# शेरलॉक होम्स ५



वृषाली जोशी

# शेरलॉक होम्स-5

मूळ इंग्लीश लेखक – ऑर्थर कॉनन डॉयल

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

# शेरलॉक होम्स-5

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# शेरलॉक होम्स-5

## लेखक : ऑर्थर कॉनन डॉयल

## अनुवादिका : वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १८ मार्च २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# शेरलॉक होम्सविषयी

ब्रिटीश लेखक सर आर्थर कॉनन डॉयल, यांच्या सिद्धहस्त लेखणीने निर्माण केलेले, शेरलॉक होम्स हे खासगी गुप्तहेराचे कपोलकल्पित पात्र आहे. निरीक्षणातील अचूकता, गुन्हेगारी शास्त्रातील जाणकारी व तर्कशास्त्रावरील हुकमत, ही त्याची गुन्हा अन्वेषणातील बलस्थाने आहेत. शेरलॉक होम्स हा, सतत तेवीस वर्षे गुप्तहेराचे काम करतो आहे. सतरा वर्षे त्याचा मदतनीस, डॉक्टर जॉन वॉटसन हा त्याच्या बरोबर काम करत असून, वॉटसनच्या लग्नापूर्वी व बायको वारल्यावर, तो आणि शेरलॉक हे दोघेही, २२१, ब, बेकर रस्ता येथे, मिसेस हडसन या मालकीणबाईंकडील सदनिकेत रहात असल्याचे दाखवले आहे. बहुतेक सगळ्या गोष्टी वॉटसनच्या तोंडून कथन केल्या गेल्या आहेत.

A Study In The Scarlet या आर्थर कॉनन डॉयल यांच्या पहिल्या पुस्तकातून हे पात्र उदयास आले व दिवसेदिवस त्याची लोकप्रियता वाढत गेली. काहीजण तर हे कल्पित पात्र नसून खराच माणूस असल्याचे समजू लागले व तो २२१, ब, बेकर रस्ता, येथे खरोखरंच रहातो, असे मानू लागले. रेडिओ व दूरदर्शनवरील नाटके, सिनेमे, शिवाय व्हिडीओ गेम्स, अशी सर्व ठिकाणे; सुमारे शंभर वर्षे, शेरलॉक होम्सने गाजवून सोडली. लंडनमध्ये शेरलॉक होम्स वस्तुसंग्रहालय आहे. सर आर्थर कॉनन डॉयल याच्या जन्मगावी, म्हणजे एडिंबरो येथील पिकार्डो येथे शेरलॉक होम्सचा पुतळाही आहे.

पहिला रहस्यकथा लेखक ॲलन पो याच्या गुप्तहेराची थोडीशी छाप, शेरलॉक होम्समध्ये भासत असली तरी, जोसेफ बेल नावाचा सर्जन, फ्रान्सिस टॅन्की स्मिथ हा पोलीस व सर हेन्री लिटील जॉन हा वैद्यकीय वकील; या खऱ्याखुऱ्या लोकांची छटाही, शेरलॉक या पात्रात कॉननने रंगवलेली दिसते. मॅक्समिलन हेलर हे फ्रेंच लेखक हेन्री कॉव्हेन निर्मित पात्रही शेरलॉक होम्स रंगवण्यासाठी त्याच्याकडून वापरले गेल्यासारखे वाटते. तरीही शेरलॉक होम्स हे अत्यंत गाजलेले, एकमेवाद्वितीय व्यक्तीचित्र असल्याचे मान्य करावेच लागेल.

# प्रस्तावना

पानागणिक उत्सुकता वाढवणाऱ्या रहस्यकथा वाचायला कोणाला आवडत नाहीत? त्याच कारणाने मीदेखील त्या वाचत गेले व मराठी लोकांसाठी त्या अनुवादित कराव्या, असे वाटले. यास्तव हा प्रपंच. या पूर्वी सहा-सहा कथांचे चार संग्रह प्रकाशित केले. त्यांना वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. म्हणून हा सहा कथांचा पाचवा संग्रह!

डॉ. वृषाली जोशी

अर्पणपत्रिका

रहस्ये उकलणाऱ्या शेरलॉक होम्सच्या चातुर्यास

# अनुवादिकेची ओळख

B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून व अकरा पुस्तके ई साहित्यतर्फे प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन

संशोधन प्रकल्पात सहभाग

कॉलेजमध्ये प्राचार्यपद

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके

सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा,

कविता करण्याचा

व शब्दकोडी बनवण्याचा छंद

संपर्क वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९

चलभाष ९९२१७४६२४५


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI

सॉमरसेटमॉम
मेजबानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
short story by W. Somerset Maugham
BEFORE
THE PARTY


वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
4 BOOKS IN ONE
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअर च्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night


The Sherlock Holmes
शेरलॉक होम्स
वृषाली जोशी


Adventures of
Sherlock
Holmes
शेरलॉक होम्स ४
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE


THE ADVENTURES OF
SHERLOCK HOLMES
शेरलॉक होम्स ३
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE


SHERLOCK
2
HOLMES
शेरलॉक होम्स-२
वृषाली जोशी

वृषाली जोशी
ATLANTISCH
OZEAN
INDISCHER
OZEAN
welt-atlas.de
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा१

वृषाली जोशी
विश्वकथा-३

# वृषाली जोशी यांच्या ई साहित्यवरील इतर अकरा पुस्तकांच्या लिंक्स

1. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dorian_gray_oscar_wilde_vrishali_joshi.pdf
2. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saki_vrishali_joshi.pdf
3. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holms_4_vrishali_joshi.pdf
4. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_1a_vrishali_joshi.pdf
5. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_2_vrishali_joshi.pdf
6. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shakespere_stories_vrishali_joshi.pdf
7. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_h_3_vrishali_joshi.pdf
8. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mejavaanipurvi_and_other_stories_somerset_maughm_vrishali_joshi.pdf
9. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/wishwakatha_vrishali_joshi.pdf
10. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/wishwakatha_3_vrishali_joshi.docx.pdf
11. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/wishwakatha_2_vrishali_joshi.pdf

# कथानुक्रम

The Adventure Of The Solitary Cyclist एकाकी सायकलस्वाराचे साहस

The Adventure Of Black Peter काळया पीटरचे साहस

The Adventure Of The Dancing Men नाचणाऱ्या माणसांचे साहस

The Adventure Of The Priory School निवासी शाळेचे साहस

The Adventure Of The Norwood Builder नॉरवूड बिल्डरचे साहस

The Adventure of the Empty House रिकाम्या घराचे साहस

# The Adventure Of The Solitary Cyclist

# एकाकी सायकलस्वाराचे साहस

१८९४ ते १९०१ या काळात मिस्टर शेरलॉक होम्स हा फार व्यग्र मनुष्य होता. असे म्हणणे योग्य ठरेल की या काळात समाजात उद्भवलेल्या कुठल्याही कठीण केसमध्ये, त्याचा सल्ला घेतला गेला नाही, असे झाले नाही. शेकडो खासगी केसेसपैकी सर्वात गुंतागुंतीच्या आणि असामान्य केसेसमध्ये त्याने प्रमुख भूमिका बजावली. चक्रावून टाकणारी खूपशी यशस्वी प्रकरणे व काही थोडी अटळ अशी फसलेली प्रकरणे, हे या लांबलचक काळातील सातत्याने केलेल्या कामाचे गमक होते. माझ्याकडे या सर्व प्रकरणांचे इत्यंभूत वर्णन होते व त्यातील अनेकांत माझाही व्यक्तिगत सहभाग होता. यापैकी कुठली गोष्ट वाचकांसमोर ठेवावी, हे ठरवणे सोपे नाही. पण ज्यांच्यामधील रुची ही गुन्ह्याच्या रानटी शारीरिक हिंसेमुळे नव्हे, तर ती उकलून काढायच्या शोधक व नाटकी पद्धतीमध्ये आहे, अशा केसेसना महत्व देण्याचा माझा आधीचा नियम मी

पाळतो. मिस व्हायोलेट स्मिथ या चार्लिंग्टनच्या सायकल चालवणाऱ्या एकाकी मुलीसंबंधीच्या बाबतीत आम्ही केलेला चौकस तपास, यामुळे मी आता ती केस वाचकांसमोर ठेवतो. ही कदाचित दुःखांत कहाणी ठरली असती. ज्या शक्तीसाठी माझा मित्र प्रसिध्द होता, त्याचे काही अनपेक्षित उदाहरण म्हणून या केसकडे बघता येणार नाही. पण या केसच्या बाबतीत असे काही मुद्दे आहेत, की ज्यामुळे ही केस माझ्याकडील गुन्ह्यांच्या लांबलचक नोंदीत जाऊन बसली. तीच आता सांगतो.

माझ्या नोंदवहीत लिहिल्याप्रमाणे, १८९५ साली एका शनिवारी २३ एप्रिलला आम्ही पहिल्यांदा मिस व्हायोलेट स्मिथबद्दल ऐकले. मला आठवते की होम्ससाठी तिची भेट ही फार नकोशी अशी होती. कारण जॉन व्हिन्सेंट या तंबाखू लक्षाधीश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यापाऱ्यांच्या गुंतागुंतीच्या कठीण समस्येत, तो तेव्हा पूर्णपणे बुडालेला होता. चपखल दर्जा आणि विचारांमधील एकाग्रता, या गोष्टींबद्दल कशाहीपेक्षा जास्त प्रेम वाटणारा माझा मित्र, त्याच्या हातातील कामामध्ये काही अडथळा आल्यास, फारच पश्चात्ताप पावत असे. पण तरीही बेकर रस्त्यावरील आमच्या कार्यालयात एक दिवस संध्याकाळी उशीरा आलेल्या, सुंदर, उंच, डौलदार तरूण मुलीची कहाणी ऐकण्यास नकार देणे, त्याच्यासारख्या मृदु स्वभावाच्या माणसासाठी अशक्य होते. तिने येऊन त्याचा सल्ला व मदत मागितली. ती तरुणी तिची कहाणी सांगण्याच्या इराद्याने आली होती. त्यामुळे त्याने त्याला वेळ नाही असे सांगणे, व्यर्थ ठरले असते. तिची कहाणी सांगितल्याशिवाय ती खोलीबाहेर पडेल, असे कदापि शक्य दिसत नव्हते. नाईलाजाने होकार देत व ओठांवर कसेबसे हसू आणत, होम्सने त्या घुसखोर सुंदरीला बसायला सांगितले व तिला काय त्रास आहे, ते कथन करण्यास सांगितले.

डोळ्यांनी तिला निरखत तो म्हणाला, “तू सायकल चालवणारी इतकी उत्साही मुलगी असल्याने, तुला निदान शारीरिक स्वरूपाचा काही त्रास असणे शक्य नाही.”

तिने आश्चर्याने स्वतःच्या पायाकडे पाहिले. सायकलचे पॅडल घासले गेल्याने, तळपायाचा कडेचा भाग थोडा चरबरीत झाला होता.

“हो मिस्टर होम्स, मी खूप सायकल चालवते. आणि त्याचा तुमच्या आजच्या भेटीशी संबंध आहे.”

एखादा शास्त्रज्ञ ज्या थाटात त्याचा अभ्यासविषय असलेला नमुना बघेल, त्या थाटात माझ्या मित्राने तिचा बिनमोज्याचा हात हातात घेतला आणि जवळून, लक्ष देऊन बघितला.

नंतर तो सोडून देत, तो बोलला, “माझी खात्री आहे की तू मला माफ करशील. पण हा माझा व्यवसाय आहे. तू टाईपरायटर वापरत असणार, असे चुकीचे मला वाटत होते. अर्थात, हे संगीत आहे. वॉटसन, तू रुंद व गुळगुळीत टोके असलेली बोटे बघितलीस का? ते दोन्ही व्यवसायांचे वैशिष्ट्य आहे. तरीही चेहऱ्याबाबत आत्मिक शक्ती जाणवते” -- तिने तो हळूहळू उजेडाकडे वळवला – “जी टंकलेखनाने येत नाही. ही मुलगी संगीतज्ञ आहे.”

“हो, मिस्टर होम्स, मी संगीत शिकवते.”

“या देशात तू शिकवत असणार. तुझ्या कांतीवरुन मी ते ओळखले.”

“हो सर, फारहॅमजवळ, सरेच्या सीमेलगत.”

“तो खूप रोमांचक आठवणींनी भरलेला सुंदर भाग आहे. वॉटसन, तुला आठवते का की तिथे आपण आर्ची स्टॅमफोर्ड या प्रती काढणाऱ्याला भेटलो होतो. मिस व्हायोलेट, सरेच्या सीमेलगत असलेल्या फारहॅमजवळ काय झाले ते सांग.”

त्या तरुण स्त्रीने शांत व संयत पद्धतीने, स्पष्टपणे सांगायला सुरवात केलीः

“मिस्टर होम्स, माझे वडील वारले आहेत. त्यांचे नाव जेम्स स्मिथ असून, ते जुन्या इम्पिरिअल थिएटरमध्ये ऑर्केस्ट्रा चालवत असत. ते गेल्यावर, राल्फ स्मिथ नावाचे माझे काका सोडून, आम्हाला कुणीच नातेवाईक उरले नाहीत. माझे काका पंचवीस वर्षांपूर्वी आफ्रिकेला गेले. आणि तेव्हापासून आमचा त्यांच्याशी काहीही संबंध आला नाही. जेव्हा वडील वारले, तेव्हा

आमची अवस्था गरीबीची झाली. पण एक दिवस आम्हाला कळले, की आमची चौकशी करत, टाईम्समध्ये एक जाहिरात आली आहे. आपले नशीब उघडले की काय, या विचाराने आम्ही हरखून गेलो. जाहिरातीत नाव दिलेल्या वकिलाकडे आम्ही गेलो. तिथे आम्हाला दक्षिण आफिकेहून घरी परतलेले मिस्टर कॅरुथर्स आणि मिस्टर वूडले असे दोघेजण भेटले. ते म्हणाले की माझे काका त्यांचे मित्र होते व काका जोहान्सबर्गमध्ये काही महिन्यांपूर्वी मोठ्या गरिबीत मृत्यु पावले. शेवटचा श्वास घेतांना त्यांनी आम्हाला तुम्हाला शोधून काढून, तुमची चौकशी करण्यास सांगितले. हे आम्हाला विचित्र वाटले, की राल्फकाकांनी ते जिवंत असतांना कधी आमच्याशी संपर्क साधला नाही व आता त्यांच्या मरणानंतर आमची काळजी घेण्यास सांगितले. पण मिस्टर कॅरुथर्स यांनी स्पष्ट केले, की याचे कारण असे होते की राल्फकाकांनी नुकतेच त्यांच्या भावाच्या मरणाबद्दल ऐकले. त्यामुळे त्यांना आमची काळजी वाटली."

होम्सने मध्येच विचारले, "ही केव्हाची गोष्ट आहे?"

"चार महिन्यांपूर्वीची -- मागील डिसेंबरमधील."

"ठीक आहे. पुढे सांग."

"मिस्टर वूडले हे मला त्यांच्यापासून दूर निघून जावे, असे गृहस्थ वाटले. ते लाल मिशांचे, सुजलेल्या चेहऱ्याचे व खडबडीत कांतीचे असून त्यांचे केस दोन्ही बाजूंनी कपाळावर रुळत होते. ते माझ्याकडे सतत डोळे फाडून बघत होते. तो नक्कीच द्वेष वाटेल असा माणूस होता -- माझी खात्री होती की सिरीलला, माझे ज्याच्याबरोबर लग्न ठरले आहे त्याला, मी असल्या माणसाशी ओळख करून घ्यावी असे नक्कीच वाटले नसते."

होम्स हसत बोलला, "त्याचे नाव सिरील आहे तर!"

ती तरूण स्त्री लाजून हसली.

“हो मिस्टर होम्स, सिरील मॉर्टन. तो इलेक्ट्रीकल इंजिनियर आहे. आम्ही दोघे उन्हाळ्याच्या शेवटी लग्न करणे अपेक्षित आहे. पण मी त्याच्याबद्दल काय सांगत बसले? मला असे सांगायचे होते, की मिस्टर वूडले टाळावे असे असले, तरी मिस्टर कॅरुथर्स हे वयातीत व जास्त चांगले वाटत होते. ते काळसर, पिवळ्या रोगीष्ट कांतीचे, घोटून दाढी केलेले व शांत गृहस्थ होते. त्यांचा स्वभाव नम्र दिसत होता व चेहऱ्यावर मृदु हास्य होते. त्यांनी आमची चौकशी केली, की कसे आम्ही एकाकी राहिलो. आमची खूप गरिबी असल्याचे त्यांना समजल्यावर, त्यांनी मला असे सुचवले की मी त्यांच्या एकुलत्या एक असलेल्या दहा वर्षाच्या मुलीला संगीत शिकवावे. मी म्हटले की मला माझ्या आईला सोडून जायचे नाही. तेव्हा ते म्हणाले की शनीवार रविवार मी माझ्या घरी जाऊन माझ्या आईला भेटावे आणि ते मला वर्षाला शंभर पौंड देतील. हा पगार चांगला होता. मी ते कबूल केले. फारहॅमपासून सहा मैलांवर असलेल्या चिल्टर्न ग्रंज इथे मी जाऊन राहीले. मिस्टर कॅरुथर्स हे विधुर होते. पण त्यांनी घरी एक घर सांभाळणारी मिसेस डीक्सन नावाची वयस्क व चांगली बाई ठेवली होती. ती सर्व काही व्यवस्थित बघे. ती मुलगी तिची लाडकी होती व सर्व काही सुरळीत चालू होते. मिस्टर कॅरुथर्स हे दयाळू व संगीत आवडणारे होते. आमच्या संध्याकाळी एकत्रपणे छान जात. दर शनीवार रविवार मी घरी जाऊन आईला भेटत असे.

माझ्या आनंदाला गालबोट लागले ते लाल मिशांच्या मिस्टर वूडले यांच्या आगमनामुळे! ते तिथे दर आठवड्याला येत आणि अरेरे! मला ते तीन महिने वाटत. ती त्रासदायक व्यक्ती होती -- ते सर्वांवर जादापणा करत, पण माझ्यावर सर्वात जास्त करत. ते माझ्यावर नकोसे प्रेम करत, त्यांच्या श्रीमंतीबद्दल बढाया मारत व म्हणत की मी त्यांच्याशी लग्न केले तर, मला लंडनमधील सर्वात सुंदर हिरे मिळतील. शेवटी त्यांना जेव्हा कळले, की मला त्यांच्याशी काही देणेघेणे नाही, तेव्हा एक दिवस त्यांनी मला जेवणानंतर त्याच्या बाहूत पकडले -- ते वाईट रीत्या आडदांड होते. ते म्हणू लागले की मी त्यांचे चुंबन घेतल्याशिवाय, ते मला सोडणार नाहीत. मिस्टर कॅरुथर्स आल्यावर, माझी सुटका झाली. तेव्हा ते फारच चिडले व त्यांनी मिस्टर कॅरुथर्सना खाली पाडून

त्यांच्या चेहऱ्यावर ओरबाडले. तुम्ही कल्पना करू शकता, की ती त्यांची शेवटची भेट ठरली. मिस्टर कॅरुथर्सनी दुसऱ्या दिवशी माझी क्षमा मागितली व पुन्हा असे कधीही होणार नाही असे सांगितले. त्यानंतर मी कधी मिस्टर वूडलेना पाहिले नाही.

"आणि मिस्टर होम्स, शेवटी आज मी एका विशेष अशा कारणाने तुमचा सल्ला मागायला येऊन पोचले आहे. तुम्हाला हे माहिती पाहिजे, की दर शनिवारी दुपारी मी माझी सायकल घेऊन फारहॅम स्टेशनवर जाते. तेथून १२. २२ ची गाडी पकडते. चिल्टर्न ग्रंजपासून स्टेशनचा रस्ता सुनसान आहे. चिल्टर्न ग्रंज येथील गवताळ ओसाड भागापासून पासून चार्लिंग्टन हॉलभोवती पसरलेल्या जंगलापर्यंतच्या मैलभरात एका ठिकाणी तर तो फारच सुनसान आहे. इतका एकाकी रस्ता तुम्ही पाहिला नसेल. क्रुक्सबरीजवळील उंच रस्ता लागेपर्यंत, एखादी गाडी किंवा एखादा शेतकरीसुद्धा तिथे दिसणे मुश्कील आहे. दोन आठवड्यांपूर्वी मी तिथून जात होते, तेव्हा मी सहज मागे वळून पाहिले, तर माझ्या मागे साधारण दोनशे यार्डांवर मी एका बुटक्या, काळी दाढी असलेल्या मध्यमवयीन माणसाला सायकलवर पाहिले. फारहॅम येण्यापूर्वी मी एकदा परत वळून पाहिले तर तो माणूस दिसला नाही. त्यामुळे मग मी त्याचा जास्त विचार केला नाही. पण मी किती आश्चर्यचकित झाले होते, याची तुम्ही कल्पना करू शकता. मिस्टर होम्स, सोमवारी परततांना मी परत त्या माणसाला रस्त्याच्या त्याच भागात पाहिले. जेव्हा ही घटना पूर्वीसारखीच पुढच्या शनिवार रविवारी परत घडली, तेव्हा मला वाटणारे नवल अजून वाढले. तो नेहमी तेवढे अंतर ठेवे व मला काही छेडत नसे. पण हे जरा विचित्रच होते. माझे म्हणणे ऐकण्यात रुची असलेल्या मिस्टर कॅरुथर्सना मी हे सांगितले. ते मला म्हणाले की ते काही करतील. मी यापुढील काळात त्या सुनसान रस्त्यावर कुणी सोबत असल्याशिवाय जाऊ नये, म्हणून त्यांनी एक घोडा व कुत्र्याच्या गाडीची मागणी नोंदवली. तो मनुष्य नेहमी इतका लांब असे, की मला त्याचा चेहरा स्पष्टपणे दिसत नसे. पण नक्कीच तो कुणी माझ्या माहितीतला नव्हता. तो गडद रंगांच्या कपड्यात असे व टोपी घाले. त्याच्या चेहऱ्याचा मला ठळकपणे दिसणारा भाग म्हणजे

काळी दाढी हाच फक्त होता. आज मी सावध नव्हते, पण मी उत्सुकतेने तो कोण आहे व त्याला काय हवे आहे, हे पहायचे ठरवले. मी सायकलचा वेग हळू केला. पण त्यानेही तसेच केले. मी पूर्णपणे थांबले. तर तोही थांबला. मग मी त्याच्यासाठी एक युक्ती केली. जिथे रस्ता एकदम खूप कठीण वळण घेतो. तिथे मी एकदम वेगात गेले व थांबले. तो मला ओलांडून झटक्यात पुढे जाईल, अशी माझी अपेक्षा होती. पण तो आलाच नाही. मग मी मागे गेले व कोपऱ्यापर्यंत नजर टाकली. मला एक मैलभर रस्ता दिसत होता. पण त्याचा पत्ता नव्हता. त्यात भर म्हणजे, जिथे तो जाऊ शकेल असा एखादा रस्ता तिथे कडेला नव्हता."

होम्स शांतपणे हसला व हात चोळले. तो म्हणाला, "ही थोडी वैशिष्ट्यपूर्ण केस दिसते आहे. तू वळलीस व रिकामा रस्ता पाहिलास, यात मध्ये किती वेळ गेला?"

"दोन किंवा तीन मिनिटे."

तर मग तो त्याच रस्त्याने परत गेला नाही. आणि तू म्हणतेस की कडेला दुसरा एखादा रस्ता नव्हता."

"नव्हता."

"मग नक्कीच तो रस्त्याच्या एका किंवा दुसऱ्या बाजूच्या पदपथाच्या कडेने गेला असणार."

"तो गवताळ ओसाड भागाच्या पलीकडे गेल्याने मला दिसला नसावा."

"तेव्हा आपण अशा निष्कर्षाला पोचतो, की तो चार्लिंग्टन हॉलच्या दिशेने गेला. माझ्या समजुतीप्रमाणे तो रस्ता त्या गवताळ ओसाड भागाच्या कडेने जातो. अजून काही?"

"अजून काही नाही, मिस्टर होम्स. फक्त मी इतकी चक्रावून गेले आहे, की तुम्हाला भेटल्याशिवाय व तुमचा सल्ला मागितल्याशिवाय मला चैन पडेना."

होम्स थोडा वेळ शांत बसला.

शेवटी त्याने विचारले, “तुझे ज्याच्याशी लग्न ठरले आहे, तो मनुष्य कुठे आहे?

”तो कॉव्हेन्ट्रीमध्ये मिडलँड इलेक्ट्रीकल कंपनीत आहे.”

“तो तुला एकदम अचानक भेटायला येऊ शकणार नाही का?”

“ओहो, मिस्टर होम्स, जसे काही मला तो माहितीच नाही.”

“तुला वाखांणणारे अजून कोणी आहेत का?”

“सिरीलची ओळख होण्यापूर्वी बरेच जण.”

“आणि तेव्हापासून?”

“जर तुम्ही त्याला माझा चाहता म्हणणार असाल तर, तो भयंकर माणूस, वूडले.”

“अजून कोणी नाही?”

आमची सुंदर अशील थोडी गोंधळलेली वाटली.

होम्सने विचारले. “तो सायकलस्वार कोण असावा?”

“ती कदाचित माझी नुसती कल्पना असेल. पण मला कधीकधी असे वाटते की मिस्टर कॅरुथर्स माझ्यात खूप रस घेतात. आम्ही बराच वेळ एकत्र असतो. मी संध्याकाळी त्यांच्याबरोबर असते. ते कधीच तसे काही म्हणाले नाहीत. ते अगदी सभ्य गृहस्थ आहेत. पण बायकांना सहाव्या ज्ञानेंद्रियाने सारे काही कळते.”

होम्स चिंतीत दिसला. “हं! तो उदरनिर्वाहासाठी काय करतो?”

“तो श्रीमंत मनुष्य आहे.”

“त्याच्याकडे टांगा किंवा घोडे नाहीत?”

“मला तरी तो बऱ्यापैकी सधन वाटतो. तो आठवड्यातून दोनतीन वेळा शहरात जातो. त्याला दक्षिण आफ्रिकेच्या सोन्याच्या शेअरमध्ये बराच रस आहे.”

मिस स्मिथ, काही ताजी घडामोड असेल, तर मला कळवा. मी आत्ता दुसऱ्या एका कामात फार अडकलो आहे. पण तुमच्या केससाठी मी निश्चितच वेळ काढेन. मध्यंतरीच्या काळात मला कळवल्याशिवाय, काही हालचाल करू नका. अच्छा. माझा विश्वास आहे की तुमच्याकडून मला चांगली बातमीच मिळेल.”

होम्सने त्याचा पाइप काढला व बोलला, “अशा मुलीला अनेक चाहते असणे हे अगदी नैसर्गिक आहे. पण म्हणून सुनसान रस्त्यावर तरी ते नकोत. संशयातीतपणे कोणी गुप्त चाहता असला पाहिजे. पण हे या केसबद्दलचे चौकस आडाखे आहेत, वॉटसन.”

पण तो फक्त त्या रस्त्यावरच का दिसावा?”

“तेच तर. आपल्याला पहिल्यांदा चार्लिंग्टन हॉलमध्ये कोण रहाते, हे शोधले पाहिजे. मग परत, वूडले व कॅरुथर्स यांच्यामधील नाते शोधले पाहिजे. कारण ते दोघेही वेगळ्या प्रकारचे लोक वाटतात. राल्फ स्मिथचे नातेवाईक शोधून काढण्यात दोघांनाही कसा काय रस होता? अजून एक मुद्दा. घर स्टेशनपासून सहा मैल असतांना, बाजारभावापेक्षा दुप्पट पगार मुलीला संगीत शिकवणारीला द्यायचा पण घोडा किंवा टांगा ठेवायचा नाही, ही कसली गृहव्यवस्था? काहीतरी विचित्र वॉटसन, -- फारच विचित्र!”

“तू त्यात लक्ष घालणार का?”

“नाही, माझ्या प्रिय मित्रा. तू ती केस बघ. हे फार महत्वाचे प्रकरण वाटत नाही. माझ्या दुसऱ्या महत्वाच्या केसच्या तपासाचे काम, मी यासाठी सोडू शकत नाही. सोमवारी तू लवकर फारहॅमला जाऊन मग चार्लिंग्टन हॉलभोवती पसरलेल्या जंगलापर्यंतच्या भागात जाशील व तिने सांगितलेल्या खऱ्याखोट्याची शहानिशा करशील. त्यावरून तुला जसे योग्य वाटतील, तसे निर्णय

घेऊन तू नंतर चार्लिंग्टन हॉलमध्ये रहाणाऱ्यांची चौकशी करशील व सर्व प्रकाराचा अहवाल मला येऊन देशील. आणि वॉटसन, आता यावर अजून चर्चा नाही. आपल्याला काही भक्कम पुरावे मिळणे अपेक्षित आहे, ज्यावरुन आपल्याला ही केस सोडवण्यासाठी मदत होईल.'

आम्ही त्या मुलीकडून खात्री करून घेतली, की ती ती सोमवारी वॉटरलूहून ९.५० ला सुटणाऱ्या गाडीने निघेल. त्यामुळे मी सकाळी लवकर ९.१३ ची गाडी पकडली. फारहॅम स्टेशनवरून चार्लिंग्टनला जाण्यात मला काही अडचण आली नाही. त्या तरूण स्त्रीच्या साहसाचे दृष्य चुकवणे अशक्य होते. कारण उघड्या जंगलातून रस्ता जात होता. एका बाजूला सूचीपर्णी वृक्षांचे कुंपण होते. तर दुसऱ्या बाजूला मोठीमोठी झाडे असलेली बाग होती. मुख्य रस्त्यातील दगडांवर वेली पसरलेल्या होत्या. प्रत्येक बाजूचे खांब विशिष्ट प्रकारच्या पुसट होत चाललेल्या चिन्हांनी भरलेले होते. पण मी काय निरीक्षण केले, की या मुख्य रस्त्याशिवाय, कुंपणातील फटींमधून रस्ते फ़ूटत होते. रस्त्यावरून घर दिसत नव्हते. पण आजूबाजूची पडझड, अंधार व मरगळ दिसत होती. जंगल पिवळ्या फुलांच्या झुडुपांनी भरून गेले होते व त्या पिवळ्या फुलांवर उन्हाळ्यातील उन पडून ती चकाकत होती. अशाच एका झुडुपामागे, मी दडून बसलो. तिथून मला चार्लिंग्टन हॉलचे दार व दोन्ही बाजूचा रस्ता लांबपर्यंत दिसत होता. पहिल्यांदा तो सुनसान होता पण आता मला मी आलो, त्याच्या विरुद्ध बाजूने येणारा एक सायकलस्वार दिसला. त्याने गडद सूट घातला होता आणि त्याला काळी दाढी होती. चार्लिंग्टन मैदानाचा शेवट गाठल्यावर, त्याने सायकलसकट कुंपणाच्या कडेने उडी मारली आणि माझ्या डोळ्यादेखत नाहीसा झाला.

पंधरा मिनिटे गेली. मग दुसरी सायकल दिसू लागली. स्टेशनपासून एक तरुणी येत होती. ती चार्लिंग्टनच्या इथे झुडूपांशी येईपर्यंत मी तिचे निरीक्षण करत होतो. क्षणार्धात तो मनुष्य त्याच्या लपायच्या जागेतून बाहेर आला. त्याच्या सायलवर स्वार झाला आणि तिच्यामागे जाऊ लागला. त्या परिसरात एवढ्या दोनच हलणाऱ्या आकृत्या होत्या. तिच्या सायकलवर ताठ बसलेली मुलगी आणि सायकलच्या हँडलवर वाकून बसलेला व प्रत्येक हालचालीतून चौकस

लपाछपी दिसत असलेला माणूस. तिने मागे वळून त्याच्याकडे पाहिले व सायकलचा वेग कमी केला. त्याने पण तसेच केले. ती थांबली. ताबडतोब तोही दोनशे यार्डावर थांबला. तिची पुढची कृती उस्फूर्त पण अनपेक्षित होती. तिने अचानक तिची सायकल वळवली व आणि सरळ जाऊन त्याच्यावर आदळवायचा प्रयत्न केला. तोही तिच्याइतकाच चपळ होता. तरीही दयनीय रीतीने तो हवेतून फेकला गेल्यासारखा झाला. नंतर ती परत तिच्या रस्त्याला लागली व तिचा आब राखत, त्या माणसाची दखल न घेता, पुढे जात राहिली. तोही वळला आणि परत तसेच अंतर ठेऊन तिच्यामागे येऊ लागला. रस्ता वळला तिथे शेवटी दोघेही माझ्या नजरेच्या टप्प्याबाहेर गेले. मी माझ्या जागीच लपून बसलेला राहिलो. आणि ते मी बरेच केले. कारण तो माणूस परत दिसू लागला. तो हळूहळू सायकल मारत येत होता. तो हॉलच्या दरवाज्याशी येऊन आत शिरला आणि सायकलवरून उतरला. काही वेळ मला तो झाडांमध्ये उभा असलेला दिसत होता. त्याचे हात वर केलेले होते. आणि तो त्याचा टाय नीट करत होता. नंतर तो परत सायकलवर चढला आणि माझ्यापासून दूर हॉलच्या दिशेने गेला. मी त्या गवताळ मोकळ्या जागेतून धावत गेलो. झाडांमधून डोकावून पाहिले. लांबून मला उंच धुराडी बाहेर आलेल्या करड्या इमारतीचा भाग दिसत होता. पण रस्ता दाट झुडुपांमधून जात असल्याने, मला नंतर तो मनुष्य दिसला नाही.

मला असे वाटले, की मी सकाळी बऱ्यापैकी काम केले आहे. आणि मी मोठ्या आनंदाने फारहॅमला परतलो. घरांचा स्थानिक दलाल मला चार्लिंग्टन हॉल येथील घरांबद्दल, काही सांगू शकला नाही. त्यासाठी त्याने मला पॉल मॉल येथील एका प्रसिध्द कार्यालयाचा पत्ता दिला. मी घरी जातांना वाटेत तिथे थांबलो व तेथील दलालाला भेटलो. पण मला उशीर झाल्याने चार्लिंग्टन हॉल येथील जागा उन्हाळ्यासाठी मिळाली नाही. ती महिन्यापूर्वीच कुणाला तरी दिली गेली होती. मिस्टर विलीअँम्सन असे त्या भाडेकरूचे नाव होते. तो वयाने मोठा, मान द्यावा असा, सभ्य गृहस्थ होता. तो नम्र दलाल अजून काही बोलला नाही. कारण त्याच्या भाडेकरूच्या इतर बाबींची चर्चा तो करू शकत नव्हता.

मिस्टर शेरलॉक होम्सने त्या संध्याकाळी, मी सांगितलेले सारे काही लक्षपूर्वक ऐकून घेतले. पण त्याने मी ज्याची वाट बघत होतो ते, मी बरे काम केल्याचे चार शब्द काही तोंडातून काढले नाहीत. उलट त्याचा कठोर चेहरा आणखीनच कठोर झाला.

नंतर तो बोलला. "माझ्या प्रिय वॉटसन, तुझी लपायची जागा फार चुकीची होती. तू कुंपणापलीकडे असायला हवे होतेस. म्हणजे तुला त्या माणसाला जवळून बघता आले असते. तू काही शे यार्ड लांब असल्याने, मिस स्मिथपेक्षाही कमी वर्णन करू शकलास. तिला वाटते की ती त्या माणसाला ओळखत नाही. पण मला वाटते की ती ओळखते. नाहीतर तिने त्याच्याजवळ त्याला बघण्यासाठी येऊ नये, याबद्दल तो इतका ठाम का असेल? सायकलच्या हँडलवर वाकून बसलेला, असे त्याचे वर्णन तू केलेस. पण हे परत चेहरा दिसू नये म्हणून केल्यासारखेच वाटते, नाही का? तू फारच वाईट काम केले आहेस. तो त्याच्या घरी परततो आणि तुला तर शोधून काढायचे आहे की तो कोण आहे. पण तू फक्त लंडनच्या घरे विकणाऱ्या दलालाला भेटतोस!"

मी थोड्या रागाने ओरडलो, "मग मी काय करायला हवे होते?

"तू जवळपासच्या एखाद्या सार्वजनिक जागी जायला हवे होतेस. ती गावगप्पांची जागा असते. त्यांनी तुला मालकापासून मोलकरणीपर्यंत सगळ्यांची नावे सांगितली असती. विलीअँम्सन? यामुळे मला काहीच उलगडा होत नाही. जर हा वयाने मोठा माणूस आहे, तर मग तो सायकलस्वार असू शकत नाही कारण मग तो तरुणीच्या चपळ हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करून, पळून जाऊ शकत नाही. तुझ्या मोहिमेनंतर आपल्याला काय नवीन समजले? त्या मुलीच्या शौर्याची हकीगत खरी आहे व सायकलस्वाराचा चार्लिंग्टन हॉलशी काहीतरी संबंध आहे. त्याबद्दल मला संशय नाही. विलीअँम्सनने तेथे भाड्याने जागा घेतली आहे. पण तो कोण आहे? ठीक आहे. ठीक आहे. प्रिय सर, एवढा नाराज होऊ नकोस. आपण पुढील शनिवारी अजून शोध घेऊ. आणि मध्यंतरीच्या काळात, मीदेखील काही चौकशा करतो."

दुसऱ्या दिवशी सकाळी, आम्हाला मिस स्मिथकडून एक चिठ्ठी मिळाली. मी बघितलेले प्रसंग त्यात तपशीलवार लिहिलेले होते. पण त्यातील मजकूर पुढीलप्रमाणे होताः

मिस्टर होम्स, माझी खात्री आहे की माझा आत्मविश्वास पाहून तुम्ही खूष व्हाल. कारण मिस्टर कॅरुथर्स यांनी मला लग्नाची मागणी घातली आहे व त्यामुळे मी फारच अडचणीत आले आहे. मला कल्पना आहे की त्यांच्या भावना खोलवर व मान द्याव्या अशा आहेत. परंतु त्याच वेळी मी माझा नकार दिलेला आहे. तो त्यांनी फार गंभीरपणे पण धीराने घेतलेला आहे. तुमच्या लक्षात येईल की परिस्थिती जरा तणावपूर्ण आहे.

चिठ्ठी वाचल्यावर होम्स विचारपूर्वक म्हणाला, "आपली अशील खोल पाण्यात बुडत चालली आहे. या केसमध्ये नक्कीच अजून रुचीपूर्ण गोष्टी असणार. मी पूर्वी विचार केला होता, त्यापेक्षा काही जास्त या केसमध्ये घडते आहे. मला शांतपणे आजचा दिवस घालवायचा होता. पण मी मनात विचार केलेल्या एकदोन गोष्टी तपासून बघण्यासाठी आज दुपारी बाहेर पडावे की काय, असे मला वाटते आहे.

अशा तऱ्हेने होम्सचा शांत दिवस नवलपूर्ण रीतीने संपला. कारण तो रात्री उशिरा फाटलेला ओठ घेऊन व कपाळावर रंगहीन टेंगूळ घेऊन बेकर रस्त्याला आला. दमलेल्या अवतारात तो स्कॉटलंड यार्ड तपास अधिकाऱ्यांसमोर उठून दिसत असणार. तो त्याच्या स्वतःच्या हास्यास्पद साहसी कृत्यांच्या आठवणींनी बेजार होऊन, मनापासून हसत सुटला होता.

तो म्हणाला, "अलीकडे मला खूप कमी शारीरिक व्यायाम घडतो. त्यामुळे आज मला चांगलाच व्यायाम घडला. तुला माहिती आहे, की बॉक्सींग या ब्रिटीश खेळात मला बऱ्यापैकी गती आहे. प्रसंगापरत्वे, ती माझ्या कामी येते. उदाहरणार्थ, आज मला चार लोकात लाज येऊन, दुःख झाले असते."

मी त्याला म्हटले, की काय घडले, ते नीट सांग."

मी तुला आधीच शिफारस केलेल्या दारूच्या गुत्त्यात जाऊन, मी चौकशी केली. तेथील बडबड्या मालकाने, मला पाहिजे ती सगळी माहिती दिली. विलीअँम्सन हा पांढरी दाढी असलेला मनुष्य आहे. तो काही नोकरांबरोबर चार्लिंग्टन हॉलमध्ये एकटाच रहातो. तो पूर्वी धर्मगुरू असल्याची अफवा आहे. त्याच्या तेथील अल्प काळच्या वास्तव्यात घडलेल्या एकदोन प्रसंगांवरून, मला अशी शंका आली की त्याला चर्चमधून काढून टाकले असावे. मी आधीच एका ठिकाणी चौकशी केली होती. त्यांनी मला सांगितले की त्यांच्याकडील कागदपत्रांमध्ये अशा अशा नावाचा, वाईट कारकीर्द असलेला माणूस होता. मालक पुढे म्हणाला की एक चार्लिंग्टन हॉलवर दर शनिवार रविवार येणारा माणूस होता. एकदम गरम मामला! सर. तो लाल मिशा असलेला मिस्टर वूडले होता. एवढे आम्ही बोलतो आहोत तोच, तो स्वतःच तिथे हजर झाला. तो बिअर पीत बसला होता. त्याने आमचे सर्व संभाषण ऐकले होते. तो गुरगुरला, "मी कोण आहे? मला काय हवे आहे? मी प्रश्न का विचारतो आहे? हे सर्व काय चालले आहे?" त्याची भाषा रांगडी होती व विशेषणे फार ठसठशीत होती. त्याच्या दुष्ट हाताच्या मागच्या बाजूने तो एक निरुपयोगी दोर फिरवत होता. त्याचा फटका मी टाळू शकलो नाही. पुढची काही मिनिटे फार प्रेक्षणीय होती. एक दांडगट मारामारीपटू व एक साधा सरळ मनुष्य अशी जोडी होती. त्यातून मी तुला आत्ता जसा दिसतो आहे, तसा बाहेर पडलो. मिस्टर वूडले गाडीतून घरी गेला. अशी माझी तेथील भेट झाली आणि मला कबूल केले पाहिजे, की कितीही मजा आली तरी, माझा सरेच्या सीमेवरचा दिवस तुझ्या तेथील भेटीपेक्षा फार काही लाभदायी ठरला नाही."

गुरुवारी आमच्या अशीलाकडून अजून एक पत्र आले. ते असे होतेः

मिस्टर होम्स, "तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटणार नाही की, मी मिस्टर कॅरुथर्स यांच्याकडील नोकरी सोडली आहे. मला माझ्या भरपूर पगारापेक्षा, माझा अशा परिस्थितीतील अस्वस्थपणा, जास्त महत्वाचा वाटतो. शनिवारी मी माझ्या घरी आले, की परत जाणार नाही. मिस्टर कॅरुथर्स यांचा काही एक सापळा होता. सुनसान रस्त्याचा धोका होता. ते सर्व आता संपले.

माझे नोकरी सोडायचे कारण फक्त मिस्टर कॅरुथर्सबरोबरील अस्वस्थता एवढेच नव्हते, तर तिथे परत येऊ लागलेला तो वूडले नावाचा बेकार मनुष्य, हे देखील होते. तो नेहमी कुरूप होताच पण आता तो जास्तच भीतीदायक दिसू लागला होता. कारण त्याला एक अपघात झाला व त्यामुळे त्याचा निदान जो काही शारीरिक डौल होता, तो सर्व गेला आहे. मी त्याला खिडकीतून पाहिले. पण तो मला भेटला नाही. त्यामुळे मला बरे वाटले. त्याचे मिस्टर कॅरुथर्स यांच्याबरोबर खूप वेळ बोलणे झाले. त्यामुळे ते दोघे नंतर बरेच उद्दीपित दिसत होते. मला वाटते बहुधा मिस्टर वूडले शेजारीच रहात असावेत, कारण ते इथे झोपले नाहीत. तरीही आज सकाळी मी त्यांना शांतपणे झुडूपांमधून फिरतांना ओझरते पाहिले. लवकरच माझ्या दृष्टीने एक रानटी जनावर इथे मोकळे असणार होते. मला त्यांची किळस येते. मी त्यांना किती घाबरते, ते मी सांगू शकत नाही. मिस्टर कॅरुथर्स अशा प्राण्याला क्षणभरासाठीसुद्धा कसे काय सहन करू शकतात? तसेही आता शनिवारपासून माझा हा सर्व त्रास संपेल."

"माझा विश्वास आहे, वॉटसन, मला वाटते तिथे त्या मुलीच्या बाबतीत, काही खोलवर उत्सुकता चाळवणारे असे काही घडते आहे. शेवटच्या प्रवासाच्या दिवशी तिच्यावर काही बाका प्रसंग गुदरणार नाही हे बघणे, आपले कर्तव्य आहे. वॉटसन, मला वाटते, आपण दोघांनी शनिवारी सकाळी वेळ काढून असे पाहिले पाहिजे, की या प्रकरणाचा शेवट विपरीत होणार नाही."

मला कबूल केले पाहिजे, की आत्तापर्यंत मी या केसचा फार गंभीरपणे विचार केला नव्हता. ती केस मला विनोदीपणे थोडी कुरूप व मनोरंजन करणारी, विचित्र पण धोकादायक अशी वाटत होती. एखाद्या माणसाने सुंदर, तरुण मुलीचा पाठलाग करावा, ही काही जगावेगळी गोष्ट नाही. आणि जर तो इतका धीट नसेल की तिला भेटेल किंवा तिने बघितल्यावर पळून जाणार नाही, तर मग तो तिच्यावर काही हल्ला करायची भीती नसावी. अतिरेकी वूडले हा खूप वेगळ्या प्रकारचा माणूस होता. पण एक प्रसंग सोडला, तर त्याने तिला काही त्रास दिला नव्हता. आता तिच्या तेथील अस्तित्वाची दखल न घेता, तो कॅरुथर्स यांच्या घरात वावरत असेल तर ठीक आहे. पण

होम्सच्या लक्षात आले होते की सायकलस्वार मनुष्य, चार्लिंग्टन हॉल येथील शनिवार रविवार होणाऱ्या मेजवानीचा सभासद असावा. तो कोण होता व त्याला काय पाहिजे होते, हे मात्र समजले नव्हते. इथून निघण्यापूर्वी होम्सने खिशात पिस्तुल ठेवले होते. तेव्हा मला असे वाटले होते, की या चौकस घटनासाखळीचा काही दुःखांत होणार आहे की काय.

रात्रभराच्या पावसानंतर सकाळी छान उजाडले. त्या गावठी जंगलाचा तो भाग फुलांच्या ताटव्यांनी भरून गेला. लंडनच्या करड्या उजाड रखरखीत आसमंतापेक्षा ही मोहकता डोळयांना सुखावत होती. होम्स आणि मी रुंद वालुकामय रस्त्यावरून सकाळच्या ताज्या हवेचा आस्वाद घेत व पक्ष्यांचे कूजन ऐकत चाललो होतो. क्रुक्सबरी टेकाडापासून निघणाऱ्या रस्त्यावर आम्हाला, उंच उंच ओक वृक्षांमधून जुन्या हॉलचा वरील भाग दिसत होता. त्याभोवतालच्या इमारती त्यामानाने नवीन होत्या. होम्सने मला जंगलाचा तपकीरी भाग व उमलणाऱ्या फुलांचा हिरव्या पट्ट्यामधील लाल पिवळसर असा रस्त्याचा लांब भाग दाखवला. लांबवर आम्हाला ठिपक्यासारखे एक वाहन आमच्या दिशेने येतांना दिसू लागले. होम्सने अधीरपणे काही उद्गार काढला.

तो म्हणाला, "मी अर्ध्या तासाची मुदत दिलेली आहे. हा जर तिच्यासाठीचा सापळा असेल, तर ती आधीच्या गाडीने जात असणार. वॉटसन, मला भीती वाटते की आपण तिला गाठण्यापूर्वीच ती चार्लिंग्टन ओलांडेल की काय."

आम्ही चढ ओलांडल्यापासून आम्हाला वाहन दिसेनासे झाले. पण आम्ही आमचा वेग इतका वाढवला, की माझ्यासारख्या बैठे आयुष्य जगणाऱ्या माणसाला तो डोस जास्तच वाटला. त्यामुळे मी मागे पडलो. होम्स मात्र तयार गडी असल्याने, त्याच्याकडे भरपूर क्षमता होती. तो त्याच्या उडत्या चालीने माझ्यापुढे शंभर यार्ड जात होता. अचानक तो थांबला. त्याने त्याचे हात दुःखाने हताश होऊन हवेत उडवलेले मी पाहिले. त्याच वेळी एक कुत्र्यांची रिकामी गाडी व घोडा रस्त्यावर आमच्याकडे हळूहळू येतांना दिसू लागले.

मी धावत त्याच्याजवळ गेलो तेव्हा होम्स ओरडला, “फार उशीर झाला. वॉटसन, फार उशीर झाला. मी तिला आधीच्या गाडीने जाऊ नकोस, म्हणून सांगायला हवे होते. तिचे अपहरण झाले. वॉटसन, तिचे अपहरण झाले. बहुतेक खून झाला. देवाला ठाऊक की नक्की काय झाले? रस्ता अडवा! घोडा थांबवा! हे ठीक आहे. आता उडी मार. मी मूर्खपणे केलेली चूक मला दुरुस्त करता येते का, ते बघू.”

आम्ही कुत्र्यांच्या गाडीत उडी मारली आणि होम्सने घोड्याला चाबकाने एक जोरदार फटका लगावला व लगाम त्याच्या हातात ठेवला. मग आम्ही रस्त्याने वळून, मागे जाऊ लागलो. चार्लिंग्टन हॉल व जंगलाचा ओसाड गवताळ भाग यातील अंतर, आम्हाला पूर्णपणे दिसू लागले. मी होम्सचा हात पकडला.

मी धापा टाकत बोललो, “तो बघ, तो मनुष्य!” एक एकाकी सायकलस्वार आमच्या दिशेने येत होता. त्याचे डोके खाली होते व खांदे गोल होते. तो सर्व शक्तीनिशी पॅडल मारत होता. रेसमधील खेळाडूंसारखा जणू उडत होता. अचानक त्याने त्याचा दाढीवाला चेहरा वर केला. आम्हाला त्याच्याजवळ आलेले पाहिले व सायकलवरून उडी मारून तो थांबला. त्याचे डोळे ताप आल्यासारखे चकाकत होते आणि दाढी कोळशासारखी काळी कुळकुळीत होती. तो आमच्याकडे व कुत्र्याच्या गाडीकडे डोळे फाडून बघत होता. नंतर त्याच्या चेहऱ्यावर नवल वाटल्याचे भाव पसरले.

त्याची सायकल आमच्या गाडीपुढे आडवी घालत, तो ओरडला, “तुम्ही कोण आहात? तिथेच थांबा. तुम्हाला ही कुत्र्याची गाडी कुठे मिळाली? अरे माणसा, थांब!” पिस्तुल काढत तो किंचाळला. “तिथेच थांबा. नाहीतर मी तुमच्या घोड्याला गोळी घालेन.”

होम्सने घोड्याचा लगाम माझ्या हातात दिला व गाडीतून उडी मारली.

त्याच्यावर सरळसरळ हल्ला करत तो म्हणाला, “आम्हाला हवा असलेला माणूस तूच आहेस. मिस व्हायोलेट स्मिथ कुठे आहे?”

“तेच तर मी तुम्हाला विचारतो आहे. मिस व्हायोलेट स्मिथ कुठे आहे? तुम्ही तिच्या कुत्र्याच्या गाडीत आहात. ती कुठे आहे हे तुम्हालाच माहिती पाहिजे.”

“आम्हाला कुत्र्याची गाडी रस्त्यात मिळाली. त्यात कुणी नव्हते. त्या तरुणीला मदत करायला म्हणून आम्ही आलो.”

नाटकीपणे दुःख करत तो अनोळखी माणूस ओरडला, “अरे देवा! अरे देवा! मी काय करू? त्यांनी तिला पळवले. त्या कुत्तरड्या वूडलेचे व बिशपच्या माणसाचे हे काम आहे. तुम्ही खरोखर तिचे मित्र असाल, तर इकडे या. माझ्या बाजूने उभे रहा. आपण तिला वाचवू. मग मला चार्लिंग्टनच्या जंगलात मरण आले तरी बेहत्तर!”

तो हातात पिस्तुल घेऊन कुंपणातील फटीतून वाट फुटेल तिकडे धावू लागला. होम्स त्याच्या मागोमाग गेला. आणि मी घोड्याला रस्त्याच्या कडेला चरायला सोडून होम्सच्या मागे गेलो.

चिखलात बऱ्याच पाऊलांचे ठसे उमटलेल्या ठिकाणी बोट दाखवत तो बोलला, “इथून ते आले. हॅलो, एक मिनिट थांबा. इथे झुडुपात कोण आहे?

तो एक साधारण सतरा वर्षांचा, घोड्यांची निगा राखणाऱ्या लोकांसारखे कपडे घातलेला व पायात चामड्याचे पट्टे असलेली पँट घातलेला तरुण होता. तो पाठीवर उताणा पडला होता. त्याचे गुडघे वर असून डोक्याला भली मोठी खोक पडली होती. तो बेशुध्द झाला होता, पण जिवंत होता. त्याची जखम हाडापर्यंत गेली नसल्याचे, त्याच्याकडे बघून समजत होते.

अनोळखी माणूस ओरडला, “हा पीटर आहे, घोड्यांची निगा राखणारा मुलगा. तो तिला गाडीतून नेत होता. त्या नरपशूंनी त्याला गाडीबाहेर खेचले आणि जखमी केले. त्याला आपण काही करू शकत नाही. तो तसाच राहू दे. पण आपण तिला वाईट नशीबापासून वाचवू शकतो.”

आम्ही वेड्यासारखे धावत झाडांमधून रस्त्याच्या खालील भागात गेलो. आम्ही घराभोवतीच्या झुडूपांच्या दाटीशी पोचलो, तेव्हा होम्स सरसावून उभा राहिला.

“ते घरी गेले नाहीत. इथे डावीकडे लॉरेल झुडूपापाशी पाउलखुणा आहेत. ओहो! मी तसे म्हणालो होतो.”

तो असे म्हणत असतांना एका बाईची किंकाळी आमच्या समोरील दाट, हिरव्या झुडूपांच्या गर्दीतून ऐकू आली. -- अशी किंकाळी ज्यामुळे सर्वत्र रानटी दहशत भरून राहिली -- गळा आवळल्यासारखा व घशातून घरघर झाल्यासारखा जोरदार आवाज आला.

झुडूपांमधून वाट काढत अनोळखी मनुष्य बोलला, “इकडून या. इकडून या. ते त्या अरुंद पॅसेजमध्ये आहेत. ओहो, भित्रट कुत्तरडे! सभ्य गृहस्थहो, माझ्या मागून या. फार उशीर झाला. फारच उशीर!

आम्ही अचानक जुनाट वृक्षांनी वेढलेल्या छानशा मोकळ्या हिरवळीवर आलो. तेथील पुढच्या भागात, एका महाकाय ओक वृक्षाच्या सावलीत एक तीन जणांचा वैशिष्ट्यपूर्ण गट उभा होता. त्यातील एक मोडून पडलेली व अशक्त दिसणारी आमची अशील महिला होती. तिच्या तोंडाभोवती करकचून रुमाल बांधलेला होता. तिच्यासमोर दुष्ट, लाल मिशावाला, क्रूर चेहऱ्याचा तरुण मनुष्य उभा होता. त्याचे पँट घातलेले पाय फाकवून, एक हात सीटवर ठेऊन, कोपर बाहेर ताणून व दुसरा हातातील चाबूक हलवत, त्याचा दृष्टीकोन पूर्णपणे विजयी वीरासारखा दाखवत उभा होता. त्यांच्यामध्ये एक वयाने मोठा करड्या रंगांचा दाढीवाला, ट्वीड कोटवर लहानसे पांढरे जाकीट घालून लग्नाची तयारी जवळजवळ पूर्णत्वाला नेत होता. त्याने त्याचे प्रार्थनेचे पुस्तक आम्ही तिथे जाताच खिशात ठेवले. आणि दुष्ट बेत करणाऱ्या नवऱ्या मुलाच्या पाठीवर अभिनंदन करत थाप मारली. मी दुःखाने चकित होऊन बोललो, “त्यांचे लग्न झाले.”

आमचा वाटाड्या ओरडला, “इकडे या.” तो फटीत घुसला. होम्स आणि मी त्याच्या मागोमाग गेलो. आम्ही गेल्यावर त्या स्त्रीने कसेबसे धडपडत, झाडाच्या खोडाचा आधार घेतला. चर्चमधून हाकलला गेलेला माणूस, विलीअँम्सन, आमच्यापुढे फसव्या नम्रपणे वाकला. धटींगण वूडले खुनशीपणे मोठ्याने हसत पुढे आला.

तो म्हणाला, “बॉब, तू तुझी दाढी आता काढलीस तरी चालेल. मी तुला चांगले ओळखतो. तू आणि तुझा चमचा, तुमची मिसेस वूडलेशी ओळख करून देण्यासाठी तुम्ही अगदी वेळेत आला आहात.”

आमच्या वाटाड्याचे उत्तर अगदी वेगळ्याच प्रकारचे होते. त्याने त्याची ओळख लपवलेली काळी कुळकुळीत दाढी ओढून काढली आणि त्याचा घोटून दाढी केलेला, लांब, अशक्त पिवळट चेहरा उघडा केला. मग त्याने त्याचे पिस्तुल उंचावून, त्याच्यावर चालून येणाऱ्या, घोड्याचा धोकादायक चाबूक हातात घेतलेल्या, तरुण आक्रमक गुन्हेगारावर रोखले.

आमचा वाटाड्या म्हणाला, “मी बॉब कॅरुथर्स आहे. आणि मी या स्त्रीला न्याय दिलेला आहे. तू तिचा काही गैरवापर करू बघशील, तर मी तुला काय करतो ते बघ. देवाशपथ, मी माझा शब्द खरा करेन.”

“तुला फार उशीर झालेला आहे. ती माझी बायको आहे.”

“नाही. ती तुझी विधवा आहे.”

त्याचे पिस्तुल वाजले. मी वूडलेच्या कोटाच्या पुढील बाजूकडून रक्त आलेले पाहिले. तो गिरकी मारून किंचाळला व पाठीवर उताणा पडला. त्याचा भयानक लाल चेहरा अचानक डागाळलेला व हीन दीन झाला. तो कोटवर लहानसे पांढरे जाकीट घातलेला, वयाने मोठा माणूस मी कधी न ऐकलेले असे अर्वाच्य शिव्याशाप द्यायला लागला. त्याचे पिस्तुल ओढून काढले. पण ते सरसावण्यापूर्वी, तो होम्सच्या पिस्तुलाच्या चापाकडे बघत होता.

माझा मित्र थंडपणे म्हणाला, “पुरे झाले. ते पिस्तुल फेका. वॉटसन, ते उचल. ते त्याच्या डोक्याला लाव. आभारी आहे. कॅरुथर्स, ते पिस्तुल मला दे. आपल्याला आता अधिक रक्तपात नको. चल. मला ते दे.”

“तू कोण आहेस?”

“माझे नाव शेरलॉक होम्स आहे.”

“अरे बापरे!”

“तू माझे नाव ऐकले आहेस तर! ठीक आहे. नेमलेले सरकारी पोलीस येईपर्यंत, मी त्यांची भूमिका बजावतो. ए, इकडे ये रे.” मोकळ्या जागेच्या कडेला उभ्या असलेल्या घाबरलेल्या पोऱ्यावर तो खेकसला. “इकडे ये. ही चिठ्ठी घे आणि वेगाने फारहॅमला जा. त्याने त्याच्या वहीतील एक कागद काढून, त्यावर काही खरडले. “हा कागद पोलीस स्टेशनमधील कॉन्स्टेबलला दे. तो येईपर्यंत मी तुम्हा सर्वांना माझ्या ताब्यात ठेवतो.”

होम्सची बळकट, स्वाभिमानी व्यक्तिमत्वामुळे दुःखदायक परिस्थितीवर वचक बसला. सगळेजण त्याच्या हातातले बाहुले बनले होते. कॅरुथर्स आणि विलीअँम्सनने जखमी वूडलेला उचलून घरात नेले. आणि मी घाबरलेल्या मुलीला आधार दिला. जखमी माणसाला अंथरुणावर झोपवले गेले आणि होम्सने विनंती केल्याने मी त्याला तपासले. जुने पडदे टांगलेल्या व आधीच तिथे दोन कैदी असलेल्या जेवणघरात तो बसलेला होता. तिथे मी तो अहवाल नेऊन दिला.

मी बोललो, “तो जगेल.”

कॅरुथर्स त्याच्या खुर्चीतून उडी मारून उठत किंचाळला, “काय? मी वरती जाऊन पहील्याप्रथम त्याचा खात्मा करून टाकतो. तुम्ही मला असे सांगत आहात का की त्या सुंदर मुलीला आयुष्यभरासाठी त्या गुरगुरणाऱ्या नीच जॅक वूडलेबरोबर बांधायचे?”

होम्स म्हणाला, “तू त्याचा विचार करायचे काही कारण नाही. दुसरा काही उपाय नसल्याने, काहीही झाले तरी तिने त्याच्याशी लग्न करु नये, यासाठी दोन चांगली कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे आपण मिस्टर विलीअँम्सन यांना लग्नविधी करायचे अधिकार आहेत का, ते नक्कीच विचारू शकतो.”

तो हलकट ओरडला, “मला पवित्र लग्नविधी करायचे अधिकार देण्यात आलेले आहेत.”

“आणि तुझ्याकडून तो अधिकार काढूनही घेण्यात आलेला आहे.”

एकदा चर्चचे काम करणारा माणूस, म्हणजे नेहमीच तसा माणूस.”

“मला तसे वाटत नाही. परवानापत्राचे काय?”

“आमच्याकडे लग्न लावण्याचे परवानापत्र आहे. हे इथे माझ्या खिशात आहे.”

“मग तू ते काहीतरी युक्तीने मिळवले आहेस. पण तरीही जबरदस्तीने केलेले लग्न हे लग्न नव्हे. तर तो गंभीर गुन्हा आहे, असे तुझ्या लक्षात येईल. जर मी चुकत नसेन तर, पुढील दहा वर्षे तुला या मुद्द्यावर विचार करायला वेळ आहे. कॅरुथर्स, तुझे पिस्तुल खिशात टाकून, तू चांगले केले आहेस.’

“मिस्टर होम्स, मी विचार करायला सुरवात केली होती. पण जेव्हा मी या मुलीचा बचाव करण्यासाठी घेतलेली सर्व काळजी विचारात घेतली, तेव्हा मला जाणवले की मी तिच्यावर प्रेम करतो म्हणून हे केले. मिस्टर होम्स, किंबरलेपासून जोहान्सबर्गपर्यंत ज्याच्या नावाची दहशत आहे, असा माणूस, तो दुष्ट धटिंगण वूडले! ती त्या आफ्रिकेच्या दुष्ट हैवानाच्या ताब्यात आहे असे कळल्यावर, माझे डोकेच सटकले. कारण याच वेळी मला, खऱ्या प्रेमाचा अर्थ समजला होता. मिस्टर होम्स, तुम्ही यावर विश्वास ठेवणार नाही. पण नोकरीसाठी ती मुलगी माझ्या घरात आल्यापासून, मी तिला अजिबात कुठेही दुसरी नोकरी शोधू दिली नाही. बाहेर तिच्यावर लांडगे टपलेले असल्याचे, मला माहिती होते. माझ्या सायकलने तिचा पाठलाग न करता, तिला काही

त्रास होत नसल्याची खबरदारी मी घेत होतो. मी तिच्यापासून अंतर राखून होतो. आणि तिने ओळखू नये म्हणून मी दाढी लावत असे. कारण ती चांगली व धीराची मुलगी आहे. मी रस्त्यावर तिचा पाठलाग करतो आहे, हे तिला समजले असते, तर ती माझ्याकडे इतके दिवस नोकरी करत राहिली नसती."

तिला धोका असल्याचे तुम्ही तिला सांगितले का नाही?'

"कारण मग तिने माझ्याकडील नोकरी सोडली असती आणि ते मला सहन झाले नसते. जरी ती माझ्यावर प्रेम करू शकत नसली, तरी तिची छोटीशी छान आकृती माझ्या घरात रोज बघणे आणि तिचा आवाज ऐकणे हे देखील माझ्यासाठी खूप होते.

मी म्हणालो, "अस्स! मिस्टर कॅरुथर्स, तुम्ही त्याला प्रेम म्हणता. पण मी त्याला स्वार्थीपणा म्हणेन."

"काही म्हटले तरी त्यात फार फरक नाही. तसेही मी तिला नोकरी सोडून जाऊन द्यायला तयार नव्हतो. शिवाय इतक्या गर्दीत तिची काळजी घेणारे कोणीतरी होते, हे चांगले होते. नंतर तार आली तेव्हा मला समजले, की आता ते काही हालचाल करणार आहेत."

"कुठली तार?"

कॅरुथर्सने खिशातून एक तार काढली व म्हणाला, "हीच ती तार."

ती लहानशी व थोडक्यात अशी लिहिलेली होतीः

'वयस्क मनुष्य (राल्फ स्मिथ)मेला आहे.'

होम्स बोलला, "हं. मला वाटते आता मला कशाकशा गोष्टी घडत गेल्या, याचा अंदाज येतो आहे. तुम्ही म्हणता आहात त्याप्रमाणे मला कळते आहे, की या तारेमुळे त्यांनी हालचाल करायचे ठरवले. पण तुम्ही थांबला आहात, तर तुम्हाला जे माहिती आहे ते मला सांगू शकता."

पांढरे जाकीट घातलेला तो वयस्क छचोर माणूस शिव्यांची बरसात करू लागला.

तो म्हणाला, "देवाच्या दयेनी जर तुम्ही आमच्यावर ओरडणार असाल तर बॉब कॅरुथर्स, तू जॅक वूडलेला जशी वागणूक दिलीस, तशी मी तुला देईन. तू मनभरून त्या मुलीविषयी काहीही बरळ, कारण ती तुझी एकतर्फी बाजू आहे. पण जर तू तुझ्या या चमच्यांना माझ्यासारख्या पांढरे शुभ्र कपडे घातलेल्या माणसाबद्दल, काहीबाही सांगत सुटलास, तर तर ते दिवसभरातील तुझे सर्वात वाईट काम असेल."

सिगरेट पेटवत होम्स म्हणाला, "तुझा आत्मसन्मान फार टोकाला नेऊ नकोस. ही केस सरळसरळतुझ्या विरुद्ध जाते आहे. माझ्या उत्कंठेचे शमन व्हावे म्हणून फक्त मी तुम्हाला काही स्पष्टीकरण द्यायला सांगतो आहे. पण ते देण्यात काही अडचण असेल, तर मी बोलतो आणि मग बघू, की तुम्हाला किती वेळ तुमचे गुपित राखून ठेवता येऊ शकते. सर्वप्रथम तुम्ही तिघे दक्षिण आफ्रिकेतून आलात. तुम्ही, वूडले आणि कॅरुथर्स."

विलीअँम्सन म्हणाला, "असत्य नंबर १ - मी कधीच त्या दोघांना दोन महिन्यांपूर्वी पाहिले नव्हते आणि माझ्या आयुष्यात मी कधीच आफ्रिकेला नव्हतो. तेव्हा उचापतखोर मिस्टर होम्स, तुमचे अंदाज तुमच्याकडेच ठेवा.

कॅरुथर्स म्हणाला, "तो म्हणतो, ते खरे आहे."

"ठीक आहे. ठीक आहे. तुम्ही दोघे तिथे होतात. विलीअँम्सनबद्दलचे मत हे आम्हीच आमच्या मनाने बनवलेले आहे. तुम्हाला राल्फ स्मिथ दक्षिण आफ्रिकेत भेटला. तो आता फार जगणार नाही, हे तुम्ही जाणले. तुम्ही ठरवले की त्याच्या पुतणीला त्याचे जे काही आहे, ते मिळाले पाहिजे. कसे काय? बरोबर?"

कॅरुथर्सने मान हलवली व विलीअँम्सनने संमती दर्शवली.

“ती सर्वात जवळची नातेवाईक होती, यात काही संशय नाही. तुम्हाला माहिती होते, की त्या मरणाऱ्या माणसाने काही इच्छापत्र केलेले नाही.”

कॅरुथर्स म्हणाला, “त्याला लिहिता वाचता येत नव्हते.”

त्यामुळे तुम्ही संधी घेऊन त्या मुलीची शिकार केली. तुमचा असा बेत होता की एकाने तिच्याशी लग्न करायचे व दुसऱ्याने मजा मारायची. काही कारणाने वूडलेला नवरा म्हणून ठरवले गेले. असे का केले?”

“आम्ही प्रवासामध्ये, पत्ते खेळतांना पैज लावली. ती तो जिंकला.”

“अस्स! तुम्ही त्या तरूणीला तुमच्याकडे नोकरी दिली. आणि वूडलेने तिचे प्रणयाराधन सुरु केले. तिला तो दुष्ट व दारुडा असल्याचे कळले व ती त्याच्यापासून फटकून राहू लागली. मध्यंतरीच्या काळात तुमचा करार मोडायची पाळी आली, कारण तुम्ही स्वतःच तिच्या प्रेमात पडलात. तुम्हाला त्या वूडले हलकटाने तिला पटकवावे, हे काही रुचेना, बरोबर?”

“नाही. असे काही झाले नव्हते.”

तुमच्या दोघांमध्ये भांडण झाले. तो रागाने तुम्हाला सोडून गेला. तो स्वतःचे वेगळे बेत आखू लागला.”

कॅरुथर्स कटूपणे हसत ओरडला, “विलीअँम्सन, आपल्याकडे या सभ्य गृहस्थाला सांगण्यासारखे फारसे काही नाही. हो, आम्ही भांडलो व त्याने मला खाली पाडले. परंतु कसेबसे मी मारामारीत त्याच्या पातळीला आहे. मग आम्ही भेटेनासे झालो.

मग त्याने या चर्चमधून हाकलून दिलेल्या, धर्मगुरूची किरकोळ कामे करणाऱ्या माणसाला, इथे पकडून आणले. ती शनिवारी इथून सायकलवरून स्टेशनला जाते, असे त्यांना कळल्याने, ते इथे घर भाड्याने घेऊन ते रहात आहेत, असे मला समजले. काही दुष्ट कारस्थान चालल्याचा मला

संशय आल्याने, त्यानंतर मी तिच्यावर लक्ष ठेऊ लागलो. मी त्यांच्यावर वेळोवेळी लक्ष ठेऊन होतो. कारण ते काय नको तो उद्योग करत आहेत का, हे मला शोधून काढायचे होते. दोन दिवसांपूर्वी राल्फ स्मिथ वारल्याची ही तार वूडले माझ्या घरी घेऊन आला. तो म्हणाला, की तो करत असलेल्या बेतात मी सहभागी होणार का. मी नाही म्हणालो. त्याने मला विचारले की तू त्या मुलीशी लग्न करून, मला त्यातील वाटा देणार का? मी असे खुषीने केले असते, पण ती माझ्याशी लग्नाला तयार होणार नाही, असे मी म्हणालो. तो म्हणाला, "प्रथम तिचे लग्न लावू आणि मग एक दोन आठवड्यांनी, तिला काय तो धक्का देऊ. मी म्हटले मला रक्तपात करून काहीही करायचे नाही. त्यामुळे तो घाणेरडा हलकट मला शिव्या देत, 'मी तिला मिळवीनच', असे बडबडत निघून गेला. ती माझे काम या शनिवारपासून सोडणार होती. मी तिला स्टेशनपर्यंत नेण्यासाठी एक सापळा रचला. पण मला मनातून इतके अपराधी वाटत होते की मी सायकलने तिचा पाठलाग केला. मी सायकल चालवायला सुरवात केली. पण मी तिला गाठण्यापूर्वीच हे नाटक झाले. जेव्हा मी तिच्या कुत्र्याच्या गाडीत बसून तुम्हाला दोघांना परततांना पाहिले, तेव्हा त्याबद्दल मला पहिल्यांदा कळले.

होम्सने उठून त्याची सिगरेट दाबून विझवली व बोलला, "वॉटसन, मी फार उशीर केला. जेव्हा तुझ्या अहवालात तू म्हणालास, की तू एक सायकलस्वार बघितलास व तो झुडूपांमध्ये जाऊन त्याचा टाय नीट करत होता, त्या एका गोष्टीमुळे मला हे सर्व लक्षात यायला हवे होते. पण अशी चौकस व काही बाबतीत वेगळीच असणारी केस आपल्याला मिळाल्याबद्दल, आपण आपले अभिनंदन करुया. मला येथील तीन कॉन्स्टेबल इथे येण्याच्या वाटेवर असल्याचे कळले आहे. आणि घोड्याची काळजी घेणाऱ्या मुलाने त्याला सांगितलेले काम चोखपणे केलेले आहे. तो हलकट नवरदेव किंवा तो रुचीपूर्ण पोऱ्या यांनी घडवून आणलेल्या त्या सकाळच्या कृत्यामुळे, त्याना कायमची अद्दल घडेल, असे वाटत नाही. वॉटसन, मला वाटते, तू डॉक्टर असल्याने, तू मिस स्मिथला सांगू शकतोस की ती पुरेशी बरी झाली असेल, तर आपण तिला तिच्या आईच्या

घरी सोडू शकतो. जर ती स्वतःला अजून आजारी समजत असेल, तर तिला एक टोला दे, की आम्ही मिडलँडमधील तरुण इलेक्ट्रिशियनला तार करणार आहोत. त्याने ती लगेच बरी होईल. मिस्टर कॅरुथर्स, या दुष्ट बेतामध्ये तुम्हाला जे करणे शक्य होते, ते तुम्ही केले आहे. तुमच्या कोर्टातील सुनावणीच्या वेळी जर माझ्या साक्षीची मदत लागली, तर हे माझे कार्ड घेऊन ठेवा. ते उपयोगी पडेल."

गोष्ट लिहितांना, माझ्या या सतत मध्येमध्ये संभाषण घालायच्या सवयीमुळे, मला माझे सांगणे आटोपशीर करता येत नाही. चौकस वाचकाला त्याच्या अपेक्षेप्रमाणे मी झटपट शेवटाकडे नेऊ शकत नाही, असे माझ्या वाचकांच्याही लक्षात आले असेल. एखादी घटना किंवा कृती सांगणे हे माझ्या दृष्टीने महत्वाचे असते. आपल्या व्यस्त आयुष्यातून एकदा गोष्टीतील कळसाध्याय गाठला गेला, की मग ती पात्रे आपल्या स्मरणातून निघून जातात. मात्र या केसच्या बाबतीत माझ्या नोंदवहीत एक परिशिष्ट जोडलेले आहे की मिस व्हायोलेट स्मिथचे नशीब फळफळले, ती आता सिरील मॉर्टिनची पत्नी आहे. सिरील मॉर्टिन हा वेस्टमिन्स्टर येथील 'मॉर्टिन व केनेडी' या प्रसिद्ध इलेक्ट्रिशियन फर्मचा वरिष्ठ भागीदार आहे. वूडले व विलीअँम्सन यांच्यावर बळजबरीने अपहरण करून शारीरिक हल्ला केल्याबद्दल, खटला भरण्यात आला. त्यात विलीअँम्सनला सात वर्षांची व वूडलेला दहा वर्षांची शिक्षा झाली. कॅरुथर्सला काही शिक्षा झाली का, हे काही माझ्याकडे लिहिलेले नाही पण त्याच्या किरकोळ गुन्ह्याची कोर्टाने फारशी दखल घेतली नसावी. वूडले ह्याची फार धोकादायक धटिंगण असल्याची कीर्ती असल्याने, काही महिन्यातच त्याला शिक्षा फर्मावण्यात आली.

# The Adventure Of Black Peter

# काळ्या पीटरचे साहस

मी माझ्या मित्राला शारीरिक व मानसिक दृष्ट्या इतक्या चांगल्या अवस्थेत '९५ मध्ये जसे पाहिले, तसे नंतर कधीच पाहीले नाही. त्याच्या वाढत्या प्रसिद्धीने त्याच्याकडे धडाधड कामे येऊ लागली. त्यातील काही नावाजलेल्या अशीलांची ओळख मी उघड केली तर बेकर रस्त्यावरील होम्सच्या नावाच्या पाटीचा मी अपमान केल्यासारखे होईल. इतर अनेक थोर कलाकारांसारखा होम्स त्याच्या (रहस्यभेद करण्याच्या) कलेसाठी जगत असे. होल्डरनीजच्या उमरावाच्या केसचा अपवाद वगळता, त्याने दिलेल्या अमूल्य सल्ल्याबद्दल मी त्याला कधी त्याच्या अशीलांकडून मोठ्या घबाडाची अपेक्षा ठेवलेले बघितले नाही. तो इतका बेफिकीर व लहरी आहे की कधीकधी तो सत्ताधीश धनिक लोकांना मदत करायला नकार देतो व त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगत नाही. तर काही नम्र अशीलांचे त्याच्या कल्पकतेला व शोधकतेला आव्हान देणारे विचित्र, नाट्यपूर्ण काम अगदी लक्षपूर्वक करण्यासाठी मात्र आठवडेच्या आठवडे घालवतो.

त्या '९५च्या संस्मरणीय वर्षात चौकस आणि असुसंगत अशा खूप केसेस त्याने हाताळल्या. माननीय पोप यांच्या इच्छेने केलेला रोमन कॅथॉलिक चर्चचा महत्वाचा माणूस असलेल्या तोस्का याच्या अचानक मृत्युचा तपास, पक्ष्यांना प्रशिक्षण देणाऱ्या व ज्याने पूर्व लंडनमधून प्लेगची गाठ घालवली, त्या कुप्रसिद्ध विल्सनला केलेली अटक, या दोन नावाजलेल्या केसबरोबर या दोन केसही त्याने यशस्वीपणे सोडवल्या, वूडमन लीच्या शोकांतिकेचा उलगडा आणि कॅप्टन पीटर कॅरी याच्या मरणाभोवतालच्या गूढ परिस्थितीचा छडा. या असामान्य केसेसचा उल्लेख केल्याशिवाय मिस्टर शेरलॉक होम्सच्या आगळयावेगळया कामाचे मोजमाप होणार नाही.

जुलैच्या पहिल्या आठवड्यात माझा मित्र आमच्या बेकर रस्त्याच्या घरी बरेच वेळा नसायचा. तेव्हा माझ्या लक्षात आले की तो काही कामात गुंतलेला दिसतो आहे. तेव्हा बरेच ओबडधोबड दिसणारे लोक घरी येऊन कॅप्टन बेसिलची चौकशी करत. त्यामुळे मला समजले की होम्स त्याच्या अनेक सोंगांपैकी एका नावाने वावरत असून त्याने स्वतःची ओळख लपवली आहे. लंडनच्या वेगवेगळया भागात तो वेष व व्यक्तिमत्व बदलू शकत असलेले निदान पाच अड्डे होते.

तो कशात गुंतला आहे, याबद्दल त्याने मला काही सांगितले नाही. मी देखील माझ्या सवयीप्रमाणे, त्याला काही विचारले नाही. त्याने मला उद्देगून पहीला इशारा दिला, त्यावरून तो काही असामान्य तपासात गुंतल्याचे मला कळले. तो सकाळी न्याहारीपूर्वी बाहेर गेला व माझा मी बसलो असतांना तो खोलीत अवतीर्ण झाला. त्याच्या डोक्यावर टोपी होती व मोठी विचित्र भाल्यासारखे टोक असलेली छत्री त्याने काखेत धरली होती.

मी ओरडलो, "हे काय होम्स! तू लंडनभर असा फिरतो आहेस की काय?

"मी कत्तलखान्यात जाऊन आलो."

"मास विकणाऱ्याकडे?"

"आणि आता छान भूक लागून परत आलो आहे. माझ्या प्रिय वॉटसन, आता माझ्या न्याहारीपूर्वीच्या व्यायामाच्या काही प्रश्न नाही. पण मी पैज लावायला तयार आहे की तुला माझ्या व्यायामाबद्दल काहीही तर्क करणे शक्य नाही."

"मी तसा प्रयत्नही करणार नाही."

कॉफी ओतताना तो गालातल्या गालात हसला.

"जर तू अलार्ड्यसच्या मागील दुकानात गेलास तर तुला छताच्या हुकाला टांगलेले एक मेलेले डुक्कर दिसेल आणि एक शर्ट घातलेला माणूस जीव खाऊन ते त्याच्या सुरीने कापतांना दिसेल. मी शक्तिमान असल्यामुळे जास्त जोर न लावता एका फटक्यात ते काम करून माझी खुमखुमी जिरवली. तुला प्रयत्न करून बघायचा आहे का?"

"अजिबात नाही. पण तू ते कशाला करत होतास?"

“कारण वूडमन लीच्या गूढ प्रकरणावर त्याचा दुरान्वयाने परिणाम होईल, असे मला वाटले. ओहो, हॉपकिन्स मला काल रात्री तुझी तार मिळाली. मी तू येण्याचीच वाट बघत होतो. तू ये आणि आम्हाला सामील हो.”

आमचा पाहुणा तीस वर्षांचा एकदम जागरुक मनुष्य होता, त्याने ट्वीडचा सूट घातला होता. पण नेहमी तो घालायची सवय नसल्याने, त्यात थोडा अवघडलेला वाटत होता. मी त्याला तरुण पोलीस इन्स्पेक्टर स्टॅन्ले हॉपकिन्स म्हणून लगेच ओळखले. त्याच्या उज्वल भवितव्याबद्दल होम्सला खूप आशा होत्या. स्वतःसाठी काम करणाऱ्या माझ्या प्रसिद्ध मित्राच्या शास्त्रीय पद्धतीसाठी, एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणे तो त्याची स्तुती करे व त्याला मान देई. तो भुवई उंचावून, खचलेल्या, दुःखी मनस्थितीत खाली बसला.

“नको सर. मी न्याहारी करूनच निघालो. मी रात्र शहरात काढली, कारण मी काल अहवाल द्यायला तिथे आलो होतो.”

“तू काय अहवाल दिलास?”

“काही नाही सर, घोर निराशा.”

“काहीच प्रगती झाली नाही का?”

“नाही.”

“अरेरे! मी त्यात लक्ष घालायला हवे होते.”

“मिस्टर होम्स, तुम्ही ते करावे, अशी मी इच्छा करतो. ही मला पहिल्यांदा मिळालेली मोठी संधी आहे आणि मी फारच निराश झालो आहे. कृपया मला मदत करा.”

“ठीक आहे. ठीक आहे. मी आधीच न्यायालयीन चौकशीसह मला मिळालेला सर्व पुरावा काळजीपूर्वक वाचला आहे. तसेही तू गुन्ह्याच्या जागी मिळालेल्या त्या तंबाखूच्या पुडीचे काय केलेस? त्यात काही पुरावा सापडला नाही का?”

हॉपकिन्स आश्चर्यचकित झाला.

त्या माणसाची स्वतःची ती कातडी पुडी होती व आत त्याची आद्याक्षरेदेखील होती. तो सील करायचे काम बरीच वर्षे करत होता.”

“पण त्याच्याकडे पाईप नव्हता.”

“नही सर, आम्हाला पाईप सापडला नाही. खरच, तो फार सिगरेट ओढत नव्हता. पण कदाचित त्याच्या मित्रांसाठी त्याने तंबाखूची पुडी बाळगली असेल.”

“नक्कीच. मी फक्त विचारले कारण मी जर ही केस हाताळत असतो, तर मी माझ्या तपासातील पहिला मुद्दा तो घेतला असता. माझा मित्र वॉटसन याला या केससंबंधी काहीही माहिती नाही आणि मलादेखील अजून एकदा सर्व घटनाक्रम ऐकायला आवडेल. आम्हाला या केसचा एक धावता आढावा ऐकव.”

स्टॅन्ले हॉपकिन्सने खिशातून एक कागदाचा तुकडा काढला.

“कॅप्टन पीटर कॅरे या मृत माणसाच्या व्यावसायिक आयुष्यातील काही तारखा यावर आहेत. त्या सांगतो. तो ‘४५ मध्य जन्मला. तो खूप धडाडीचा व यशस्वी असा व्हेल व सील माशांचा शिकारी होता. १८८३ मध्ये तो डंडीच्या सी युनिकॉर्न जहाजाचा कॅप्टन होता. तेव्हा त्याने ओळीने खूप समुद्र सफरी केल्या. नंतर १८८४ मध्ये त्याने निवृत्ती घेतली. नंतर काही वर्षे त्याने प्रवास केला. नंतर शेवटी त्याने ससेक्स परगण्यात फॉरेस्ट रो जवळ, वूडमन ली येथे लहानशी जागा विकत घेतली. तेथे तो सहा वर्षे राहीला आणि आठवड्यापूर्वी तो तिथे वारला.

“या माणसाबद्दल काही विचित्र गोष्टी होत्या. सर्वसामान्य आयुष्यात तो शांत, काळसर व कडक प्रोटेस्टंट पंथीय ख्रिश्चन होता. त्याची बायको, वीस वर्षांची मुलगी व दोन नोकराणी असे ते रहात असत. त्या नोकराणी नेहमी बदलत असत. कारण तिथे नेहमी आनंदी परिस्थिती नसे. आणि कधीकधी तर ती असह्य असे. तो मनुष्य कधीकधी दारू पीत असे आणि तेव्हा तो जणू राक्षस बने. तो केव्हातरी मध्यरात्री त्याच्या बायको व मुलीला घराबाहेर काढत असे व त्याना शिक्षा म्हणून चाबकाने बडवून काढत असे. सरे गावभर त्यांच्या किंकाळ्या दुमदुमत असत.

एकदा त्याला त्याच्या वागणुकीबद्दल समज देण्यासाठी आलेल्या बिशपच्या हाताखालील वयस्क माणसावर रानटी हल्ला केल्याबद्दल, त्याला अटक करण्यात आली. थोडक्यात मिस्टर होम्स, पीटर कॅरे हा फार धोकादायक मनुष्य होता. मी असे ऐकले की जहाजावरदेखील त्याची वागणूक तशीच होती. तो काळा पीटर म्हणून ओळखला जात असे. पण केवळ त्याच्या लांब काळ्या दाढीमुळे व काळ्या रंगामुळे नव्हे. कदाचित तुमच्या मित्राने ऐकले नसेल, की त्याने त्याच्या घरापासून काही यार्ड अंतरावर एक लाकडी गॅरेज बांधले होते -- तो त्याला केबिन म्हणे. तिथे तो रोज रात्री झोपे. ती सोळा फूट व दहा फूट लांबीरुंदी असलेली एक खोली असलेली राहुटी होती. तो त्याची किल्ली त्याच्या खिशात ठेवे. स्वतःचे अंथरूण स्वतः घाले व तिथे कुणाला फिरकू देत नसे. प्रत्येक बाजूला लहान खिडक्या होत्या. त्या पडद्याने झाकलेल्या असत व कधीच उघड्या नसत. त्यातील एक उंच रस्त्याच्या बाजूला होती. जेव्हा त्या खिडकीतून बाहेर उजेड दिसे, तेव्हा लोक मनाशी नवल करत, की आत काळा पीटर काय करतो आहे. मिस्टर होम्स, कोर्टातील सुनावणीच्या वेळी मिळालेला विश्वासार्ह पुरावा याच खिडकीतून मिळाला होता.

“खुनाच्या दोन दिवस आधी, फॉरेस्ट रोमधून दुपारी एक वाजता चालत जाणारा स्लॅटर नावाचा दगडी काम करणारा गवंडी तुला आठवतो का? तो चालतांना थांबला झाडांमधून प्रकाशमान होणारा एक चौकोन त्याने पाहीला. तो शपथ घेऊन सांगतो की कुशीवर वळलेल्या माणसाच्या डोक्याची सावली पडद्यातून स्पष्टपणे दिसत होती. तो पीटर कॅरेला चांगले ओळखत

होता. ती त्याची नव्हती. ती कॅप्टनपेक्षा वेगळ्या प्रकारे लहान दाढी राखलेल्या माणसाची होती. असे तो म्हणतो. तो नंतर दोन तास तेथील सार्वजनिक घरात होता. पण खिडकी व रस्ता यांच्यात अंतर आहे. शिवाय ही गोष्ट सोमवारची आहे आणि गुन्हा तर बुधवारी घडला.

"मंगळवारी पीटर कॅरे अगदी वाईट मनस्थितीत होता. खूप पीत सुटला होता. एखाद्या जंगली पशूसारखा वाटत होता. तो घराबाहेर हिंडत होता. बायकांनी त्याला येतांना पाहीले, तेव्हा त्या धावल्या. संध्याकाळी उशीरा तो त्याच्या केबिनमध्ये गेला. साधारण पहाटे दोन वाजता, खिडकी उघडी टाकून झोपलेल्या त्याच्या मुलीने त्या दिशेने एक भीतीदायक किंकाळी ऐकली. पण तो प्यायलेला असेल तर ही काही नवीन गोष्ट नव्हती. त्यामुळे तिने काही लक्ष दिले नाही. सात वाजता उठल्यावर, एका नोकराणीला केबिनचे दार उघडे दिसले. पण त्या माणसाची दहशत इतकी होती. की दुपारपूर्वी त्याचे काय झाले हे बघायला जायचे धाडस कोणी केले नाही. उघड्या दारातून डोकावतांना, त्यानी जे दृष्य पाहिले, ते बघून त्या उडाल्याच. त्यांचे पांढरे फटक चेहरे घेऊन त्या गावात गेल्या. तासाभरात मी त्या जागी पोचलो व ती केस ताब्यात घेतली.

"मिस्टर होम्स, तुम्हाला माहिती आहे त्याप्रमाणे, मी तसा शांत स्वभावाचा आहे. पण केबिनमध्ये पाऊल ठेवल्यावर मी चक्रावून गेलो. जमीन व भिंती कत्तलखान्या सारख्या दिसत होत्या. तिथे सतत पेटीच्या भात्यासारखा, माशांचा गुणगुण आवाज येत होता. तो त्याला केबिन म्हणत असे, ती नक्की केबिनच होती. कारण तुम्ही जहाजात आहात, असेच वाटत होते. एका कोपऱ्यात बंक बेड होता. नकाशे व फलक, त्याच्या स्वतःचा वस्तूंचा कप्पा, मांडणीवर हिशेबाच्या वह्यांची ओळ, सर्व काही एखाद्या कॅप्टनच्या खोलीसारखे आणि त्यामध्ये, तो माणूस स्वतः -- आत्मा हरवल्याने छळ झाल्यासारखा त्याचा चेहरा आणि तपकीरीसर दाढी रागाने वर झालेली! त्याच्या रुंद छातीत स्टीलचा भाला घुसलेला, आणि तो त्याच्यामागील भिंतीपर्यंत गेलेला! तो एखाद्या पिनेने कार्डावर टोचलेल्या पाखरासारखा दिसत होता. अर्थात त्याची अत्यंत त्रासिक अशी शेवटची किंकाळी मारल्यापासून, तो पूर्णपणे मेलेला होता.

“सर, मला तुमची पद्धत माहिती आहे आणि ती मी उपयोजित करायचा प्रयत्न देखील केला. काही हलवायला परवानगी देण्यापूर्वी, मी भोवतालच्या व खोलीतल्या जमिनीची काळजीपूर्वक तपासणी केली. तिथे पायांचे ठसे सापडले नाहीत.

“म्हणजे तुला काही दिसले नाहीत?”

“सर, मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की तिथे ठसे नव्हते.”

“अरे हॉपकिन्स, मी पुष्कळ गुन्ह्यांचे बिंग उकलले आहे. पण अजून तरी मी उडणारा गुन्हेगार पाहीलेला नाही. जोपर्यंत गुन्हेगार दोन पायांचा आहे, तोपर्यंत निदान काही पुसट पाऊलखुणा किंवा काही नगण्य हलवाहलवी केलेल्या खुणा तरी शास्त्रीय दृष्टीकोन बाळगणाऱ्याला सापडल्याच पाहीजेत. या रक्ताचा शिडकावा झालेल्या खोलीत आपल्याला मदत होईल, असा काही पुरावा सापडू नये, यावर माझा विश्वास बसत नाही. तरीही मला कोर्टातील सुनावणीतून समजले, की तेथील काही गोष्टींकडे तुझे दुर्लक्ष झाले नाही.”

तरुण इन्स्पेक्टरने माझ्या मित्राच्या विरोधभासात्मक शेऱ्याकडे दुःखाने पाहीले.

“मिस्टर होम्स, मी तुम्हाला त्याच वेळी न बोलावून मूर्खपणा केला. पण आता त्याबद्दल पश्चात्ताप करण्यात काही अर्थ नाही. हो. त्या खोलीत विशेष लक्ष द्यावे अशा पुष्कळ वस्तू पडल्या होत्या. एक म्हणजे खून केला गेलेला भाला. तो भिंतीवरील फळीवरून हिसकावून काढला गेला होता. अजून दोन तिथे होते व तिसऱ्याची जागा रिकामी होती. त्यावर ‘SS सी युनिकॉर्न, डंडी असे कोरलेले होते. असे दिसत होते की रागाच्या भरात हे कृत्य केले गेले. खुन्याने त्याला दिसलेले पहीले शस्त्र हिसकावले. खून रात्री दोन वाजता झाला आणि तरीही पीटर कॅरेच्या अंगात पूर्ण कपडे होते, ही गोष्ट असे सुचवते की त्याची खुन्याबरोबर भेटायची वेळ ठरलेली होती. टेबलावर पडलेली रमची बाटली व दोन पेले, या बाबीला दुजोरा देत होते.

होम्स बोलला, “हो, दोन्ही निष्कर्ष बरोबर वाटत आहेत. तिथे रम सोडून आणि काही तत्सम पेय दिसले का?”

“हो. तिथे ब्रँडी व व्हिस्कीही दिसत होती. पण त्याचे आपल्याला फारसे महत्व नाही. तरीही त्या बाटल्या पूर्ण भरलेल्या असल्याने वापरल्या न गेल्याचे दिसत होते.”

होम्स म्हणाला, “पण तरीही त्या तिथे असल्याने, त्याचा काही संबंध असू शकतो. अजून काही वस्तूंबद्दल आपण तुझ्याकडून ऐकू.”

“ही तंबाखूची पुडी टेबलावर पडली होती.’

“टेबलाच्या कुठल्या भागावर?”

“ती मध्यभागी पडली होती व खडबडीत सील माशाच्या कातडीची होती -- सरळ केस असलेली कातडी व त्यावर चामड्याची पट्टी बांधलेली होती. आतील भागावर ‘P C’ लिहिलेले होते. त्यात जहाजावरील अर्धा औंस कडक तंबाखू होती.”

“छान. अजून काय?”

स्टॅन्ले हॉपकिन्सने त्याच्या खिशातून, एक जुनाट डायरी काढली. त्याची बाहेरील बाजू खरबरीत व फाटकी होती. पानांचा रंग उडाला होता. पहील्या पानावर J. H. N. अशी अक्षरे लिहिलेली होती. होम्सने ती टेबलावर ठेवली. त्याच्या सूक्ष्म पद्धतीने ती तपासली. तेव्हा हॉपकिन्स व मी एकमेकांकडे बघत होतो. दुसऱ्या पानावर ‘C. P. R.’ असे लिहिलेले होते आणि मग खूप आकड्यांचे तक्ते होते. अजून काही मथळे ‘अर्जेन्टाइन’, ‘कोस्टा रिचा’ व ‘सॅन पाउलो’ असे होते. प्रत्येक पानावर सह्या व त्यानंतर काही आकडे होते.

होम्सने विचारले, “याचे तू काय केलेस?”

ती सुरक्षा ठेवींची सूची वाटत होती. मला वाटते, 'J. H. N.' ही मधल्या दलालाची व 'C. P. R.' त्या खरेदी करणाऱ्यांची आद्याक्षरे असावीत."

होम्स बोलला, "'C. P. R.' म्हणजे कॅनेडीयन पॅसिफिक रेल्वे असेल का?"

स्टॅन्ले हॉपकिन्सने दात चमकवत, रागाने त्याच्या हाताच्या मुठी वळल्या.

तो ओरडला, "मी किती मूर्ख आहे! अर्थात ते तुम्ही म्हणालात तसेच आहे. आता 'J. H. N.' चा छडा लावायचा आहे. मी जुन्या शेअर बाजाराची यादी तपासली. १८८३ मध्ये त्यात, किंवा बाहेरही तशा आद्याक्षरांचा कोणी दलाल सापडला नाही. तरीही ती आद्याक्षरे महत्वाचा पुरावा असल्याची, माझी खात्री आहे. मिस्टर होम्स, तुम्ही मान्य कराल, की ही आद्याक्षरे तिथे उपस्थित असलेल्या दुसऱ्या माणसाची असू शकतील -- म्हणजे दुसऱ्या शब्दात, खुन्याची. मी अशी विनंती करतो की अशा भरमसाठ किमतीच्या सुरक्षा ठेवींची कागदपत्रे बघून आपल्याला खुनाचा हेतू कळण्यासाठी काही इशारे मिळत आहेत."

या नव्या प्रगतीने शेरलॉक होम्सचा चेहरा त्याला चांगलाच धक्का बसल्याचे दाखवत होता.

तो म्हणाला, "मला तुझे दोन्ही मुद्दे मान्य आहेत. मी कबूल करतो की या कोर्टात पेश न करण्यात आलेल्या डायरीने, माझे काही पूर्वग्रह पुसून टाकले आहेत. मी गुन्ह्याची अशी उपपत्ती मांडतो आहे, की त्यात याला काही स्थान नसेल. तू येथे सापडलेल्या सुरक्षाठेवींच्या नोंदींचा काही माग काढला आहेस का?"

"आता कार्यालयात चौकशी होत आहे. पण मला वाटते की दक्षिण अमेरीकेतील कुठल्याशा कंपनीतील या सुरक्षा ठेवींची पूर्ण नोंद सापडण्यासाठी काही महिने थांबून, मग आपण त्याचा माग काढला पाहीजे."

होम्स डायरीचे मुखपृष्ठ त्याच्याकडील भिंगाने तपासत होता.

तो म्हणाला, “नक्कीच यातील काही रंग उडाला आहे.”

“हो सर, ते रक्ताचे डाग आहेत. मी तुम्हाला सांगितले की मी जमिनीवरून ती डायरी उचलली.”

रक्ताचे डाग वर होते की खाली?”

पुढील बाजूला व कडेला.”

“अर्थात यामुळे हे सिद्ध होते, की की गुन्हा घडल्यानंतर डायरी खाली जमिनीवर टाकण्यात आली.”

तेच तर, मिस्टर होम्स. मी त्या मुद्द्याची प्रशंसा करतो. मी असे मत मांडतो, की पळून जायच्या घाईत गुन्हेगाराकडून ती पडली असणार. ती दरवाज्याजवळ पडली होती.”

मला वाटते, या सुरक्षा ठेवी मृत माणसाच्या मालमत्तेपैकी नव्हत्या.”

“नाही, सर.”

“तुला चोरी झाल्याचा संशय आहे का?”

“नाही सर. कशालाच धक्का लागलेला नव्हता.”

“अरे, ही नक्कीच मोठी कुतूहलपूर्ण केस आहे आणि तिथे चाकूही होता, बरोबर?”

“आच्छादन असलेला चाकू. तो अजूनही आच्छादनात आहे. तो मृत माणसाच्या पायाशी पडला होता. मिसेस कॅरेने तो तिच्या नवऱ्याचा असल्याचे ओळखले.”

होम्स काही वेळ विचारात हरवून गेला.

शेवटी तो बोलला, “मला वाटते, मला तो बघितला पाहिजे.”

स्टॅन्ले हॉपकिन्सने आनंदाने आरोळी ठोकली.

“सर, मी आभारी आहे. त्याने खरेच माझ्या मनावरचे थोडेतरी ओझे उतरले आहे.”

होम्सने इन्स्पेक्टरकडे बोट हलवत नकार दिला.

तो म्हणाला, “आठवड्यापूर्वी हे काम सोपे होते. पण तरीही माझी येथील भेट अगदीच फुकट गेली असे नाही. वॉटसन, तुला वेळ असेल तर, मला तुझ्याबरोबर जायला आवडेल. हॉपकिन्स, तू टांगा मागवलास, तर आम्ही दोघे अर्ध्या पाऊण तासात फॉरेस्ट रोला जाण्यासाठी तयार होतो.”

एका आडबाजूच्या स्टेशनवर पोचल्यावर आम्ही थोडेफार जंगलाचा भाग असलेल्या जागेवरून काही मैल गेलो. तो भाग म्हणजे एके काळी दक्षिण इंग्लंडमधील जंगलच होते. नंतर लोखंड मिळविण्यासाठी त्या जंगलातील झाडे तोडली गेली. आता उत्तरेकडील भागांनी हा व्यापार ताब्यात घेतला आहे. इथे आता उध्वस्त बागा व जमिनीत खणलेले चर याशिवाय काही उरलेले नाही. इथे हिरव्या उतारानंतर, आम्हाला शेतामध्ये खालच्या बाजूला मोठे दगडी घर दिसू लागले. ते रस्त्याच्या जवळ असून तीन बाजूंनी झुडुपांनी वेढलेले होते. बाहेर गॅरेज होते. आमच्या बाजूला एक दार व खिडकी उघडत होती. ती खुनाची जागा होती.

स्टॅन्ले हॉपकिन्स आम्हाला त्या घरात घेऊन गेला. तिथे त्याने आमची ओळख एका करड्या केसांच्या, आजारी वाटणाऱ्या बाईशी, मृत माणसाच्या बायकोशी, करून दिली. तिने वर्षानुवर्षे काढलेले कष्ट व सोसलेला छळ दाखवणारा तिचा चेहरा थकलेला, सुरकुत्या पडलेला व भीतीचे त्रासदायक भाव लालसर डोळ्यात साठलेला होता. तिच्याबरोबर तिची छान केस असलेली अशक्त मुलगी होती. विरोधाने चमकणारे तिचे डोळे सांगत होते की तिचे वडील मेल्यामुळे तिला आनंद झालेला आहे. त्याला मारणाऱ्या हातांचे तिला कौतुक वाटत होते. काळ्या पीटरचे घर भयानक होते. आमची सुटका झाल्याचे भाव सूर्यप्रकाशात आमच्याही चेहऱ्यावर उमटले असणार. आम्ही बाहेर पडून, तो मेलेला माणूस नेहमी चालत असलेल्या शेतातून जाणाऱ्या वाटेने केबिनकडे चालू लागलो.

केबिन म्हणजे साधे, लाकडी घर होते. एक खिडकी दाराजवळ व एक थोड्या अंतरावर होती. स्टॅन्ले हॉपकिन्सने खिशातून किल्ली काढली व वाकून कुलूप उघडले. त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव घेऊन तो थांबला.

"इथे कुणीतरी येऊन गेलेले दिसते आहे. आत्ताच काही केल्यासारखे, लाकूडकाम तोडले होते व रंगातील चऱ्यांमधून पांढरा भाग दिसत होता. होम्स खिडकी तपासत होता.

"इथेही कुणीतरी जोर लावल्यासारखे दिसत आहे. तो जो कुणी असेल त्याला आत शिरता आले नसावे. तो कुणी गरीब चोर असावा."

इन्स्पेक्टर म्हणाला, "ही फारच असामान्य गोष्ट आहे. काल या खुणा नव्हत्या, हे मी ठामपणे सांगू शकतो."

मी सुचवले, "कदाचित गावातील कुणी माणूस कुतूहल वाटून आला असेल."

"अशी शक्यता वाटत नाही. इथे आसपास कोणी फिरकत नसत व केबिनमध्ये जायची तर बातच सोडा. मिस्टर होम्स, तुम्हाला काय वाटते?"

"मला वाटते आपले नशीब बलवत्तर आहे."

"ती व्यक्ती परत येईल, असे तुम्हाला म्हणायचे आहे का?"

"अशी दाट शक्यता आहे. तो उघड्या दाराच्या अपेक्षेने आला असेल. छोट्याशा सुरीचे पाते घेऊन प्रवेश केला असेल. त्याने त्याचे काम न झाल्याने, मग तो काय करेल?"

"तो दुसऱ्या दिवशी परत वेगळे उपयोगी आयुध घेऊन येईल."

"मी तेच म्हणतो आहे. आपण त्याला दबा धरून पकडले नाही, तर ती आपली चूक ठरेल. आता मला केबीनच्या आतला भाग बघू दे."

त्या दुःखांतिकेचे सर्व मागमूस हलवले गेले होते. पण गुन्ह्याच्या रात्री असलेले फर्निचर जसेच्या तसे होते. होम्सने तेथील प्रत्येक वस्तूचा बारकाईने शोध घेतला, पण तो यशस्वी न झाल्याचे त्याच्या चेहऱ्यावरून दिसत होते. त्याच्या शांतपणे चाललेल्या तपासात तो फक्त एकदाच थांबला.

"हॉपकिन्स, या मांडणीमधून तू काही घेतलेस का?"

"नाही."

"काहीतरी घेतले गेले आहे. मांडणीच्या या कोपऱ्यात दुसरीकडच्यापेक्षा कमी धूळ आहे. घेतलेली वस्तू एखादे पुस्तक किंवा खोकेही असू शकेल. ठीक आहे. मी याहून जास्त काही करू शकत नाही. आपण या सुंदर जंगलातून फिरू. वॉटसन, आपण पक्षी व फुलांना थोडा वेळ देऊ. हॉपकिन्स, आम्ही तुला नंतर इथेच भेटतो व इथे येऊन गेलेल्या सद्गृहस्थाचा काही ठावाठिकाणा लागतो आहे का, ते बघू."

अकरा वाजून गेले होते. आम्ही दबा धरून बसलो होतो. हॉपकिन्सने केबिनचे दार उघडे ठेवले होते. पण होम्सचे मत असे होते की असे केल्याने, त्या अनाहुतांचा संशय वाढेल. कुलूप अगदी साधे होते. एखाद्या धारदार सुरीने ते सहज कापले गेले असते. होम्सने असेही सुचवले की आम्ही केबिनमध्ये नव्हे तर पलीकडील खिडकीजवळील झुडूपांमध्ये बाहेरील बाजूस थांबावे. अशा तऱ्हेने आम्हाला तो माणूस कोण व त्याचा इथे येण्याचा उद्देश काय ते समजेल. आम्ही झोपायच्या वेळी तिथे अस्वस्थपणे चुळबुळत, जागत बसलो होतो. तरीही पाण्याच्या शेजारी दबा धरून तहानलेल्या जनावराची वाट पहाणाऱ्या शिकाऱ्यासारखी उत्सुकता आम्हाला वाटत होती. अंधारातून आमच्यावर कोण रानटी प्राणी हल्ला करणार की काय, तेही कळत नव्हते. त्याच्या धारदार दातांनी व नखांनी ओरबाडणारा असा तो गुन्हेगारी वाघ होता की दुबळ्या, असंरक्षित प्राण्यांसाठी धोकादायक असा लबाड कोल्हा होता?

नीरव शांततेत आम्ही आमच्यासमोर काय वाढून ठेवले आहे, याची प्रतीक्षा करत, झुडूपात रांगत होतो. प्रथम काही गावकऱ्यांचा हलकासा पदरव व आवाज आला. पण हळूहळू ते एकेकजण नाहीसे झाले. दूरवरील चर्चच्या घंटीच्या आवाजा व्यतिरिक्त पूर्ण शांतता पसरली. रात्र चढू लागली. आम्ही ज्याचा आसरा घेतला होता, त्या पानांवर पावसाची भुरभुरी चालू झाली.

पहाटेपूर्वीचे गुडूप अंधाराचे अडीच वाजले, तेव्हा गेटच्या बाजूने हळू पण स्पष्ट असा आवाज आला. कोणीतरी गेटमधून आत शिरले. परत बराच वेळ शांतता पसरली. मला भीती वाटू लागली, की तो आवाजाचा भास होता. तेव्हा केबिनच्या दुसऱ्या बाजूने अविश्वसनीय अशी पाऊलांची हालचाल जाणवली. क्षणभराने धातू खरवडल्याचा आवाज आला. कुणी मनुष्य कुलुपाशी झटापट करत होता. यावेळी त्याची कुशलता जास्त असावी किंवा त्याचे हत्यार जास्त बरे असावे. कारण एकदम धाडकन आवाज येऊन करकर असा बिजागऱ्यांचा आवाज आला. मग एक काडी ओढली गेली. आणि एका मेणबत्तीचा संथ प्रकाश पडला. पडद्द्यामधून आमचे डोळे आतील दृष्याकडे लागले होते.

तो निशाचर बारीक तरुण मनुष्य होता. काळ्या मिशांमुळे त्याच्या भयाण चेहऱ्यात भर पडत होती. तो फार तर वीस वर्षांचा वाटत होता. मी इतका घाबरलेला दयनीय माणूस आजपर्यंत पाहिला नव्हता. तो थरथरत होता. त्याचे दात वाजत होते. त्याने एखाद्या सभ्य माणसासारखा जाकीट व डोक्यावर टोपी, असा पोषाख केला होता. त्याला आजूबाजूला घाबरट डोळयांनी बघतांना आम्ही पाहीले. मग त्याने मेणबत्ती टेबलाच्या कडेला ठेवली. आता तो एका कोपऱ्यात गेल्यामुळे आम्हाला दिसेनासा झाला. तो मांडणीमधील एक मोठी वही घेऊन आला. टेबलावर वाकून, त्याने त्याला हव्या असलेल्या पानावर येईपर्यंत त्या वहीची पाने भराभर उलटली. नंतर रागाने हाताच्या मुठी वळून, त्याने ती मिटवली. परत होती तिथे ठेवली व मेणबत्ती विझवली. तो केबिनबाहेर पडणार तोच, हॉपकिन्सने त्याची कॉलर पकडली. आपण आता पकडले गेलो, हे समजून त्या माणसाने जोराने किंकाळी मारलेली मी ऐकली. पुन्हा मेणबत्ती लावली गेली. तो

दुर्दैवी कैदी त्या गुप्तहेराच्या पकडीत थरथरत उभा राहीला. त्याने त्या सामानाच्या कप्प्यावर बसकण मारली व दयार्द नजरेने आमच्याकडे आळीपाळीने बघत राहीला.

स्टॅन्ले हॉपकिन्स बोलला, “अरे लबाड माणसा, तू कोण आहेस? तुला काय हवे आहे?”

तो माणूस स्वतःला सावरायचा प्रयत्न करत आमच्याकडे बघू लागला.

तो बोलला, “तुम्ही गुप्तहेर आहात का? तुम्हाला असे वाटते आहे, की कॅप्टन पीटर कॅरेच्या मृत्यूशी माझा संबंध आहे. पण मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो, की मी निरपराध आहे.”

हॉपकिन्स बोलला, “ते आपण बघू. पहिल्यांदा हे सांग की तुझे नाव काय?”

“मी जॉन होप्ले नेलीगन आहे.”

होम्स आणि हॉपकिन्सने एकमेकांना झटपट खूण केलेली मी पाहीली.

“तू इथे काय करतो आहेस?’

“मी कुणाला कळू न देता, बोलू शकतो का?”

“नाही. अर्थातच नाही.”

“मी तुम्हाला का सांगावे?”

“जर तुझ्याकडे उत्तर नसेल, तर कोर्टात तुला त्रास होईल.”

पुढील भीतीने त्या तरूण माणसाचा थरकाप झाला.

तो म्हणाला, “ठीक आहे. मी तुम्हाला सांगतो. का सांगू नये? तरीही मला या जुन्या प्रकरणातून नव्या आयुष्यातील कर्जाचा लाभ होतांना बघण्याचा विचार तिरस्करणीय वाटतो आहे. तुम्ही डॉसन व नेलीगनचे नाव ऐकले आहे का?

हॉपकिन्सच्या चेहऱ्यावरून मला समजत होते की त्याने ते ऐकले नव्हते. पण होम्सने बहुधा ऐकले होते.

तो म्हणाला, "तुला पश्चिमेकडील बँकर्सबद्दल म्हणायचे आहे का? त्यांनी लाख डॉलर्सचा अपहार करून देशातील अर्धी कॉर्नवेल कुटुंबे धुळीला मिळवली. एवढे केल्यावर ते निसटले."

"बरोबर. नेलीगन माझे वडील होते."

शेवटी आमच्या हाती काही लागत होते. तरीही स्वतःच्याच भाल्याने भिंतीवर भोसकला गेलेला पीटर कॅरे व निसटू बघणारा बँकर यांच्यातील संबंध काय ते अजून कळत नव्हते. आम्ही लक्ष देऊन त्या तरुण माणसाचे म्हणणे ऐकले.

"यात खरे तर माझ्या वडीलांचा संबंध होता. डॉसन निवृत्त झाला होता. मी त्यावेळी फक्त दहा वर्षांचा होतो. पण त्याबद्दल लाज व भीती वाटण्याइतका मोठा होतो. नेहमी असे म्हटले जाते की माझ्या वडिलांनी सर्व सुरक्षा ठेवी चोरून पोबारा केला. पण ते खरे नाही. त्यांचा असा विश्वास होता, की त्यांना जर वेळ दिला गेला असता, तर सर्व काही ठीक झाले असते व प्रत्येक खातेदाराला त्याचे पूर्ण पैसे परत मिळाले असते. त्यांच्यावर पकड वॉरंट जारी होण्यापूर्वीच, ते त्यांच्या लहानशा जहाजाने नॉर्वेला निघाले. आदल्या रात्री त्यांनी माझ्या आईचा निरोप घेतला, ते मला आठवते आहे. त्यांनी आम्हाला सुरक्षा ठेवींची यादी दिली. ते म्हणाले की ते उजळ माथ्याने परत येतील व त्यांच्यावर विश्वास ठेवलेल्यांचे काहीही वाकडे होणार नाही. त्यानंतर त्यांच्याकडून काहीच कळले नाही. ते व त्यांचे जहाज दोन्ही पूर्णपणे नाहीसे झाले. माझी आई व मी दोघेही समजू लागलो की त्यांनी बरोबर नेलेल्या सुरक्षा ठेवी समुद्रात त्यांच्याबरोबर बुडाल्या. आमचा एक विश्वासू व्यापारी मित्र होता. त्याने असे शोधून काढले की काही काळापूर्वी त्यांनी बरोबर नेलेल्या काही सुरक्षा ठेवी लंडन बाजारात परत दिसू लागल्या. आम्हाला किती नवल वाटले असेल, याची तुम्ही कल्पना करू शकता. मी अनेक महिने त्याचा शोध घेत होतो. आणि

शेवटी अनेक संशयास्पद गोष्टीतून व अडचणीतून जाऊन, मला असा शोध लागला की या केबिनचा मालक कॅप्टन पीटर कॅरे हा त्या मूळ ठेवी विकणारा होता.

अर्थात मी त्या माणसासंबंधी चौकशी केली. मला असे आढळले, की माझे वडील ज्यावेळेस नॉर्वेहून निघाले, तेव्हाच आर्टिक्ट समुद्राहून निघणाऱ्या जहाजाचा तो कॅप्टन होता. त्या वर्षीचा हिवाळा वादळी होता आणि तेथे ओळीने अनेक दक्षिण वाऱ्यांची वादळे होत होती. माझ्या वडिलांचे जहाज उत्तरेला भरकटत गेले असावे. आणि तेथे ते कॅप्टन पीटर कॅरेच्या जहाजाला भेटले असावे. तसे असेल तर माझ्या वडिलांचे काय झाले? तरीही मी पीटर कॅरेकडील कागदपत्रांच्या पुराव्यावरून हे सिद्ध करू शकलो असतो, की त्या सुरक्षा ठेवी माझ्या वडीलांनी न विकता, बाजारात कशा आल्या आणि माझ्या वडिलांचा हेतू त्या स्वतःच्या खासगी मालमत्तेसारख्या वापराव्यात, असा कधीच नव्हता.

"कॅप्टनला भेटावे असा बेत आखून मी ससेक्समध्ये आलो. पण तेव्हाच त्याचा भयानक खून झाला. मी कोर्टात असे ऐकले, की त्याच्या जहाजावरील जुन्या हिशेबाच्या वह्या त्या केबिनमध्ये ठेवलेल्या आहेत. माझ्या मनात आले, की जर ऑगस्ट १८८३ मध्ये सी युनिकॉर्न या जहाजावर काय झाले हे मला सापडले, तर माझ्या वडीलांच्या नाहीसे होण्याच्या गोष्टीवर, काही प्रकाश पडू शकेल. मी काल रात्री तसा प्रयत्न केला. पण मला दार उघडता आले नाही. आज रात्री मी परत प्रयत्न केला व तो सफल झाला. पण मला पाहीजे असलेल्या महिन्याची पाने आधीच फाडली गेल्याचे मला आढळून आले. त्याच वेळी तुम्ही मला पकडले."

हॉपकिन्सने विचारले, "एवढेच का?"

त्याची नजर न हलवता तो म्हणाला, "हो. एवढेच."

"अजून काही तू सांगू शकत नाहीस का?"

तो घुटमळला.

“नाही. अजून काही नाही.”

“तू काल रात्रीपूर्वी कधी इथे आला नव्हतास?”

“नाही.”

मग पुरावा म्हणून पहिल्या पानावर त्या माणसाचे नाव असलेली व त्याच्या वेष्टनावर रक्ताचे डाग उडालेली डायरी हातात फडकवत हॉपकिन्स ओरडला, “मग या डायरीबद्दल तू काय सांगशील?”

तो दुर्दैवी माणूस कोसळला. त्याने त्याचा चेहरा हातात लपवला व थरथरू लागला.

तो ओरडला, “ही तुम्हाला कुठे मिळाली? मला माहिती नाही. मला वाटले की मी ती हॉटेलवर विसरलो.”

हॉपकिन्स म्हणाला, “एवढे पुरेसे आहे. अजून काही तुला सांगायचे असेल, तर तुला ते कोर्टात सांगावे लागेल. आता तू मुकाट्याने माझ्याबरोबर पोलीस स्टेशनला चल. आणि मिस्टर होम्स, मी तुमचे व तुमच्या मित्राचे मला मदत केल्याबद्दल आभार मानतो. तुमचा सहभाग या केसमध्ये जरुरीचा नव्हता. तुमच्याशिवाय देखील मी केस या टोकापर्यंत आणू शकलो असतो. पण तरीही मी आभार मानतो. ब्रँब्लेट्ये हॉटेलमध्ये तुमच्यासाठी आरक्षण केले आहे. आपण सर्वजण बरोबरच तिथे जाऊ.”

दुसऱ्या दिवशी आम्ही बेकर रस्त्याला परत आल्यावर होम्सने मला विचारले, “वॉटसन, तुला या केसबद्दल काय वाटते?”

“मला दिसते आहे, की तू समाधानी नाहीस.”

“ते खरे नाही, प्रिय वॉटसन, मी पूर्ण समाधानी आहे. तरीही स्टॅन्ले हॉपकिन्सची पद्धत मला आपली स्तुती करणारी वाटली नाही. मी त्याच्यावर नाराज झालो आहे. मला त्याच्याकडून काही

जास्त अपेक्षा होती. प्रत्येकाने नेहमी दुसऱ्या शक्यतेचा विचार करायला हवा व त्याचा पाठपुरावा करायला हवा. गुन्हेगारी तपासाचा हा पहिला नियम आहे."

"मग, दुसरी शक्यता काय असू शकेल?"

"जी तपासाची दिशा मी पकडली होती, ती. कदाचित त्यातून काहीच हाती लागणार नाही. त्याबद्दल मी आत्ता सांगू शकत नाही. पण मी ती शेवटपर्यंत तडीस नेईन."

बेकर रस्त्यावर पुष्कळ पत्रे होम्सची वाट बघत पडून होती. त्याने त्यातील एक ओढून घेतले व उघडले. तो विजयोन्मादाने जोरजोरात हसू लागला.

"छान वॉटसन, दुसरा पर्याय सफल होतो आहे. तुझ्याकडे तारेचे कागद आहेत का?

माझ्याकरता काही मजकूर लिही बर. 'उन्हाळ्यातील जहाजांचा दलाल, रॅटक्लिफ रस्ता, उद्या सकाळी दहा वाजता तीन माणसे पाठवा ---- बेसिल.' ते माझे त्या विभागातील नाव आहे. दुसरी आहेः 'इन्स्पेक्टर स्टॅन्ले हॉपकिन्स, ४६, लॉर्ड रस्ता, ब्रिक्स्टन, उद्या सकाळी साडेनऊला न्याहारीसाठी ये. येणे शक्य नसल्यास तार कर. शेरलॉक होम्स'. बरका वॉटसन, या बेकार केसने दहा दिवस मला छळले आहे. आता मी तिचा निकालच लावून टाकतो. उद्या तिची कायमची तड लावून टाकतो."

बरोबर दिलेल्या वेळी इन्स्पेक्टर स्टॅन्ले हॉपकिन्स हजर झाला. आम्ही मिसेस ह्डसनने केलेल्या चविष्ट न्याहारीचा आस्वाद घेऊ लागलो. त्याच्या विजयामुळे तो तरुण इन्स्पेक्टर खुषीत होता.

होम्सने त्याला विचारले, "तुला खरेच असे वाटते का, की तुझी केसची उकल बरोबर आहे?'

"याहून काही अधिक अपेक्षा मी करू शकत नाही."

"मला ती उकल बरोबर वाटत नाही."

“मिस्टर होम्स, तुम्ही मला चकित करत आहात. अजून काय शोधायचे बाकी आहे?”

“तुझे स्पष्टीकरण सगळे मुद्दे विचारात घेते का?”

“निःसंशय. तरूण नेलीगन ब्रॅंब्लेट्ये हॉटेलमध्ये गुन्हा घडला, त्याच दिवशी आला होता. तो गोल्फ खेळण्याच्या बहाण्याने आला होता. त्याची खोली तळमजल्यावर होती. तो कधीही झटकन बाहेर पडू शकत असे. त्याच रात्री तो वूडमन लीला गेला. पीटर कॅरेला केबिनमध्ये पाहीले. त्याच्याबरोबर भांडण केले व त्याला भाल्याने ठार मारले. नंतर स्वतःच्या कृत्याने भयभीत होऊन, तेथून पळाला. जातांना पीटर कॅरेला सुरक्षा ठेवींबद्दल विचारण्यासाठी आणलेली डायरी खाली पडली. तुम्हाला दिसेल की त्या यादीपैकी काही बाबींवर टिकमार्क केली होती आणि इतर ---- बऱ्याचशा ---- तशी खूण केलेल्या नव्हत्या. ज्यावर टिकमार्क केली होती त्या लंडन बाजारात दिसल्या होत्या. बहुधा अजून त्या पीटरच्या ताब्यात होत्या. तरुण नेलीगन त्या परत मिळवून, त्याच्या वडीलांच्या खातेदारांना देणार होता. त्याच्या पलायनानंतर काही काळ तो परत केबिनमध्ये येऊ धजत नव्हता. पण त्याला हवी असलेली माहिती मिळवण्यासाठी, शेवटी मन घट्ट करून त्याने स्वतःला तयार केले. असे सर्व साधे व सरळ आहे.”

होम्सने हसून मान हलवली. “मला वाटते यात एक त्रुटी आहे. हॉपकिन्स, ती म्हणजे, हे अगदी ठामपणे अशक्य आहे. तू शरीरातून भाला काढण्याचा प्रयत्न केलास का? नाही? अरेरे, माझ्या प्रिय माणसा, तू असल्या गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे होतेस. माझा मित्र वॉटसन तुला सांगू शकेल, की मी सबंध सकाळभर याच गोष्टीवर विचार करत होतो. ही इतकी सोपी गोष्ट नाही. त्यासाठी दणकट व सरावाचा हात लागतो. हा ठोसा इतक्या आक्रमकपणे मारला गेला, की भाल्याचे टोक भिंतीत खोल घुसले. हा ॲनिमियाने जर्जर असलेला तरुण इतका जबरदस्त ठोसा मारू शकेल, अशी तू कल्पना तरी करू शकतोस का? रममध्ये समाजमान्य पद्धतीने पाणी मिसळून ती त्याने खुनाच्या दिवशी काळ्या पीटरबरोबर घेतली असेल का? दोन दिवसांपूर्वी पडद्यावर

दिसलेली आकृती त्याची होती का? नाही. हॉपकिन्स, नाही. तो कुणी दुसराच शक्तिमान माणूस असला पाहिजे. त्याला शोधायला हवे."

होम्स बोलतांना हॉपकिन्सचा चेहरा लांब झाला. त्याच्या आशा व महत्वाकांक्षा मोडून पडल्या होत्या. पण जोरदार लढा दिल्याशिवाय, तो त्याचे पद सोडणार नव्हता.

"मिस्टर होम्स, तुम्ही हे नाकारू शकत नाही, की त्या रात्री नेलीगन तिथे हजर होता. त्या वह्या हे सिद्ध करतील. जरी तुम्हाला ते पटत नसले तरी, मला वाटते, माझ्याकडे ज्युरीचे समाधान होईल, इतका पुरावा आहे. मिस्टर होम्स, त्याशिवाय मी माझ्या मते गुन्हेगार असलेल्या त्या माणसाला पकडले आहे. तुमच्या मताप्रमाणे असलेला तो भयानक खुनी आहे कुठे?"

होम्स म्हणाला, "मी अशी कल्पना करतो की तो जिन्यावर आहे. वॉटसन, मला वाटते, तुला पटकन मिळेल अशा जागी तू पिस्तुल ठेवावेस." तो उठला व एक लिखित कागद कडेच्या टेबलावर ठेवला. तो बोलला, "आता आपण तयार आहोत."

तिथे बाहेर काही असंबद्ध बोलण्याचे आवाज आले. मिसेस हडसनने दार उघडले व सांगितले की तीन माणसे कॅप्टन बेसिलची चौकशी करत आहेत.

होम्स म्हणाला, "एकेकाला वर पाठवा."

पहिला आलेला छोटा रिबस्टन लालपिवळ्या सफरचंदासारखा होता. तो सुदृढ व लाल गालांचा दिसत होता. त्याचा मिशा पांढऱ्या भरघोस होत्या. होम्सने त्याच्या खिशातून पत्र काढले.

त्याने विचारले, "नाव काय?'

"जेम्स लॅन्कास्टर ."

“मी दिलगीर आहे, लॅन्कास्टर. जागा भरली आहे. तुझ्या तसदीबद्दल तुला हे नाणे घे. या खोलीत काही मिनिटे बस.”

दुसरा उमेदवार सरळ केसांचा, खप्पड गालांचा, उंच व सुकट प्राणी होता. त्याचे नाव हग पॅटीन्स होते. त्यालाही बाद करण्यात आले व नाणे देऊन बसायला सांगण्यात आले.

तिसरा उमेदवार उल्लेखनीय दिसत होता. त्याचा चेहरा भीतीदायक दांडग्या कुत्र्यासारखा असून केस वेडेवाकडे बांधलेले होते. दाढी होती व दोन धीट मोठे डोळे दाट लोंबणाऱ्या भुवयांच्या आडून डोकावत होते. त्याची टोपी हाताने गोल फिरवत, तो सलाम करून, एखाद्या खलाशांप्रमाणे उभा राहिला.

होम्सने विचारले, “तुझे नाव?”

“पॅट्रिक केन्स.”

“भालाफेक करणारा?”

“हो सर, सव्वीस सफरी.”

“मला वाटते डंडीचा?”

“हो सर.”

“किती पगार?’

“महिन्याला आठ पौंड”

“तू कामावर लगेच रुजू होऊ शकतोस का?”

“माझी साधनसामग्री मिळाल्यावर लगेच.’

“तुझ्याकडे तुझी कागदपत्रे आहेत का?”

“हो सर.” त्याने त्याच्या खिशातून जुनाट व डाग पडलेले कागद काढले. होम्सने त्यावर नजर फिरवून ते परत दिले.

तो म्हणाला, “तू बरोबर मला हवा असलेला मनुष्य आहेस. या कडेच्या टेबलावर आपल्यातील करार ठेवला आहे. तू त्यावर सही केलीस, तर मग काम फत्ते झाले.”

त्या खलाशाने खोलीत आनंदाने येरझऱ्या मारल्या व पेन घेतले. टेबलावर वाकून त्याने विचारले, “मी इथे सही करू का?”

होम्सने त्याच्या खांद्यांवरून पुढे वाकून त्याच्या गळ्यात दोन्ही हात टाकले. तो बोलला, “इथे चालेल.”

मला स्टील आपटल्याचा व माजलेल्या बैलाच्या फुरफुरण्याचा आवाज आला. पुढच्या क्षणो होम्स व तो खलाशी यांनी जमिनीवर लोळण घेतली. तो इतका शक्तिशाली मनुष्य होता की होम्सने त्याच्या मनगटाला धातूचे पट्टे बांधलेले असूनही त्याने झटपट माझ्या मित्रावर वर्चस्व प्रस्थापित केले. मी व हॉपकिन्स होम्सच्या मदतीला धावलो. जेव्हा मी पिस्तुलाचे टोक त्या खलाशाच्या कानशीलावर रोखले, तेव्हा त्याला शेवटी कळले, की विरोध करणे व्यर्थ आहे. आम्ही त्याच्या घोट्यांना दोरी बांधली आणि त्या मारामारीने दमून गेलो.

होम्स म्हणाला, “हॉपकिन्स, मी खरच तुझी क्षमा मागायला पाहिजे. उकडलेली अंडी गार झाल्याबद्दल मला खेद होतो. शेवटी तू तुझी केस विजयश्रीकडे खेचत आणलीस याबद्दल तुला नक्कीच आनंद होईल व तुझी इतर न्याहारी तुला आवडेल.”

हॉपकिन्स नवल वाटून अवाक झाला.

अचानक लाल चेहऱ्याने तो बोलला, “मिस्टर होम्स, काय बोलावे, ते मला समजत नाही. असे दिसते आहे, की ते पहिल्यापासून मला मूर्ख बनवत आहेत. आता मला समजले, की मी तुमचा

शिष्य आहे आणि तुम्ही माझे गुरु आहात, हे मी कधीच विसरायला नको होते. पण मला कळले नाही, की तुम्ही ते कसे केलेत व ते काय दर्शवते?"

"होम्स हसत म्हणाला, "ठीक आहे. ठीक आहे. आपण सगळे अनुभवातूनच शिकतो. यावेळेचा तुझा धडा असा आहे की, कधीही पर्यायांचा विचार सोडायचा नाही. तू तरुण नेलीगनमध्ये इतका गुंतून गेलास, की तुला पीटर कॅरेच्या खऱ्या खुन्याचा, पॅट्रिक केन्सचा, विचार करायला सवडच मिळाली नाही."

आमच्या संभाषणामध्ये त्या खलाशाचा घोगरा आवाज कानावर आला.

तो म्हणाला, "मिस्टर असे बघा, तुम्ही मला असे बांधून ठेवलेत, याबद्दल माझी काही तक्रार नाही पण ते म्हणतात मी पीटर कॅरेचा खून केला पण मी म्हणतो मी पीटर कॅरेला मारले, आणि यात फरक आहे. मी काय म्हणतो, यावर कदाचित तुम्ही विश्वास ठेवणार नाही व थापा मारतो आहे, असे तुम्हाला वाटेल."

"होम्स बोलला, "तसे नाही. तुला काय म्हणायचे आहे, ते सांग."

त्याने ते लगेच सांगितले. देवाच्या दयेने त्यातील प्रत्येक शब्द खरा होता. त्याने सुरु केले, "मला काळा पीटर माहिती होता.आणि जेव्हा त्याने त्याचा चाकू काढला, तेव्हा मी त्याला भाल्याने भोसकले, कारण मला वाटले, की एक तर, तो तरी जगेल किंवा मी. अशा तऱ्हेने तो मेला. तुम्ही त्याला खून म्हणू शकता. तसेही पीटरचा चाकू माझ्या हृदयात घुसल्याने मी मेलोच असतो."

"होम्सने विचारले, "पण तू तिथे आलास कसा?'

"मी तुम्हाला सुरवातीपासून सगळे सांगतो. मी बसतो म्हणजे मला नीट बोलता येईल. '८३ मध्ये हे झाले ---- त्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये. पीटर सी युनिकॉर्नचा कॅप्टन होता. मी राखीव भालाफेक करणारा होतो. घराकडे जातांना आम्ही घट्ट बर्फातून चालत होतो. खूप वारा होता.

दक्षिणेचे वादळ घोंघावत होते. उत्तरेकडे वहात चाललेली एक सुबक नाव आम्ही उचलून घेतली. त्यावर समुद्राला नवखा असलेला एक माणूस होता. ती मजेने चक्कर मारायची शिडाची उघडी बोट नॉर्वेच्या किनाऱ्याला लागेल, असे त्यांना वाटत होते. मला वाटते, ते सगळे बुडाले. तरी आम्ही त्या माणसाला आमच्या जहाजावर घेतले. तो मनुष्य आणि कॅप्टन यांच्यात बराच वेळ बोलणे झाले. केबिनमध्ये त्याचे सामान म्हणजे एक टीनची पेटी होती. त्या माणसाचे नाव कळले नाही. दुसऱ्या रात्री तो कधी इथे न आल्यासारखा, अदृष्य झाला. एक तर त्याने आपण होऊन पाण्यात उडी मारली असली पाहीजे किंवा वादळी हवेमुळे तसे झाले असावे. एकाच माणसाला काय झाले, ते माहिती होते आणि तो म्हणजे मी होतो. कारण माझ्या स्वतःच्या डोळयांनी मी शेटलँडचे दिवे दृष्टीपथात येऊ लागल्यावर, अंधाऱ्या रात्री कॅप्टनला टाचा उंचावून, त्या माणसाला उंच बार्सवर घड्याळाखाली ठेवतांना पाहीले. मी हे कुणालाच बोललो नाही. पुढे काय होते ते बघत राहीलो. जेव्हा आम्ही स्कॉटलंडला परत गेलो, तेव्हा सर्व काही शांत झाले होते. आणि कुणीही काही प्रश्न विचारले नाही. तो अनाहूत पाहुणा अपघाताने मेला आणि कुणालाच त्याचे काही पडले नव्हते. नंतर लगेचच पीटर कॅरेने समुद्र सोडला. अनेक वर्षे ती कुठे आहे, याचा मला काही पत्ता नव्हता. मला वाटते पेटीत जे काही होते त्याबद्दल त्याने काही करार केला आणि त्यामुळे माझे तोंड गप्प ठेवण्यासाठी तो मला बरीच रक्कम देऊ शकला. त्याला लंडनमध्ये भेटलेल्या एका खलाशांकडून, मी तो कुठे आहे ते शोधून काढले आणि त्याला कोंडीत पकडण्यासाठी गेलो. पहील्या रात्री तो ठीक होता. तेव्हा मला समुद्री आयुष्यातून बाहेर पडण्यासाठी मदत करायला तयार होता. दोन रात्रींनंतर आम्ही त्याबद्दल सर्व काही ठरवणार होतो. मी त्याला भेटलो, तेव्हा तो खूपच प्यायलेला होता व त्याची मनस्थितीदेखील ठीक नव्हती. आम्ही प्यायलो व गतकाळातील आठवणी काढत बसलो. पण तो जितका जास्त जास्त पिऊ लागला, तितके त्याच्या चेहऱ्याकडे बघणे मला असह्य होऊ लागले. या प्रकरणातून बाहेर पडण्यापूर्वी कदाचित मला तो लागेल, म्हणून मी भिंतीवरील तो भाला काढला. नंतर डोळयात खून उतरलेल्या त्याने शिव्याशाप देत, हातात चाकू घट्ट धरून माझ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न

केला. त्याला चाकूचे आच्छादन काढायला वेळ मिळायच्या आतच, मी भाला त्याच्या आरपार घुसवला. बापरे! तो कसला जोरात किंचाळला! तो कोसळला. त्याचे रक्त माझ्याभोवती जमा झाले. मी क्षणभर थांबलो. सर्वत्र शांतता होती. मी परत धीर गोळा केला. मी आजूबाजूला पाहिले. तिथे मांडणीमध्ये टीनची पेटी होती. तसेही, पीटर कॅरेइतकाच माझा त्या पेटीवर हक्क होता. त्यामुळे ती घेऊन मी केबिन सोडली. एकाद्या मूर्खासारखे माझे पाकीट मी तिथे टेबलावर विसरलो.

"आता मी तुम्हाला गोष्टीचा सर्वात विचित्र भाग सांगतो. मी केबिनबाहेर पडतो न पडतो, तोच मी एकाला तिथे येतांना पाहीले. मी झुडूपात लपलो. तो माणूस गुपचूप, हलक्या पाऊलांनी केबिनमध्ये शिरला व एखाद्या भुताला बघावे, तसा ओरडू लागला. तो जोराने पळत बाहेर पडून दिसेनासा झाला. तो कोण होता व त्याला काय हवे होते, हे मला समजले नाही. मी शहाणपणा करून दहा मैल चाललो व एक शिलिंगदेखील खर्च न करता, टनब्रिजला गाडी पकडून लंडन गाठले.

"त्यानंतर मी जेव्हा पेटी उघडली, तेव्हा त्यात मला पैसे आढळले नाहीत. काही कागदपत्रे सापडली. ती मी विकू धजलो नाही. मी काळ्या पीटरवरचा माझा हक्क गमावून बसलो आणि एखाद्या कफल्लकासारखा लंडनमध्ये फिरू लागलो. माझा व्यापार फक्त शिल्लक होता. मी ही भालाफेक करणारे पाहिजेत अशी जाहीरात वाचली. भरपूर पगार असलेला वाचले व जहाजावरील दलालाकडे गेलो. त्याने मला इथे पाठवले. एवढे मला माहिती आहे. आणि परत सांगतो जर मी काळ्या पीटरला मारले असेल, तर कायद्याने माझे आभार मानले पाहीजेत. कारण मी फाशीच्या दोराचा खर्च वाचवला आहे."

उठून त्याची सिगरेट पेटवत होम्स होम्स बोलला, "अगदी स्पष्टपणे केलेले कथन. मला वाटते हॉपकिन्स, तू कैद्याला सुरक्षित जागी हलवण्यासाठी उशीर करू नयेस. ही खोली म्हणजे काही तुरुंग नाही. आणि पॅट्रिक केन्स येथील फारच जागा अडवितो आहे."

हॉपकिन्स म्हणाला, “मिस्टर होम्स, मला कळत नाही की तुमचे आभार कसे मानू. अजूनही मला सनजत नाही, की तुम्ही इथपर्यंत कसे पोचलात.”

“सुरवातीपासून नशीबाने योग्य पुरावा सापडल्यामुळे. अशी खूप शक्यता होती की मला या डायरीबद्दल माहिती झाल्याने, मी तुझ्यासारखाच भरकटलो असतो. पण सारासार विचार करता, सर्व गोष्टो एकाच दिशेकडे बोट दाखवत होत्या. भाला वापरण्यातील शक्ती व कसब, रम व पाणी, तंबाखूची पुडी ---- हे सर्व एखाद्या खलाशाकडे निर्देश करत होते, बहुधा व्हेलची शिकार करणाऱ्या जहाजाकडे. पुडीवरील ‘P.C.’ ही अक्षरे योगायोग होता. ती अक्षरे पीटर कॅरेची नव्हती. कारण तो क्वचित तंबाखू ओढत असे. तुला आठवत असेल, मी विचारले होते की केबिन मध्ये व्हिस्की किंवा ब्रँडी सापडली का आणि तू हो म्हणाला होतास. किती खलाशी व्हिस्की किंवा ब्रँडी मिळत असतांना रम पीत असतील? मग माझी खात्री झाली की तो खलाशीच असला पाहीजे.”

“आणि तुम्हाला तो कसा सापडला?”

“माझ्या प्रिय सर, ही फारच सोपी समस्या होती. जर तो खलाशी असेल, तर तो नक्की पीटरच्या बरोबर असलेला सी युनिकॉर्न या जहाजावरील असणार, हे लक्षात आले. मला समजले की आत्तापर्यंत तो दुसऱ्या कुठल्या जहाजावर काम करत नव्हता. मी डंडीला लिहिण्यात तीन दिवस घालवले. आणि मधल्या वेळात मी १८८३च्या सी युनिकॉर्नच्या ताफ्यातील नावांची खातरजमा केली. जेव्हा मला भालाफेकीत निष्णात असलेल्या पॅट्रिक केन्सचे नाव समजले, माझा शोध संपत आला. मला वाटले की तो बहुधा लंडनमध्ये असणार आणि काही वेळाकरता, देश सोडायच्या विचारात असणार. त्यामुळे मी काही दिवस पूर्वेच्या टोकाला आर्टिक्ट मोहिमेवर घालवून, कॅप्टन बेसिलच्या हाताखालील भालाफेक करणाऱ्यांच्या पुढे मोहक अशा अटी असलेल्या नोकरीचा प्रस्ताव ठेवला व ---- मग वाट बघत बसून राहीलो.”

हॉपकिन्स ओरडला, “नवलपूर्ण! आश्चर्यकारक!”

होम्स म्हणाला, “तरुण नेलीगनची तू लवकरात लवकर सुटका केली पाहीजेस. माझे तर असे म्हणणे आहे, की तू त्याची क्षमा मागितली पाहिजेस. टीनची पेटी त्याला दिली पाहिजेस. पण अर्थात, पीटर कॅरेने विकलेल्या सुरक्षा ठेवींवर पाणीच सोडायला हवे. हॉपकिन्स, ती बघ गाडी येते आहे. तू याला अटक करू शकतोस. कोर्टातील केसच्या वेळी तुला माझी गरज भासल्यास, माझा व वॉटसनचा ठावाठिकाणा नॉर्वेजवळ कुठेतरी असेल ---- मी ठळक बाबी नंतर पाठवेन.”

# The Adventure Of The Dancing Men

# नाचणाऱ्या माणसांचे साहस




होम्स काही तास त्याची लांब अरुंद पाठ एका रासायनिक परिक्षानळीवर वाकवून, कसले तरी घाणेरडा वास येणारे मिश्रण करत, शांत बसला होता. त्याचे डोके त्याच्या छातीत रुतले होते. माझ्या दृष्टीकोनातून, तो एखाद्या करडी पिसे आणि काळे डोके असलेल्या लांब, सरळ पक्ष्यासारखा दिसत होता.

तो म्हणाला, "तर मग वॉटसन, तुला दक्षिण आफ्रिकन सुरक्षा ठेवीत पैसे गुंतवायचे नाही म्हणतोस?

मी आश्चर्यचकित झालो. होम्सच्या नवलपूर्ण कारवायांना मी सारावलेलो होतो तरीही माझ्या जिव्हाळ्याच्या विषयावर त्याचे अचानक घसरणे, माझ्यासाठी धक्का देणारे होते.

मी विचारले, "तुला याची माहिती कुठून मिळाली?"

हातात वाफाळलेली परिक्षानळी घेऊन व डोळ्यात करमणुकीची छटा घेऊन तो स्टुलावरुन वळला.

तो बोलला, "वॉटसन, आता तुला धक्का बसल्याचे कबूल कर."

“हो. बसला.”

“मला तुझ्याकडून, एका कागदावर सही करून घ्यायची आहे.”

“का?’

“कारण पाच मिनिटात तू म्हणशील की हे सर्व वेड्यासारखे साधे आहे.”

“माझी खात्री आहे, की मी असे काहीही म्हणणार नाही.”

त्याच्या हातातील परिक्षानळी जागेवर ठेवत तो एखाद्या प्राध्यापकाच्या थाटात व्याख्यान देऊ लागला, “बघ हं. माझ्या प्रिय वॉटसन, “---- निष्कर्षांची मालिका तयार करणे काही फार कठीण काम नाही. ती आधीच्या प्रक्रियांवर अवलंबून असते व साधी असते. असे केल्यावर मध्यवर्ती निष्कर्ष अगदी सहज निघतात. ऐकणाऱ्यांवर आकर्षक, परंतु काही खोली नसलेला असा धक्कादायक परिणाम साधू शकणे सोपे असते. तुझ्या डाव्या हाताचा अंगठा व चाफेकळी यांच्या मधल्या भागाच्या तपासणीवरून, मी नक्की सांगू शकतो की तुला तुझ्याकडील थोडेसे पैसे सोन्यात गुंतवायचे नाहीत.”

“मला तरी या दोन गोष्टीत काही संबध दिसत नाही.”

“तसा तो दिसणार नाहीच, पण मी तुला तो पटकन दाखवू शकतो. त्या साखळीतील वगळलेले दुवे असे आहेतः १. काल रात्री जेव्हा तू क्लबमधून परत आलास, तेव्हा तुझ्या डावा अंगठा व बोट यामध्ये खडू धरलेला होता. २. बिलिअर्ड खेळतांना इशारा म्हणून तू तो तसा ठेवला होतास. ३. तू थर्स्टनशिवाय कुणाशीच बिलिअर्ड खेळत नाहीस. ४. तू मला महिन्यापूर्वी सांगितलेस की थर्स्टनला दक्षिण आफ्रिकेतील काही संपत्ती मिळवायची संधी आहे पण तिची मुदत एक महिनाच आहे. त्याला ती तुझ्याबरोबर मिळवायची इच्छा आहे. ५. तुझे चेकचे पुस्तक माझ्या खणात कुलुपबंद आहे. आणि तू किल्ली मागितलेली नाहीस. ६ त्याअर्थी तुला त्यात पैसे गुंतवायची इच्छा नाही.”

“किती वेड्यासारखे साधे!” इति वॉटसन

तो म्हणाला, “ते तसेच आहे. प्रत्येक समस्या तुला विषद करून सांगितल्यावर पोरकट ठरते. आता ही एक स्पष्टीकरण न दिलेली समस्या ऐक. त्याचे तू काय करतोस, ते बघू. त्याने एक कागद पसरला व परत त्याच्या रासायनिक विश्लेषणाच्या कामात दंग झाला.

मी ओरडलो, “होम्स, हे काय आहे? हे तर एखाद्या मुलाने मारलेल्या रेघोट्या आहेत.”

“ओहो, ही तुझी कल्पना आहे.’

“दुसरे काय असणार?”

“नॉरफोक मधील रायडिंग थोर्प मॅनॉर येथील मिस्टर हिल्टन क्युबिट, तेच तर जाणून घेण्यासाठी उत्सुक आहेत. ही गोंधळाची व कठीण अशी छोटीशी समस्या पहिल्या डाकेने आली आहे आणि पुढच्या गाडीने ते येत आहेत. वॉटसन, मला वाटते दाराची घंटी वाजते आहे. तेच आले असल्यास, मला नवल वाटणार नाही.”

जिन्यावर मोठा पदरव ऐकू आला. आणि क्षणार्धात एक उंच, लालसर, घोटून दाढी केलेला, माणूस आत आला. स्वच्छ डोळयांचा, सफरचंदासारखे गाल असलेला मनुष्य नक्कीच बेकर रस्त्यावरील धुके पसरलेल्या भागापेक्षा वेगळ्या भागातून आल्याचे कळत होते. त्याने त्याच्याबरोबर पूर्व किनाऱ्यावरील ताज्या, ताकदवान व आरोग्यपूर्ण हवेचा वानवळा आणल्याचे जाणवत होते. आमच्याबरोबर हस्तांदोलन केल्यावर तो खाली बसणार, तोच त्याचे लक्ष मी नुकत्याच पाहून टेबलावर ठेवलेल्या कागदाकडे गेले.

तो ओरडला, “कसे काय मिस्टर होम्स, तुम्ही याचे काय केले? त्यांनी मला सांगितले, की तुम्ही गूढ गोष्टींचा नाद असलेले आहात आणि याहून अधिक गूढ काही तुम्हाला सापडणार नाही. मी हा कागद मुद्दाम आधी पाठवला, म्हणजे तुम्हाला तो अभ्यासता येईल.”

होम्स म्हणाला, “हा खरेच नवलपूर्ण दिसतो आहे. प्रथम असे वाटते, की या एखाद्या मुलाने मारलेल्या रेघोट्या आहेत. पण यात नाचणाऱ्या खूप लहान लहान विचित्र आकृत्या आहेत. इतक्या कुरुपपणे विखुरलेल्या विनोदी आकृत्यांना, तुम्ही इतके महत्व का देत आहात?”

“मी नाही पण माझी बायको देते. त्यामुळे ती मरणांतिक घाबरते. ती तसे काही बोलत नाही पण तिच्या डोळ्यात मला ती दहशत दिसते. म्हणून मला हे प्रकरण मुळापासून मिटवून टाकायचे आहे.”

होम्सने तो कागद नीट उजेडात धरला. तो वहीतून फाडलेला एक कागद होता. त्यावर पेन्सिलीने खुणा केलेल्या होत्या आणि त्या या कागदावर आहेत, तशा होत्या.

होम्सने काही वेळ त्याचे निरीक्षण केले आणि मग त्याची व्यवस्थित घडी करून त्याच्या खिशातील छोट्या पुस्तकात ठेवली.

तो म्हणाला, “ही नेहमीपेक्षा वेगळी, गोंधळवून टाकणारी केस दिसते आहे. मिस्टर हिल्टन क्युबिट, तुम्ही मला तुमच्या पत्रातून यासंबधी काही माहिती दिलीत. पण माझ्या या मित्राकरता, डॉ वॉटसनकरता, तुम्ही ती परत सांगितलीत, तर बरे होईल.”

त्याचे मोठे हात थोड्या नाराजीने एकमेकांवर दाबत, आमचा पाहुणा बोलला, “मी फारसा गोष्टीवेल्हाळ नाही. तुम्हाला काय समजले नाही, तेवढे तुम्ही मला विचारा. माझे गेल्या वर्षी लग्न झाले, तिथपासून मी सुरवात करतो. पण प्रथम मला हे सांगितले पाहिजे की मी फारसा श्रीमंत माणूस नसलो तरी, माझे आप्तस्वकीय लोक गेल्या पाच शतकांपासून रायडिंग थोर्प येथे रहातात. आमचे कुटुंब नॉरफोकमधील सर्वात चांगल्या कुटुंबांपैकी आहे. मागील वर्षी मी राणीच्या रजत जयंती समारंभासाठी लंडनला आलो आणि रसेल चौक येथील एका खानावळीत राहिलो. कारण आमच्या चर्चमधील बिशप तिथे रहात होता. तिथे एक एल्सी पॅट्रीक नावाची अमेरिकन तरुण बाई होती. आम्ही चांगले मित्र झालो. तेथील महिन्याभरात मी तिच्या प्रेमात पडलो. लवकरच

आम्ही एका रजिस्टारच्या कार्यालयात गुपचूप लग्न केले. नॉरफोकमध्ये लग्नाचे जोडपे म्हणून आम्ही परतलो. मिस्टर होम्स, हे तुम्हाला वेडेपणाचे वाटेल, की एका परंपरावादी घराण्यातील माणसाने अशा काही पूर्वेतिहास माहिती नसलेल्या, ती कोण कुठली हे काहीही माहिती नसलेल्या, बाईशी अशा प्रकारे लग्न करावे. पण तुम्ही तिला पाहिलेत व ओळख करून घेतलीत, तर तुम्हाला समजेल.

त्या बाबतीत ती अगदी सरळ होती. माझी इच्छा असेल तर तिच्यामध्ये गुंतण्यातून मी बाहेर पडावे, म्हणून तिने मला संधी दिली होती. ती म्हणत असे, "माझ्या आयुष्यात काही वादातीत गोष्टी आहेत. मला ते सर्व विसरायचे आहे. मला माझ्या भूतकाळात रेंगाळायचे नाही, कारण तो माझ्यासाठी फार त्रासदायक आहे. हिल्टन, त्यात व्यक्तिगत रीत्या लाज वाटण्यासारखे काही नाही, पण त्यासाठी तुला माझ्यावर विश्वास ठेवावा लागेल. मी तुझी होण्यापूर्वीच्या माझ्या भूतकाळाबद्दल मला न बोलण्याची, तू परवानगी दिली पाहिजेस. नाहीतर तू मला ज्या एकाकी आयुष्यातून आणलेस, तेथेच मला सोडून दे व तू नॉरफोकला परत जा."

हे ती मला लग्नाच्या आदल्या दिवशी म्हणाली. मी तिला तिच्या अटी कबूल असल्याचे सांगितले आणि आजपर्यंत मी ते निभावले आहे.

आता आमच्या लग्नाला एक वर्ष झाले व आम्ही सुखी आहोत. पण सुमारे महिन्यापूर्वी, जूनच्या शेवटी, मला पहिल्यांदा त्रासाची चिन्हे दिसली. एक दिवस माझ्या बायकोला अमेरिकेहून एक पत्र आले. मी तसे तिकीट त्या पत्रावर पाहिले. ते बघून ती पांढरी फटक पडली. ते पत्र वाचून तिने शेकोटीत भिरकावून दिले. नंतर ती त्याबद्दल काही बोलली नाही. मीही विचारले नाही. कारण वचन म्हणजे वचन! पण तेव्हापासून ती बेचैन असते. नेहमी तिचा चेहरा घाबरलेला दिसतो, जसे काही ती थांबून कसली तरी वाट बघते आहे. तिने मला सर्वात जवळचा मित्र समजून, माझ्यावर विश्वास ठेवला, तर बरे पडेल. आत्तापर्यंत तसे होते. ती बोलत नाही, तोपर्यंत मला काहीच समजत नाही. तुम्हाला सांगतो, ती खरे बोलणारी बाई आहे. मिस्टर होम्स, तिच्या

पूर्वायुष्याबद्दल काही त्रास असेल, तर तो काही तिचा गुन्हा नाही. मी इंग्लंडमधील लहान गावातील जमीनदार असून, मला माझ्या कुटुंबाचा अभिमान आहे. तिला हे लग्नापूर्वीपासून माहिती आहे. ती त्यावर काही आंच आणणार नाही -- याची मला खात्री आहे.

"तर आता मी माझ्या गोष्टीच्या विचित्र भागाकडे येतो. साधारण आठवड्यापूर्वी, मला या कागदावर जशा विचित्र, गूढ आकृत्या आहेत, तशा खिडकीच्या काचेवर दिसल्या. त्या खडूने काढलेल्या होत्या. मला वाटले, की तबेल्यात काम करणाऱ्या मुलाने त्या काढल्या असतील. पण मुलाने तर शपथेवर त्याने त्या काढल्या नसल्याचे सांगितले. शिवाय त्या रात्री काढल्या गेल्या. मी त्या धुवून टाकल्या आणि त्यानंतर मी माझ्या बायकोशी त्याबद्दल बोललो. मला नवल वाटले, की तिने ते फार गंभीरपणे घेतले. ती म्हणाली की परत जर असे काही काढलेले आढळले, तर ती ते बघेल. आठवडाभर काही लिहिले गेले नाही. काल रात्री मी हा कागद बागेतील सौरघड्याळावर ठेवलेला पाहिला. मी तो एल्सीला दाखवला, तेव्हा तिला चक्कर येऊन तो तिच्या हातातून खाली गळून पडला. नंतर ती अर्धवट झोपेत, अर्धवट स्वप्नात व अर्धवट जागी असल्यासारखी झालेली आहे. तिच्या डोळ्यात भयंकर भीती दिसते आहे. त्यानंतर मी तो कागद तुम्हाला पाठवला. मी हे पोलीसांना सांगू शकत नव्हतो. कारण ते मला हसले असते. पण तुम्ही मला सांगा, मी काय करू?

मी फार श्रीमंत माणूस नाही. पण माझ्या बायकोला यात काही धोका असेल तर मी माझ्याकडील शेवटच्या पेनीपर्यंत तिचे संरक्षण करेन."

साधा, सरळ सभ्य, निळ्या डोळ्यांचा आणि आल्हादक चेहऱ्याचा असा तो जुन्या इंग्लिश मातीतील भला माणूस होता. त्याचे बायकोवरील प्रेम व तिच्यावरील विश्वास, यावरून त्याचा स्वभाव लक्षात येत होता. होम्सने त्याची गोष्ट नीट लक्ष देऊन ऐकली. आता काही वेळ तो विचारात हरवून बसला.

तो बोलला, “मिस्टर क्युबिट, तुम्हाला असे वाटत नाही का, तुमच्या बायकोला सरळ तिचे गुपित विचारणे, हा सर्वात चांगला उपाय राहील?

हिल्टन क्युबिटने त्याचे जड व मोठे डोके हलवले.

“मिस्टर होम्स मी एकदा वचन दिले की दिले. नाहीतर मला तिचा विश्वास गमवावा लागेल. पण त्यापेक्षा मला माझ्या पद्धतीने जाणे परवडेल -- आणि मी तेच करेन.”

“तर मग मी तुम्हाला सर्व शक्तीनिशी मदत करेन. प्रथम मी तुम्हाला हे विचारतो, की तुमच्या शेजारी पाजारी तुम्ही कोणी परके विचित्र लोक पाहिलेत का?”

“नाही.”

मला वाटते तुमचे घर फार शांत जागी आहे. एखादा नवीन चेहरा दिसला तर लगेच कुजबुज सुरु होत असेल, नाही का?”

“हो. अगदी लागून असलेल्या घरांच्या बाबतीत हे शक्य आहे. पण आमच्या घराजवळ बऱ्याच पाण्याच्या जागा आहेत आणि शेतकरी तिथे खानावळ चालवतात.”

ही चिन्हांकित अक्षरे निश्चितपणे काही अर्थ सांगतात. जर हे काही पूर्णपणे निरर्थक असते, तर आपल्याला त्याचा अर्थ लावणे अवघड आहे. दुसऱ्या बाजूने विचार केला, तर ते पद्धतशीर वाटते. मला खात्री आहे की आपण त्याच्या मुळापर्यंत जाऊ. पण हा विशेष नमुना इतका लहानसा आहे की मला याचे काहीच करता येणार नाही. तुम्ही सांगितलेली हकिगत, इतकी अपुरी आहे की आपल्याला शोध घेण्यास काही पायाच दिसत नाही. मी तुम्हाला असे सुचवेन की तुम्ही नॉरफोकला परत जा आणि गुपचूप पाळत ठेवा. अजून नवीन काही नाचणाऱ्या माणसांच्या आकृत्या असलेली चित्रे येतात का, ते बघा. खिडकीच्या काचेवर खडूने काय काढले होते, ते तू पुसून टाकल्याने बघायची काही सोय नाही, हे फार दुर्दैवी आहे. त्याबाबत कसून चौकशी करा. आसपासच्या परक्या लोकांवर लक्ष ठेवा. जेव्हा तुम्हाला काही नवीन पुरावे सापडतील, तेव्हा

परत माझ्याकडे या. मिस्टर हिल्टन क्युबिट, असा चांगला सल्ला मी तुम्हाला देऊ शकतो. जर तातडीची गरज आहे असे वाटले, तर मी कधीही तुमच्या नॉरफोकच्या घरी येऊन तुम्हाला भेटू शकतो."

या मुलाखतीनंतर होम्स विचारात बुडून गेला आणि पुढील अनेक दिवसातील बरेचसे तास मी त्याला, त्याच्या वहीतील तो कागद घेऊन त्यावरील विचित्र चिन्हे बघत बसल्याचे पाहिले. तरी साधरण पंधरा दिवसात, तो त्याबद्दल काही बोलला नाही. मग एक दिवस मी बाहेर चाललो असतांना, त्याने मला हाक मारली.

"वॉटसन, तू इथे राहिलास तर बरे होईल."

"का?"

"कारण मला आज सकाळी हिल्टन क्युबिटकडून तार आली आहे. नाचणाऱ्या माणसांच्या संदर्भातील हिल्टन क्युबिट, तुला आठवत असेल. तो लिव्हरपूल रस्त्याला दुपारी एक वाजून वीस मिनिटांनी येतो आहे. तो इथे कधीही येऊन टपकेल. मला त्याच्या तारेवरून असे कळले की काही महत्वाची घटना घडली आहे."

थोड्याच वेळात आमचा नॉरफोकचा अशील वेळ न घालवता, स्टेशनपासून टांग्याने येऊन दाखल झाला. तो काळजीत पडलेला व दुःखी दिसत होता. त्याचे डोळे दमलेले व कपाळ आठ्यांनी भरलेले होते.

तारवटलेल्या माणसासारखा खुर्चीत बसत, तो म्हणाला, "मिस्टर होम्स हे प्रकरण मला अगदी वैताग आणत आहे. तुमच्यावर काहीतरी करणी करणारे, कधी न पाहिलेले, माहिती नसलेले लोक, वेढा घालून बसले आहेत आणि त्याशिवाय ते तुमच्या बायकोला इंचाइंचाने ठार मारत आहेत, असे असेल तर हे असहनीय आहे. त्यामुळे ती झिजत चालली आहे. माझ्या डोळ्यासमोर, झिजत चालली आहे."

“ती अजून काही बोलली की नाही?”

“नाही, मिस्टर होम्स. ती काहीही बोलली नाही. तरीही तिला बोलायचे असावे, असे वाटते आहे. पण ती तेवढे धैर्य दाखवू शकत नाही. मी तिला निष्काळजीपणे मदत करायचा प्रयत्न केला आणि तिला घाबरवले. ती माझ्या पूर्वजांबद्दल आणि आमच्या कुटुंबाच्या कीर्तीबद्दल बोलली. आमच्या मानमरातबाबद्दल व अभिमानाबद्दल बोलली. आणि मला वाटले, की आता ती मुद्द्याचे बोलेल. पण तिथपर्यंत पोचण्यापूर्वीच ती बोलायची बंद झाली.”

“पण त्यातून तुम्हाला काही सापडले का?”

“खूप काही सापडले, मिस्टर होम्स. माझ्याकडे तुम्हाला तपासण्यासाठी खूप नाचणाऱ्या माणसांची चित्रे आहेत. आणि जास्त महत्वाचे काय, तर मी त्या माणसाला पाहिले.”

“कोण? ती चित्रे काढणारा माणूस?”

“हो. मी त्याला काम करतांना पाहिले. पण मी तुम्हाला सर्व काही नीट सांगतो. मी तुम्हाला भेटून जेव्हा परत गेलो, तेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी काय पाहिले, तर नाचणाऱ्या माणसांचे नवे पीक! सामानाच्या खोलीच्या लाकडी दारावर खडूने ते काढले होते. हिरवळीशेजारील खिडक्यांमधून ते पूर्णपणे दिसत होते. त्याची प्रत मी आणली आहे.

होम्स म्हणाला, “छान! पुढे चालू ठेवा.

“जेव्हा मी त्याची प्रत घेतली, तेव्हा मी त्यावरील खुणा पुसून टाकल्या. पण दोन दिवसांनी सकाळी, तिथे नवीन चित्र उमटले. त्याची प्रतही मी आणली आहे.”

होम्सने आनंदाने त्याचे हात चोळले.

आपल्याला पटापट धागेदोरे सापडत आहेत.

“तीन दिवसांनी सौरघड्याळावरील दगडांखाली कागदावर कोरलेला, निरोप मिळाला. हा तो मी आणला आहे. मागील पत्रासारखेच अक्षर आहे. त्यानंतर मी दबा धरून बसायचे ठरवले. माझे पिस्तुल घेऊन मी हिरवळ व बाग दिसणाऱ्या खिडकीजवळील अभ्यासिकेत रात्री दोनपर्यंत बसून राहिलो. बाहेरचा चंद्रप्रकाश सोडून सर्वत्र अंधार होता. मला माझ्यामागून पदरव ऐकू आला. तिथे रात्रीच्या गाऊनमध्ये माझी बायको उभी होती. तिने मला अंथरुणावर चलण्याचा आग्रह केला. आपल्यावर असे चेटूक करणारा कोण आहे, ते बघण्यासाठी मी दबा धरून बसल्याचे तिला मोकळेपणे सांगितले. ती उत्तरली की हा काही विनोद आहे आणि तू त्यात लक्ष घालू नकोस.

“हिल्टन, जर तुला खरेच याचा त्रास होत असेल, तर आपण, तू आणि मी, प्रवासाला जाऊ व हा त्रास टाळू.”

“काय? असा विनोद करणाऱ्याला घाबरून आपल्याच घरातून पळून जायचे? का? सगळे जग आपल्याला हसेल.”

“चल. झोपायला चल. आपण सकाळी याविषयी बोलू.”

ती बोलत असतांना, अचानक तिचा गोरा चेहरा चंद्रप्रकाशात अधिक पांढरा दिसू कागला आणि तिचा घट्ट हात माझ्या खांद्यावर पडला. सामानाच्या खोलीत काहीतरी सावलीसारखे हलत होते. मी एक काळी दबकत चालणारी आकृती कोपऱ्यात फिरतांना व दारासमोर बसकण मारतांना पाहिली. माझे पिस्तुल सरसावून मी बाहेर धावणार, तोच माझ्या बायकोने तिचे हात झडप घातल्यासारखे माझ्या गळ्यात टाकले. मी तिला बाजूला करायचा प्रयत्न करू लागलो पण ती मला घट्ट चिकटून बसली. शेवटी मी माझी सुटका करून घेतली. पण मी दार उघडून बाहेर जाईपर्यंत तो प्राणी निघून गेलेला होता. त्याने त्याच्या अस्तित्वाची खूण मागे ठेवली होती. आधी दोनदा दारावर जशी नाचणारी माणसे काढली होती, तशीच तिथे दिसत होती. मी सर्वत्र हिंडून बघितले. पण तो जो कुणी होता, त्याचा कुठे थांगपत्ता नव्हता. नवलपूर्ण गोष्ट म्हणजे तो तिथे

सर्व वेळ असणार. कारण सकाळी मी पाहिले, तेव्हा काल रात्री मी पाहिली त्यापेक्षा अजून जास्त चित्रे तिथे काढलेली होती."

"ती नंतर काढलेली चित्रे, तुमच्याकडे आहेत का?"

"हो. ती थोडीच होती. त्यांची प्रतदेखील मी आणली आहे. ही घ्या."

त्याने अजून एक कागद दिला.

मी माझ्या डोळयांनी पाहिले की होम्स फार उद्दीपित झाला होता. तो म्हणाला, "मला सांगा, ही आधीच्यात भर टाकली होती, की पूर्णपणे नवीन होती?"

"ती दुसऱ्या दारावर काढलेली होती."

"छान! हे आपल्यासाठी फार महत्वाचे आहे. यामुळे मला हे गूढ सोडवण्याची आशा वाटू लागली आहे. मिस्टर हिल्टन क्युबिट, आता तुमचे कथन पुढे चालू ठेवा."

"मिस्टर होम्स, मला अजून काही सांगायचे नाही. फक्त मला एवढेच सांगायचे आहे की मी त्या रात्री खरे तर त्या हलकट माणसाला पकडले असते. पण तिने माझा पाय मागे खेचल्याने, मी तिच्यावर रागावलो. ती म्हणाली की तिला मी जखमी होण्याची भीती वाटली. क्षणभर माझ्या मनात असा विचार चमकून गेला, की कदाचित तिला खरी कसली भीती वाटली असेल तर तो मला इजा करेल याची. कारण तिला तो मनुष्य व त्याच्या विचित्र खुणांचा अर्थ माहिती आहे. पण तिच्या आवाजाचा पोत व निरागस डोळे बघून, तिला खरोखर माझ्या सुरक्षिततेची काळजी वाटली असणार, याची मला खात्री पटली. असे सर्व घडले आणि मी या बाबतीत काय करावे, याचा मला तुमच्याकडून सल्ला हवा आहे. मला स्वतःला असे वाटते आहे, की निदान माझे अर्धा डझन नोकर कामाला लाऊन त्या हरामखोराला असे चोपून काढावे, की तो पुन्हा आम्हाला त्रास देणार नाही."

होम्स बोलला, “मला वाटते असे उपाय अवलंबण्यासाठी ही वरवरची केस नाही. तू किती काळ लंडनमध्ये राहू शकतोस?”

“मला आज परत गेले पाहिजे. मी माझ्या बायकोला काही झाले तरी रात्री एकटे ठेवणार नाही. ती फार उदास झाली आहे व तिने मला लवकर परत बोलावले आहे.”

“तुमचे बरोबर आहे. पण जर तुम्ही थांबलात, तर एकदोन दिवसात मी तुमच्याबरोबर तिथे येण्यासाठी निघू शकतो. मध्यंतरीच्या काळात, तुम्ही हे कागद इथे ठेऊन जा. मी लवकरच नॉरफोक येथे भेट देतो आणि या प्रकरणावर प्रकाश टाकायचा प्रयत्न करतो.”

शेरलॉक होम्सने त्याचा व्यावसायिक शांतपणा आमचा अशील येथून जाईपर्यंत चालू ठेवला, पण त्याला ओळखणाऱ्या मला हे कळत होते की तो फारच अस्वस्थ झालेला आहे. ज्या क्षणी हिल्टन क्युबिटची रुंद पाठ वळून तो दारातून दिसेनासा झाला, त्या क्षणी माझा मित्र टेबलाशी धावला व नाचणाऱ्या माणसांचे सगळे कागद पुढे ओढून बसला. त्याचे खोलवर, गहन असे चिंतन सुरु झाले. दोन तास तो ती पाने व पत्रे खालीवर करत राहिला. त्या कामात तो इतका बुडून गेला की माझे तेथील आस्तित्व देखील विसरला. कधी काही प्रगती झाल्यास तो शीळ वाजवून गाणे गुणगुणे, तर कधीकधी कोड्यात पडल्यासारखे भुवया ताणून, शून्यात नजर लाऊन बसे. शेवटी तो समाधानाची आरोळी मारत, खुर्चीतून उडी मारून उठला आणि त्याचे हात चोळत खोलीभर फेऱ्या मारू लागला. मग त्याने एक लांबलचक तार लिहिली. तो मला म्हणाला, “वॉटसन, तुझ्या संग्रहात लवकरच आणखी एका छानशा गोष्टीची भर पडणार, अशी आशा मला वाटते आहे. माझी अशी अपेक्षा आहे की आपण दोघे उद्या नॉरफोकला जाऊन आपल्या मित्राला त्याच्या त्रासाच्या गुपिताबद्दल नक्की चांगली बातमी देऊ शकतो.”

मी उत्कंठतेने भारला गेल्याचे कबूल करतो. पण मला कल्पना होती की होम्स त्याच्या पद्धतीने व त्याचा वेळ घेऊनच गौप्यस्फोट करेल. त्यामुळे त्याने मला विश्वासात घेईपर्यंत मी थांबलो.

पण त्या तारेला उत्तर यायला उशीर झाला. वाट बघण्यात दोन दिवस गेले. तेव्हा होम्स फोनकडे कान लावून बसला होता. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी हिल्टन क्युबिटचे पत्र आले. तिथे सर्व कुशल होते, फक्त त्या दिवशी सकाळी सौरघड्याळाकडे जाणाऱ्या फरसबंद वाटेवर लांबलचक चित्रे काढलेली दिसली. त्याने त्याची प्रत आम्हाला पाठवली. होम्स त्या कुरूप, विनोदी कागदावर काही मिनिटे वाकला आणि अचानक आश्चर्याने व दुःखाने ओरडत उभा राहिला. त्याचा चेहरा काळजीने उतरला होता.

"आपण हे प्रकरण फार लांबवले. आज रात्री उत्तर वाल्शामला जाणारी गाडी आहे का?" मी वेळापत्रक उघडले. शेवटची गाडी नुकतीच गेली होती.

होम्स बोलला, "मग आपण उद्या सकाळी लवकर न्याहारी करून, मिळेल त्या पहिल्या गाडीने जाऊ. आपण तिकडे ताबडतोब जाणे गरजेचे आहे. ओहो! आपल्याला अपेक्षित असलेली तार आली आहे. एक मिनिट, मिसेस हडसन, हे उत्तर असेल. मी त्याचीच वाट बघत होतो. आता तर आपण तासभरही फुकट घालवायला नको. मिस्टर हिल्टन क्युबिटला काय परिस्थिती आहे, ते सांगायला पाहिजे. आपला नॉरफोकचा अशील ज्यात अडकला आहे ते वेगळ्याच प्रकारचे व धोकादायक जाळे आहे."

आणि तसेच सिध्द झाले. जसजसा मी गोष्टीच्या अंधारी, पोरकट व विचित्र निष्कर्षांकडे आलो, तसतसा मी परत एकदा दुःखाने व भीतीने थरारून गेलो. माझ्या वाचकांना मला काही चमकदार शेवट सांगायचा आहे का, तर हो. पण अशी परिस्थिती आहे, ज्यामुळे रायडिंग थोर्प, मॅनॉर येथील घराची चर्चा पूर्ण इंग्लंडभर काही दिवस सुरु राहिली, अशी गूढ गुंतागुंत आणि विचित्र घटनांची साखळी मला उलगडली पाहिजे.

आम्ही जेमतेम उत्तर वाल्शामला पोचलो आणि आम्हाला जिथे जायचे आहे ते नाव सांगितले, तेव्हा स्टेशमास्तर घाईघाईने आमच्याकडे येऊन म्हणाला, "मला वाटते तुम्ही लंडनहून आलेले गुप्तहेर आहात?"

होम्सच्या चेहऱ्यावर रागाची व त्रासाची छटा दिसू लागली,

“तुम्हाला असे का वाटले?”

“कारण नॉर्विचचा इन्स्पेक्टर मार्टिन आत्ताच इथून गेला. पण कदाचित तुम्ही सर्जन असाल. ती मेली नाही -- निदान मी ऐकलेल्या शेवटच्या बातमीपर्यंत तरी -- अजूनही तुम्ही तिला वाचवू शकाल -- जरी तो फासाचा दोर असला तरी!”

होम्सची भुवई चिंतेने काळी पडली.

तो म्हणाला, “आम्ही रायडिंग थोर्प, मॅनॉर येथे चाललो आहोत. पण तिथे काय झाले, ते आम्हाला काहीच माहिती नाही.

स्टेशमास्तर म्हणाला, “ते भयंकर प्रकरण आहे. मिस्टर हिल्टन क्युबिट व त्याची बायको, दोघांनाही गोळ्या घातल्या गेल्या. तिने प्रथम त्याला गोळी घातली व मग स्वतःवर झाडून घेतली -- असे नोकर म्हणतात. तो ठार झाला व तिची अवस्था फारशी चांगली नाही. नॉरफोकमधील अगदी जुने, फार चांगले व मानमरातब असलेले असे ते कुटुंब होते.”

काही न बोलता होम्स मुकाट्याने टांग्याकडे वळला. सात मैलांचे लांब अंतर काटतांना, त्याने कधीच त्याचे तोड उघडले नाही. त्याला इतके निराश व गर्भगळीत मी कधीच पाहिले नव्हते. लंडनहून निघाल्यापासून सबंध प्रवासात तो अस्वस्थ होता. तो सर्व वर्तमानपत्रे लक्षपूर्वक चाळत होता. परंतु आता अचानक सत्य परिस्थिती कळल्यामुळे, त्याची टोकाची भीती आता अगम्य उदासीनतेत बदलली होती. जरी आजूबाजूला रुचीपूर्ण गोष्टी चालू होत्या, तरी तो त्याच्या जागी रेलून बसला व तर्काचे जाळे विणण्यात गढून गेला. कारण आम्ही इंग्लंडइतक्याच वैशिष्ट्यपूर्ण गावांच्या परिसरातून चाललो होतो. येथील विखुरलेली घरे विरळ लोकवस्तीची निर्देशक होती. आजूबाजूच्या हिरव्यागार जमिनीमधून उंच चौकोनी चर्चेस दृष्टीस पडत होती. त्यातून जुन्या पूर्व अँग्लीयाचे वैभव व सुबत्ता दिसत होती. शेवटी नॉरफोकच्या किनाऱ्याच्या

हिरव्या कडेला जर्मन महासागराची जांभळट वर्तुळाकार खाडी दिसू लागली. चालकाने त्याच्या चाबूकाने झाडांच्या दाटीतून दिसणाऱ्या दोन जुन्या विटांकडे व लाकडी भिंतीच्या छताकडे आमचे लक्ष वेधले व बोलला, "ते रायडिंग थोर्प मॅनॉर आहे."

जेव्हा आम्ही इमारतीच्या पोर्चशी असलेल्या, पुढील दाराकडे पोचलो, तेव्हा मला त्यासमोर, टेनिस कोर्टशेजारील, काळे घर व आमच्याशी विचित्र संधान असलेले फरसबंद सौरघड्याळ दिसले. मेणासारख्या चिकट दिसणाऱ्या मिशा असलेला व व्यवस्थित पोषाख घातलेला एक लहानसा चटपटीत मनुष्य एका कुत्र्याच्या गाडीतून नुकताच उतरला होता. त्याने नॉरफोक पोलीस स्टेशनमधील इन्स्पेक्टर मार्टिन म्हणून स्वतःची ओळख करून दिली. माझ्या मित्राचे नाव ऐकताच तो चांगलाच चमकला.

"मिस्टर होम्स, गुन्हा तर आज पहाटे तीन वाजता घडला. तुम्हाला लंडनला ही बातमी समजून, तुम्ही माझ्याचबरोबर इथे कसे काय आलात?"

"मी तसा तर्क केला होता. खरे तर मी गुन्हा रोखायच्या उद्देशाने आलो होतो."

तर मग आम्हाला माहिती नसलेला, असा काही भक्कम पुरावा तुमच्याकडे असला पाहिजे. कारण ते तर एक प्रेमळ जोडपे होते."

होम्स बोलला, "माझ्याकडे फक्त नाचणाऱ्या माणसांचा पुरावा आहे. मी तुला सर्व स्पष्टीकरण नंतर देतो. आता ही दुःखांत घटना रोखायला फारच उशीर झालेला आहे. पण मला जे काही माहिती आहे ती वापरून न्याय मिळावा, म्हणून मी उत्सुक आहे. तुमच्या शोधमोहिमेत तुम्ही मला सहभागी करून घ्याल, की मी स्वतंत्रपणे माझे काम करू"?"

इन्स्पेक्टर नम्रपणे म्हणाला, "मिस्टर होम्स, आपण एकत्र काम केले, हे सांगायला मला अभिमान वाटेल."

तसे असेल तर वेळ फुकट न घालवता, मला तुमच्याकडील पुरावा तपासायला व परिसराची पहाणी करायला आवडेल."

माझ्या मित्राला त्याच्या मर्जीप्रमाणे गोष्टी करायला परवानगी देण्याचा मोठेपणा, इन्स्पेक्टर मार्टिनने दाखवला. त्याने काळजीपूर्वक तपासातून पुढे आलेल्या बाबी लिहून काढल्या. वयस्क, केस पांढरे झालेला स्थानिक सर्जन, नुकताच मिसेस हिल्टन क्युबिटच्या खोलीतून बाहेर आला होता. तो म्हणाला, तिच्या जखमा गंभीर आहेत, पण इतक्या मरणांतीक नाहीत. मेंदूच्या पुढच्या भागातून गोळी आरपार गेली आहे आणि तिला शुद्धीवर यायला काही वेळ लागेल. तिला गोळी घातली गेली की तिनेच ती स्वतःला मारून घेतली, या प्रश्नाला उत्तर देतांना ते बोलले, की काही ठाम मत द्यायचे धाडस ते करणार नाहीत. नक्कीच गोळी अगदी जवळून मारली गेली होती. खोलीत दोन गोळ्या वापरलेले एकच पिस्तुल सापडले. मिस्टर हिल्टन क्युबिट यांच्या हृदयाला गोळी लागली होती. त्याने तिला आधी गोळी मारली व नंतर स्वतःलाही मारून घेतली, असेही झालेले असणे शक्य होते. किंवा ती गुन्हेगार असेल. कारण पिस्तुल जमिनीवर दोघांच्या मध्ये पडले होते.

होम्सने विचारले, "त्याला हलवले का?"

आम्ही ती बाई सोडून कुणालाही हलवले नाही. आम्ही तिला जखमी अवस्थेत जमिनीवर टाकून देऊ शकत नव्हतो."

"डॉक्टर, तुम्ही इथे किती वेळ आहात?"

"चार वाजल्यापासून."

"आणखी कुणी तुमच्याबरोबर होते का?"

"हो. कॉन्स्टेबल."

“आणि तुम्ही कशाला हात लावला नाही?”

“नाही.”

“तुम्ही चांगले काम केले आहे. तुम्हाला बोलवायला कोण आले होते?”

सॉंडर्स नावाची नोकरांणी.”

“जिने काही धोक्याची सूचना दिली, तीच का?”

“ती आणि स्वयंपाकीण मिसेस किंग.”

“आता त्या कुठे आहेत?”

“मला वाटते, स्वयंपाकघरात असव्यात.”

मग मला वाटते, आपण लगेच त्यांच्या तोंडून काय घडले ते ऐकू.”

ओकच्या लाकडाने बनवलेला, उंच खिडक्या असलेला जुनाट हॉल, तपासाची जागा झाला होता. जुन्या पद्धतीच्या प्रशस्त खुर्चीत होम्स बसला होता. त्याच्या आजारलेल्या चेहऱ्यामधून चकाकणारे डोळे जणू बाहेर पडत होते. त्याच्या ज्या अशीलाला तो वाचवू शकला नाही, त्याबद्दल निदान सूड उगवणे हे त्याच्या आयुष्याचे ध्येय बनल्याचे त्याने ठरवल्याचे, मी त्या डोळयांमध्ये वाचू शकत होतो. वयस्क, करड्या केसांचा, गावातील डॉक्टर, कृश इन्स्पेक्टर मार्टिन, मी व गावातील शांत पोलीस, असे आम्ही सर्वजण तिथे होतो.

त्या दोन महिलांनी त्यांची कहाणी पुरेशा स्पष्टपणे सांगितली. एकापाठोपाठ एक अशा दोन गोळयांच्या आवाजाने त्या दोघी झोपेतून जाग्या झाल्या. त्या दोघी जवळच्या खोल्यांमध्ये झोपल्या होत्या. आवाज ऐकून मिसेस किंग, मिसेस सॉंडर्सच्या खोलीत धावली. दोघी मिळून जिना उतरल्या. अभ्यासिकेचे दार उघडे होते व टेबलावर मेणबत्ती जळत होती. खोलीच्या मध्यभागी त्यांचा मालक तोंडावर पडला होता. तो बहुधा मेलाच होता. खिडकीजवळ त्याची

बायको गुडघे वाकलेले व डोके भिंतीवर टेकलेले, अशा अवस्थेत पडली होती. ती भयानक जखमी झाली होती. तिच्या चेहऱ्याची एक बाजू पूर्णपणे रक्ताळली होती. ती धापा टाकत होती पण काही बोलू शकत नव्हती. पॅसेज व खोली दोन्ही धुराने व पावडरच्या वासाने भरली होती. खिडकी नक्कीच आतून भक्कमपणे बंद केलेली होती. दोन्ही महिला अगदी वेळेत पोचल्या होत्या. त्यांनी ताबडतोब डॉक्टरना व कॉन्स्टेबलला निरोप पाठवला. नंतर घोड्यांची निगा राखणाऱ्या माणसाच्या व तबेल्यातील मुलाच्या मदतीने त्यांनी त्यांच्या जखमी मालकिणीला तिच्या खोलीत हलवले. ती व तिचा नवरा दोघांनाही पलंगावर ठेवले. तिला तिचे कपडे घातले व त्याच्या रात्रीच्या कपड्यांवर गाऊन चढवला. अभ्यासिकेतील काहीही हलवले नाही. त्याना माहिती होते त्याप्रमाणे, नवरा बायकोत कधीच काही भांडण होत नसे. त्या दोघांकडे नेहमी एक मिळून मिसळून रहाणारे जोडपे, म्हणूनच बघत असत.

नोकरांच्या जबानीचे हे मुख्य मुद्दे होते. इन्स्पेक्टर मार्टिनच्या प्रश्नाला उत्तर देतांना हे स्पष्ट झाले, की सगळी दारे आतून नीट बंद केलेली होती. घरातून कोणी निसटून गेल्यासारखेही वाटत नव्हते. होम्सच्या प्रश्नाला उत्तर देतांना त्या दोघींना आठवले, वरील मजल्यावरून त्यांच्या खोलीबाहेर पडल्यापासून, त्यांना पावडरचा वास येत होता. होम्स त्याच्या व्यावसायिक सहकाऱ्याला म्हणाला, "ही गोष्ट खूप काळजीपूर्वक हाताळण्यासाठी, मी तुमच्या लक्षात आणून देतो. आणि मला वाटते, आता आपण खोलीची नीट तपासणी केली पाहिजे."

अभ्यासिका म्हणजे एक लहान खोली होती. त्यात तीन बाजूंना पुस्तके लगडलेली होती आणि खिडकीपाशी लिहायचे टेबल होते. खिडकीतून बाहेरची बाग दिसत असे. पहिल्यांदा त्या गावात पत असणाऱ्या जमीनदाराकडे लक्ष दिले गेले. तो उंचापुरा माणूस खोलीत आडवा पडला होता. त्याचा विस्कटलेले कपडे असे दर्शवत होते, की तो घाईने झोपेतून उठून आलेला होता. त्याला पुढून गोळी घालण्यात आली होती आणि हृदयाला लागून ती रुतून बसली होती. त्याचे

मरण फार न तडफडता, तत्काळ झाले असावे. त्याच्या कपड्यांवर अथवा हातांवर पावडरच्या खुणा नव्हत्या. सर्जनच्या म्हणण्याप्रमाणे, बाईच्या चेहऱ्यावर, डाग होते, पण हातांवर नव्हते.

होम्स म्हणाला, "डाग नसणे म्हणजे काही नाही . पण असणे म्हणजे सर्व काही. पिस्तुलात नीट न बसलेली गोळी अचानक मागे उडून, जोरात लागू शकते. काही खूण न ठेवता, असे कितीही नेम मारता येऊ शकतात. मी असे सुचवेन की आता मिस्टर क्युबिटचे प्रेत हलवायला काही हरकत नाही. मला वाटते डॉकटर, त्या बाईच्या शरीरात घुसलेली गोळी तुम्ही बाहेर काढली नाही, बरोबर?

"त्यासाठी गंभीर ऑपरेशन करावे लागेल. पण पिस्तुलात अजून चार गोळ्या शिल्लक आहेत. दोन उडवल्या गेल्या आणि दोन जखमी सापडले. म्हणजे प्रत्येकाला एकेक गोळी मारली गेली."

होम्स बोलला, "असे वाटते आहे. कदाचित खिडकीला चाटून गेलेली गोळी देखील तुम्ही लक्षात घेऊ शकाल?

तो अचानक वळला आणि त्याचे लांब बारीक बोट खिडकीच्या खालील बाजूस, जमिनीपासून इंचभरावर पडलेल्या भोकाकडे, निर्देश करू लागले.

इन्स्पेक्टर ओरडला, "अरे देवा, तुम्हाला ते कसे काय दिसले?"

"कारण मी नीट निरीक्षण केले."

डॉकटर म्हणाला, "हे नवलपूर्ण आहे. सर, तुमचे बरोबर आहे. म्हणजे तिसरी गोळीही मारली गेली. आणि म्हणजे तिसरी व्यक्ती तिथे असली पाहिजे. पण ती कोण असेल व ती निसटली कशी असेल?"

शेरलक होम्स म्हणाला, “तीच समस्या आता आपल्याला सोडवायची आहे. इन्स्पेक्टर मार्टिन, तुला आठवते का की नोकर म्हणाले की ते त्यांच्या खोलीतून बाहेर पडले, तेव्हा त्यांना पावडरचा वास आला. मी तेव्हाच म्हणालो होतो, की हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे.”

“हो सर, पण मला तेव्हा तुम्ही काय म्हणता आहात, ते नीटसे कळले नाही.’

“म्हणजे असे सुचवले जाते आहे, की पिस्तुलातून गोळ्या झाडल्या गेल्या, तेव्हा खोलीची खिडकी व दार दोन्ही उघडे होते. नाहीतर पावडरचा वास घरभर दरवळला नसता. खोलीतील दार व खिडकी अगदी थोड्या वेळासाठी उघडे होते.”

“तुम्ही हे कसे सिध्द करणार?”

“कारण मेणबत्तीचे मेण इकडेतिकडे वेडेवाकडे पसरले नव्हते.”

इन्स्पेक्टर ओरडला, “झकास! फार छान!”

या दुःखद प्रसंगी, खिडकी उघडी असल्याची खात्री झाल्यावर, मला असे वाटते आहे की या प्रकरणात तिसरी व्यक्ती असणार. आणि बाहेरून तिने गोळ्या झाडल्या असणार. या व्यक्तीवर साधलेला नेम त्या व्यक्तीच्या मफलर किंवा तत्सम वस्तूला चाटून गेला असणार. मी पाहिले आणि खरोखरच मला गोळीची खूण दिसली.”

पण मग खिडकी आतून बंद कधी झाली?”

“बाईची पहिली प्रतिक्रिया खिडकी लाऊन आतून कडेकोट बंद करायची असणार. पण अरेरे, हे काय?”

अभ्यासिकेतील टेबलावर बाईची छोटीशी मगरीच्या कातड्याची, चांदीच्या रंगाची पर्स पडली होती. होम्सने ती उघडून त्यातील वस्तू बाहेर काढल्या. त्यात बँक ऑफ इंग्लंडच्या पन्नास पौंडाच्या वीस नोटा भारतीय रबराने बांधलेल्या होत्या -- बाकी काही नव्हते.

इन्स्पेक्टरच्या हातात पर्स देत होम्स म्हणाला, “हे नीट ठेवले पाहिजे. कोर्टात सुनावणीच्या वेळी ते लागेल. आता आपण आपले लक्ष या तिसऱ्या गोळीकडे वळवले पाहिजे. लाकडाला पडलेल्या भोकामुळे हे स्पष्ट होते आहे की ती गोळी खोलीच्या आतून मारली गेली आहे. मला स्वयंपाकीण मिसेस किंग हिला परत भेटावे लागेल. मिसेस किंग म्हणाली की ती मोठ्या आवाजाने जागी झाली. तिला असे म्हणायचे होते का, की दुसऱ्या तशा आवाजापेक्षा मोठ्या?”

“असे बघा सर, मला त्यामुळे झोपेतून जाग आली. त्यामुळे तुमच्या प्रश्नाचे उत्तर देणे अवघड आहे. पण तो आवाज फार मोठा होता, एवढे खरे.”

तुला असे वाटत नाही का, की दोन्ही आवाज जवळजवळ एकाच वेळी आले?”

“सर, मी ते नक्की सांगू शकणार नाही.”

“माझा विश्वास आहे की ते तसेच होते. इन्स्पेक्टर मार्टिन, या खोलीतील बघण्यासारखे सर्व, आपण बघितले आहे. जर तू माझ्याबरोबर आलास तर बागेत आपल्याला काही ताजे पुरावे मिळतात का, ते आपण बघू.”

अभ्यासिकेच्या खिडकीपर्यंत फुलांचा ताटवा गेलेला होता. तिथे जाताच आमच्या तोंडून आश्चर्याचा उद्गार निघाला. फुले चुरगळली गेली होती व मऊ मातीत सगळीकडे पाऊलखुणा उमटल्या होत्या. ती मोठी, लांब व पुढे निमुळती असलेली पुरुषाची पाऊले होती. होम्सने एखाद्या माग काढणाऱ्या कुत्र्यासारखा गवतातून व पानांमधून शोध घेतला. मग समाधानाची आरोळी मारून, तो पुढे वाकला व छोटीशी वृत्तचितीच्या आकाराची वस्तू उचलून घेतली.

तो म्हणाला, “मला वाटलेच होते. पिस्तुलातून बाहेर पडलेली ही तिसरी गोळी आहे. इन्स्पेक्टर मार्टिन, मला खरेच असे वाटते की आपली केस बहुधा सोडवली गेली.”

होम्सने झटपट व चलाखीने केलेला तपास पाहून, त्या गावठी इन्स्पेक्टरचा चेहरा फारच आश्चर्यात बुडाला. प्रथम तो स्वतःचा आब राखून, गप्प राहिला पण नंतर होम्सची स्तुती करत, आढेवेढे न घेता व प्रश्न न विचारता, होम्सच्या मागून जायला तयार झाला.

त्याने विचारले, "तुम्हाला कोणाचा संशय येतो आहे?"

"ते मी नंतर सांगतो. मी तुला आत्ता सांगू शकणार नाही, अशा खूप पायऱ्या या समस्येत आहेत. आता मला जेवढे समजले आहे, त्या आधारावर मी पुढे जातो व नंतर सर्व काही नीट समजावून सांगतो."

"मिस्टर होम्स, गुन्हेगार सापडणार असेल तर, तुम्ही तुमच्या पद्धतीने तपास चालू ठेवा."

"मला तुला कोड्यात टाकायचे नाही. पण लांबलचक व गुंतागुंतीच्या स्पष्टीकरणात आत्ताच शिरणे, या कार्यमग्नतेच्या क्षणी शक्य नाही. माझ्या हातात या प्रकरणाचे सर्व धागेदोरे आलेले आहेत. जरी ही बाई शुद्धीवर आली नाही, तरी आपण काल रात्रीचा घटनाक्रम जुळवू शकतो व न्याय मिळवण्याची खात्री देऊ शकतो. पहिल्यांदा मला असे हवे आहे, की इथे आसपास 'एलरीज ' नावाची एखादी खानावळ आहे का?"

नोकरांना प्रश्न विचारले गेले. पण कोणीच असे नाव ऐकले नव्हते. तबेल्यातील पोऱ्याला आठवले की पूर्व रस्टनच्या दिशेने काही मैल अंतरावर रहाणाऱ्या शेतकऱ्याचे ते नाव होते. त्यामुळे या गोष्टीवर थोडा प्रकाश पडला.

"ते शेत एकांडे, आसपास काही नसलेले आहे का?"

"हो सर."

"कदाचित त्यांना इथे काल रात्री काय झाले ते माहिती नसेल?"

"नसेल माहिती, सर."

होम्सने थोडा विचार केला आणि नंतर त्याच्या चेहऱ्यावर उत्सुक हसू पसरले.

तो म्हणाला, “अरे मुला, माझ्यासाठी घोडा तयार कर. मला एलरीजच्या शेतावर जायचे आहे.”

त्याने त्याच्या खिशातून वेगवेगळ्या प्रकारचे नाचणाऱ्या माणसांचे कागद काढले. ते घेऊन, तो अभ्यासिकेतील टेबलाशी गेला व त्या कागदांचे नीट निरीक्षण करून काही वेळ विचार केला. शेवटी त्याने पोऱ्याला एक चिठ्ठी दिली. मग त्या चिठ्ठीवर पत्ता लिहिलेल्या माणसाला ती पोचवायच्या सूचना त्या पोऱ्याला दिल्या. त्याला अशा स्पष्ट सूचना दिल्या की त्या माणसाने काहीही प्रश्न विचारले तरी त्यांना उत्तरे द्यायची नाहीत. मी चिठ्ठीची वरची बाजू पाहिली. त्यावर होम्सच्या नेहमीच्या अक्षरापेक्षा वेगळ्या हस्ताक्षरात गिचमिड असा पत्ता लिहिला होताः मिस्टर अॅबे स्लॅने, एलरीज शेत, पूर्व रस्टन, नॉरफोक.

होम्सने शेरा मारला, “मला वाटते इन्स्पेक्टर, की तू पोलिसांची कुमक मागवून घ्यावीस. जर माझा अंदाज खरा ठरला, तर तुला एका धोकादायक माणसाला तुरुंगात टाकावे लागेल. ही चिठ्ठी घेऊन जाणारा पोऱ्या, तुझी फौजेची मागणी करणारी तार घेऊन जाऊ शकेल. वॉटसन, दुपारी गावात जाणारी गाडी असेल, तर ती आपण घेऊ शकू. मला काही मनोरंजक रासायनिक विश्लेषण करायचे आहे व ते या तपासाशी जवळचे आहे.” जेव्हा चिठ्ठी मार्गी लागली, तेव्हा होम्सने नोकरांना सूचना दिल्या. ‘जर कोणी मिसेस हिल्टन क्युबिटची चौकशी करत आले तर, त्याला तिच्या अवस्थेबद्दल काहीही माहिती द्यायची नाही. पण त्याला ताबडतोब हॉलमध्ये बसवायचे.’ हे त्याने खूप कळकळीने नोकरांना समजावून सांगितले. आता आपल्या हातात काही नाही असे बोलत, तो हॉलच्या दिशेने चालू पडला. आपल्यासाठी घरात खायला काय आहे हे बघून व ते खाऊन आपला वेळ आपण घालवावा, असे त्याने सुचवले. डॉक्टर त्यांच्या कामाला निघून गेले. इन्स्पेक्टर आणि मी फक्त राहिलो.

होम्सने त्याची खुर्ची टेबलाजवळ ओढून घेतली व नाचणाऱ्या माणसांचे कागद पुढे पसरत म्हटले, “मला वाटते तुझा तासभर मजेत आणि फायद्यात जावा म्हणून, मी तुला मदत करू शकतो. मित्रा वॉटसन, इतका वेळ तुझी नैसर्गिक उत्सुकता दाबून ठेवल्याबद्दल मी तुझा गुन्हा केला आहे. इन्स्पेक्टर, ही संपूर्ण घटना तुझ्या व्यवसायातील उल्लेखनीय अशी अभ्यासनीय बाब ठरेल. पहिल्या प्रथम मला तुम्हाला हे सांगितले पाहिजे, की बेकर रस्त्यावर माझा सल्ला मागायला मिस्टर हिल्टन क्युबिट आले होते, तेव्हाची परीस्थिती काय होती. मग त्याने आधी नोंदवलेल्या बाबींची उजळणी केली. “इथे माझ्यासमोर आत्ता असे हे विचित्र चित्रे असलेले कागद आहेत. जर त्यांच्यामुळे एवढी मोठी दुःखद घटना घडणार आहे, असे माहिती नसते, तर एखादा माणूस हसला असता. सर्व प्रकारच्या गुप्त लिखाणाशी मी परिचित आहे आणि त्यावर माझी लहानशी पुस्तिकाही प्रसिध्द झालेली आहे. त्यात मी लिहिण्याचे एकशे सात विविध प्रकार सांगितले आहेत. पण मला कबूल केले पाहिजे, की माझ्यासाठी हा काहीतरी वेगळाच प्रकार होता. हे बनवणाऱ्यांचा हेतू या चित्रांद्वारे काही कथन करायचा होता. पण ती अशीच गंमत म्हणून काढलेली मुलांची चित्रे आहेत, असे वरवर वाटावे असाही हेतू होता.

चित्रे काही अक्षरांबद्दल लिहिली गेली आहेत, हे एकदा लक्षात आल्यावर आणि गुप्त लिपीचे काही नियम पाळल्यावर, उकल अगदी लगेच झाली. पहिला निरोप इतका लहान होता की मला ठामपणे काही करण्यापेक्षा, काही सांगणे जास्त सोपे होते, जसे की XXX हे चिन्ह E साठी होते. तुम्हाला माहिती असेल की E हे इंग्लिश अक्षरांमधील अगदी सर्वसामान्य अक्षर आहे. आणि ते ठळकपणे इतके महत्वाचे आहे की एखाद्या छोट्या वाक्यातही ते बऱ्याच वेळा आढळते. पंधरा चिन्हांपैकी पहिल्या निरोपातील चार तीच होती. त्यामुळे त्याचा अर्थ E असल्याचे समजले. काही वेळा चित्रात झेंडा होता आणि काही वेळा नव्हता. पण ज्या पद्धतीने झेंडे विखुरलेले होते त्यावरून असे वाटते की वाक्य शब्दांमध्ये विभाजित करण्यासाठी पूर्णविरामासारखे, ते

उपयोगात आणले गेले असावे. मी हे गृहीत धरले व ठरवले की XXX हे चिन्ह E अक्षरासाठी आहे.

पण आता खरी अडचण आली. इंग्लिश अक्षरांचा E नंतरचा क्रम सुसंगत नाही. सामान्य भाषेत लिहिलेल्या मोठा मजकूर असलेल्या कागदावर जास्त वेळा आलेले तेच शब्द दाखवता येतात, त्याचा उलट लहान वाक्यांमध्ये होते. सधारणपणे सांगायचे झाले तर, T, A, O, I, N, S, H, R, D आणि L; या क्रमाने अक्षरे येतात. पण T, A, O आणि I ही अक्षरे मागेपुढे कशीही येतात. त्यामुळे प्रत्येक शब्दसमूहाची छाननी करून अर्थ लावणे हे काम दुरापास्त आहे. त्यामुळे मी नवीन चिठ्ठी येईपर्यंत थांबलो. मिस्टर हिल्टन क्युबिट यांना मी दुसऱ्यांदा भेटलो, तेव्हा त्यांनी मला अजून दोन लहानशी वाक्ये असलेल्या मजकुराची चिठ्ठी दिली. त्यात झेंडा नसल्याने तो सलग शब्द होता, असे वाटले. एका पाच शब्दाचा अक्षरात E हे अक्षर दुसऱ्या व चौथ्या जागी आले होते. तो शब्द SEVER, NEVER किंवा LEVER असावा. हे पत्र विनंतीला दिलेले उत्तर असण्याची बरीच शक्यता वाटली. आणि परिस्थिती बघता असे वाटते, की हे उत्तर बहुधा त्या बाईने लिहिले असावे. हे बरोबर आहे असे धरले, तर आपण असे म्हणू शकतो, की खुणा ओळीने N, V व R दर्शवतात.

आत्तासुद्धा मी बऱ्यापैकी अडचणीत आहे पण आनंदी विचारामुळे, मला इतर खूप अक्षरे समजली. जे मला वाटते आहे, तशी ही पत्रे निघाली, तर मला वाटते की पत्रे लिहिणारा, त्या बाईच्या पूर्वायुष्याशी संबंधित असा जवळचा कोणी असावा. दोन E असलेला पाच अक्षरी शब्द बहुतेक ELSIE असे नाव असावे. परीक्षण केल्यावर मला असे आढळून आले की तीन वेळा पत्राचा शेवट या शब्दाने झालेला आहे. ही नक्कीच कुणा Elsieला केलेली विनंती असावी. अशा तऱ्हेने मला L, S आणि I ही अक्षरे मिळाली. पण ही काय विनंती होती? त्या पत्रांमध्ये Elsieच्या आधी फक्त चारच अक्षरे होती. तो शब्द नक्कीच COME असला पाहिजे. मी E ने शेवट होणारे सगळे इतर शब्द वापरून बघितले. पण या केससाठी चपखलपणे बसेल असा कुठला नव्हता. त्यामुळे

आता मला C,O आणि M चे अर्थ कळले. मग मला परत एकदा पहिल्या निरोपाचा अर्थ समजला. मी पत्र शब्दांमध्ये विभागले आणि प्रत्येक न कळलेल्या खुणेसाठी टिंब देत गेलो. असे करून करून मी इथपर्यंत पोचलोः

.M .ERE ..E SL.NE.

आता पहिले अक्षर CAN म्हणजे A, हा सर्वात उपयुक्त शोध होता. कारण तो या छोट्याशा वाक्यात तीन वेळा तरी नक्की आलेला होता. दुसऱ्या शब्दातला H हा सुद्धा सहज समजण्यासारखा होता. आता असे झालेः

AM HERE A.E SLANE.

किंवा नावात योग्य त्या रिकाम्या जागा भरूनः

AM HERE ABE SLANEY माझ्याकडे आता इतकी पत्रे होती की दुसऱ्या निरोपाकडे मी बऱ्यापैकी विश्वासाने वळलो. तो असा निघालाः

A.ELRI. ES.

गाळलेल्या अक्षरांसाठी मी आता आरामात G आणि T ही अक्षरे घालू शकत होतो. शिवाय मी कल्पना करू शकत होतो की ही पत्रे लिहिणारा जिथे रहातो, त्या घराच्या नावाची ही अक्षरे आहेत."

इन्स्पेक्टर मार्टिन आणि मी खूप रुची घेऊन, हा सगळा वृतांत ऐकत होतो, की कसाकसा माझा मित्र माग काढत गेला व आम्हाला कठीण वाटणारे रहस्य त्याने कसे इतक्या सहजपणे सोडवले.

इन्स्पेक्टरने विचारले, "सर, नंतर तुम्ही काय केले?"

“मला असे म्हणायला पुरेसे कारण होते, की हा अॅबे स्लॅने अमेरिकन होता. कारण अमेरिकेहून आलेल्या एका पत्राने या सर्व त्रासाला सुरवात झाली. या सर्व प्रकरणात काही गुन्हेगारी स्वरूपाची गुप्तता दडलेली होती, असा विचार करायचेही कारण होते. त्या बाईने स्वतःच्या भूतकाळाबद्दल बोलायला दिलेला नकार, नवऱ्याला विश्वासात न घेणे. हे दोन्ही त्याकडेच निर्देश करतात. म्हणून मी न्यूयॉर्क पोलीस स्टेशन मधील माझ्या मित्राला, विल्सन हरग्रेव्हला, तार केली. लंडन मधील गुन्ह्याचा माग काढायच्या संदर्भात त्याने माझी अनेकदा मदत घेतलेली आहे. मी त्याला विचारले की अॅबे स्लॅने हे नाव त्याला परिचित आहे का. हे इथे त्याचे उत्तर आहेः तो शिकॅगोमधील धोकादायक गुंड आहे. ज्या दिवशी मला हे उत्तर आले त्याच दिवशी मला हिल्टन क्युबिटने स्लॅनेकडून आलेले शेवटचे पत्र पाठवले. माझ्याकडे यापूर्वी असलेल्या पत्रांच्या अभ्यासावरून मला या पत्रातील मजकूर असा असल्याचे समजलेः

ELSIE. RE. ARE TO MEET THY GO

P आणि D घातल्यामुळे निरोप पूर्ण झाला. तो असे सांगत होता, की तो हलकट विश्वास ठेवायला लावण्यापासून, धमक्या देईपर्यंतच्या दिशेने चालला होता. आणि शिकॅगोमधील धोकादायक गुंड अशी त्याची किर्ती ऐकल्यापासून, तो लवकरच त्याचे शब्द खरे करणार, याचा अंदाज मला आलेला होता. मी ताबडतोब माझा मित्र डॉ वॉटसन याच्याबरोबर नॉरफोक येथे आलो. पण दुर्दैवाने सर्वात वाईट असे आधीच घडून गेलेले होते.”

इन्स्पेक्टर मवाळपणे म्हणाला, “या केसमध्ये तुमच्याबरोबर काम करायला मिळाले, हा मी माझा गौरव समजतो. मी तुमच्याशी मोकळेपणे बोललो, तर तुम्ही मला माफ कराल. तुम्हाला विचारणारे कोणी नाही. पण मला माझे वरिष्ठ विचारतील. हा अॅबे स्लॅने जर एलरीज येथे रहात असेल, आणि तो खुनी असेल, आणि मी इथे असतांना तो इथून निसटून गेला, तर माझ्यावर मोठी आफत ओढवेल.”

“तू अस्वस्थ होऊ नकोस. तो इथून निसटणार नाही.”

“तुम्हाला कसे काय माहिती?”

“निसटून जाणे म्हणजे गुन्ह्याची कबुली देणे ठरेल.”

“मग आपण जाऊन त्याला पकडू.”

“मी तो कुठ्ल्याही क्षणी इथे येण्याची अपेक्षा करतो आहे.”

“पण तो इथे कशाला येईल?”

“कारण मी चिठ्ठी लिहून त्याला इथे बोलावले आहे.”

“मिस्टर होम्स, पण हे अशक्य वाटते आहे. तुम्ही बोलावले आहे, म्हणून तो का येईल? उलट अशा विनंतीमुळे त्याला संशय येऊन, तो पळून जायला उद्युक्त होईल, नाही का?”

शेरलॉक होम्स म्हणाला, “मला वाटते ती पत्रे कशी वापरायची, ते मला चांगले कळते. खरे तर, मी चुकत नसेन तर तो इथे बाहेर आलेला आहे.”

दाराच्या दिशेने विशिष्ट प्रकारे दमदार पाऊले टाकत, एक मनुष्य येत होता. तो उंच, देखणा व काळसर रंगाचा होता. त्याने फ्लॅनेलचा करड्या रंगाचा सूट घातला होता. डोक्यावर पनामा टोपी होती. काळी चकचकीत दाढी होती. उद्दामपणे पुढे आलेले नाक होते. चालतांना त्याच्या हातातील चाबूक फटकारत तो चालला होता. ती जागा त्याच्या मालकीची असल्यासारखा, ऐटीत तो चालत होता. त्याची जोराने, मोठ्या रुबाबात वाजवलेली घंटी आम्ही ऐकली.

होम्स शांतपणे म्हणाला, “हे बघा सभ्य गृहस्थहो, आपण दारामागे पवित्रा घेऊन बसू, ते बरे. अशा माणसाबरोबर वागतांना, काळजी घेतलेली बरी. इन्स्पेक्टर, तुम्हाला बेड्यांची गरज भासेल. त्याच्याशी काय बोलायचे, ते मी बघतो.”

आम्ही एक मिनिट शांत राहिलो -- असे एक मिनिट, जे मी कधीच विसरणार नाही. मग दार उघडून तो मनुष्य आत आला. क्षणार्धात होम्सने त्याच्या डोक्याला पिस्तुल लावले. हा हल्ला

इतका सहज झाला, की तो हलकट हतबल झाला. तो त्याच्या चकाकणाऱ्या काळ्या डोळ्यांनी, आमच्यापैकी प्रत्येकाकडे बघत राहीला. नंतर तो कटूपणे हसत सुटला.

"हे बघा सभ्य गृहस्थहो, या वेळेस तुम्ही माझ्यावर पिस्तुल रोखले आहे. मी कुणाला बेदम मारून लोळवले आहे, असे दिसते आहे. पण मी तर इथे मिसेस हिल्टन क्युबिटच्या पत्राला उत्तर म्हणून आलो आहे. तुम्ही ती तुम्हाला सामील असल्याचे मला सांगता आहात? मला पकडायचा सापळा रचण्यासाठी तिने तुम्हाला मदत केल्याचे मला सांगता आहात? नाही. नाही."

"मिसेस हिल्टन क्युबिट गंभीर रीत्या जखमी झालेली असून मरणाच्या वाटेवर आहे."

त्या माणसाने दुःखाने घरभर निनादणारी एक मोठी किंकाळी फोडली. तो भयानकपणे ओरडला, "तुम्हाला वेड लागले आहे. त्याला जखमी केले गेले, तिला नव्हे. छोट्या एल्सीला कुणी मारले? मी तिला धमकावले असेल -- देव मला क्षमा करो -- पण मी तिच्या सुंदर मस्तकाला धक्काही लावला नसता. तुमचे शब्द मागे घ्या – तुम्ही असे सांगा, ती ठीक आहे. असे सांगा."

"तिच्या मृत नवऱ्याशेजारी ती अतिशय जखमी अवस्थेत सापडली."

तो हंबरडा फोडून मटकन खाली खुर्चीत बसला व त्याच्या बेड्या घातलेल्या हातांनी तोंड झाकून घेतले. पाच मिनिटे तो शांत राहिला. मग त्याचे डोके वर उचलून तो थंडपणे दुःखाने बोलला, "लोकहो, मला तुमच्यापासून काहीही लपवायचे नाही. मी त्या माणसाला मारले असेल, तर त्यानेही मला मारलेले आहे, त्यामुळे तो खून ठरत नाही. पण तुम्हाला जर असे वाटत असेल, की मी त्या बाईला जखमी केले, तर तुम्हाला ती किंवा मी कोणीच माहिती नाही. मी सांगतो, मी तिच्यावर जगातील कुणाहीपेक्षा जास्त प्रेम केले. माझा तिच्यावर हक्क होता. खूप वर्षांपूर्वी तिने माझ्यासाठी शपथ घेतली होती. आमच्यामध्ये येणारा कोण हा इंग्लिश माणूस? माझा तिच्यावर पहिला हक्क होता. आणि जे माझे होते, तेच मी मागत होतो."

होम्स कडकपणे म्हणाला, “तू कशा प्रकारचा माणूस आहेस, हे समजल्यावर ती तुझ्या प्रभावाखालून बाहेर आली. तुझ्यापासून पळ काढण्यासाठी तिने अमेरिका सोडली आणि इंग्लंडमधील एका माननीय सभ्य माणसाशी लग्न केले. तू तिच्या हात धुवून मागे लागलास व तिचे आयुष्य त्रासदायक करून टाकलेस. तिने ती प्रेम करत असलेल्या नवऱ्याला सोडावे, व द्वेष वाटणाऱ्या घाबरणाऱ्या तुझ्याबरोबर यावे, म्हणून तू मागे लागला होतास. तू तिच्या नवऱ्याला ठार केलेस व तिला आत्महत्या करायला भाग पाडलेस. मिस्टर ॲबे स्लॅने, असा या प्रकरणात तुझा हात आहे आणि आता तुला कोर्टात त्याचा कायदेशीर जाब द्यावा लागेल.”

तो अमेरिकन बोलला, “जर एल्सी मरणार असेल, तर मग माझे काहीही का होईना. त्याने त्याच्या एका हातातून एक चुरगळलेली चिठ्ठी काढली. त्याच्या डोळ्यातील संशयाच्या छटेसकट तो ओरडला, “तुम्ही मला असे घाबरवू शकत नाही, समजलात? जर त्या बाईला इतके जखमी केले गेले आहे, तर मग ही चिठ्ठी कोणी लिहिली आहे?” त्याने ती चिठ्ठी टेबलावर फेकली.

“तुला इथे आणण्यासाठी मी ती लिहिली आहे.”

“तू लिहिलीस? आम्हा दोघांशिवाय जगात कुणालाच, नाचणाऱ्या माणसांचे गूढ माहिती नव्हते. तुला ते कसे कळले?”

होम्स म्हणाला, “एक माणूस ज्याचा शोध लावतो, ते दुसरा माणूसही जाणू शकतो. मिस्टर ॲबे स्लॅने, तुला नॉरविचला नेण्यासाठी गाडी येते आहे. पण मध्यंतरीच्या काळात, तिला जखमी करण्यासारख्या चुकांबद्दल स्पष्टीकरण देण्यासाठी तुझ्याकडे वेळ आहे. तुला माहिती आहे का, की मिसेस हिल्टन क्युबिटला तिच्या नवऱ्याचा खून केल्याची संशयित आरोपी म्हणून धरले गेले आहे आणि केवळ मी इथे असल्याने व माझ्याकडे असलेल्या माहितीमुळे, तिला या दोषारोपातून मुक्त करण्यात येते आहे. तिच्या नवऱ्याच्या मृत्युला ती कशाही प्रकारे जबाबदार नव्हती, एवढे तरी तू तिच्यासाठी सर्व जगाला सांगितले पाहिजेस.”

अमेरिकन म्हणाला, “मलाही अजून काही नको. निखळ सत्य काय ते सांगणे हे माझ्यासाठी उत्तम ठरेल.”

ब्रिटीश गुन्हेगारी कायद्याचा मोठा जाणकार असल्याचा आनंद दाखवत इन्स्पेक्टर ओरडला, “हे तुला सांगणे माझे कर्तव्य आहे की हे तुझे कथन तुझ्याविरुद्ध वापरले जाईल.”

स्लॅनेने त्याचे खांदे उडवले.

तो बोलला, “मी ते करेन, पहिल्याप्रथम मला तुम्हाला सर्वांना हे सांगायचे आहे, की मी या बाईला ती लहान मुलगी असल्यापासून ओळखतो. शिकॅगोमधील टोळीत, तेव्हा आम्ही सातजण होतो आणि एल्सीचे वडील टोळीप्रमुख होते. त्यांचे नाव पॅट्रिक असून, ते फार हुशार होते, जर तुम्हाला काही मागमूस लागला नाही, तर एखाद्या मुलाने काही रेघोट्या मारल्या आहेत असे वाटणाऱ्या त्या चित्रलिपीचा शोध त्याने लावला. तर, एल्सी आमच्याकडून काही गोष्टी शिकली. पण तिला टोळीच्या कारवायांत काही गम्य नव्हते. तिच्याकडे तिचा श्रमाने मिळवलेला पैसा होता. त्यामुळे तिने आम्हा सर्वांना सोडले व तो लंडनला गेली. तिचे माझ्याशी लग्न ठरले होते आणि मला वाटते, मी काही दुसरा चांगला व्यवसाय स्वीकारला असता, तर ते झालेही असते. पण तिने माझ्याशी पंगा घेण्याचे, काही कारण नव्हते. या इंग्लिश माणसाशी तिने लग्न केल्यावरच, मला तिचा पत्ता लागला. मी तिला पत्र लिहिले पण उत्तर मिळाले नाही. पत्रांचा काही उपयोग न झाल्याने, मग मी स्वतः आलो. तिला वाचता येईल अशा जागी. मी तिला निरोप लिहून पाठवला.

आता गेला महिनाभर जवळजवळ मी इथे आहे. मी त्या शेतात, एक खोली घेऊन रहातो. रोज रात्री मी बाहेर ये जा करू शकतो. हा माझा खूप शहाणपणा आहे. मी एल्सीचे मन वळवायचा खूप प्रयत्न केला. मला माहिती होते की तिने माझा निरोप वाचला आहे. कारण एका पत्राला तिने उत्तर दिले होते. मग मला चेव चढला व मी तिला धमकावू लागलो. तिने मला एक पत्र पाठवून, तेथून निघून जाण्याची विनंती केली. तिचा नवरा जर काही संकटात सापडला, तर तिचे हृदय

भग्न होईल असे ती म्हणाली. ती पुढे म्हणाली की जर तिला शांतता देऊन मी निघून जायला तयार असलो, तर ती तिचा नवरा झोपलेला असेल तेव्हा, पहाटे तीन वाजता, शेवटच्या खिडकीत येऊन माझ्याशी बोलेल. ती तिच्याबरोबर पैसे घेऊन आली व पैशांची लालूच दाखवून मला तेथून निघून जाण्यास प्रवृत्त करू लागली. यामुळे मी संतापलो आणि तिचा दंड पकडून तिला खिडकीबाहेर ओढण्याचा प्रयत्न केला. त्याच क्षणी तिचा नवरा हातात पिस्तूल घेऊन अवतीर्ण झाला. एल्सी खाली जमिनीवर बसली होती आणि आम्ही एकमेकांसमोर होतो. मी टाचा उंच करून उभा होतो. त्याला घाबरवण्यासाठी माझ्या हातात बंदुक होती. मी निघून जाणार होतो, तेवढ्यात त्याने मला पिस्तुलातून गोळी मारायचा प्रयत्न केला, पण तो चुकला. जवळजवळ त्याच क्षणी मी बंदुकीचा चाप ओढला आणि तो कोसळला. मी बागेतून पळून गेलो. माझ्यामागे खिडकी बंद झाल्याचा आवाज मी ऐकला. हे असे घडले. लोकहो, यातील प्रत्येक शब्द खरा आहे. आणि मग तो पोऱ्या मी इथे यावे अशी चिठ्ठी घेऊन येईपर्यंत, याबद्दल मी काही ऐकले नाही. अशा तऱ्हेने मी इथे तुमच्या हातात येऊन पडलो."

अमेरीकन बोलत असतांना, बाहेर गाडी येऊन थांबली. गणवेष घातलेले दोन पोलीस त्यात बसलेले होते. इन्स्पेक्टर मार्टिन उठला आणि कैद्याच्या खांद्याला हात लावला.

"चल, जायची वेळ झाली."

"प्रथम मी तिला बघू शकतो का?"

"नाही. ती शुद्धीवर नाही. मिस्टर शेरलॉक होम्स, जर मला अशीच एखादी महत्वाची केस मिळाली तर माझ्या चांगल्या नशिबाने तुम्ही माझ्या बाजूला असाल अशी मी आशा करतो."

आम्ही खिडकीत उभे राहून गाडी दूरवर जातांना पाहिली. मी वळलो, तेव्हा त्या कैद्याने टेबलावर टाकून दिलेले कागदांचे भेंडोळे मला दिसले. त्या चिठ्ठीच्या सहाय्याने होम्सने त्या गुन्हेगाराला अलगद सापळयात आणून टाकले होते.

होम्स हसून म्हणाला, “तुला ते वाचता येते का बघ.”

त्यात काही शब्द नव्हते तर नाचणाऱ्या माणसांची ओळ होती.

होम्स म्हणाला, “मी स्पष्ट केलेली चित्रांची भाषा तू वापरलीस, तर तुला असे आढळेल की मी एवढेच लिहिले होते, ‘ताबडतोब निघून ये.’ माझी खात्री होती की हे आमंत्रण तो नाकारू शकणार नाही. कारण त्याला ते मिसेस हिल्टन क्युबिटने लिहिले असेल असेच वाटले. आणि म्हणून माझ्या प्रिय वॉटसन, अशा तऱ्हेने नेहमी वाईट कृत्य करणाऱ्या नाचणाऱ्या माणसांना आपण चांगले बनवून, यशस्वी ठरलो आहोत. मी वचन दिल्याप्रमाणे तुला लिहिण्यासाठी खूप वेगळ्या धर्तीचे काही दिले आहे. तीन वाजून चाळीस मिनिटांनी आपली गाडी आहे. रात्रीच्या जेवणासाठी आपण बेकर रस्त्याला असू, अशी मी आशा करतो.

आता उपसंहाराचे काही शब्द. तो अमेरिकन, मिस्टर अॅबे स्लॅने, याला नॉरविच येथील कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली. पण त्याच्या शिक्षेत बदल केला जाऊन ती कमी केली गेली कारण हिल्टन क्युबिटने पहिल्यांदा गोळी मारली होती. मिसेस हिल्टन क्युबिटबद्दल मी असे ऐकले, की ती पूर्णपणे बरी झाली. अजूनही ती विधवेचे जिणे जगत, तिचे आयुष्य गोरगरिबांची काळजी घेण्यात व नवऱ्याची मालमत्ता सांभाळण्यात घालवत आहे.

# The Adventure Of The Priory School

# निवासी शाळेचे साहस

बेकर रस्त्यावरील आमच्या लहानशा मंचावर काही नाटकी आगमने व निर्गमने होत असतात. पण मला थॉर्नेक्रॉफ्ट हक्सटेबल, एम ए, पी एच डी याच्या अचानक व नवलपूर्ण आगमनाइतके, दुसरे तसे काही झालेले आठवत नाही. त्याच्या उच्च विद्याविभूषततेची भली मोठी यादी, त्याच्या लहानशा कार्डात मावत नसे. ते कार्ड आधी आले आणि पाठोपाठ तो महाकाय, भपकेबाज व स्वाभिमानी माणूस, मोठ्या तोऱ्यात अवतीर्ण झाला. जेव्हा त्याच्यामागे दार लागले, तेव्हा तो टेबलाचा आधार घेत डुगडुगत उभा राहीला. आमच्या शेकोटीसमोरील गालीच्यावर ती महाकाय आकृती तोंड खाली करून घसरून पडली.

आम्ही एकदम उठून उभे राहीलो व ते धूड पडलेले बघून क्षणभर शांतपणे करमणूक होत त्याला निरखत राहीलो. जीवनसागरात मरणप्राय वादळ झाल्यासारखे वाटले. मग होम्सने धावपळ करत त्याच्या डोक्याखाली उशी सरकवली व मी त्याच्या तोंडात ब्रँडी ओतली. त्या मोठ्या, गोऱ्या चेहऱ्यावर आठ्यांचे जाळे दिसत होते. डोळ्याखालील पोटरीसारखा भाग काळा पडला होता. ओठांचे कोपरे दुःखाच्या भाराने खाली वळले होते आणि हलणाऱ्या हनुवटीवर केस उगवले होते. शर्टावर व कॉलरवर लांबच्या प्रवासाने सुरकुत्या पडल्या होत्या. डोक्यावरचे केस विस्कटले होते. आमच्यासमोर पडलेल्या मनुष्याला चांगलाच धक्का बसला होता.

होम्स बोलला, “वॉटसन, याला झाले तरी काय?”

मी त्याची क्षीण लागणारी नाडी बघत म्हणालो, “अति दमणूक -- कदाचित फार भूक आणि दम!”

त्याच्या खिशातून काही काढत होम्स बोलला, “इंग्लंडच्या उत्तरेकडील मॅक्लेटॉनचे जायचे व यायचे तिकीट दिसते आहे. अजून बारा वाजले नाहीत. तो नक्की लवकर निघाला असणार.”

त्या माणसाच्या मिटलेल्या पापण्या हलू लागल्या. रिकामे भकास डोळे आमच्याकडे बघू लागले. क्षणार्धात तो त्याच्या पायांवर उठून उभा राहीला. त्याचा चेहरा शरमेने काळा पडला होता.

“मिस्टर होम्स, या अशक्तपणाला माफ करा. मी फार काळजीत आहे. मला एक कपभर दूध व बिस्कीट मिळाले तर मी नक्कीच बरा होईन, यात काही संशय नाही. मिस्टर होम्स, तुम्ही माझ्याबरोबर याल असे समजून मी स्वतः तुम्हाला भेटायला आलो. नुसती तार पाठवून या केसची तातडी तुमच्या लक्षात आली नसती, असे मला वाटले.”

“तुम्ही पूर्णपणे भानावर आलात की मग ---- “

“आता मी ठीक आहे. मी इतका अशक्त कसा झालो, तेच कळत नाही. मिस्टर होम्स, पुढच्या गाडीने तुम्ही माझ्याबरोबर मॅक्लेटॉनला यावे अशी माझी इच्छा आहे.”

माझ्या मित्राने मान हलवली.

“डॉ वॉटसन हा माझा मित्र तुम्हाला सांगेल, की आत्ता आम्ही कामात किती व्यग्र आहोत. फेररची कागदपत्रे व ॲबेरगॅव्हेनीच्या खुनाची केस कोर्टात सुरु होणार आहे. त्यामुळे तसेच महत्वाचे काम असल्याशिवाय मला लंडन सोडणे शक्य नाही.”

आमचा पाहुणा हात उडवत म्हणाला, “महत्वाचे! होल्डरनीजच्या एकुलत्या एका उमरावाच्या मुलाच्या अपहरणाची बातमी तुम्ही ऐकली नाही का?”

“कोण तो केंद्रीय मंत्रीमंडळातील होल्डरनीज?”

“बरोबर. तेच. आम्ही ती बातमी वर्तमानपत्रांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. पण ग्लोबमध्ये काल रात्री तशी अफवा असल्याचे छापून आले. मला वाटले, ती तुमच्या कानावर आली असेल.”

होम्सने त्याचे लांब व बारीक हात हवेत उडवले व त्याच्या संदर्भग्रंथाचा H खंड काढला.

“होल्डरनीज, सहावा उमराव, K. G., P. C. ---- अर्धी अक्षरे! बॅरॉन बेव्हर्ली, कार्सटनचा उमराव. वा! वा! काय यादी आहे! १९०० पासून हॅलामशायरचा लेफ्टनंट. दोनशे पन्नास एकर जमिनीचा मालक. सर चार्ल्स ॲपेलडोर याची एकुलती एक मुलगी एडीथ, हिच्याबरोबर लग्न, एकुलता एक वारस असलेला त्याचा मुलगा साल्टायर. लँकशायर आणि वेल्स मध्ये खाणी. पत्ताः कार्लटन निवास, होल्डरनीज हॉल, हॅलामशायर, कार्सटन राजवाडा, वेल्स. ॲडमिरॅल असलेला उमराव, १८३२ मध्ये राज्याचा मुख्य सचिव ---- वा! वा! हा माणूस म्हणजे अति महत्वाचा दिसतो आहे.”

“अति महत्वाचा आणि अति श्रीमंत. मिस्टर होम्स, मी जाणतो की तुम्ही तुमच्या व्यवसायात अग्रेसर आहात आणि तुम्ही कामाकरता काम करता. तरीही मी तुम्हाला सांगू इच्छितो की की त्यांचा मुलगा कुठे आहे हे सांगणाऱ्यास, पाच हजार पौंडांचा चेक दिला जाईल, हे उमरावांनी आधीच जाहीर केले आहे. आणि कुणी त्याचे अपहरण केले ते सांगणाऱ्यास अजून एक हजार पौंड दिले जातील.”

“ही फार मोठी रक्कम आहे. वॉटसन, मला वाटते, आपण डॉ हक्सटेबलबरोबर उत्तर इंग्लंडला जावे. मिस्टर हक्सटेबल, आता तुमचे दूध पिऊन झाले असेल तर, तुम्ही मला तुमची काय ती हकीगत सांगाल का? शेवटी मॅक्लेटॉनजवळच्या निवासी शाळेतील डॉ थॉर्नेक्रॉफ्ट हक्सटेबल याचा यात काय संबध आहे आणि हे घडल्यानंतर तीन दिवसांनी तो का आला -- तुमच्या ह्नुवटीची अवस्था ती गोष्ट कधी घडली, ते सांगते आहे -- तुम्हाला मदतीची गरज असल्याचे सांगते आहे.”

आमच्या पाहुण्याने दूध व बिस्किटे संपवली. त्याच्या डोळ्यात प्राण आला व गालांचा रंग पालटला. मोठ्या उत्साहाने व सुस्पष्टपणे त्याने परिस्थितीचे स्पष्टीकरण देण्याची तयारी केली.

“सभ्य गृहस्थहो, मला तुम्हाला हे सांगितले पाहीजे की मी निवासी शाळेचा संस्थापक व मुख्याध्यापक आहे. ‘हक्सटेबलची होरास प्रकाशकडा’ हे नाव तुम्ही कदाचित ऐकले असेल. माझी शाळा ही इंग्लंडमधील उत्कृष्ट व मोजक्या शाळांपैकी एक आहे. ब्लॅकवॉटरचे उमराव लिव्हरस्टोक, सर कॅथकार्ट सोम्स इत्यादी मंडळींनी त्यांची मुले माझ्याकडे सोपवली होती. पण काही आठवड्यांपूर्वी होल्डरनीजच्या उमरावाने त्याचा सचिव जेम्स वाईल्डर याला माझ्याकडे पाठवून असा निरोप दिला की त्याचा एकुलता एक दहा वर्षांचा मुलगा, उमराव साल्टायर याला तो माझ्या शाळेत दाखल करू इच्छितो. तेव्हा आता मी यशाचे उत्तुंग शिखर गाठल्याचा मला अनुभव आला. मी असा विचार केला, की माझ्या वाईट नशिबात ही चांगली घटना घडते आहे.

जेव्हा उन्हाळ्याची सहामाही चालू झाली, तेव्हा एक मे ला तो मुलगा आला. तो गोंडस मुलगा होता आणि लवकरच तो इथे रुळला. मी तुम्हाला सांगतो -- मी काही खासगी गोष्टी सांगत नसेन, असा माझा विश्वास आहे -- पण अशा गोष्टींमधील विश्वासार्हता खरी नसते -- की तो घरी आनंदी नव्हता. हे उघड गुपित होते की त्या उमरावाचे वैवाहिक आयुष्य शांतीपूर्ण नव्हते. एकमेकांच्या संमतीने त्यांनी फारकत घेतली होती. त्याची बायको दक्षिण फ्रान्स मध्ये रहात होती. हे काही काळापूर्वीच झाले होते आणि मुलाचा ओढा त्याच्या आईकडे असल्याचे बोलले जात होते. होल्डरनीज हॉलमधून तिच्या प्रयाणानंतर तो कावराबावरा झाला होता आणि त्याच कारणाने उमराव त्याला माझ्याकडे पाठवणार होता. एका पंधरवड्यात मुलगा माझ्याकडे रुळला व आनंदी होता.

“१३ मेच्या रात्री त्याला आम्ही शेवटचे बघितले. म्हणजे मागच्या सोमवारी रात्री! त्याची खोली दुसऱ्या मजल्यावर होती. दुसरी दोन मुले झोपत असत त्या मोठ्या खोलीतून त्याची खोली दिसत असे. या मुलांनी काही पाहीले किंवा ऐकले नाही. त्यामुळे तो सरळ मार्गाने नक्कीच कुठे गेला नाही. त्याच्या खोलीची खिडकी उघडी होती. तिथे चकचकीत हिरवी पाने असलेले चढून

जाण्यासारखे मजबूत झाड होते. पण खाली कुठे पाउलखुणा दिसल्या नाहीत. तरीही फक्त इथूनच बाहेर जाणे शक्य होते.

मंगळवारी सकाळी सात वाजता, तो नसल्याचे लक्षात आले. त्याचे अंथरूण त्याचा शाळेचा नेहमीचा गणवेष, म्हणजे काळे जाकीट, गडद करड्या रंगाची पँट त्याने घातली होती. खोलीत कोणी आल्याची चिन्हे दिसत नव्हती. काही रडणे भेकणे किंवा मारामारी झाल्याची लक्षणे नव्हती. कारण आतील खोलीतील मोठा मुलगा कॅउंटर याची झोप सावध होती.

जेव्हा उमराव साल्टायर नाहीसा झाल्याचे लक्षात आले, तेव्हा मी त्या वसाहतीतील मुले, शिक्षक व नोकरचाकर, या सगळ्यांना बोलावले. तेव्हा आम्ही खात्री केली की उमराव एकटाच नव्हे तर जर्मन शिक्षक हेडेगर हे देखील नाहीसे झाले होते. त्यांची खोली दुसऱ्या मजल्यावर इमारतीच्या पुढच्या टोकाकडे होती. त्याचे आत शिरायचे दार साल्टायरच्या खोलीच्या दिशेनेच होते. त्यांचे अंथरूणदेखील विस्कटलेले होते.

पण त्यांनी अंगात पूर्ण कपडे घातले नसावेत. कारण त्यांचा शर्ट व मोजे जमिनीवर पडलेले होते. ते नक्कीच हिरवी चकचकीत पाने असलेल्या झाडाच्या येथून उतरले, असे वाटत होते.कारण त्यांच्या पाऊलखुणा तिथे हिरवळीत दिसत होत्या. तेथेच जवळ त्यांची सायकल ठेवलेली असे. ती सुद्धा दिसत नव्हती.

“साल्टायर माझ्याबरोबर दोन वर्षे होता आणि उत्तम ओळखीने आला होता. तो शांत असून स्वभावाने दुष्ट होता. तो मुलांमध्ये व शिक्षकांमध्येही फारसा लोकप्रिय नव्हता. तिथे कोणी लपलेले वा तेथून निसटलेले दिसले नाही. आता गुरुवारी सकाळी आम्ही मंगळवारी सकाळइतकेच अज्ञानी होतो. अर्थात होल्डरनीज हॉलमध्ये लगेच चौकशी करण्यात आली. ते ठिकाण येथून काही मैलांवर आहे. आमची अशी कल्पना होती की अचानक घराची आठवण आल्याने, तो त्याच्या वडिलांकडे परत गेला असेल. पण तसे काही नव्हते. त्याचे उमराव वडील खूप चिडले होते. माझ्यावर पडलेल्या जबाबदारीने व कोड्यात पडल्याच्या परिस्थितीने मी कसा खंगलो, ते तुम्ही

पहाता आहात. मिस्टर होम्स, जर तुम्ही तुमची सर्व शक्ती पणाला लावली, आणि ते तुम्ही करावे, तर तुम्हाला तुमच्या आयुष्यात कधी मिळाली नसेल, अशी केस तुम्हाला मिळेल."

शेरलॉक होम्सने नीट लक्ष देऊन, त्या दुःखी माणसाची हकीगत ऐकली. त्याच्या भुवयांमध्ये पडलेली आठी, त्याला त्याचे पूर्ण लक्ष समस्येवर एकाग्र करायला सांगायची जरुरी नसल्याचे सुचवत होते. पण गुंतागुंतीची व वेगळीच केस असल्याने, त्याची त्याबद्दलची रुची व प्रेम फारच वाढले होते. त्याने त्याची वही काढली व भरभर दोनतीन गोष्टी लिहून ठेवल्या.

तो कडकपणे म्हणाला, "तुम्ही माझ्याकडे लगेच न येऊन हयगय केली आहे. त्यामुळे माझ्या तपासात गंभीर अडथळा येणार आहे. मी हे समजू शकत नाही, उदाहरणार्थ, ते खिडकीजवळील झाड व हिरवळ यात आता एकाद्या तज्ञ निरीक्षकालाही काही दिसणार नाही."

"मिस्टर होम्स, यात माझा काही दोष नाही. या गोष्टीचा लोकांमध्ये गवगवा व्हायला नको, याबाबत उमराव अगदी ठाम होते. त्यांना त्यांच्या कुटुंबाचे दुःख वेशीवर टांगायचे नव्हते. त्याबाबत त्यांना फारच भीती होती."

"पण काही व्यावसायिक तपास झाला का?"

"हो. पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. एक वरवरचा पुरावा लगेचच सापडला. एक मुलगा व एक माणूस जवळच्या स्टेशनवरून एका लवकरच्या गाडीने जातांना दिसले. काल रात्री आम्हाला अशी बातमी समजली, की त्या जोडीला लिव्हरपूलला हटकले गेले, पण ते कुणी वेगळेच होते. त्यामुळे मी नाराज होऊन, दुःखात बुडून गेलो. अख्खी रात्र झोपेशिवाय तळमळत काढल्यावर, सकाळी लवकरच्या गाडीने मी इथे आलो."

"मला वाटते, तो खोटा पुरावा मिळाल्यानंतर तो स्थानिक तपास थांबला का?"

"तो पूर्णपणे बारगळला."

“त्यामुळे तीन दिवस फुकट गेले. हे प्रकरण फारच निष्काळजीपणे हाताळले गेले.”

“मलाही असेच वाटते. मी ते कबूल करतो.”

“तरीही या समस्येची तड लावता येईल. मला ही सोडवायला आनंद होईल. तुम्हाला हा हरवलेला मुलगा आणि तो जर्मन शिक्षक यांच्यात काही संबंध आढळून आला का?”

“नाही. काहीच नाही.”

“तो त्या शिक्षकांच्या वर्गात होता का?”

“मला जेवढे माहिती आहे त्याप्रमाणे, तो त्यांच्याशी कधी एक शब्ददेखील बोलला नव्हता.”

“हे फारच विचित्र आहे. मुलाकडे सायकल होती का?”

“नाही.”

“दुसरी एखादी सायकल नाहीशी झाली होती का?”

“नाही.”

“नक्की?”

“हो. नक्की.”

तो मनुष्य त्या मुलाला घेऊन सायकलवरून रात्रीच्या काळोखात बेपत्ता झाला, असे तुम्हाला खरेच वाटत नाही का?”

“खात्रीपूर्वक नाही.”

“मग काय झाले असेल, असे तुम्हाला वाटते?”

“मला वाटते, यात सायकलचा काही संबंध नसावा. ती कदाचित कुठे लपवून ठेवली असेल. ती जोडी कुठेतरी चालत गेली असेल.”

“असेलही. पण हे जरा चुकीचेच वाटते आहे, नाही का? दुसऱ्या सायकली सावलीत लावलेल्या होत्या का?”

“खूप.”

“त्याने दोन सायकली लपवून ठेऊन असा आभास निर्माण केला नसेल ना, की ते दोघे सायकली घेऊन कुठे गेले असे सर्वांना वाटावे?”

“असे असू शकेल.”

“अर्थात, असेच असणार. बाकी कल्पना बेकार वाटतात. तपास सुरु करायला, ही घटना स्तुत्य आहे. शेवटी सायकल ही गोष्ट लपवून ठेवायला किंवा नाहीशी करायला सोपी नाही. अजून एक प्रश्न. तो मुलगा नाहीसा झाला, त्याच्या आदल्या दिवशी त्याला कुणी भेटले होते का?”

“नाही.”

“त्याला काही पत्रे आली होती का?”

“हो. एक आले होते.”

“कोणाकडून?”

“त्याच्या वडिलांकडून.”

“तुम्ही मुलांची पत्रे उघडता का?”

“नाही.”

“तुम्हाला कसे कळले, की ते वडिलांकडून आले होते?”

“पाकिटावर त्यांचे खास चिन्ह होते व त्या उमरावाच्या विशिष्ट शैलीत ते लिहिले गेले होते. शिवाय उमरावाने ते लिहिले असल्याचे त्यांच्याही लक्षात होते.”

“त्यापूर्वी त्याने कधी पत्र लिहिले होते?”

“बरेच दिवसात लिहिले नव्हते.”

“त्याने फ्रान्सहून कधी पत्र पाठवले होते का?”

“नाही. कधीच नाही.”

“अर्थात तुम्हाला माझ्या प्रश्नाचा रोख कळला असेल. एकतर मुलाला जबरदस्तीने पळविले गेले असावे किंवा तो स्वतःच्या इच्छेने गेला असावा. स्वतःच्या इच्छेने गेला असेल, तर इतक्या लहान मुलाला असे करायला, बाहेरून कोणीतरी भाग पाडले असणार. जर त्याला भेटायला कुणी येत नव्हते, तर मग तसा प्रयत्न पत्रातून झाला असला पाहिजे. त्यामुळे मला हे हवे आहे, की त्याला पत्र कुणी पाठवले होते.”

“मला वाटते मी तुम्हाला या बाबतीत फार मदत करू शकणार नाही. मला माहिती आहे त्याप्रमाणे त्याला फक्त त्याच्या वडिलांकडूनच पत्रे येत असत.”

“तो नाहीसा झाला, त्यादिवशी कुणाकडून काही पत्र आले होते का? बाप व मुलामधील संबंध चांगले होते का?”

“उमराव कधीच कोणाशी मित्रत्वाने वागत नाहीत. ते नेहमीच मोठ्या सार्वजनिक समस्यांमध्ये गुंतलेले असतात. सामान्य भावभावनांना त्यांच्या आयुष्यात काही स्थान नाही. पण त्यांच्या पद्धतीने ते मुलाशी नेहमी दयाळूपणे वागत असत.”

“पण मुलाचा कल त्याच्या आईकडे होता, बरोबर?”

“हो.”

“तो तसे बोलला होता का?”

“नाही.”

“मग उमराव तसे काही बोलला होता का?”

“अरे बापरे. नाही. नाही.”

“मग तुम्हाला ते कसे समजले?”

“उमरावांचा सचिव, मिस्टर जेम्स वाईल्डर याच्याबरोबर माझे खासगी बोलणे झाले. त्याने मला त्या मुलाच्या, उमराव साल्टायरच्या मनात काय आहे त्याची कल्पना दिली.”

“अस्स! तसेही तो मुलगा निघून गेल्यावर ते त्याच्या वडीलांनी पाठवलेले पत्र, खोलीत पडले होते का?”

“नाही. तो ते घेऊन गेला.मिस्टर होम्स, मला वाटते, आपण मॅक्लेटॉनला जाण्यासाठी निघू.”

“मी टांगा मागवतो. पाऊण तासात आम्ही तुमच्या सेवेसाठी हजर असू. मिस्टर हक्सटेबल, जर तुम्ही घरी तार करत असाल, तर तुमच्या शेजाऱ्यांना असे वाटू दे की अजून लिव्हरपूलला किंवा जिकडे कुठे तुमचा तपास चालू आहे, तोच चालू आहे. मध्यंतरीच्या काळात, मी तुमच्या येथे शांतपणे थोडे काम करतो. वॉटसन व मी अशा दोन कुत्र्यांना कदाचित तेथील वासावरून काही सुगावा लागेल.”

डॉ हक्सटेबल यांची प्रसिध्द शाळा असलेल्या, ताज्या, थंड वातावरणाच्या पिक नावाच्या प्रदेशात आम्ही संध्याकाळी होतो. आम्ही तिथे पोचलो, तेव्हा आधीच अंधार झाला होता. हॉलमधील टेबलावर एक कार्ड पडले होते. तेथील खानसामा त्याच्या मालकाच्या कानात काहीतरी कुजबुजला. मालक वळून आमच्याकडे रागीट तोंड करून बघू लागला.

तो म्हणाला, “उमराव इथे आले आहेत. उमराव आणि मिस्टर वाईल्डर अभ्यासिकेत बसले आहेत. या, मी तुमची त्यांच्याशी ओळख करून देतो.”

अर्थात मी उमरावांचे, त्या मुत्सद्दी राजकारण्याचे चित्र पाहिलेले होते. पण त्यापेक्षा ते प्रत्यक्षात वेगळे वाटले. ते उंच असून त्यांचे दर्शन प्रतिष्ठीत व जादूभरे होते. त्यांचा पोषाख काळजीपूर्वक केलेला दिसत होता. बारीक चेहरा उतरलेला वाटत होता. त्यांचे नाक लांब, वाकलेले व कुरूप होते. त्यांची त्वचा पिवळी व राठ होती. त्यांची छोटीशी, लालसर दाढी घड्याळाची साखळी बाहेर आलेल्या पांढऱ्याशुभ्र कोटावर विचित्रपणे चांगलीच उठून दिसत होती. असे ते रुबाबदार व्यक्तिमत्व शेकोटीपुढील रगाआडून आमच्याकडे थंड नजरेने बघत होते. त्यांच्याशेजारी एक तरुण मुलगा उभा होता. तो बहुधा त्यांचा खासगी सचिव, वाईल्डर असावा. तो लहानसा, सावध, चपळ व थोडा नाराज वाटत होता. त्याचे फिकट निळे डोळे बुद्धिमान दिसत होते. त्याने विश्लेषण करत सकारात्मक पद्धतीने संभाषणास सुरवात केली.

“मी आज सकाळी मिस्टर हक्सटेबलना फोन केला पण तुम्ही लंडनहून निघू नका हे सांगायला फार उशीर झाला. मला असे समजले, की ही केस शेरलॉक होम्सच्या हवाली करण्यासाठी तुम्ही प्रयत्नात होतात. उमरावांना आश्चर्य वाटले. मिस्टर हक्सटेबल, त्याना विचारल्याशिवाय तुम्ही असे पाऊल उचलायला नको होतेत.”

“जेव्हा मला समजले की पोलिसांना काही छडा लागत नाही, तेव्हा ----“

उमरावांना पोलिसांबाबत असे अजिबात वाटत नाही.”

“पण मिस्टर वाईल्डर नक्कीच ----“

“डॉ हक्सटेबल, तुम्हाला माहिती आहे की उमरावांना या बाबतीत लोकांचा हस्तक्षेप नको आहे. त्यांना शक्यतो, कमीत कमी लोकांना विश्वासात घ्यायचे आहे.”

भुवया चढलेला डॉक्टर बोलला, “सकाळच्या गाडीने मिस्टर शेरलॉक होम्स लंडनला परत जाऊ शकतात.”

होम्स मवाळ आवाजात म्हणाला, “असे क्वचितच होईल. डॉक्टर, अगदी क्वचितच होईल. या उत्तरेकडच्या हवेने मला ताजेतवाने आणि छान वाटते आहे. त्यामुळे मी काही दिवस इथे रहायचा व माझे मन माझ्या पद्धतीने रिझवायचा विचार करतो आहे. मी तुमच्या घरी राहीन किंवा एखाद्या खानावळीत राहीन. अर्थात हे तुम्हाला ठरवायचे आहे.”

मला दिसत होते की तो दुर्दैवी डॉक्टर काही निर्णय घेऊ शकत नव्हता. लालसर दाढीच्या उमरावाने त्याची यापासून सुटका केली, कारण खर्जातील खोल घुमल्यासारख्या आवाजात तो म्हणाला, “मिस्टर वाईल्डर, डॉ हक्सटेबल, तुम्ही मला विचारले असते, तर तो शहाणपणा ठरला असता. पण तुम्ही मिस्टर होम्सना आधीच विश्वासात घेतल्यामुळे, आता जर आपण त्यांची मदत घेतली नाही, तर ते विचित्र दिसेल. मिस्टर होम्स, कुठेतरी लांब खानावळीत रहाण्यापेक्षा तुम्ही होल्डरनीज हॉलमध्ये माझ्याबरोबर राहीलात तर मला आवडेल.”

“महाशय, मी आपला आभारी आहे. मला वाटते, माझ्या तपासाच्या कामासाठी जिथे हा गूढ प्रकार घडला, तिथे हजर असणे शहाणपणाचे ठरेल.”

“मिस्टर होम्स, बरोबर आहे. मी किंवा मिस्टर वाईल्डर तुम्हाला वेळोवेळी माहिती देऊच.”

होम्स म्हणाला, “मला वाटते, बहुधा मला तुम्हाला हॉलमध्ये भेटायची गरज भासेल. सर, तुम्ही तुमच्या मुलाच्या अचानक नाहीसे होण्याबद्दल मनाशी काय विचार केला आहे?

“नाही. मी तसा काही विचार केला नाही.”

“तुम्हाला कदाचित त्रास होईल, पण मला हे विचारल्याशिवाय काही तरणोपाय दिसत नाही. त्याच्या आईचा यात काही हात असेल, असे तुम्हाला वाटते का?”

तो उमराव कां कू करत शेवटी बोलला, “मला तसे वाटत नाही.”

“दुसरे सहज समोर येणारे स्पष्टीकरण म्हणजे, कुणी पैसे मिळायच्या आशेने त्याचे अपहरण केले असेल. तुमच्याकडे तशा स्वरूपाची काही मागणी आली नाही का?”

“नाही, सर.”

“महाशय, अजून एक प्रश्न. मला असे समजले की मुलगा नाहीसा झाला, त्या दिवशी तुम्ही त्याला पत्र लिहिले होते.”

“नाही. त्याच्या आदल्या दिवशी लिहिले होते.”

“बरोबर. पण ते त्याला त्या दिवशी मिळाले.”

“हो.”

“त्या पत्रात असे काही होते का, की ज्यामुळे तो बेचैन व्हावा व त्याला असे कृत्य करण्यास भाग पडावे.”

“नाही. असे काही नव्हते.”

“तुम्ही स्वतःते पत्र नेऊन टाकले का?”

उमरावाने काही उत्तर द्यायच्या आत त्यांचा सचिव रागाने बोलला, “सरांना असली कामे करायची सवय नाही. इतर पत्रांबरोबर ते पत्र मी पोस्टाच्या पेटीत टाकले.”

“तुमची खात्री आहे का की इतर पत्रांबरोबर तेही गेले?”

“हो. नक्की.”

“तुमच्या सरांनी त्या दिवशी किती पत्रे लिहिली?”

“वीस, तीस असतील माझा पत्रव्यवहार मोठा आहे. पण हे असे विचारणे मला बरोबर वाटत नाही.”

होम्स बोलला, “असेच काही नाही.”

उमरावाने चालू ठेवले, “मला तरी ते तसेच वाटले. मी पोलिसांना फ्रान्सच्या दक्षिण भागात त्यांचे लक्ष वळवण्याचा सल्ला दिला आहे. इतके राक्षसी कृत्य बाईसाहेब करू धजतील, असे मला वाटत नसल्याचे मी आधीच बोललो आहे. पण त्या मुलाच्या डोक्यात काही गैरसमज भरलेले असल्याने व जर्मन शिक्षकांनी त्याला या चुकीच्या रस्त्याने जायला मदत केल्यामुळे कदाचित तो तिच्याकडे पळून गेलाही असेल. डॉ हक्सटेबल, आपण आता हॉलला परत जाऊ.”

होम्सला अजून काही प्रश्न विचारायचे असल्याचे मला कळत होते. पण उमरावांच्या अनपेक्षित वागणुकीने मुलाखतीचा शेवट झाला. उमरावांच्या चढेलपणाच्या स्वभावाला अनुसरून, त्यांच्या कौटुंबिक भानगडी एखाद्या परक्या माणसासमोर उघड करणे त्याना उबग आणणारे ठरत होते. प्रत्येक नवीन प्रश्न त्यांच्या खानदानी इतिहासाच्या पुसट कोपऱ्यांवर भीतीदायक उजेड पाडत होते.

जेव्हा उमराव व त्यांचा सचिव तेथून गेले, तेव्हा माझा मित्र तपासाचा एक भाग असलेल्या चौकशीसाठी त्याच्या स्वभावाप्रमाणे उत्सुक झाला.

तो मुलगा रहात असलेली खोली नीट तपासण्यात आली. तिथे काहीही सापडले नाही. पण एक गोष्ट लक्षात आली, की तो बहुधा खिडकीतूनच निसटला असणार. जर्मन शिक्षकांची खोली व व तेथील काही दृष्य परिणामांतून काही निष्पन्न झाले नाही. मुलाच्या खिडकीखालील बागेतील चकचकीत हिरवे झुडूप वजनाने विस्कटलेले दिसत होते. कंदीलाच्या उजेडात आम्हाला हिरवळीवर त्याच्या पायाचे ठसे दिसले. त्या गवतातील छोट्याशा ठशांमुळे त्या मुलाच्या अनाकलनीय पलायनाची साक्ष मिळत होती.

शेरलॉक होम्स त्या घरातून बाहेर पडला. तो एकदम अकरानंतर परतला. त्याने आसपासच्या भागाचा नकाशा मिळवला व तो खोलीत घेऊन आला. तो अंथरुणावर उघडून त्याने त्यावर उजेड पडेल अशा तऱ्हेने दिवा हलवला. तो सिगरेट ओढून मधूनमधून त्यातील रुचीपूर्ण गोष्टी त्याच्या पाइपच्या टोकाने मला दाखवत राहीला.

होम्सने आणलेला शाळेच्या आसपासचा नकाशा

तो म्हणाला, "वॉटसन, ही केस आता माझ्यावर चढू लागली आहे. यात नक्कीच काही गूढ बाबी आहेत. आपल्याला तपासात उपयोगी ठरू शकतील, अशा काही भौगोलिक गोष्टी मला तुला सुरवातीला दाखवायच्या आहेत.

"या नकाशाकडे बघ. हा गडद चौरस म्हणजे निवासी शाळा आहे. तिथे मी एक पिन लावतो. आता हा पूर्व पश्चिम रस्ता दिसतो आहे, तो मुख्य रस्ता आहे. इथपासून मैलभर अंतरावर कुठेही त्याला फ़ूटलेले रस्ते नाहीत. जर ते दोघे कुठल्या रस्त्याने गेले असतील, तर तो हाच रस्ता आहे."

"बरोबर."

"एका विशिष्ट प्रकारे आपण त्या रात्री या रस्त्यावरून कोण कोण गेले व काय काय झाले ते तपासू शकतो. आत्ता माझा पाईप मी ज्या ठिकाणी ठेवला आहे, तिथे रात्री बारा ते सहाचा कॉन्स्टेबल कामावर होता. तुला दिसतो आहे, त्याप्रमाणे पूर्व दिशेने त्याला आडवा गेलेला हा पहीला रस्ता आहे. हा कॉन्स्टेबल म्हणतो त्याप्रमाणे तो पूर्ण वेळ इथे पहारा देत होता व जराही इकडे तिकडे गेला नाही. एक मुलगा व माणूस असे दोघे या रस्त्याने त्याला न दिसता गेलेले असण्याची काहीच शक्यता नाही. मी आज रात्री त्याच्याशी बोललो व तो मला विश्वासार्ह वाटतो. तिथे हा रस्ता संपतो. आता आपण दुसऱ्या रस्त्याबद्दल बोलू. एक लाल बैल नावाची खानावळ आहे. तेथील मालकीण आजारी असून तिने मॅक्लेटॉनच्या डॉक्टरांना बोलावणे पाठवले होते. पण ते दुसऱ्या एका केसमध्ये गुंतल्यामुळे. सकाळपर्यंत आले नाहीत. खानावळीतले लोक

डॉक्टरची वाट बघत रात्रभर सावध होते. त्यापैकी एकाचे तरी रस्त्याकडे सतत लक्ष होते. त्यांनी सांगितले की त्यावेळेस त्या रस्त्याने कुणीही गेले नाही. जर त्यांची साक्ष खरी असेल तर, आपण निःसंशय स्वतःला भाग्यवान समजून पश्चिम दिशेचा नाद सोडून देऊ शकतो. आणि असेही म्हणू शकतो की निसटलेल्या लोकांनी हा रस्ता वापरलाच नाही.

“पण सायकल?” मी हरकत घेतली.

“तेच तर! आपण सायकलीकडे येऊच. पण आपला तर्क लढवणे चालू ठेवता, जर ते या रस्त्याने गेले नसतील, तर मग त्यांनी घराच्या उत्तर किंवा दक्षिण दिशेने कूच केले असणार, हे नक्की. आपण याची एकमेकाशी तुलना करून बघू. तुला दिसते आहे त्याप्रमाणे, घराच्या दक्षिणेला अनेक तुकडे असलेली व मध्ये दगडी भिंती असलेली शेते पसरलेली आहेत. तिथून सायकल चालवणे शक्य नाही, असे मला वाटते. तेव्हा ही कल्पना आपण सोडून देऊ. आता आपण उत्तरेचा विचार करू. इथे रॅग्ड शॉ नावाची वृक्षराई आहे. त्यापुढे दोन्ही बाजूला चढ असलेले, दहा मैल मोठे माळरान पसरलेले आहे. इथे या जंगलाच्या एका बाजूला होल्डरनीज हॉल आहे. रस्त्याने तो दहा मैल आहे पण माळरानातून फक्त सहा मैल आहे. हा फार शुकशुकाट असलेला सपाट भाग आहे. या माळरानात काही शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत. तिथे ते शेळ्या व गुरे पाळतात. तिथून चास्टरफिल्डच्या चढ्या रस्त्यापर्यंत फक्त काही जातींचे पक्षी रहाताना दिसतात. हे बघ , इथे तुला एक चर्च दिसेल. काही घरे आहेत व एक खानावळ. त्यानंतर उंच डोंगर सुरु होतात. खात्रीपूर्वक आपल्याला इथे उत्तरेलाच शोध घेतला पाहीजे.”

“पण सायकल?” मी चालू ठेवले.

होम्स अधीरपणे म्हणाला, “ठीक आहे. सायकलस्वार चांगला असेल, तर रस्ता फार चांगला लागतोच असे नाही. माळरानात खूप रस्ते आहेत. त्या दिवशी पौर्णिमा होती. ओहो! हे काय आहे?”

दारावर रागारागाने थापा मारल्या गेल्या व क्षणभराने डॉ हक्सटेबल खोलीत शिरले. त्यांच्या हातात पांढरी व्हीची खूण असलेली निळी क्रिकेटची टोपी होती.

ते ओरडले, "शेवटी आपल्याला एक पुरावा मिळाला. मी देवाचे आभार मानतो. शेवटी बहुतेक आपल्याला त्या गोंडस मुलाचा माग काढता येईल. ही त्याची टोपी आहे."

"ती कुठे सापडली?"

"माळरानात वस्ती केलेल्या जिप्सींच्या गाडीत. ते लोक मंगळवारी गेले. आज पोलिसांनी त्यांचा माग काढून त्यांच्या तांड्याची तपासणी केली. तेव्हा ही टोपी सापडली."

"त्यांना कसे कळले की ती मुलाची होती?"

"मंगळवारी सकाळी ते माळरानावर गाणी गात फिरतांना, ती त्यांना मिळाली. त्या हलकटांना तो मुलगा कुठे आहे ते माहिती आहे. देवा रे! त्यांना कडीकुलुपात बंदिवान केले आहे. कायद्याच्या भीतीने किंवा उमरावांकडील पैशाच्या जोरावर त्यांची तोंडे उघडतील."

जेव्हा डॉक्टर खोलीतून गेले तेव्हा होम्स बोलला, "इथपर्यंत ठीक झाले. आपण माळरानाच्या खालील बाजूस तो मुलगा सापडायची आशा करत होतो, ते बरोबर निघाले. त्या जिप्सींना अटक केल्याचे सोडून, स्थानिक पोलिसांनी काहीच केलेले नाही. वॉटसन, इकडे बघ. इथे माळरानापलीकडे झरा आहे. इथे नकाशात तो दाखवलेला आहे, बघ. काही ठिकाणी तो रुंद होऊन दलदल माजली आहे. विशेषतः तो भाग शाळा आणि होल्डरनीज हॉल यामधील दिसतो आहे. या कोरड्या हवेत दुसरीकडे कुठे पाऊलखुणा शोधणे निरर्थक आहे. पण त्या जागी नक्की काही पुरावा मागे राहिलेला असण्याची शक्यता आहे. मी तुला उद्या सकाळी लवकर हाक मारतो. आपण दोघे उद्या तिथे जाऊन या प्रकरणावर काही प्रकाश पडतो का, ते बघू."

दुसऱ्या दिवशी उजाडत असतांना मला उंच, बारीक होम्स माझ्या अंथरुणाशेजारी उभा असलेला दिसला. तो पूर्ण कपडे घालून तयार होता व जवळजवळबाहेर पडतच होता.

“मी हिरवळीवर व सायकल ठेवायच्या सावलीच्या जागी जाऊन आलो. रॅग्ड शॉ येथेही फेरफटका मारला. वॉटसन, आता पुढच्या खोलीत कोको तयार आहे. मी तुला घाई करायची विनंती करतो. अख्खा दिवस आपल्यापुढे पडलेला आहे.”

त्याचे डोळे चमकत होते. कामाचा ढीग समोर पहाणाऱ्या निष्णात कर्मचाऱ्यासारखे त्याचे गाल उत्तेजित होऊन लाल झाले होते. अंतर्निरीक्षण करणारा, अशक्त, पूर्णपणे वेगळा होम्स, बेकर रस्त्यावरील चटपटीत तत्पर माणूस होता. त्या चपळतेने सहज हालचाली करणाऱ्या, चैतन्याने रसरसलेल्या जिवंत पण थोड्या उदास आकृतीकडे बघून मला जाणवले की खरच एक दमणूक करणारा दिवस आमच्यासमोर पडला होता.

तरीही तो काळ्याकुट्ट निराशेतच उगवला. उंचावलेल्या आशांसहीत शेळयांच्या हजारो वाटा असलेले लालसर तपकिरी माळरान तुडवतांना, आम्ही होल्डरनीज हॉल व आमच्यामधील रुंद, दलदलीच्या हिरवट पट्ट्याशी आलो. जर मुलगा घरुन गेला असेल तर तर तो पाऊलखुणा उमटवत इथूनच गेला असणार. पण त्याच्या किंवा जर्मन शिक्षकाच्या काहीही खुणा तिथे आढळल्या नाहीत. पडलेला चेहरा घेऊन माझा मित्र तिथे हिंडत होता. दलदलीच्या कडेने प्रत्येक चिखलमय ठशाचा मागोवा घेत तो उत्सुक निरीक्षक फिरत होता. तिथे शेळयांच्या पायांचे खूप ठसे होते आणि काही मैलांवर एके ठिकाणी गाई येऊन गेल्याचे दिसत होते. अजून काही नाही.

दूरवर पसरलेले माळरान उदासीनतेने बघत होम्स म्हणाला, “नंबर एक ध्यानात घे. काही अंतरावर अजून एक दलदलीची जागा दिसते आहे. दोन्ही दलदलींच्या मध्ये चिंचोळी जागा आहे. वा! वा! किती छान! आपण इथे काय करतो आहोत?”

आम्ही त्या अरुंद वाटेवर आलो. त्याच्या मध्यभागी पाणथळ जागी सायकलीच्या स्पष्ट खुणा दिसत होत्या.

मी ओरडलो, “ओहो! आपल्याला त्या सापडल्या.”

पण होम्स त्याचे डोके हलवत होता. त्याचा चेहरा आनंदी नसून गोंधळलेला पण आशादायक वाटत होता.

तो बोलला, "सायकल नक्की, पण ती नव्हे. मला टायरच्या बेचाळीस प्रकारच्या खुणा माहिती आहेत. तुला दिसते आहे त्याप्रमाणे, या बाहेरील बाजूस जोड लावलेल्या डनलॉपच्या टायरच्या आहेत. जर्मन शिक्षक हेडेगरचे टायर पाल्मरचे होते. त्याच्या खुणा लांबलचक, पट्टेरी असतात. गणितज्ञ ॲव्हेलिंग याचे असे ठाम मत होते. त्यामुळे या हेडेगरच्या खुणा नाहीत."

"मग मुलाच्या?"

"शक्यता आहे. त्याच्या सायकलच्या त्या असल्याचे आपण सिध्द करू शकलो तर! पण ते तर आपण करू शकत नाही. तुला दिसत आहेत त्याप्रमाणे या खुणा शाळेकडून येणाऱ्या सायकलस्वाराकडून उमटवल्या गेल्या आहेत."

"की शाळेकडे जाणाऱ्या?"

"नाही. नाही. माझ्या प्रिय वॉटसन, जास्त खोल रुतलेल्या खुणा आहेत त्या जास्त वजन पडणाऱ्या मागील चाकाच्या आहेत. तुला खूप ठिकाणी या इकडेतिकडे पसरलेल्या खुणा दिसतील आणि पुढील चाकाच्या पुसट होऊन नाहीशा होत चाललेल्या खुणाही दिसतील. त्या संशयातीतपणे शाळेकडून निघालेल्या आहेत. त्या आपल्या केसशी निगडीत असतील किंवा नसतीलही. पण आपण त्यांचा मागोवा घेऊ."

आम्ही तसे केले आणि काही शे यार्ड अंतरावर त्या नाहीशा झाल्या, कारण माळरानाचा तो भाग फारच पाणथळ होता. पुन्हा मागे येऊन आम्ही झरा आडवा जाणारी दुसरी एक जागा शोधली. इथे परत एकदा सायकलीच्या चाकांच्या खुणा दिसत होत्या. पण गाईच्या पायांनी त्या जवळजवळ नाहीशा झाल्या होत्या. त्यानंतर काही माग काढता आला नाही. पण तो रस्ता शाळेच्या मागील बाजूस असलेल्या रॅग्ड शॉपर्यंत थेट जात होता. या जंगलातून सायकली गेल्या

असल्या पाहिजेत. त्याची हनुवटी हातांवर ठेऊन होम्स एका मोठ्या खडकावर बसला. तो तेथून हलेपर्यंत मी दोन सिगरेटी ओढल्या.

तो म्हणाला, "हं. तर शेवटी, अर्थात असे झाले असण्याची शक्यता आहे की लबाड माणसाने वेगळ्या प्रकारच्या खुणा उमटाव्यात म्हणून, त्याच्या सायकलचे टायर बदलले असतील. असा विचार करू शकणाऱ्या गुन्हेगाराचा तपास करायला मला अभिमान वाटेल. तूर्तास आपण हा प्रश्न बाजूला ठेऊ आणि परत पाणथळ जागेकडे जाऊ. तिथे अजून आपल्याला न सापडलेल्या बऱ्याच गोष्टी असतील."

आम्ही आमचा पद्धतशीर तपास माळरानातील दलदलीच्या पाणथळ जागी चालू ठेवला आणि लवकरच आम्हाला आमच्या चिकाटीचे फळ मिळाले. पाणथळ जागेच्या खालील भागाच्या पलीकडे एक चिखलमय रस्ता जात होता. होम्स तिथे गेल्यावर त्याने आनंदाची आरोळी ठोकली. त्या रस्त्याच्या मध्यभागी खूप चाकोऱ्या पडल्या होत्या. त्या पाल्मर टायरच्या होत्या.

होम्स ओरडला, "इथे हा हेडेगर आहे, अगदी नक्की! वॉटसन, माझा तर्क चांगलाच बरोबर दिसतो आहे."

"मी तुझे अभिनंदन करतो."

"पण अजून आपल्याला बरेच काम करायचे आहे. कृपया माझ्याबरोबर या रस्त्याने चालत रहा. आपण या खुणांचा माग काढत जाऊ. मला आशा आहे की त्या फार लांब गेलेल्या नसतील.

तरीही आम्ही चालत राहिल्यावर आम्हाला असे आढळले की माळरानाचा हा भाग आडव्यातिडव्या मऊसर तुकड्यांनी भरलेला आहे. सायकलच्या खुणा दिसेनाशा झाल्या तरी परत परत थोड्या थोड्या अंतरावर त्या दिसत राहील्या.

होम्स बोलला, "सायकलस्वार आता निःसंशय सायकल दामटतो आहे, यात काही शंका नाही. या खुणा बघ दोन्ही टायर स्पष्टपणे दिसत आहेत. हे तुला दिसते आहे का? दोन्ही खोलवर

उमटलेले आहेत. त्यावरून असे समजते आहे की सायकलस्वार छलांग मारत हँडलवर त्याचे वजन टाकतो आहे. अरे देवा! तो पडला."

मी सुचवले, "घसरून पडला असावा."

होम्सने पिवळ्या झुडूपाची एक मोडकी फांदी उचलून हातात धरली. पिवळी फुले किरमिजी लाल रंगाने माखलेली बघून मी भीतीने शहारलो. तेथील इतर झुडूपांमध्ये देखील गोठलेल्या रक्ताचे लाल डाग पडले होते.

होम्स म्हणाला, "वाईट झाले. वॉटसन, स्पष्टपणे दिसते आहे. फार वाईट झाले. इथे ही छलांग मारली असणार. इथे बघून मी काय वाचतो आहे? तो पडून जखमी झाला -- उठला -- परत सायकलवर बसला -- आणि चालू पडला. पण पुढे सायकलच्या चाकोऱ्या दिसत नाहीत. आपण अजून पुढे जात राहू. या कडेला असलेले गुरांच्या खुरांचे ठसे व चाकोऱ्या आपल्याला मार्ग दाखवतील. बैलाने त्याला ढुशी दिली की काय? अशक्य! पण या खुणा दुसऱ्या कुणाच्या नाहीत. वॉटसन, आपण जात राहू. या चाकोऱ्या आणि डाग आपल्याला मार्ग दाखवतील. आता तो आपल्यापासून पळ काढू शकत नाही."

आमचा शोध काही फार काळ चालला नाही. ओल्या चकाकणाऱ्या रस्त्यावर टायरच्या खुणा वेड्यावाकड्या होऊ लागल्या. अचानक मी समोर बघतांना, दाट झुडूपांमध्ये धातूवरुन परावर्तीत झालेले प्रकाशकिरण माझ्या डोळ्यात घुसले. तेथून पाल्मरचे टायर असलेली, एक पॅडल वाकलेली, सगळ्या पुढील बाजूचा चेंदामेंदा झालेली व रक्ताने माखलेली एक सायकल आम्ही ओढून बाहेर काढली. झुडुपांच्या दुसऱ्या बाजूला एक बूट बाहेर आलेला दिसत होता. आम्ही त्याभोवताली फेरी मारली. तिथे तो दुर्दैवी सायकलस्वार पडला होता. तो मोठी दाढी असलेला, चष्मा घातलेला उंच मनुष्य होता. चष्म्याची एक काच लाथाडून तुटली होती. डोक्यावर केलेल्या वज्रमुठीच्या प्रहाराने त्याचे मरण ओढवलेले दिसत होते. त्यामुळे त्याचा कवटीचा भाग फ़ूटला होता. तो मजबूत आणि चपळ असल्याने इतकी जखम झाल्यावरही तो

पळायचा प्रयत्न करत असावा. त्याच्या पायात बूट होते, पण मोजे नव्हते. उघड्या कोटाच्या आत रात्रीचा शर्ट होता. तो नक्कीच जर्मनचा शिक्षक होता.

होम्सने शव उलटे केले. आणि नीट लक्ष देऊन त्याची तपासणी केली. मग काही वेळ तो समाधी लाऊन बसला. त्याची उंचावलेली भुवई पाहून मला कळले की त्याच्या मते हा एवढासा शोध लागल्याने, तपासकामात फार प्रगती झाली नव्हती.

“वॉटसन, आता काय करावे, ते ठरवणे जरा अवघड आहे. माझे स्वतःचे मत म्हणशील, तर हा तपास चालू ठेवावा. कारण आपण आधीच यात इतका वेळ घालवलेला आहे, की यात अजून वेळ घालवणे आपल्याला परवडण्यासारखे नाही. तर दुसरीकडे आपल्याला लागलेला शोध पोलिसांना कळवणे भाग आहे. ह्या प्रेताची योग्य तो विल्हेवाट लागली पाहिजे.”

“मी ते काम करू शकतो.”

“पण मला तुझ्या सोबतीची व मदतीची गरज आहे. थोडा थांब. तिथे एक मनुष्य खतासाठी खड्डा खणतो आहे. त्याला इकडे आण. तो पोलिसांना सांगेल. मी त्या शेतक-्याला बोलावले. त्या घाबरलेल्या माणसाला होम्सने डॉ हक्सटेबलसाठी एक चिठ्ठी खरडून दिली.

होम्स बोलला, “वॉटसन, आता आज सकाळी आपल्याला दोन पुरावे मिळाले. एक म्हणजे पाल्मरचे टायर असलेली सायकल आणि दुसरी म्हणजे जोड लावलेली डनलॉपची सायकल. आपण त्याच्या तपासाला सुरवात करण्यापूर्वी, आपल्याला काय काय माहिती झाले आहे, त्याचा आढावा घेऊ. महत्वाचे काय आहे आणि अचानक काय झाले आहे, ते वेगळे करू.”

पहील्या प्रथम, मी तुला सांगतो की मुलगा नक्की त्याच्या स्वतःच्या इच्छेने बाहेर पडला. तो त्याच्या खोलीच्या खिडकीतून उतरला. एकटा किंवा कुणाबरोबर तरी बाहेर पडला. एवढे नक्की.”

मी मान डोलवली.

“ठीक आहे. आता आपण दुर्दैवी जर्मन शिक्षकाकडे वळू. मुलगा पळाला तेव्हा पूर्ण कपडे केलेला होता. त्यामुळे त्याला पुढे काय करायचे ते माहिती असणार. पण जर्मन शिक्षक मोजे न घालता गेला, त्याअर्थी अगदी घाईघाईने गेला.”

“नक्की.”

“तो का गेला? कारण त्यांच्या झोपायच्या खोलीतून त्यांने मुलाला पळून जातांना बघितले. त्याला समजावून परत आणण्याच्या इराद्याने तो गेला. त्यांने त्याची सायकल काढली आणि त्याला गाठतांना स्वतःचे मरण ओढवून घेतले.”

“असेच झाले असणार.”

आता मी नकोशा भागाकडे वळतो. मुलाच्या मागे पळतांना कोणीही सहजपणे पळून त्याला पकडण्याचा प्रयत्न करतो. तो मुलाला गाठेल असे त्याला वाटत होते. पण जर्मन शिक्षकाने तसे केले नाही. त्याने सायकल वळवली. तो हुशार सायकलस्वार असल्याचे मला सांगितले गेले होते. त्या मुलाला पळून जाण्याचे झटपट मार्ग माहिती असल्याचे त्याला दिसल्याने त्याने हे केले.”

“दुसरी सायकल असणार.”

“आपली गोष्ट पुढे चालू ठेऊ. शाळेपासून पाच मैलांवर त्याचे मरण ओढवते -- गोळीने नव्हे, तुला सांगतो, ती कदाचित त्या मुलानेही मारलेली असू शकेल. पण रानटी, दणकट हाताचा तडाखा मारला गेला. त्यामुळे असे वाटते की मुलाबरोबर कुणीतरी असणार. झटपट पलायनाचा बेत असणार. कारण जर्मन शिक्षकासारख्या सायकलपटूने पाच मैलांचे अंतर कापून त्यांना गाठले असणार. त्या दुःखांतिकेच्या जागेची पहाणी आपण केल्यावर आपल्याला काय सापडले? काही गाईगुरांच्या खुरांचे ठसे, अजून काहीच नाही. तिथपासून पन्नास यार्डांवर कुठलाही रस्ता नसल्याची, मी तिथे हिंडून खात्री केली. तिथे मनुष्याच्या काही पाऊलखुणा नव्हत्या. प्रत्यक्ष खुनाशी दुसऱ्या सायकलस्वाराचा काही संबंध नसू शकेल.”

मी ओरडलो, “होम्स, हे अशक्य आहे.”

तो म्हणाला, “वा! वा! सर्वात चाणाक्ष शेरा! हे अशक्य आहे असे मी म्हणालो. त्यामुळे, कुठेतरी गफलत केली असली पाहीजे. तरी तुला ते समजले. तू यातली चूक दाखवू शकतोस का?”

“तो पडला तेव्हा त्याची कवटी मोडली नसणार, नाही का?”

“दलदलीत का, वॉटसन?”

इथे माझ्या चाणाक्षपणाची हद्द झाली.”

“आपण काही फार वाईट समस्या सोडवल्या आहेत. निदान आपल्याकडे बरीच माहिती गोळा झाली आहे. पण त्याचा योग्य उपयोग आपल्याला करता आला पाहीजे. चल, आता पाल्मरने केलेली दमणूक बास झाली. पॅच लावलेली डनलॉपची सायकल आपल्याला काय सांगते आहे, ते बघू.”

आम्ही दुसरी वाट पकडून चालू लागलो. थोडे अंतर जातो तर माळरानातील गवत माजलेल्या भागाने वळण घेतले. पाणी मागे राहीले. अजून कुठल्या वाटांकडून मदतीची काही आशा दिसत नव्हती. डनलॉप टायरच्या शेवटच्या खुणा आम्हाला जिथे दिसल्या, ती वाट बहुधा होल्डरनीज हॉलकडे जात होती. त्याचे उंच मनोरे आम्हाला आमच्या डाव्या बाजूला काही मैलांवर दिसत होते. समोर खालच्या बाजूला करड्या रंगाचे गाव व चेस्टरफिल्डचा उंच रस्ता दिसत होता. दारावर झुंजणाऱ्या कोंबड्याची खूण असलेल्या, तिथे जाऊ नये असे वाटणाऱ्या, बेकार घाणेरड्या खानावळीवरून जातांना, अचानक होम्स पडू लागला. म्हणून त्याने माझ्या खांद्याला धरले. त्याच्या पायात घोट्याजवळ जोरदार वाम आल्याने तो हवालदील झाला होता. मोठ्या प्रयासाने तो दारापर्यंत चालत गेला. तिथे एक काळा, वयस्क माणूस पाय दुमडून पाइप ओढत बसला होता.

होम्स म्हणाला, “मिस्टर रेबेन हेज, तू कसा आहेस?”

“तू कोण आहेस? तुला माझे नाव कसे माहिती?” त्याच्या लबाड, संशयास्पद डोळयांतून कटाक्ष टाकत तो गावरान मनुष्य उत्तरला.

“तुझ्या डोक्यावरील फलकावर ते लिहिले आहे. त्याच्या स्वतःच्या घरात, मालकाला ओळखणे सोपे आहे. मला वाटते तुझ्या तबेल्यात टांगा नसावा.”

“नाही. माझ्याकडे नाही.”

“मला आता एक पाऊलही टाकवत नाही.’

“मग नको टाकूस.”

“मला चालता येत नाही आहे.”

“मग, उड्या मार.”

मिस्टर रेबेन हेज फटकळ दिसत होता. पण होम्सने ते विनोदाने घेतले.

तो म्हणाला, “अरे माणसा, हे बघ, मी खरच चमत्कारिक रीत्या फसलो आहे. मला तर काही सुचत नाही.”

“मलाही.”

ही गोष्ट फार महत्वाची आहे. तू मला सायकल दिलीस, तर मी तुला एक नाणे देईन.’

त्या मालकाने कान टवकारले.

“तुम्हाला कुठे जायचे आहे?

“होल्डरनीज हॉलकडे”

चिखलाचे डाग पडलेल्या कपड्यांकडे विरोधभासात्मक दृष्टीने बघत तो मालक बोलला, “मला वाटते, उमरावांचे मित्र का?”

होम्स भलेपणाने हसला.

“तसेही, आम्हाला बघून त्यांना आनंद होईल.”

“का?”

“कारण आम्ही त्याचा हरवलेल्या मुलाबद्दलची बातमी घेऊन चाललो आहोत.’

“तो मालक सावरून बसला.

“काय, तुम्ही त्याच्या मागावर होतात?”

“तो लिव्हरपूलला असल्याचे आम्ही ऐकले. बहुतेक तासाभरात त्याला आणतील.”

दाढी न केलेल्या जाडजूड चेहरा झरझर बदलला. त्याने आनंदीपणे मित्रत्वाचा आव आणत म्हटले, “मला चार लोकांसारखे उमरावांना शुभेच्छा द्यायचे फारसे कारण नाही. एके काळी मी त्यांच्या टांग्यांचा प्रमुख होतो आणि तेव्हा त्यांनी मला दुष्टपणे व फार वाईट पद्धतीने वागवले. एका मका विकणाऱ्या माणसाच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन त्यांनी मला वाईट चारित्र्याचा म्हणून हाकलून दिले. पण त्यांचा लहान मुलगा लिव्हरपूलला असल्याचे ऐकून मला आनंद झाला. मी तुम्हाला होल्डरनीज हॉलकडे जाण्यासाठी मदत करेन.”

होम्स म्हणाला, “आभारी आहे. आधी आम्हाला काहीतरी खायचे आहे. मग तू सायकल आण.”

“माझ्याकडे सायकल नाही.”

होम्सने एक पौंड किमतीचे नाणे काढले.

“माझ्याकडे सायकल नाही. पण मी हॉलपर्यंत तुम्हाला दोन घोडे देऊ शकतो.”

होम्स बोलला, “चालेल. खाऊन झाल्यावर आपण याबद्दल बोलू.”

जेव्हा आम्ही दोघेच दगडी भटारखान्यात उरलो, तेव्हा आश्चर्यकारक रीत्या दुखावलेला पाय बरा झाला. जवळजवळ रात्र व्हायला आली होती आणि आम्ही सकाळपासून काहीही खाल्ले नव्हते. त्यामुळे आम्ही जेवलो. होम्स विचारात बुडून गेला होता. एकदोनदा तो खिडकीजवळ चालत गेला आणि गंभीरपणे बाहेर निरखून बघत राहीला. ती बाहेर अत्यंत घाणेरड्या अंगणात उघडत होती. लांबच्या एका कोपऱ्यात लोहाराचे दुकान होते. तिथे एक घाणेरडा मुलगा काम करत होता. दुसऱ्या बाजूला तबेले होते. या आमची दमणूक करणाऱ्या मोहिमेनंतर होम्स शांत बसला होता, पण अचानकपणे तो खुर्चीतून ओरडत उठला.

“अरे देवा वॉटसन, मला वाटते मला ते सापडले. हो. हो. ते तसेच असणार. वॉटसन, तुला आजचे माझे गाईंच्या खुरांच्या खुणा बघणे, आठवते आहे का?”

“हो. खूपच.’

“कुठे?’

“म्हणजे काय? सगळीकडे. त्या पाणथळ जागी होत्या. रस्त्यांवर होत्या आणि बिचारा हेडेगर जिथे मेला, तिथे पण होत्या.”

“बरोबर. ठीक आहे. वॉटसन, आता तुला माळरानावर किती गाई दिसल्या?”

मला तर एकही दिसल्याचे आठवत नाही.”

“वॉटसन, हे विचित्र आहे. आपण आपल्या वाटेवर खुरांच्या खुणा पाहील्या पण एकही गाय नाही. खूपच विचित्र, नाही का वॉटसन?”

“हो. विचित्र आहे खरे.”

“वॉटसन, आता तुझे मन थोड्या प्रयत्नाने भूतकाळात घेऊन जा. तुला रस्त्यावरील त्या खुणा डोळ्यासमोर दिसतात का?”

“हो. दिसतात.”

होम्सने पावाचे तुकडे अशा प्रकारे लाऊन : : : : म्हटले, “काही वेळा त्या अशा दिसत असल्याचे तुला आठवते आहे का?” -- मग त्याने ते वेगळ्या प्रकारे लावले :. :. :. व म्हणाला, “आणि कधीकधी अशा प्रकारे दिसत असल्याचे तुला आठवते आहे का?”

“नाही.”

“पण मला आठवते आहे. शपथपूर्वक सांगतो. तरी पण आपण परत तिथे जाऊन बघू शकतो. काय आंधळ्यासारखा मी वागलो आणि निष्कर्ष काढू शकलो नाही!

“आणि तुझा निष्कर्ष काय आहे?”

“ती एक विशिष्ट प्रकारची, चालणारी, चरणारी व धावणारी गाय आहे. देवा रे! वॉटसन, इतके युक्तीबाज काही करणे, हे खानावळ चालवणाऱ्याचे डोके नाही. तो मुलगा सोडून, पाण्याच्या कडेचे लोक हुशार दिसतात. आपण बाहेर पडून आपल्याला काय दिसते, ते बघू.”

तेथील मोडकळीला आलेल्या तबेल्यात दोन खरखरीत केसांचे घाणेरडे घोडे होते. होम्सने त्यातील एकाचे मागचे पाय उंच केले व जोरजोरात हसू लागला.

जुनेच बूट, पण नवीन प्रकारे सुधारलेले -- जुनेच बूट. ही अत्यंत भन्नाट केस आहे. आपण त्या पाणथळ जागी जाऊ.”

आमची दखल न घेता मुलाचे काम सुरूच होते. तिथे विखरून पडलेल्या लाकूड व लोखंडाच्या बारीक तुकड्यांवर होम्सची नजर भिरभिरत होती. अचानक आमच्या मागे आम्हला पदरव ऐकू आला. तो मालक होता. त्याचे रानटी डोळे, चढलेल्या भुवया व काळेकुट्ट शरीर, अनावर रागाने थरथरत होते. त्याच्या हातात एक धातूची काठी होती. तो इतक्या धोकादायक तऱ्हेने पुढे आला, की मला माझ्या खिशात पिस्तुल असल्याचे वेळेवर आठवल्याने आनंद झाला.

तो ओरडला, “तुम्ही अधम हेर! तुम्ही इथे काय करता आहात?”

होम्स थंडपणे म्हणाला, “का मिस्टर रेबेन हेज? तुम्हाला आम्ही काही शोधून काढू म्हणून भीती वाटते आहे?”

त्या माणसाने स्वतःला खुनशी आविर्भावातून सावरले आणि त्याचा कडक चेहरा त्याच्या खोट्या हास्यात बदलला. पण तो खुनशी रागापेक्षा जास्त भयंकर वाटत होता.

तो बोलला, “माझ्या या जागेत तुम्हाला जो काही शोध घ्यायचा आहे तो खुशाल घ्या. पण मिस्टर, असे बघा, मी इथे असतांना माझ्या जागेकडे लोकांनी बोट दाखवले तरी, मी त्याची पर्वा करत नाही. पण तुम्ही जितक्या लवकर इथून बाहेर पडाल, तितके मला बरे वाटेल.”

होम्स म्हणाला, “ठीक आहे मिस्टर हेज. आम्ही जातो. आम्ही तुमच्या घोड्यांकडे बघत होतो. पण मला वाटते, मी चालू पडावे. होल्डरनीज हॉल काही फार लांब नाही.”

“दोन मैलांपेक्षा काही जास्त नाही. हा डावीकडचा रस्ता घ्या.” आम्ही त्याच्या जागेतून बाहेर पडेपर्यंत, तो आमच्याकडे वटारलेल्या डोळ्यांनी बघत होता.

आम्ही त्या रस्त्याने फार लांब गेलो नसू तर एका वळणावर, त्या बेकार मालकाच्या दृष्टीआड गेल्याक्षणी होम्स थांबला.

“आपण त्या खानावळीत, छान उबेत होतो. आता पाऊलागणिक मला जास्त जास्त थंडी वाजते आहे. नाही. नाही. मी ती सोडू शकत नाही.”

मी म्हणालो, “मला पटते आहे. या रेबेन हेजला सगळेच माहिती असावे. इतका स्वाभिमानी खलनायक मी पाहीला नव्हता.”

“ओहो, त्याने तुझ्यावर अशा प्रकारे छाप पाडली, हो ना? तिथे घोडे आहेत. पाणथळ जागा आहे. हो. झुंजीच्या कोंबड्याची खूण असलेली अशी ती एक रुचीपूर्ण जागा आहे. मला वाटते आपण त्याकडे संशयी दृष्टीने न बघता वेगळ्या पद्धतीने पाहिले पाहीजे.”

लांबलचक डोंगराचा उताराचा भाग, त्यावर विखुरलेले वेड्यावाकड्या आकाराचे चुनखडीचे दगड असे दृष्य आमच्यामागे पसरले होते. आम्ही रस्त्यापासून वळून, टेकाडावर चढू लागलो. होल्डरनीज हॉलच्या दिशेने बघतांना, मला एक सायकलस्वार जोरात येतांना दिसला.

माझ्या खांद्यावर हाताने दाबत, होम्स ओरडला, “वॉटसन, थांब.” आम्ही त्याला पहातो न पाहतो, तोच आम्हाला ओलांडून तो नाहीसा झाला. आमच्या दोघांच्या मध्ये धुळीचा लोट उठला. मला एक रागावलेला, अशक्त चेहरा क्षणभर दिसला -- तोंड उघडे, विस्फारलेले डोळे व प्रत्येक बाबतीत अतिशय भीतीदायक, असा चेहरा. आदल्या रात्री आम्ही पाहिलेल्या व्यवस्थित जेम्स वाइल्डरचे जणू विचित्र प्रतिबिंब असलेला!

होम्स किंचाळला, “उमरावांचा सचिव! चल वॉटसन, तो काय करतो, ते आपण बघू.”

आम्ही धडपडत वेगाने खडकाखडकांमधून फिरलो. काही वेळाने आम्ही खानावळीच्या पुढच्या दाराशी आलो. त्याच्या बाजूला असलेल्या भिंतीला टेकून वाइल्डरची सायकल उभी होती. तिथे कुणाची हालचाल दिसली नाही.किंवा खिडकीतून कुणाचे चेहरे दिसले नाहीत. सूर्य मावळल्यावर हळूहळू होल्डरनीज हॉलच्या मनोऱ्यांपासून खाली संधीप्रकाश ओघळला. पुसट उजेडात आम्हाला खानावळीच्या तबेल्यात दोन बाजूला दिवे असलेला टांगा दिसला. थोड्याच वेळात खुरांचा व टांगा रस्त्यावर आल्याचा आवाज ऐकू आला. चेस्टरफिल्डच्या दिशेने तो भरधाव गेला.

होंस कुजबुजला, “वॉटसन, याचा अर्थ काय?”

“तो जणू काही उडत गेला.”

“आपल्याला दिसले त्याप्रमाणे टांग्यात एकच माणूस होता. तो नक्कीच जेम्स वाइल्डर नव्हता कारण तो तर दारात उभा आहे.”

अंधारातून लाल उजेडाचा झोत आला. त्यात मध्यभागी, डोके पुढे झुकलेली व अंधारात निखून बघणारी सचिवाची काळी आकृती दिसत होती. तो कुणाची तरी वाट बघत असल्याचे लक्षात येत होते. शेवटी रस्त्यावर पाय वाजले व उजेडात एक आकृती दिसली. दार बंद झाले व परत एकदा मिट्ट काळोख झाला. पाच मिनिटांनी पहिल्या मजल्यावरील खोलीत दिवा लावला गेला.

होम्स बोलला, “झुंजीचा कोंबडा खानावळीत काही नवलपूर्ण गोष्टी घडतांना दिसत आहेत.”

“बार दुसऱ्या बाजूला आहे.”

“असेल. हे कुणी खाजगी पाहुणे दिसतात. अशा रात्रीच्या वेळी त्या गुहेत मिस्टर जेम्स वाइल्डर काय करतो आहे आणि त्याला भेटायला येणारा मित्र कोण आहे?

वॉटसन, इकडे ये. आपण खरे तर धोका पत्करून हे सर्व थोडे जवळून तपासायला हवे.”

आम्ही दोघे रस्त्यावर उतरलो आणि खानावळीच्या दरवाजाच्या पलीकडे लपलो. अजूनही भिंतीशी सायकल टेकवून ठेवलेली होती. होम्सने काडी ओढून मागील चाकाशी नेली. जोड लावलेल्या डनलॉपच्या टायरवर उजेड पडला, तेव्हा मी त्याला गालातल्या गालात हसतांना पाहीले. आमच्या वर उजेडाची खिडकी होती.

“मला त्या खिडकीतून डोकावून बघितले पाहीजे. वॉटसन, तू जे भिंतीला टेकून वाकून उभा राहिलास, तर मला ते जमेल, असे वाटते.”

क्षणार्धाने त्याचे पाय माझ्या खांद्यावर होते. पण तो लगेच खाली उतरला.

तो म्हणाला, “चल माझ्या मित्रा, आपला कामाचा दिवस फार लांबलचक दिसतो आहे. मला वाटते जेवढी माहिती गोळा करायला हवी, तेवढी आपण केली आहे. इथून शाळा लांब आहे. पण आपण जितक्या लवकर तिकडे जाऊ तेवढे बरे.”

दमलेल्या त्याने माळरानावर हळू चालतांना व शाळेत शिरल्यावरही, त्याचे तोंड क्वचितच उघडले. पण तो काही तारा पाठवण्यासाठी मॅक्लेटॉन स्टेशनकडे गेलेला दिसला. त्याच्याकडील शिक्षकाच्या मरणाने अस्वस्थ झालेल्या डॉ हक्सटेबलचे सांत्वन करतांना रात्री उशिरा मी त्याला पाहीले आणि नंतर जेव्हा तो खोलीत शिरला, तेव्हा सकाळइतकाच उत्साही व तरतरीत दिसत होता. तो म्हणाला, “माझ्या मित्रा, सर्व काही ठीक झाले. मी नक्की सांगतो की उद्या संध्याकाळच्या आत गूढ उकललेले असेल.”

दुसऱ्या दिवशी अकरा वाजता, मी व माझा मित्र होल्डरनीज हॉलच्या प्रसिध्द यू रस्त्यावरून फिरत होतो. आम्हाला भल्यामोठ्या राणी एलिझाबेथच्या काळातील कमानी खालून उमरावांच्या अभ्यासिकेकडे नेण्यात आले. तिथे नम्र आणि अदबशीर मिस्टर जेम्स वाइल्डर होता. पण त्याच्या अपराधी डोळ्यात व थरथरणाऱ्या शरीरात काल रात्रीची रानटी भीती तरळत होती.

“तुम्ही उमरावांना भेटायला आलात का? पण माफ करा. त्यांची तब्येत बरी नाही. दुःखद बातमीने ते फार खचून गेले आहेत. काल दुपारी आम्हाला तुमचा शोध सांगणारी, डॉ हक्सटेबल यांची तार मिळाली.

“मिस्टर वाइल्डर, आम्हाला उमरावांना भेटायचेच आहे.”

“पण ते त्यांच्या खोलीत आहेत.”

“मग मला तिथे जावे लागेल.”

“मला वाटते, ते झोपले आहेत.”

“मी त्यांना तिथे भेटतो.”

होम्सच्या थंड आणि विरोध करण्यास कठीण अशा आविर्भावाने मिस्टर वाइल्डर समजून चुकला की त्यांच्याबरोबर वाद घालणे, निरर्थक आहे.

“ठीक आहे, मिस्टर होम्स, मी त्यांना सांगतो, की तुम्ही इथे आला आहात.”

एक तासाने थोर उमराव आले. त्यांचा चेहरा नेहमीपेक्षा सुकलेला दिसत होता. खांदे झुकलेले होते आणि काल आम्ही पाहीले, त्यापेक्षा ते म्हातारे दिसत होते. त्यांनी आम्हाला खानदानीपणे अभिवादन केले. त्यांची लाल दाढी टेबलाला टेकवत ते बसले.

ते म्हणाले, “कसे काय मिस्टर होम्स?”

पण माझ्या मित्राचे डोळे त्याच्या मालकाशेजारी उभे असलेल्या सचिवाकडे स्थिरपणे बघत होते.

“मला वाटते, मिस्टर वाइल्डर इथून गेले, तर मी तुमच्याशी जास्त मोकळेपणे बोलू शकेन.”

त्या मनुष्याचा चेहरा झरकन उतरला व तो दूषित नजरेने होम्सकडे पाहू लागला.

“जर उमरावांची तशी इच्छा असेल तर ---- “

“हो. हो. तू गेलास तर बरे. मिस्टर होम्स, आता तुम्हाला जे काही सांगायचे आहे, ते सांगा.”

जाणाऱ्या सचिवाने दार लावेपर्यंत माझा मित्र थांबला.

“महाशय असे आहे, की माझा मित्र डॉ वॉटसन आणि मला डॉ हक्सटेबलनी असे सांगितले आहे की या केससाठी बक्षीस ठेवले आहे. पण ते तुमच्याकडून ऐकायला मला आवडेल.”

नक्कीच, मिस्टर होम्स.”

“जर माझी माहिती बरोबर असेल, तर पाच हजार पौंड इतकी रक्कम तुम्ही तुमच्या मुलाला सापडवून देणाऱ्याला भेट देणार आहात.”

“बरोबर.”

“आणि ज्या माणसाने त्याला पकडून त्याच्या ताब्यात ठेवले आहे, त्याचे नाव सांगितल्यास एक हजार पौंड देणार.”

“अगदी बरोबर.”

“फक्त ज्याने त्याला पकडून ठेवले आहे तोच नव्हे, तर त्या मुलाला अशा अवस्थेला पोचवण्यासाठी गुप्त बेत आखणाऱ्यांचे नावदेखील त्यात हवे, नाही का?”

उमराव अधीरपणे ओरडला, “हो. नक्कीच. मिस्टर शेरलॉक होम्स, जर तुम्ही तुमचे काम चांगले केले, तर तुम्हाला आमच्याकडून दिल्या जाणाऱ्या वागणूकीबद्दल तक्रारीचे काही कारण रहाणार नाही.”

मला नवल वाटेल अशा तऱ्हेने माझ्या काटकसरी मित्राने त्याचे बारीक हात मोठ्या उत्साहाने चोळले.

तो म्हणाला, “मी समजतो की या टेबलावर तुमचे चेकचे पुस्तक पडलेले आहे. जर तुम्ही सहा हजाराचा चेक सही करून, फाडून मला दिला, तर मला बरे वाटेल. ऑक्सफर्ड रस्त्याच्या कॅपिटल बँकेत माझे खाते आहे.

उमराव त्यांच्या खुर्चीत कडकपणे ताठ बसून नजर न हलवता माझ्या मित्राकडे बघत होते.

“हा काय विनोद आहे, मिस्टर होम्स? इथे गंभीर संभाषण चालू आहे.”

“महाशय, तसे काही नाही. माझ्या आयुष्यात मी कधी इतका आग्रही नव्हतो.”

“मग तुमचे म्हणणे तरी काय आहे?”

“मी समजतो की मला माझे बक्षीस मिळाले आहे. तुमचा मुलगा कुठे आहे, हे मला माहिती आहे आणि ज्यांनी त्याला जखडून ठेवले आहे त्यातील काही, निदान एकजण मला माहिती आहे.”

भीतीने पांढऱ्या पडलेल्या उमरावांच्या चेहऱ्यावर दाढी जास्तच लाल दिसत होती.

श्वास रोधून त्यांनी विचारले, “तो कुठे आहे?”

“इथून साधारण दोन मैलांवर असलेल्या झुंजणाऱ्या कोंबड्यांच्या खानावळीत तो आहे किंवा काल रात्री होता.”

उमराव त्याच्या खुर्चीत मागे पडला.

“आणि तुम्ही कोणाला दोष देता?”

शेरलॉक होम्सचे उत्तर नवलपूर्ण रीत्या उल्लेखनीय होते. तो हळूच पुढे सरकला व उमरावांच्या खांद्याला स्पर्श करून म्हणाला, “मी तुम्हाला दोष देतो. महाशय, आणि आता मी तुम्हाला चेक देण्यासाठी त्रास देणार.”

अथांग पाण्यात बुडणाऱ्या माणसाप्रमाणे उमराव त्याच्या टोकदारपणे वाढलेल्या नखांच्या हातांनी धाऊन आला. नंतर असामान्यपणे हुकुमशाही गाजवणाऱ्या थाटात तो खाली बसला व त्याचे तोंड त्याच्या हातात लपवले.

डोके वर न करता शेवटी तो बोलला, “तुम्हाला कितपत माहिती आहे?”

“काल रात्री मी तुम्हाला दोघांना एकत्र बघितले.”

“तुमचा मित्र सोडून आणि कुणाला हे माहिती आहे का?”

“मी कुणाला याबद्दल काही बोललो नाही.”

उमरावाने त्याच्या थरथरत्या हातात पेन घेतले व त्याचे चेकचे पुस्तक उघडले.

“मिस्टर होम्स, मी माझा शब्द पाळतो. मी चेक लिहितो आहे पण तुम्हाला मिळालेली माहिती ऐकून, मला बरे वाटले नाही. जेव्हा पहिल्यांदा मी ही पैशांची घोषणा केली, तेव्हा गोष्टी कशा वळण घेणार आहेत हे मला माहिती नव्हते. पण मिस्टर होम्स, तुम्ही आणि तुमचा मित्र, आब राखणारी माणसे आहात, नाही का?”

“महाशय, तुम्हाला काय म्हणायचे आहे, मी समजलो नाही.”

मी सरळपणे सांगतो. मिस्टर होम्स, जर फक्त तुम्हाला दोघांनाच या घटनेबद्दल माहिती असेल, तर बाहेर कुठे हे पसरायची शक्यता नाही. मला वाटते मी तुम्हाला बारा हजार पौंड देणे लागतो. बरोबर?’

होम्सने हसून मान हलवली.

“महाशय, हे प्रकरण एवढ्या सहजपणे गुंडाळता येणार नाही. त्या शाळेच्या शिक्षकाचे मरण ओढवले, ते लक्षात घ्यायला हवे.”

“पण जेम्सला त्यातील काहीच माहिती नाही. तुम्ही त्याबद्दल त्याला जबाबदार धरु शकणार नाही. हे त्याने कामावर ठेवलेल्या हलकटाचे काम आहे.”

महाशय, मी अशा दृष्टीने बघतो की जेव्हा एखादा मनुष्य एखाद्या गुन्ह्याबद्दल बोंबाबोंब करतो, तेव्हा तो त्यातून उद्भवणाऱ्या कुठल्याही दुसऱ्या गुन्ह्यासाठी नैतिक दृष्ट्या जबाबदार ठरतो”

“नैतिक दृष्ट्या, मिस्टर होम्स. तुमचे अगदी खरे आहे. पण कायद्याच्या दृष्टीने नव्हे. तो हजर नसलेल्या जागेत घडलेल्या गुन्ह्यासाठी त्या माणसाला तुमच्याप्रमाणेच कितीही घृणा असली तरी खुनी म्हणता येणार नाही. ज्या क्षणी त्याने याबद्दल ऐकले, तेव्हा त्याने माझ्याजवळ मनापासून माफी मागितली. इतका तो भीती आणि पश्चात्तापाने पोळलेला होता. त्याने खुन्याच्या बंदोबस्तासाठी तासाभराचा सुद्ध अवधी फुकट घालवला नाही. ओहो, मिस्टर होम्स, तुम्ही त्याला

वाचवले पाहिजे. मी सांगतो, तुम्ही त्याला वाचवले पाहीजे." उमराव हुकमतीचे शेवटचे शब्द बोलला आणि आक्रमक चेहऱ्याने व हाताच्या मुठी वळलेले हात हवेत उडवून खोलीत फेऱ्या मारू लागला. शेवटी शांत होऊन तो खाली बसला. तो म्हणाला, "दुसऱ्या कुणाशी याबद्दल बोलण्यापूर्वी तुम्ही इथे आलात, याबद्दल मी तुमचे कौतुक करतो. आपण निदान हे नकोसे वाटणारे प्रकरण कसे कमीत कमी त्रासदायक करता येईल, याचा विचार करू शकतो." होम्स म्हणाल, "तेच तर! महाशय मला वाटते, हे आपल्यात कमालीचा मोकळेपणा असेल तरच शक्य आहे. माझ्या कुवतीप्रमाणे मी तुम्हाला जास्तीत जास्त मदत करू शकतो. पण असे करण्यासाठी मला मुळापासून हे प्रकरण समजले पाहीजे. मिस्टर जेम्स खुनी नसल्याबद्दल तुमचा रोख आहे, हे माझ्या लक्षात आले आहे."

"नाही. तो खुनी नाही. खुनी पसार झालेला आहे."

शेरलॉक होम्स हलकेसे हसू हसला.

"तुम्ही माझी जी काही थोडीफार किर्ती ऐकली असेल किंवा तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही, की मला डावलणे तितके सोपे नाही. माझ्या माहितीप्रमाणे, चेस्टरफिल्डला काल रात्री अकरा वाजता रेबेन हेजला अटक झाली असेल. आज सकाळी मी शाळा सोडण्यापूर्वी, मला स्थानिक पोलिसांची तार आलेली आहे."

उमराव खुर्चीत मागे टेकून बसला व माझ्या मित्राकडे आश्चर्याने पाहू लागला व बोलला, "तुम्ही अमानवी रीत्या शक्तिमान आहात. रेबेन हेजला अटक झाली तर? जर हे जेम्सच्या भवितव्यावर घाला घालणार नसेल, तर मला हे ऐकून आनंद झाला."

"तुमचा सचिव?'

"नाही सर, माझा मुलगा."

आता आश्चर्यचकित होण्याची पाळी होम्सची होती.

“महाशय, मला हे कबूल केले पाहिजे, की ही गोष्ट माझ्यासाठी पूर्णपणे नवीन आहे. मला तुम्ही अजून स्पष्टीकरण द्यावे.”

“मी तुमच्यापासून काहीही लपवणार नाही. मी कबूल करतो की या जेम्सचा मूर्खपणा आणि आकस यामुळे आमच्यावर ओढवलेली निराशादायक परिस्थिती मला कितीही दुःखदायक वाटत असली, तरीही आपल्यात पूर्ण मोकळेपणा असणे सर्वात चांगले आहे. मिस्टर होम्स, जेव्हा मी तरुण होतो तेव्हा, आयुष्यात एकदाच होते असे प्रेम मी केले. मी त्या बाईला लग्नाची मागणी घातली. पण तिने तिचे व्यवसायिक आयुष्य कदाचित बरबाद होईल, म्हणून नकार दिला. ती जगली असती तर मी इतर कोणाशीही लग्न केले नसते. ती या एका मुलाला जन्म देऊन वारली. तिच्या इच्छेखातर, मी त्याचा सांभाळ करून त्याला वाढवले. मी जगाला त्याचा पिता असल्याचे दाखवू शकत नव्हतो. पण मी त्याला उत्तम शिक्षण दिले आणि मोठा झाल्यावर त्याला माझ्या खाजगी सचिवाची जागा दिली. त्याने माझे गुपित राखले. त्याचा माझ्यावर जो हक्क होता, तो त्याने बजावला. माझ्या किर्तीला काळीमा फासेल, असे प्रकरण त्याने उघडे करायच्या शक्यतेने मी त्याला घाबरून होतो. त्याचे आस्तित्व हे माझ्या दुःखी लग्नाचे, काही अंशी कारण होते. शिवाय, तो माझ्या मुलाचा, माझ्या कायदेशीर वारसाचा तिरस्कार करायचा. तुम्ही मला विचाराल, की अशा परिस्थितीत मी त्याला माझ्या घरात का ठेवले. त्याचे उत्तर असे आहे, की मला त्याच्यामध्ये त्याच्या आईचा चेहरा दिसायचा. तिच्यावरच्या माझ्या निरातिशय प्रेमामुळे, माझ्या छळाला काही अंतच नव्हता. तिचे सगळे सुंदर विभ्रम त्याच्यात उतरले होते आणि ते बघून, मी भूतकाळातील आठवणींमध्ये रमायचो. मी त्याला लांब पाठवू शकत नव्हतो. पण मला अशी फार भीती वाटे की तो आर्थरच्या, म्हणजे उमराव साल्टायरच्या खोड्या काढेल व त्याला छळेल. म्हणून मी सुरक्षेच्या कारणाने, आर्थरला डॉ हक्सटेबल यांच्या निवासी शाळेत दाखल केले.

जेम्स या रेबेन हेजच्या संपर्कात आला. कारण रेबेन हेज माझा भाडेकरू होता व त्याला भाडेकरू म्हणून ठेवायचे काम जेम्सने केले होते. तो सुरवातीपासूनच हलकट होता. पण काही वेगळयाच बाबींमुळे जेम्स त्याचा फार जवळचा मित्र बनला. जेम्सला अशा लोकांच्या संगतीचे फार आकर्षण होते. जेव्हा जेम्सने साल्टायरचे अपहरण करायचे ठरवले, तेव्हा त्याने या माणसाची मदत घेतली. तुम्हाला आठवत असेल की त्या शेवटच्या दिवशी मी आर्थरला पत्र लिहिले. पण जेम्सने ते फोडले व त्यात एक चिठ्ठी टाकली की आर्थरने शाळेजवळ असलेल्या रॅग्ड शॉ नावाच्या लहानशा जंगलात त्याला भेटावे. त्याने ती चिठ्ठी आर्थरच्या आईच्या नावाने लिहिली. त्यामुळे तो मुलगा तिथे आला. त्या संध्याकाळी जेम्सने सायकल चालवली -- त्याने मला जे सांगितले, ते मी तुम्हाला सांगतो आहे -- आणि त्याने जंगलात भेटलेल्या आर्थरला सांगितले, की त्याची आई त्याला भेटण्यासाठी व्याकुळ झाली आहे. ती माळरानात त्याची वाट बघते आहे. जर तो मध्यरात्री जंगलात आला तर एक घोडेवाला माणूस त्याची वाट बघत असेल व तो त्याला त्याच्या आईपर्यंत पोचवेल. बिचारा आर्थर सापळयात फसला. तो ठरल्याप्रमाणे जंगलात आला. त्याला घोड्यावर बसलेला रेबेन हेज दिसला. आर्थर त्याच्या घोड्यावर बसला आणि ते निघाले, असे असावे -- जरी जेम्सने हे कालच ऐकले -- त्यांचा पाठलाग केला गेला. त्या पाठलाग करणाऱ्याला हेजने काठीने बदडून काढले. त्यामुळे जखमा होऊन तो माणूस मेला. हेजने आर्थरला त्याच्या झुंजीचा कोंबडा नावाच्या खानावळीत आणले.

तिथे त्याला वरच्या मजल्यावरील एका खोलीत कोंडून ठेवले. त्याच्यावर देखरेख करायला मिसेस हेजला सांगितले. ती दयाळू बाई होती. पण पूर्णपणे तिच्या दुष्ट नवऱ्याच्या आज्ञेत होती.

“मिस्टर होम्स, तर अशी ही हकीगत आहे. काल मी तुम्हाला दोघांना प्रथम पाहीले, तेव्हा मला हे काही माहिती नव्हते. तुम्ही मला विचाराल, की हे करण्यात जेम्सचा काय हेतू होता. मी असे म्हणेन की आर्थर माझा वारस असल्याने, जेम्स त्याच्या वर वेड्यासारखा, काही विचार न करता जळत होता. त्याच्या मते माझ्या सर्व संपत्तीचा तो मालक व्हायला हवा होता. हे अशक्य

करणाऱ्या सामाजिक रुढीची त्याला चीड येई. त्याच वेळी त्याच्या मनात एक विशिष्ट उद्देश तयार झाला. त्याला वाटे, मी सामाजिक नियम तोडावेत व ते मला सहज शक्य आहे. मी इच्छापत्र करून माझी संपत्ती त्याच्या नावावर करावी, म्हणून तो माझ्याशी असा करार करायला तयार होता की अशा वेळी आर्थरची काळजी तो घेईल. त्याला पक्के ठाऊक होते, की मी कधीही आपणहोऊन त्याच्याविरुद्ध पोलिसांकडे जाणार नाही. त्याने अशा बेताची मला खात्री द्यावी, असे माझे म्हणणे होते. पण त्याने तसे केले नाही. इतक्या भरभर घटना घडत गेल्या की त्याला त्याचे बेत प्रत्यक्षात आणायला वेळच मिळाला नाही.

जर्मन शिक्षक हेडेगर याचा मृत्यू तुम्ही शोधून काढल्यामुळे, त्याचा दुष्ट बेत तडीस गेला नाही. या बातमीने तो भीतीने गोठून गेला. आम्ही या अभ्यासिकेत बसलो असतांना, आम्हाला काल ती बातमी समजली. डॉ हक्सटेबलने आम्हाला तार पाठवली. जेम्स दुःखाने व रागाने इतका बेभान झाला. त्यामुळे मला त्याच्याबद्दल कधी न वाटणारा संशय खात्रीत बदलला. मी त्याला त्याच्या कृत्याचा जाब विचारला. त्याने जे व जसे घडले ते सर्व मला सांगितले. नंतर त्याने मला अजून तीन दिवस ते गुप्त ठेवण्याची विनंती केली, जेणेकरून तो खुन्याला मदत करेल व त्याचा दुर्दैवी गुन्हा काही युक्तीने दाबून, स्वतःचा बचाव करू शकेल. मी त्याच्या विनवणीला संमती दिली -- जे मी नेहमीच करत असे. आणि मग लगेच जेम्स रेबेन हेजला तंबी द्यायला व पळून जायला मदत करायला झुंजीचा कोंबडा खानावळीकडे गेला. मी तिथे दिवसा उजेडी जाऊ शकत नव्हतो, पण रात्र झाल्याबरोबर, मी माझ्या लाडक्या आर्थरला भेटायला तिथे गेलो. तो सुखरूप व खुशाल होता. पण त्याने बघितलेल्या खुनाच्या अघोरी प्रकाराने, भयंकर घाबरला होता. जेम्सला दिलेले वचन पाळण्यासाठी मी मुकाट्याने त्याला तीन दिवस, मिसेस हेजच्या देखरेखीखाली ठेवायला, माझ्या इच्छेविरुद्ध परवानगी दिली. हे सरळ दिसत होते, की कुणी खून केला हे सांगितल्याशिवाय, मृत मनुष्य तिथे आहे हे पोलिसांना सांगणे शक्य नव्हते. माझ्या दुर्दैवी जेम्सची वाट लावूनच खुन्याला शिक्षा करणे शक्य दिसत होते. तुम्ही मोकळेपणाबद्दल बोललात,

मिस्टर होम्स, आणि मी तुम्हाला जसे घडले तसे, काहीही न लपवता, सर्व काही सांगितले. तुम्ही पण मला असेच मोकळेपणे सर्व काही सांगाल का?"

होम्स बोलला, "नक्की, मी तसे करेन. महाशय, पहिल्या प्रथम मी तुम्हाला सांगतो की कायद्याच्या दृष्टीने तुम्ही स्वतःवर फार गंभीर परिस्थिती ओढवून घेतली आहे. तुम्ही गुन्हा घडण्यासाठी मदत केली आहे. तुम्ही खुन्याला पळून जायला मदत केली आहे. जेम्स वाईल्डरने त्याचे हेतू साध्य करायला जे पैसे वापरले, ते नक्की तुमच्याकडूनच दिले गेले असणार, यात मला काही शंका नाही."

उमरावाने मान डोलावली.

"हे खरच अत्यंत गंभीर प्रकरण आहे. महाशय, माझ्या मते तुमचा धाकट्या मुलाबाबतचा दृष्टीकोन अजूनच दोषपूर्ण आहे. तुम्ही त्याला त्या गुहेत तीन दिवस रहायला भाग पाडलेत."

"दिलेल्या वचनामुळे ---- "

अशा लोकांना दिलेल्या वचनाचे काय मोठेसे? तुम्ही अशी खात्री देऊ शकत नाही, की तो पुन्हा अशी दंडेली करणार नाही. तुमच्या दोषी असलेल्या मोठ्या मुलाला वाचवतांना, तुम्ही तुमच्या धाकट्या मुलाला अकारण कदाचित भलत्याच धोक्यात लटकवले होते. हे अत्यंत गैर असे कृत्य होते."

होल्डरनीजच्या उमरावाला त्याच्या स्वतःच्या साम्राज्याच्या हॉलमध्ये असे काही ऐकून घ्यायची सवय नव्हती. त्यांच्या डोक्यात रक्त उतरले. पण त्यांच्या सद्सदविवेकबुद्धीने त्यांना बोलू दिले नाही.

"मी तुम्हाला एका अटीवर मदत करेन. तुम्ही जंगलाच्या राखणदाराला फोन करा आणि मग मी त्याच्याशी बोलतो."

एकही शब्द न बोलता उमरावाने घंटी वाजवली. नोकर आत आला.

होम्स म्हणाला, "तुम्हाला ऐकून आनंद होईल की तुमचा कनिष्ठ मुलगा सापडला आहे. उमराव साल्टायर याला आणण्यासाठी आपल्या इच्छेप्रमाणे झुंजणाऱ्या कोंबड्याच्या खानावळीत गाडी जाऊन त्याला घेऊन येईल". आनंदीत झालेला नोकर अदृश्य झाला.

होम्स म्हणाला, "आता तो नोकर निघून गेल्यावर, आपला भविष्यकाळ सुरक्षित केल्यावर, आपण भूतकाळातील गुन्हेगाराच्या शिक्षेबद्दल विचार करू शकतो. मी काही नेमला गेलेला माणूस नाही. त्यामुळे जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत मी माझ्याकडची माहिती कोणाला का सांगू? हेजच्या बाबतीत मी काही बोलणार नाही. फाशीचा दोर त्याची वाट बघतो आहे. आणि त्यापासून मी त्याला वाचवू शकत नाही. तो काय करेल, ते मी सांगू शकत नाही. पण माझ्या मनात याबद्दल संशय नाही की महाशय, आपण त्याला समज द्याल की त्याने गप्प राहिलेले चांगले ठरेल. पोलिसांच्या दृष्टीकोनातून त्याने पैशांसाठी मुलाचे अपहरण केले आहे. जर त्यांना ते शोधून काढता येत नसेल, तर मी कशाला त्यांच्या मध्ये पडू? महाशय, तरीही मी तुम्हाला ताकीद देतो की तुमच्या घरात जेम्स वाईल्डरचा सततचा राबता तुम्हाला दुर्दैवाकडे नेऊ शकेल."

"मिस्टर होम्स, मला ते समजले आहे. हे आधीच ठरले आहे की तो कायमसाठी ऑस्ट्रेलियाला जाईल व तिथे त्याचे नशीब आजमावेल."

"महाशय, असे असेल, तर तुम्ही स्वतःच म्हणालात की तुमच्या वैवाहिक आयुष्यातील बेबनाव त्याच्यामुळे होता. त्यामुळे मी तुम्हाला असे सुचवेन की तुम्ही काही बदल घडवून आणा म्हणजे तुमचे तुमच्या बायकोबरोबरचे बिघडलेले संबंध परत चांगले होतील."

"ते पण मी आधीच केले आहे. मी आज सकाळीच माझ्या बायकोला पत्र लिहिले आहे."

उठत होम्स म्हणाला, "असे असेल तर आमच्या येथील लहानशा भेटीचा खूप मोठा सुखकारक निकाल लागला. अजून एका गोष्टीबद्दल मला विचारायचे आहे. या हेजने त्याच्या

घोड्यांच्या खुरांना गाईच्या खुरांची नाल ठोकली आहे. हा असामान्य प्रकार तो मिस्टर वाईल्डरकडून शिकला का?"

त्याच्या चेहऱ्यावर मोठे आश्चर्याचे भाव घेऊन उमराव क्षणभर विचारात पडला.

मग त्याने एक दार उघडून, आम्हाला एका मोठ्या संग्रहालयासारख्या खोलीत नेले. एका कोपऱ्यातील काचेच्या पेटीकडे आम्हाला नेऊन त्याने त्यावर लिहिलेल्या मजकुराकडे आमचे लक्ष वेधले.

ते असे होतेः होल्डरनीज हॉलभोवतालचा खंदक खणतांना हे नाल सापडले. ते घोड्यांसाठी वापरायचे आहेत. पण खालून त्यांचा आकार दुभंगलेल्या लोखंडी पायासारखा आहे. त्यामुळे पाठलाग करणाऱ्यांना मार्गावरून बाजूला ढकलता येते. ते मध्ययुगातील लढाईवर जाणाऱ्या होल्डरनीज शिपायाचे असावेत."

होम्सने पेटी उघडली व त्याचे बोट ओले करत त्याने नालांवर फिरवले. ताज्या चिखलाचा पातळसा थर त्याच्या बोटावर राहिला.

तो झाकण लावतांना म्हणाला, "आभारी आहे. इथे बघितलेली ही दुसरी नावीन्यपूर्ण गोष्ट आहे."

"आणि पहीली?" होम्सने त्याचा चेक दुमडला व काळजीपूर्वक त्याच्या छोट्या वहीत ठेवला. तो म्हणाला, "मी गरीब माणूस आहे." नंतर प्रेमाने त्यावर हात फिरवून त्याने तो आतल्या खिशात ठेवला.

# The Adventure Of The Norwood Builder

# नॉरवूड बिल्डरचे साहस

शेरलॉक होम्स म्हणाला, “गुन्हेगार शास्त्रज्ञांच्या दृष्टीकोनातून कैलासवासी मोरीआर्टीच्या मरणानंतर लंडनमध्ये काही राम राहिला नाही.”

मी बोललो, “लंडनमधील फार थोडे नागरिक तुझ्या या म्हणण्याला पुष्टी देतील, असा माझा अंदाज आहे.”

न्याहारीच्या टेबलाशेजारील खुर्ची मागे ढकलताना तो हसून म्हणाला, “ठीक आहे. ठीक आहे. मी स्वार्थी असता कामा नये. नक्कीच समाजाचा फायदा झालेला आहे. ज्यांचा धंदा गेला, असे बेकार गरीब लोक सोडून, कुणीच काही गमावले नाही.

तो माणूस जिवंत असताना, एखादे सकाळचे वर्तमानपत्र अनेक शक्यता व्यक्त करत असे. वॉटसन, नेहमी पुसट खूण किंवा लहानसा मागोवा असे. पण तरीही यामागे त्याचा पुन्हापुन्हा विचार करणारा मेंदू आहे, हे मला समजण्यासाठी तेवढे पुरेसे असे. जाळ्याच्या कडांची मंदशी थरथर, मला जाळ्याच्या मध्यभागी असणाऱ्या घाणेरडा वास येणाऱ्या कोळ्याची आठवण करून देत असे. किरकोळ चोऱ्या, जाणूनबुजून घडवून आणलेला खूनखराबा, निर्हेतूक रागीट कृत्ये – पुरावा असेल तर ही सर्व कृत्ये एकाच माणसाने केली असल्याचे सहज लक्षात येत होते. निर्ढावलेल्या गुन्हेगारांच्या अभ्यासकाला युरोपमधील कुठल्याही देशातील राजधानीपेक्षा लंडनमध्ये जास्त वाव होता. पण आता ---- त्याने खूप प्रयत्नाने घडवून आणलेल्या या गोष्टींच्या स्थितीबद्दल त्याने विनोदी पद्धतीने त्याची नावड दाखवत, खांदे घुसळले.

मी ज्या काळाबद्दल बोलतो आहे, तेव्हा काही महिने होम्स अलिप्त होता व त्याने विनंती केल्यावरून मी माझी डॉक्टरकी थांबवून, ती विकून, पुन्हा त्याच्याबरोबर बेकर रस्त्यावरील जागी राहू लागलो होतो. व्हर्नर नावाच्या एका तरुण डॉक्टरने माझी केंसींग्टन येथील प्रॅक्टीस, मी विचारायलादेखील घाबरलो असतो, अशा आश्चर्यकारक किंमतीला काही शंका न काढता, विकत घेतली होती. अनेक वर्षांनी मला कळले की व्हर्नर हा होम्सचा दूरचा नातेवाईक होता आणि होम्सनेच त्याला माझ्या प्रॅक्टीसची तेवढी किंमत सांगितली होती.

त्याने म्हटल्याप्रमाणे आमचे एकत्र रहायचे दिवस, फार काही घटना न घडता गेल्याचे तो जे म्हणाला, ते फारसे बरोबर नव्हते. कारण माझी टिपणे बघता, या काळात घडलेल्या दोन गोष्टी म्हणजे माजी अध्यक्ष म्युरीलो यांच्या कागदपत्रांची केस व आमचे जीव पणाला लावलेले डच वाफेचे जहाज फ्रीएसलँडवरील धक्कादायक प्रकरण. त्याचा थंड आणि अभिमानी स्वभाव नेहमीच न आवडेल असा होता, कुठल्याही स्वरूपाच्या लोकांनी केलेली स्तुतीमुळे त्याने मला त्याच्या स्वतःच्या पद्धतींबद्दल, त्याच्या यशाबद्दल व एकंदरीत त्याच्याबद्दल एकही शब्द न बोलायच्या एकदम कडक अटी घातल्या होत्या, पण मी स्पष्ट केल्याप्रमाणे, त्या अलीकडे थोड्या बदलल्या होत्या.

मिस्टर शेरलॉक होम्स त्याच्या विचित्र नापसंतीनंतर, त्याच्या खुर्चीत मागे रेलून सावकाशीने सकाळचे वर्तमानपत्र उघडत होता. तेव्हा जोरात वाजवल्या गेलेल्या दाराच्या घंटीने आमचे लक्ष खेचले गेले. त्यापाठोपाठ ताशा बडवल्यासारखा आवाज आला, जणु कुणीतरी बाहेरील दारावर बंद मुठी मारत होते. ते उघडल्याबरोबर, गडबड गोंधळ करत गर्दी आत घुसली. जिन्यातून पाऊले भरभर पडल्याचे आवाज आले. त्यापाठोपाठ रानटी डोळयांचा, भीती व काळजीने ग्रासलेला, फिकट, तरुण, गबाळा व विस्कटलेल्या केसांचा मनुष्य, धापा टाकत खोलीत घुसला. तो आमच्या दोघांकडे आळीपाळीने बघत राहिला. आमची चौकस नजर बघून, तो एकदम सावध झाला व अशा प्रकारे एकदम घुसून घरात आल्याबद्दल माफी मागायला हवी असल्याचे त्याच्या लक्षात आले.

तो ओरडला, “मिस्टर होम्स, मी माफी मागतो. तुम्ही मला दोष देऊ नका. मी जवळजवळ वेडा झालो आहे. मिस्टर होम्स, मी खूप दुःखी जॉन हेक्टर मॅकफरलेन आहे.”

त्याने त्याचे नाव अशा तऱ्हेने सांगितले, की जसे काही त्यामुळे त्याच्या भेटीचे कारण व पद्धत दोन्ही समजू शकेल. माझ्या मित्राचा थंड चेहरा बघून मला कळले, की त्याला पण माझ्यासारखेच वाटते आहे.

सिगरेट केस उघडत तो म्हणाला, “मिस्टर मॅकफरलेन, सिगरेट घ्या. माझी खात्री आहे. तुमच्या लक्षणांवरुन मला असे वाटते आहे, की माझा मित्र डॉक्टर वॉटसन याने तुम्हाला शांत होण्यासाठी झोपेची गोळी दिली तर बरे पडेल. गेले काही दिवसांपासून हवा इतकी गरम आहे आणि आत्ता यावेळी तुम्हाला जरा तुमच्या भावना काबूत ठेवता आल्या, तर मला आनंद होईल. तुम्ही त्या खुर्चीवर बसा आणि सावकाशीने, शांतपणे तुम्ही कोण आहात व तुम्हाला काय हवे आहे ते सांगा. मी जसे काही तुम्हाला ओळखतो असे तुम्ही तुमचे नाव सांगितलेत. पण मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो, की तुम्ही अविवाहित आहात, वकील आहात, फ्रीमेसन ( एक संस्था ) चे सभासद आहात व दम्याचे रुग्ण आहात या व्यतिरिक्त मला तुमच्याबद्दल काहीही माहिती नाही.”

मला माझ्या मित्राची पद्धत माहिती होती. त्याची तर्कसंगती जाणून घेणे, माझ्यासाठी अवघड नव्हते. कपड्यांचा गबाळेपणा व कायद्याच्या कागदांचा विस्कटलेपण, घड्याळाची अवस्था व धाप लागल्यासारखा श्वासोच्छवास, या सर्व गोष्टींचे मी निरीक्षण करत होतो. आमचा अशील मात्र करमणूक झाल्यासारखा टक लाऊन बघत होता.

“हो मिस्टर होम्स, मी ते सर्व काही आहे. शिवाय या क्षणी मी लंडनमधील एक अत्यंत दुर्दैवी माणूस आहे. मिस्टर होम्स, कृपा करून माझा धिक्कार करू नका. मी माझी गोष्ट सांगण्यापूर्वी, जर ते मला अटक करण्यासाठी आले तर त्यांना माझ्यासाठी थोडा वेळ थांबायला सांगा, म्हणजे मला तुम्हाला सर्व सत्य काय ते सांगता येईल. तुम्ही माझ्यासाठी काम करत आहात हे माहिती असेल, तर मी आनंदाने तुरुंगात जाईन.”

होम्स नवल वाटून म्हणाला, “अटक करणार! हे फार उत्कंठापूर्ण वाटते आहे. कुठल्या गुन्ह्याखाली अटक होण्याची अपेक्षा तू करतो आहेस?”

“खालच्या नॉरवूडमधील मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे याचा खून केल्याबद्दल.”

माझ्या मित्राचा बोलका चेहरा, मला भीती वाटते, पण पूर्णपणे असमाधानी सहानुभूतीचा होता.

तो बोलला, “अरे प्रिय माणसा, आत्ता न्याहारी घेतानाच मी माझ्या मित्राला, डॉक्टर वॉटसनला, सांगत होतो की हल्ली भावनिक केसेस हद्दपार झाल्या आहेत.”

आमचा पाहुणा पुढे आला व थरथरत्या हाताने होम्सच्या गुडघ्यांवरून, डेली टेलेग्राफ नावाचे वर्तमानपत्र उचलले.

“सर, तुम्ही यात बघितले असेल तर एका दृष्टीक्षेपात तुम्हाला हे कळले असेल, की मी तुम्हाला सकाळी सकाळी काय सांगायला आलेलो आहे. मला वाटते माझे नाव व माझ्या कमनशीबाची हकीगत एव्हाना सर्वतोमुखी झाली असेल.” त्याने वर्तमानपत्र उघडून ते पान काढून दाखवले. “हे इथे आहे. तुमच्या परवानगीने मी तुम्हाला ते वाचून दाखवतो. मिस्टर होम्स, ऐका. मथळा असा आहेः खालच्या नॉरवूडमधील गूढ प्रकरण, एक प्रथितयश बिल्डर बेपत्ता. आग लावल्याचा व खुनाच्या गुन्ह्याचा संशय. गुन्हेगाराचा माग काढला जातो आहे.”

मिस्टर होम्स, अशा तऱ्हेने ते माझ्या मागावर आहेत आणि ते नक्की मला पकडणार. लंडन ब्रिज स्टेशनपासून, ते माझा पाठलाग करत आहेत. माझी खात्री आहे, की ते फक्त माझ्या अटकेच्या वॉरंटसाठी थांबले आहेत. यामुळे माझ्या आईचे काळीज फाटेल. माझी आई दुःखाने वेडी होईल.” काही वाईट घडण्याच्या काळजीने व दुःखाने, त्याने त्याचे हात हवेत उडवले आणि खुर्चीत पुढेमागे झुलू लागला.

मी रुची घेऊन या बेकायदेशीरपणे कौर्य दाखवून गुन्हा करणाऱ्या माणसाकडे पाहू लागलो. तो सोनेरी केसांचा, देखणा, धुतलेले पण गबाळे कपडे घातलेला, घाबरलेल्या निळ्या डोळ्यांचा, घोटून दाढी केलेला, उतरलेला भावनामय चेहरा असलेला, मनुष्य होता. त्याचे वय सत्तावीस

असावे. त्याचा एकंदर पोषाख व वागणूक सभ्य माणसाची वाटत होती. त्याच्या हलक्याश्या उन्हाळी कोटाच्या खिशातून त्याचा व्यवसाय दर्शवणारी कागदपत्रे डोकावत होती.

होम्स म्हणाला, "आपल्याकडे असलेल्या वेळाचा आपण सदुपयोग करायला हवा.

वॉटसन, तू ते वर्तमानपत्र घेऊन वाचायचे कष्ट घेशील का?

आमच्या अशीलाने वाचलेल्या जळजळीत मथळयाखालील बातमी मी अशी वाचलीः

काल रात्री उशीरा किंवा आज पहाटे, खालच्या नॉरवूडमध्ये एक घटना घडली. तो गंभीर गुन्हा असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे हे त्या भागातील प्रसिध्द व्यक्ती होते. खूप वर्षे ते तिथे त्यांचा बिल्डरचा व्यवसाय चालवत असत. ते बावन्न वर्षाचे असून अविवाहित होते. सिडनेहॅम रस्त्याच्या टोकाला असलेल्या जुन्या बंगल्यात ते रहात होते. विचित्र, गुप्त व लाजऱ्या सवयी असलेला मनुष्य म्हणून त्याची किर्ती होती. काही वर्षे भरपूर संपत्ती गोळा केल्यावर, तो मनुष्य व्यवसायापासून दूर होता. घराच्या मागील बाजूस, साधारण छोटीशी लाकडाची वखार अजूनही होती. काल रात्री बारा वाजता, त्यातील एका ढिगाला आग लागल्याचे लक्षात आले. लगेच आग विझवणारे बंब आले. पण कोरडे लाकूड भसाभस जळले. सर्व लाकडे जळून खाक होईपर्यंत, आग विझवणे शक्य झाले नाही. इथपर्यंत ही सर्वसामान्य अपघाताची केस वाटत होती. पण नवीन माहितीप्रमाणे तो गंभीर गुन्हा होता. आगीच्या वेळी घराचा मालक गायब झाल्याबद्दल, आश्चर्य व्यक्त करण्यात आले. चौकशी केल्यावर तो घरातून बेपत्ता झाल्याचे समजले. त्याच्या झोपायच्या खोलीची तपासणी केली असता, असे आढळून आले की तो पलंगावर झोपलाच नव्हता. तेथील तिजोरी उघडी पडली होती व खूप महत्वाचे कागद खोलीभर पसरलेले होते. शेवटी तिथे हाणामारी झाल्याच्या, खुनाच्या व काही रक्ताच्या डागांच्या खुणा सापडल्या. ओक वृक्षाच्या चालायच्या काठीच्या पकडायच्या भागावरही, रक्ताचे डाग आढळले. रात्री उशीरा मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे याला भेटायला कुणी आले होते. ४२६, ग्रेशाम इमारतीतील, ग्रॅहम व मॅकफरलेन फर्मचा भागीदार, लंडनमधील तरुण वकील जॉन हेक्टर मॅकफरलेन याची ती काठी

असल्याचे शोधून काढण्यात आले. पोलिसांचा विश्वास आहे, की ज्यामुळे खुनाचा हेतू स्पष्ट होईल, असा खात्रीलायक पुरावा त्यांच्याकडे आहे. यावरून गुन्ह्याचा माग लवकरच काढला जाईल."

"नंतर ---- आम्ही वर्तमानपत्राच्या छापखान्यात गेलो असता आम्हाला अशी वदंता ऐकायला मिळाली की मिस्टर जॉन हेक्टर मॅकफरलेन याला, मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे याच्या खुनाबद्दल अटक करण्यात आली. तसे वॉरंट निघाल्याचे खात्रीने सांगण्यात आले. नॉरवूडमधील तपासानंतर काही धोकादायक व वाईट घडले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या दुर्दैवी बिल्डरच्या खोलीत हाणामारी झाल्याच्या खुणांशिवाय, आता हे माहिती झाले आहे की त्याच्या तळमजल्यावरील झोपायच्या खोलीच्या फ्रेंच ( दरवाज्यासारख्या मोठ्या ) खिडक्या उघड्या होत्या व त्यावर कुणा जड वस्तूच्या खुणा उमटलेल्या दिसत होत्या. शेवटी अशी खात्री केली गेली, की आगीतील राखेतही तशाच खुणा आढळून आल्या. पोलिसांचे म्हणणे असे आहे की लोकांना रुचीपूर्ण वाटेल असा गुन्हा घडला आणि बळीला त्याच्या झोपायच्या खोलीत मारण्यात आले. त्याचे कागदपत्र विस्कटलेले होते आणि कलेवर जळक्या लाकडांमध्ये टाकून, गुन्ह्याचा मागमूस न ठेवता नाहीसे केले गेले. स्कॉटलंड यार्डचा अनुभवी इन्स्पेक्टर लेस्ट्रेड याच्या हाती, गुन्ह्याच्या तपासाचे काम सोपवण्यात आले आहे. तो त्याच्या नेहमीच्या उत्साहाने व शहाणपणाने पुराव्यांचा मागोवा घेतो आहे."

शेरलॉक होम्सने डोळे मिटून व बोटांची टोके जुळवून, हा खास वृत्तांत ऐकला. तो आरामात बोलला, "केसमध्ये नक्कीच काही दखलपात्र मुद्दे आहेत. मिस्टर मॅकफरलेन, मी तुम्हाला सर्वप्रथम असे विचारू शकतो का, की इतका भक्कम पुरावा असतांना, अजून तुम्ही मोकळे कसे?"

"मिस्टर होम्स, मी ब्लॅकहिथ येथील टॉरींग्टन लॉजमध्ये माझ्या पालकांसह रहातो. काल रात्री उशीरा मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे याच्याबरोबर काही कामासाठी मी नॉरवूड येथील हॉटेलमध्ये राहिलो. माझ्या दुसऱ्या काही कामासाठी तिथून इथे आलो. मी गाडीत बसेपर्यंत मला या प्रकरणाविषयी काही माहिती नव्हते. अचानक मला माझ्या असुरक्षिततेची जाणीव झाली आणि

मी ताबडतोब तुमच्याकडे धाव घेतली. माझ्या कार्यालयात किंवा घरी मला अटक होणार, याबद्दल मला काही संशय नव्हता. लंडन ब्रिज स्टेशनपासून एक मनुष्य माझा पाठलाग करत होता. अरे देवा, हे सर्व काय आहे?"

दाराच्या घंटीचा कर्कश आवाज येऊन त्यापाठोपाठ जिन्यावरून दाणदाण पाऊले वाजू लागली. क्षणार्धात आमचा जुना मित्र लेस्ट्रेड दारात अवतीर्ण झाला. त्याच्यामागे दोन गणवेष न घातलेले पोलीस उभे होते.

तो बोलला, "मिस्टर जॉन हेक्टर मॅकफरलेन?"

आमचा दुर्दैवी अशील भीतीदायक चेहऱ्याने उठला.

"खालच्या नॉरवूडमधील मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे याच्या बेकायदेशीर खुनाबद्दल मी तुला अटक करत आहे."

मॅकफरलेन दुःखी चेहऱ्याने आमच्याकडे वळला. चिरडला गेल्याप्रमाणे तो त्याच्या खुर्चीत मटकन खाली बसला.

होम्स म्हणाला, "लेस्ट्रेड, एक मिनिट थांब. अर्ध्या तासाच्या उशिराने तुला काही फरक पडत नाही. हा सभ्य मनुष्य मला या रुचीपूर्ण प्रकरणाची हकीगत सांगत होता. त्यामुळे आम्ही काही अडचण न येता, हे प्रकरण नीट हाताळू शकू"

लेस्ट्रेड रुक्षपणे म्हणाला, "मला वाटते की हे प्रकरण हाताळायला कठीण नाहीच आहे."

"ठीक आहे. मला त्याचा वृत्तांत ऐकण्याची फार उत्सुकता वाटते आहे, म्हणून तुझ्या नाराजीने दिलेल्या का होईन, पण परवानगीने मी तो ऐकतो."

“खरे तर होम्स, मागे एकदोन वेळा तुम्ही स्कॉटलंड यार्डला मदत केल्याने, मला तुमची विनंती अमान्य करणे अवघड आहे. पण मला माझ्या कैद्याजवळ रहावे लागेल आणि तो जे काही बोलेल, ते त्याच्याविरुध्द पुरावा म्हणून वापरले जाईल.”

आमचा अशील म्हणाला, “याहून अधिक मला काही नको. माझी एवढीच इच्छा आहे की तुम्ही सर्व काही ऐकून घेऊन, त्याची सत्यता पारखावी.”

लेस्ट्रेडने त्याच्या घड्याळात पाहिले. तो म्हणाला, “मी तुला अर्धा तास देतो.”

मॅकफरलेन म्हणाला, “पहिल्यांदा मला हे स्पष्ट केले पाहिजे की मला मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे यांच्याबद्दल काहीही माहिती नव्हते. त्याचे नाव माझ्या ओळखीचे होते, कारण बऱ्याच वर्षांपूर्वी माझ्या पालकांची त्यांच्याशी ओळख होती. पण पुढे ती काही वाढली वगैरे नाही. त्यामुळे काल दुपारी साधारण तीन वाजता शहरातील माझ्या कार्यालयात जेव्हा तो आला, तेव्हा मी फार आश्चर्यचकित झालो. पण जेव्हा त्याने त्याच्या येण्याचे कारण सांगितले, तेव्हा मी अजून जास्त आश्चर्यचकित झालो. त्याच्या हातात वह्यांचे खूप गठ्ठे होते. त्यावर काही लिहिलेला कागद होता -- तो इथे माझ्याकडे आहे.

ओल्डॅक्रे म्हणाला, “हे माझे इच्छापत्र आहे. मिस्टर मॅकफरलेन, मला ते तुमच्याकडून कायदेशीर चौकटीत बसवून हवे आहे. तुम्ही ते करेपर्यंत मी इथे बसतो.”

मी त्या कामाला लागलो. काही भाग वगळता, त्याने त्याची सर्व मिळकत माझ्या नावे केलेली बघून, मला किती नवल वाटले, याची तुम्ही कल्पना करू शकता. तो पांढऱ्या पापण्यांचा विचित्र माणूस होता. जेव्हा मी त्याच्याकडे बघे, तेव्हा त्याचे करडे डोळे करमणूक झाल्यासारखे माझ्यावर रोखलेले असत. इच्छापत्रातील अटी वाचून, माझा माझ्यावर विश्वास बसेना. पण त्याने स्पष्टीकरण दिले, की तो अविवाहित होता व त्याला माझे पालक सोडून जवळचे असे कुणी नव्हते. त्याने मी एक होतकरू तरुण मनुष्य असल्याचे ऐकले होते आणि त्याचे पैसे माझ्या हातात

सुरक्षित रहातील, असा त्याला विश्वास होता. अर्थात मी फक्त अडखळत आभार मानण्यापलीकडे, काही करू शकलो नाही. इच्छापत्र नीट तयार केले गेले, त्यावर सह्या झाल्या आणि माझ्या कारकुनाने त्यावर साक्षीदार म्हणून सही केली. निळ्या कागदावर लिहिलेले हे ते आहे आणि हे कागद म्हणजे कच्चा खर्डा आहे. मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे याने मला नंतर सांगितले की बरीचशी कागदपत्रे, इमारतीचे कायदेशीर कागद, जागा व मिळकत नावावर करण्यासंबंधीचे कागद इत्यादी -- सर्व मी बघावे व समजून घ्यावे. हे सर्व मार्गी लागल्याशिवाय त्याला चैन पडणार नसल्याचे तो बोलला. त्याने मला नॉरवूडमधील त्याच्या घरी मी रात्री इच्छापत्र घेऊन यावे व सर्व काही मार्गी लावावे, अशी विनंती केली. "हे बघ माझ्या मुला, सर्व काही शेवटास गेल्याशिवाय तुझ्या पालकांना काही बोलू नकोस. हे त्यांच्यासाठी एक लहानसे नवल, म्हणून आपण ठेऊन देऊ." या मुद्द्यावर तो अगदी ठाम होता. त्याने तसे वचन माझ्याकडून घेतले.

"मिस्टर होम्स, तुम्ही समजू शकता की तो काही म्हणाला, तरी त्याला नकार देण्याच्या मनस्थितीत मी नव्हतो. तो माझा उपकारकर्ता होता आणि त्याची प्रत्येक इच्छा पूर्ण करणे, हे माझे कर्तव्य होते. मी घरी तार पाठवून कळवून टाकले, की मी महत्वाच्या कामात गुंतलेलो असल्याने, घरी परतायला किती उशीर होईल, ते सांगता येत नाही. कदाचित मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे त्यापूर्वी घरी नसल्याने, त्यांने रात्री नऊ वाजता माझ्याबरोबर जेवण घेण्याची इच्छा प्रगट केली होती. मला त्यांचे घर शोधायला थोडा त्रास झाला. तसेही मला त्यांच्याकडे पोचायला अर्धा तास उशीर झाला. मी पोचलो आणि त्यांना पाहिले तर ---- "

होम्स म्हणाला, "एक मिनिट. दार कुणी उघडले?"

"एका मध्यमवयीन बाईने. मला वाटते ती त्यांची नोकराणी असावी."

"आणि, मला वाटते जिने तुमचे नाव सांगितले, तीच ती का?"

मॅकफरलेन म्हणाला, "बरोबर."

“पुढे सांग.”

मॅकफरलेनने कपाळावरील घाम पुसून, पुन्हा सांगायला सुरवात केली.

“मला त्या बाईने हॉलमध्ये बसायला सांगितले. तिथे साधारण स्वरूपाचे जेवण मांडलेले होते. नंतर मिस्टर जोन्स ओल्डॅक्रेने मला त्याच्या झोपायच्या खोलीकडे नेले. तिथे एक जड तिजोरी होती. ती उघडून त्यांनी कागदांची एक चळत बाहेर काढली. ती आम्ही दोघांनी मिळून वाचली. रात्री अकरा ते बाराच्या दरम्यान आम्ही ते काम संपवले. तो बोलला की नोकराणी झोपली असेल. तिला त्रास द्यायला नको. हा सर्व वेळ उघड्या असलेल्या फ्रेंच खिडकीतून त्याने मला बाहेरचा रस्ता दाखवला.

होम्सने विचारले, “पडदे खाली केलेले होते का?

“माझी खात्री नाही, पण बहुधा अर्धे खाली केलेले होते. हो. मला आठवले त्याने ते पूर्ण वर करून मला बाहेरची वाट दाखवली. मला माझी काठी सापडेना. तो म्हणाला, “अरे मुला, तू आता मला सतत इथे भेटणार आहेस. तू पुढच्या वेळी ती मागायला येईपर्यंत, मी ती नीट ठेवतो.” मग मी निघालो. तिजोरी उघडी होती व कागदपत्रांची पाकिटे टेबलावर पसरलेली होती. इतका उशीर झाला होता, की मी ब्लॅकहिथला परत जाऊ शकत नव्हतो. त्यामुळे मी ॲनर्ले आर्म्स येथे रात्र काढली. सकाळी वर्तमानपत्रात हा भयंकर प्रकार वाचेपर्यंत मला काहीही माहिती नव्हते.”

मॅकफरलेनचे उल्लेखनीय कथन ऐकताना, एकदोन वेळा भुवई वर गेलेला लेस्ट्रेड बोलला, “मिस्टर होम्स, तुम्हाला अजून काही विचारायचे आहे का?

“मी ब्लॅकहिथला जाईपर्यंत काही नाही. “

लेस्ट्रेड म्हणाला, “म्हणजे नॉरवूडला, असे तुम्हाला म्हणायचे आहे का? .”

गूढपणे हसत होम्स म्हणाला, “हो. मला जावेच लागेल.”

लेस्ट्रेड त्याच्या अनुभवांमधून जास्त शिकत असे. जे त्याच्या डोक्यात शिरत नसे, ते बुद्धी वापरून जाणून घेण्यासाठी तो काळजी करत नसे. मी त्याला माझ्या मित्राकडे चौकस दृष्टीने बघतांना पाहिले.

तो म्हणाल, "मिस्टर शेरलॉक होम्स, मला वाटते मला तुमच्याबरोबर थोडे बोलायला आवडेल. मिस्टर मॅकफरलेन, माझे दोन कॉन्स्टेबल दाराशी उभे आहेत आणि बाहेर चारचाकी थांबली आहे. तो दुःखी तरुण मनुष्य उठला आणि आमच्याकडे एक शेवटचा करुण दृष्टीक्षेप टाकून खोलीतून बाहेर पडला. कॉन्स्टेबल त्याला गाडीत घालून घेऊन गेले. लेस्ट्रेड थांबला.

इच्छापत्राचा कच्चा खर्डा असलेले कागद होम्सने उचलले आणि उत्सुकतेने अगदी लक्षपूर्वक तो ते वाचू लागला.

ते लेस्ट्रेडच्या हातात देत तो म्हणाला, "या कागदपत्रांबद्दल काही मुद्दे आहेत, नाही का?

लेस्ट्रेडने ते प्रश्नार्थक चेहऱ्याने बघितले.

तो म्हणाला, "मी पहिल्या काही ओळी, दुसऱ्या पानावरील मधल्या ओळी व शेवटच्या एकदोन ओळी वाचू शकतो. पण मधली अक्षरे फार खराब आहेत आणि तीन ठिकाणचा काही मजकूर, मी वाचूच शकत नाही.

होम्सने विचारले, "मग त्याचे तू आता काय करणार?"

"तुम्ही त्याचे काय करणार?"

"ते गाडीत लिहिले गेले असणार. चांगले अक्षर आहे, ते गाडी थांबलेली असतांना स्टेशनवर लिहिले गेले आहे व वाईट अक्षर गाडी हलत असतांना. फार वाईट अक्षर रुळाच्या सांध्यांवर लिहिले गेले असणार. तज्ञ माणूस सांगू शकेल की हे उपनगरीय गाडीच्या प्रवासात लिहिले गेले आहे. मोठ्या शहरांच्या आसपासचा भाग सोडून बाकी सर्व ठिकाणी भराभर मुद्दे लिहून काढले

आहेत. असे गृहीत धरले की त्याच्या सर्व प्रवासभर त्याचे इच्छापत्राचे लेखन चालू होते, तर मग ती जलद गाडी असणार. ती नॉरवूड व लंडन ब्रिज यामधील फक्त एकाच स्टेशनवर थांबली असणार.

लेस्ट्रेड हसू लागला.

तो म्हणाला, "मिस्टर होम्स, तुम्ही तुमच्या उपपत्ती मांडू लागता, तेव्हा मला हसू येते. या सर्वाचा केसशी काय संबंध आहे?"

आत्ता तरुण मनुष्याने सांगितलेल्या गोष्टीला ही बाब उचलून धरते, की जोन्स ओल्डॅक्रे याने त्याचे इच्छापत्र काल चालत्या गाडीत लिहिले. हे नवलपूर्ण आहे, नाही का? की एखाद्या माणसाने इतके महत्वाचे इच्छापत्र अशा घाईगर्दीत लिहावे! त्यावरून असे वाटते आहे की ते व्यावहारिक दृष्ट्या फार महत्वाचे आहे, असे त्याला वाटत नसावे. हे इच्छापत्र पुढे कधीकाळी खरेच धरले जाईल, अशी त्याची अपेक्षा नसेल, तरच बहुधा माणूस ते असे घाईघाईने खरडेल.

लेस्ट्रेड बोलला, "तसेही, त्याने त्याचा मृत्यूही त्याच वेळी निश्चित केला."

"ओहो, तुला असे वाटते का?'

"तुम्हाला नाही वाटत?"

"हं. ते शक्य आहे पण अजून ही केस मला स्पष्ट झालेली नाही."

"स्पष्ट झाली नाही? ठीक आहे. जर तसे असेल, तर मग अजून काय स्पष्ट होणार? इथे एका तरुण मनुष्याला असे अचानक समजले आहे, की एक विशिष्ट वयस्क मनुष्य वारला, तर त्याचा भविष्यकाळ उज्वल ठरणार आहे, तर तो काय करेल? तो कुणाला काही बोलणार नाही, पण तो असे बघेल, की काहीतरी कारण काढून तो त्या वयस्क माणसाच्या घरी जाईल. घरात इतर कोणी माणसे असल्यास ती झोपेपर्यंत थांबेल आणि मग घर सुनसान असतांना, तो त्याचा खून करेल.

लाकडाच्या ढिगाऱ्यात ते शव जाळून टाकेल आणि एका हॉटेलमध्ये जाऊन मुक्काम करेल. काठीवर व खोलीतही रक्ताचे डाग अगदी पुसट आहेत. तो अशी कल्पना करत असेल की तो रक्तरंजित खून नव्हता. आणि त्याने कलेवराचे नामोनिशाण मिटवून टाकले, तर सगळे पुरावे व खुनाची पद्धत कुणाला कळणार नाही -- असे पुरावे की जे त्याच्याकडे निर्देश करतील. असेच घडले नसणार का?"

होम्स बोलला, "अरे बाबा लेस्ट्रेड, असे घडले असेल, हे तर कुणीही सांगेल. तू तुझ्या इतर गुणांबरोबर कल्पनाविलासाला काहीच वाव देत नाहीस. पण तू क्षणभर त्या तरुण मनुष्याच्या जागी स्वतःला ठेवलेस, तर इच्छापत्र माहिती झाल्याच्या रात्रीच तू तुझ्या उपकारकर्त्याचा खून करशील? या दोन घटनांमध्ये इतके जवळचे नाते बनवणे धोकादायक नाही का? परत तू असा प्रसंग निवडशील का, की तू घरात आहेस, हे नोकराणीला माहिती आहे? आणि कलेवर जाळून टाकण्याइतके श्रम तू घेशील का? तुझी काठी तू तिथे सोडून परतशील का? लेस्ट्रेड, तू कबूल कर की हे घडले असणे अशक्य आहे."

"मिस्टर होम्स, काठीबद्दल म्हणाल तर माझ्याइतकेच तुम्हालाही माहिती आहे, की खुनी भांबावून जाऊन अशा गोष्टी करून बसतात, ज्या एखाद्या शांत माणसाने केल्या नसत्या. खुनी फार घाबरला असणार. योग्य अशी दुसरी काही उपपत्ती मांडा."

होम्स म्हणाला, "मी तुला अर्धा डझन उपपत्ती सांगू शकतो. उदाहरणार्थ, असे घडले असण्याची खूप शक्यता वाटते. मी ती तुला फुकटात सादर करतो. वयस्क मनुष्य असे कागद दाखवतो आहे, की जे फार किमती आहेत. कुणी तिथून जाणारा मनुष्य अर्धाच पडदा ओढलेल्या खिडकीतून ते बघतो. त्या वकिलाला, मॅकफरलेनला विसर. तो मनुष्य आत शिरतो. तिथे पडलेली काठी ओढतो. ओल्डॅक्रेचा खून करतो आणि शव जाळून पोबारा करतो."

"तो कुणीतरी इसम शव का जाळेल?"

“मॅकफरलेन जाळतो, तर मग हा का नाही?”

“काही पुरावा लपवण्यासाठी.”

“तो इसम कदाचित यासाठी जाळत असेल, की इथे काही खूनखराबा झालेलाच नाही असे दाखवायला.”

“आणि तो इसम काही चोरत का नाही?”

“कारण ते कागदपत्र असतात व त्यांचा तो लिलाव करू शकत नाही.”

लेस्ट्रेडने त्याची मान हलवली. पण मला त्याची ती कृती फार दम असलेली वाटली नाही.

“मिस्टर शेरलॉक होम्स, असे बघा, तुम्ही तुमचा कल्पनेतील इसम शोधत बसा तोपर्यंत आम्ही गुन्हेगाराला पकडीत घेतो. कोण बरोबर आहे ते भविष्यकाळ ठरवेल. मिस्टर होम्स, माझे बोलणे लक्षात ठेवा. आम्हाला माहिती आहे त्याप्रमाणे, कुठलीही कागदपत्रे गहाळ झालेली नाहीत आणि आम्ही पकडलेल्या गुन्हेगाराला ती गहाळ करण्याचे काहीही कारण नव्हते. कारण कायद्याने तो वारस होता आणि ते त्याच्याकडे येणारच होते.”

माझ्या मित्राला या विधानामुळे धक्का बसलेला दिसला.

तो बोलला, “मी हे नाकारू शकत नाही की पुरावा अगदी नक्की भक्कमपणे तुझ्या उपपत्तीप्रमाणे तुझ्या बाजूने आहे, पण माझी इच्छा एवढीच आहे, की इतर काही घडले असणेही शक्य असल्याचे तुला दाखवावे. तू म्हणतोस, त्याप्रमाणे भविष्यकाळ काय ते ठरवेलच. शुभ सकाळ! दिवसाभरात मी नॉरवूडला चक्कर मारून तुझे म्हणणे कितपत खरे आहे ते बघेन.”

जेव्हा लेस्ट्रेड गेला, तेव्हा माझा मित्र उठला व त्याच्या सवयीप्रमाणे, झपाट्याने कामाला लागला.

तो गडबडीने जोरात हालचाल करत म्हणाला, “वॉटसन, मला ब्लॅकहिथला जायला निघाले पाहिजे.’

‘आणि नॉरवूडला का नाही?”

“कारण या केसमध्ये महत्वाच्या दोन घटना, पायात पाय घालून उभ्या आहेत. त्यातील दुसऱ्या घटनेवर पोलीस जास्त लक्ष देत आहेत. कारण तोच खरा गुन्हेगार असल्याचे त्यांना वाटते आहे. पण मला असे नक्की वाटते आहे, की तर्कशास्त्रीय दृष्ट्या पहिल्या घटनेवर काही प्रकाश पाडणे गरजेचे आहे -- ते इतक्या झटपट बनवलेले व अनपेक्षित वारसाला सर्व काही बहाल केलेले विचित्र इच्छापत्र! त्यामुळे एकंदरीत सर्व केसचा अर्थ समजायला मदत होईल. नाही, माझ्या प्रिय मित्रा, मला नाही वाटत, की मला तुझी मदत होईल. त्यात धोका काही नाही, पण तुझ्याशिवाय हे प्रकरण धसास लावण्याची मी कल्पना करू शकत नाही. मी तुला संध्याकाळी जेव्हा पाहिले, तेव्हा मला विश्वास वाटला की मी त्या गरीब बिचाऱ्या, माझ्यावर त्याच्या संरक्षणाची जबाबदारी टाकलेल्या तरुणासाठी, मी काही करू शकेन.

माझा मित्र बाहेर जाऊन परत आला, तेव्हा बराच उशीर झालेला होता. त्याच्या दमलेल्या व काळजीयुक्त चेहऱ्यावर नजर टाकूनच मला समजले, की त्याच्या उंचावलेल्या आशा फलद्रूप झालेल्या नाहीत. तासभर तो त्याची निराशा लपविण्या साठी व्हायोलीन वाजवत बसला. शेवटी त्याने ते खाली ठेवले व त्याची साहसे कशी वाया गेली ते सांगू लागला.

“वॉटसन, सर्व काही जेवढे म्हणून चुकणे शक्य आहे, तेवढे चुकतच गेले. मी लेस्ट्रेड समोर मोठी हुशारी दाखवली पण माझ्या आत्म्याला स्मरून मी असे सांगेन, की एकदा त्याचे म्हणणे बरोबर व आपले चूक वाटते. तर माझ्या विचारांप्रमाणे सर्व काही एका बाजूला आहे आणि पुरावे दुसऱ्या बाजूला आहेत. मला अशी भीती आहे की ब्रिटीश ज्युरींनी अजून बुद्धीची इतपत पातळी गाठलेली नाही, की ते लेस्ट्रेडच्या पुराव्यांपेक्षा माझ्या उपपत्तीवर विश्वास ठेवतील.”

“तू ब्लॅकहिथला गेलास का?”

“हो वॉटसन, मी तिथे गेलो. लवकरच माझ्या लक्षात आले की कैलासवासी ओल्डॅक्रे हा फारच लबाड मनुष्य होता. मॅकफरलेनचे वडील त्यांच्या मुलाच्या, शोधात दूर गेलेले होते. त्याची आई घरी होती -- थोडीशी जाड, निळे डोळे असलेली व भीतीने गांगरून जाऊन चिडलेली, अशी ती मला दिसली. अर्थात तिने काही गुन्हा घडला असण्याची शक्यतादेखील कबूल केली नाही. पण तिने ओल्डॅक्रे याच्या नशीबाबद्दल नवलही व्यक्त केले नाही किंवा तिला खंतही वाटलेली दिसली नाही. उलट ती ओल्डॅक्रेबद्दल इतक्या कटूपणे बोलली, की ती नकळत पोलीसांची बाजू उचलून धरत होती. अर्थात तिच्या मुलाने तिला अशा तऱ्हेने बोलतांना ऐकले असते, तर त्याच्या मनात तिच्याबद्दल द्वेष व काही हिंसा करण्याची इच्छा उफाळून आली असती.

ती म्हणाली, “तो मनुष्य नव्हे तर लबाड व त्रासदायक माकड होता. आणि तो तरुण असल्यापासून तसाच होता.”

मी म्हणालो, “तुम्हाला त्यावेळी तो तसा आहे, हे माहिती होते?

“हो. मी त्याला चांगलेच ओळखून होते. तो माझा पूर्वीचा प्रियकर होता. बरे झाले, मी वेळीच सावध होऊन त्याच्यापासून लांब गेले व एका गरीब पण चांगल्या माणसाशी लग्न केले. मिस्टर होम्स, ओल्डॅक्रेबरोबर माझा साखरपुडा झाला होता. पण मी जेव्हा त्याच्याबद्दल धक्कादायक गोष्ट ऐकली, की त्याने मांजराला पिंजऱ्यात कोंडले. तेव्हा त्याच्या भयंकर दुष्टपणाला मी इतकी घाबरले, की मी त्याच्याशी संबंधच तोडून टाकले.” नंतर तिने एका खणातून चाकूने चेहरा विद्रूप करून जखमा केलेल्या बाईचा फोटो मला दिला व म्हणाली, “तो माझा स्वतःचा फोटो आहे. त्याने तो मला शापासकट, माझ्या लग्नाच्या दिवशी सकाळी पाठवला होता.”

मी म्हणालो, “नशीब की त्याने आता तरी तुला माफ केले आहे. कारण त्याने त्याची सर्व मिळकत तुझ्या मुलाच्या नावे करून ठेवली आहे.”

ती ओरडली, “माझा मुलगा किंवा मी, आम्हाला कुणालाच जिवंत वा मृत अशा त्याच्याकडून, काहीही नको आहे. मिस्टर होम्स, स्वर्गामध्ये देव आहे. तोच देव ज्याने दुष्ट माणसाला शिक्षा केली आहे व त्या दुष्ट माणसाच्या रक्ताने माझ्या मुलाचे हात बरबटलेले नाहीत, हे देखील तो देव दाखवून देईल.”

“मग मी अजून एक दोन मार्ग शोधले. पण माझ्या उपपत्तीला उचलून धरेल असे काहीही मला सापडले नाही. पण त्याविरुध्द जाणारे खूपसे मुद्दे सापडले. त्यामुळे मी तो नाद सोडून दिला व नॉरवूडला गेलो.

मी तेथील आधुनिक बंगला, अंगणात उभे राहून डोळे फाडून बघितला. त्याच्यापुढे गुळगुळीत व चकचकीत हिरवळ होती. उजवीकडे रस्त्यापासून काही अंतरावर, आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेली लाकडाची वखार होती. या माझ्या वहीत मी कच्चा नकाशा काढला आहे. ही डावीकडील खिडकी ओल्डॅक्रेच्या खोलीत उघडते. आणि तुम्हाला रस्त्यावरून ती दिसू शकते. आजच्या घडीला मला एवढेच समाधान लाभले आहे. तिथे लेस्ट्रेड नव्हता. पण त्याच्या हाताखालील मुख्य कॉन्स्टेबल होता. त्यांना तिथे नुकताच मोठा खजिना सापडला. सबंध सकाळभर ते जळक्या लाकडांची राख चिवडत होते. त्यांना तिथे बऱ्याच रंग उडालेल्या धातूच्या चकत्या व काही जळके अवशेष सापडले. मी त्यांची नीट परीक्षा केली आणि माझी खात्री झाली की ती पँटची बटणे होती. मला असे दिसले की त्यापैकी एकावर ‘Hyams’ अशी अक्षरे होती. तो ओल्डॅक्रेचा शिंपी होता. नंतर मी काही खुणा व पुरावे सापडतात का हे बघण्यासाठी हिरवळीत बारकाईने शोधाशोध केली. पण पाण्याच्या दुर्भिक्षामुळे तेथील सर्व काही लोखंडासारखे कडक झाले होते. फक्त काही जड वस्तू किंवा एखादे मोठे ओझे, पांढऱ्या, विषारी फुलांच्या झाडांमधून ओढत नेल्यासारख्या रेषा सोडून अजून काही दिसत नव्हते. अर्थात हे सर्व लेस्ट्रेडच्या विधानाशी सुसंगत असे होते. ऑगस्ट महिन्यातील सूर्य पाठीवर घेऊन मी हिरवळीवर रांगत होतो. पण तासाभराने शहाणपणाने मी तो नाद सोडून दिला.

“तर अशा तऱ्हेने झालेल्या फजितीनंतर, मी झोपायच्या खोलीत गेलो. तिथे अगदी पुसट, रंग उडालेले व चिकट पण नुकतेच पडलेले रक्ताचे डाग आढळले. तेथील काठी उचलली गेली होती व तिच्या खुणादेखील पुसट होत्या. ती काठी आमच्या अशीलाची होती, यात काही वाद नव्हता. त्यानेही ते कबूल केले होते. गालीच्यावर ओल्डॅक्रे व मॅकफरलेन दोघांच्याही पायाच्या खुणा होत्या. पण तिसऱ्या कुणा माणसाच्या नव्हत्या. ही बाब दुसऱ्या बाजूची गोष्ट बळकट करणारी होती. त्यांचा आकडा वाढत होता व आपला आहे तेवढाच होता.

“मला आशेचा एकच किरण दिसत होता -- आणि तरीही तो नगण्य होता. मी तिजोरीच्या आत पाहिले. त्यातील बरेचसे काढून टेबलावर ठेवले होते. कागदपत्र लखोटाबंद केले होते. त्यातील एकदोन पोलिसांनी उघडून बघितले होते. माझ्या मताप्रमाणे त्याना फारसे महत्व नव्हते. बँकेचे पुस्तक मिस्टर ओल्डॅक्रे आर्थिक दृष्ट्या फार सुस्थितीत असल्याचे दाखवत नव्हते. पण मला असे वाटले की तिथे सगळे कागदपत्र नव्हते. काही करार -- बहुधा जास्त किमती -- मला सापडले नाहीत. हे अर्थात, लेस्ट्रेडचे म्हणणे खोडून काढत होते. जर मॅकफरलेनला माहिती होते की संपत्ती त्याला मिळणार आहे, तर तो ती कशाला चोरेल?”

शेवटी, सर्व गोष्टींची शहानिशा करून झाल्यावर व एक सेंटही चोरीला न गेल्याचे कळल्यावर, मी नोकराणीकडे माझा मोर्चा वळवला. मिसेस लेक्सींग्टन नावाची ती लहानशी, काळसर, शांत बाई होती. तिचे डोळे संशयी व कडेपर्यंत गेलेले होते. माझी खात्री होती की तिला माहिती असते -- तर तिने नक्की सर्व काही सांगितले असते. पण ती तर तोंड उघडतच नव्हती. हो. तिने मिस्टर मॅकफरलेनला साडेनऊ वाजता घरात घेतले होते ‘असे करण्यापूर्वी माझा हात अडला का नाही’ असे तिला वाटत होते. साडेदहाला ती झोपायला गेली. तिची झोपायची खोली घराच्या दुसऱ्या बाजूला होती आणि या भागातील काहीही तिला ऐकू जात नसे. मिस्टर मॅकफरलेन त्याची टोपीदेखील विसरला होता आणि तिला आठवते आहे त्याप्रमाणे, त्याची काठी हॉलमध्ये राहिली होती. तिला आग लागल्याच्या आरडाओरडयाने जाग आली. तिच्या गरीब

बिचाऱ्या मालकाचा नक्की खून झाला, असे तिला वाटले. त्याला कुणी शत्रू होते का? तसे पाहिले, तर प्रत्येकाला शत्रू असतात. पण मिस्टर ओल्डॅक्रे स्वतःतच गुंग असलेला माणूस होता. फक्त कामासाठी तो लोकांना भेटत असे. तिने तिथे पँटची बटणे पाहिली होती व ती पँट त्याने आदल्या दिवशी घातली होती. लाकडांची चळत खूप कोरडी होती कारण गेला महिनाभर पाऊस पडला नव्हता. त्यामुळे ते लाकूड कापरासारखे जळाले. ती त्या जागी जाईपर्यंत, आगींच्या ज्वाळांशिवाय काही दिसत नव्हते. ती आणि आग विझवणाऱ्या लोकांना मास जळल्याचा वास येत होता. तिला कागदपत्रांबद्दल किंवा मिस्टर ओल्डॅक्रेच्या आर्थिक गोष्टींची, काही माहिती नव्हती.

तेव्हा माझ्या प्रिय वॉटसन, हा माझ्या अपयशाचा पाढा मी वाचला आहे. आणि तरीही -- तरीही ----"त्याने अचानक त्याचे बारीक हात गुन्हेगार सापडल्यासारखे एकमेकांवर दाबले -- मला माहिती आहे, हे सर्व चुकीचे आहे. मला ते जाणवते आहे. त्या नोकराणीला ते माहिती आहे पण ते तिच्या तोंडून बाहेर पडत नाही. तिच्या डोळ्यात काही पश्चात्तापपूर्ण विरोधाची भावना आहे. तिला गुन्ह्यासंबंधी काहीतरी नक्कीच माहिती आहे. वॉटसन, याबद्दल आता अजून काही बोलण्यात अर्थ नाही. मला वाटते, आपले नशीब चांगले असेल तर ही नॉरवूडची बेपत्ता केस, आपल्या यशस्वी केसेसच्या यादीत जाऊन बसेल. समाजाला शांतपणे आज ना उद्या त्याची वाट बघावी लागेल."

मी म्हणालो, "नक्कीच! माणसाच्या बाह्यरूपावरून ज्युरीचे काही मतपरिवर्तन होईल का?"

"माझ्या प्रिय वॉटसन, हे धोकादायक विधान आहे. तुला आठवत असेल की ८७ साली, भयंकर खुनी, बर्ट स्टीव्हन्सला असे वाटत होते की आपण त्याला सोडवावे. रविवारच्या चर्चला नियमितपणे जाणारा, एवढा मृदु स्वभावाचा तरुण मनुष्य तू पाहिला होतास का?'

"खरे आहे."

आपण जोपर्यंत लेस्ट्रेडच्या उपपत्तीला पर्यायी अशी कुठली उपपत्ती मांडू शकत नाही, तोपर्यंत या माणसाचे काही खरे नाही. त्याच्या विरुद्ध उभ्या केलेल्या केसमध्ये तुम्हाला क्वचितच एखादी पळवाट सापडेल. त्या उपपत्तीला पोषक असेच पुढचे सर्व धागेदोरे मिळत आहेत. तसेही आपल्याला चौकशीची सुरवात करता येईल असा, या कागदपत्रांबद्दल एक लहानसा चौकस मुद्दा आहे. बँकेचे पुस्तक बघता मला असे आढळले, की सर्वात कमी पैसे असल्याची पाळी गेल्या वर्षी मिस्टर कॉर्नेलीअस यांना चेक दिल्याने आलेली आहे. एका निवृत्त बिल्डरने त्याच्याबरोबर एवढे मोठे व्यवहार करावे, असा तो होता तरी कोण, हे आपण शोधून काढले पाहिजे. त्याचा या प्रकरणात काही हात असेल का? कॉर्नेलीअस कदाचित दलाल असेल. पण या मोठ्या रकमांची काही पावती आपल्याला सापडली नाही. आता हे चेक वटवणाऱ्या माणसाच्या शोधाच्या दिशेने आपण आपले संशोधन वळवले पाहिजे. पण वॉटसन, लेस्ट्रेडने आपल्या अशीलाला फासावर लटकवल्यावर मग स्कॉटलंड यार्डचा विजय आपल्याला लाजीरवाणा ठरेल."

मला माहिती नाही की त्या रात्री शेरलॉक होम्स कितपत झोपला असेल पण मी जेव्हा न्याहारीसाठी खाली आलो, तेव्हा मला तो अशक्त व त्रासलेला दिसला. आणि अंधारात त्याचे तेजस्वी डोळे जास्तच तेजस्वी दिसले. टेबलाजवळील गालीचा सिगरेटच्या थोटुकांनी व सकाळच्या गेल्या काही दिवसातील वर्तमानपत्रांनी चकाकत होता. टेबलावर एक उघडी तार पडलेली होती.

त्याकडे निर्देश करत तो बोलला, "वॉटसन, तुला याबद्दल काय वाटते?"

ती तार नॉरवूडहून आलेली होती व खालीलप्रमाणे होतीः

नवीन महत्वाचा पुरावा हाती आला आहे. मॅकफरलेन गुन्हेगार असल्याचे नक्की सिध्द होते आहे. यापुढे तुम्ही या केसच्या शोधात लक्ष घालू नये. लेस्ट्रेड

मी म्हणालो, "हे गंभीर दिसते आहे."

होम्स कटुतेने हसून म्हणाला, “हे लेस्ट्रेडचे विजयाचे छोटेसे कुकू च कू आहे. आणि आत्ताच या केसचा नाद सोडून देणे चुकीचे ठरेल. शेवटी नवीन महत्वाचा पुरावा, हे दुधारी शस्त्र आहे. आणि लेस्ट्रेडच्या कल्पनेपेक्षा वेगळेच काही असू शकेल. वॉटसन, तू न्याहारी कर आणि आपण दोघे बाहेर जाऊन काय करता येईल ते बघू. मला वाटते आज मला तुझ्या सहकार्याची व नैतिक पाठींब्याची गरज आहे.”

माझ्या मित्राने न्याहारी केली नाही. त्याच्या जोरदार विचारांच्या काळात त्याला तहानभूक लागत नसे. भुकेने कोलमडून पडण्यापर्यंतचा त्याचा बळकटपणा, मला माहिती होता. माझ्या वैद्यकीय सल्ल्याला प्रत्युत्तर देत तो म्हणे, “आत्ता मला माझी शक्ती व जोर, अन्नपचनात संपवायचा नाही.” त्यामुळे तो काही न खाता आज बाहेर पडला, तेव्हा मला काही आश्चर्य वाटले नाही. आम्ही नॉरवूडकडे निघालो. तेथील त्या उपनगरीय घराभोवती माझ्या अपेक्षेप्रमाणे बऱ्याच फुकट्या बघ्यांची गर्दी जमलेली होती. गेटमधून आत शिरताना आम्हाला लेस्ट्रेड भेटला. त्याचा चेहरा विजयोन्मादाने झळकत होता. हालचालीत विजयाचा डौल दिसत होता.

तो ओरडला, “कसे काय मिस्टर होम्स, तुम्ही आम्हाला अजून खोटे ठरवले नाही का? तुम्हाला तुमचा बेकार रस्ता सापडला की नाही?”

माझा मित्र म्हणाला, “अजून मी कुठल्याही निष्कर्षावर पोचलो नाही.”

“पण आम्ही कालच आमचा निष्कर्ष काढला आणि आता तो खरा असल्याचे सिध्द झाले आहे. तर मिस्टर होम्स, यावेळेस आम्ही तुमच्या पुढे आहोत, हे तुम्ही कबूल केले पाहिजे.”

होम्स म्हणाला, “काही असामान्य घटना घडली आहे, हे तुम्ही नक्कीच जाणले आहे..”

लेस्ट्रेड जोराने हसला. “बाकीच्या लोकांचे एवढे काही नाही. पण तुम्ही हरल्याचे, तुम्हाला फार वाईट वाटते आहे. एखादा माणूस नेहमी त्याचेच बरोबर निघणार, असे धरून चालू शकत

नाही, नाही का, डॉ वॉटसन? सभ्य गृहस्थहो, कृपया इकडून या. मी तुम्हाला एकदाचे तुमचे समाधान होईल असे सांगून टाकतो, की मॅकफरलेननेच हा गुन्हा केलेला आहे."

त्याने आम्हाला एका अंधारी पॅसेजमधून त्याच्या मागील एका अंधारी हॉलमध्ये नेले. तो म्हणाला, "खून केल्यानंतर मॅकफरलेन त्याची टोपी न्यायला परत आत आला असणार. आता इकडे पहा." त्याने नाटकीपणे एक काडी ओढली व तिच्या उजेडात, पांढऱ्या भिंतीवरील एक रक्ताचा डाग दाखवला. त्याने काडी अजून जवळ नेल्यावर मला दिसले की तिथे फक्त डागापेक्षा अजून काहीतरी होते. तो ठळक असा अंगठ्याचा ठसा होता.

"मिस्टर होम्स, तुमच्या भिंगाने त्याकडे बघा."

"हो. मी तेच करतो आहे."

"तुमच्या हे लक्षात येते आहे का, की दोन अंगठ्यांचे ठसे कधीच सारखे नसतात?"

"मी तसे ऐकले आहे."

"ठीक आहे मग, आज सकाळी मी सांगितल्यावरून मॅकफरलेनच्या उजव्या अंगठ्याचा ठसा मेणात घेतला गेला आहे. तो या खुणेशी तुम्ही जुळवून बघता का?"

त्याने जेव्हा तो मेणातील ठसा रक्ताच्या डागाजवळ नेला, तेव्हा ते दोन्ही संशयातीतपणे तंतोतंत सारखे असल्याचे भिंगाशिवायच दिसून आले. माझी खात्री झाली की आता आमचा कमनशीबी अशील गाळात गेला.

लेस्ट्रेड म्हणाला, "म्हणजे आता हे नक्की झाले."

"मी अजाणतेपणे दुजोरा देत बोललो, "हो. आता हे नक्की झाले."

होम्स म्हणाला, "हे नक्की झाले."

त्याचा सूर माझ्या कानाला खटकला. मी त्याच्याकडे बघायला वळलो. त्याचा चेहरा झरझर बदलला. तो आतल्या आनंदाने बदलत होता. त्याचे दोन्ही डोळे ताऱ्यांसारखे चकाकत होते. मला असे जाणवत होते की तो त्याचे जोरदार हसू लपवण्यासाठी, निष्फळ प्रयत्न करतो आहे.

शेवटी तो म्हणाला, "अरे प्रिय मित्रा, आता हे असे होईल असे कोणाला वाटले असेल? माझी खात्री आहे की दिसायला चांगला असा तरुण मनुष्य असला, तरी ते कितीही फसवे दृष्य असू शकते. आपला निष्कर्ष आपण कधीही विश्वासार्ह धरु नये, असा धडा आपण यातून घेतला पाहिजे, नाही का लेस्ट्रेड?"

लेस्ट्रेड बोलला, "हो. आपल्यापैकी काहीजण अगदी ठामपणे त्यांच्या निष्कर्षाला चिकटून बसले होते. त्या माणसाचा स्वभाव वेड्यासारखा उद्धट होता. पण आपण त्याच्याबद्दल कटुता ठेऊ शकत नाही."

"जर आपण विचार केला तर असे म्हणावे लागेल, की या तरुण माणसाने खुंटीवरुन टोपी घेताना त्याचा उजवा अंगठा भिंतीवर दाबला गेला असेल. किती सहजपणे ही चांगली गोष्ट घडून आली." होम्स वरवर शांत होता पण बोलतांना त्याच्या दबलेल्या उत्सुकतेने व उत्तेजितपणाने त्याचे शरीर कापत होते.

"लेस्ट्रेड, हा उल्लेखनीय शोध कुणी लावला?"

"ती नोकराणी, मिसेस लेक्सींग्टन! तिने रात्रीच्या कॉन्स्टेबलच्या ते लक्षात आणून दिले."

"रात्रीचा कॉन्स्टेबल कुठे होता?"

"जिथे गुन्हा घडला त्या खोलीत कोणी हात लाऊन काही हलवू नये म्हणून, तो पहारा देत होता."

"पण पोलिसांनी ती खूण काल रात्री कशी पाहिली नाही?"

“आम्हाला हॉलची बारकाईने तपासणी करण्याचे काही विशेष कारण आहे, असे वाटले नाही. शिवाय, तुम्ही पाहिलेत तर हॉलची जागाही फारशी महत्वाची वाटत नाही.”

“नाही. नाही ---- अर्थातच नाही. मी संशयातीतपणे असे समजतो की ती खूण काल पण तिथे होती, नाही का?”

लेस्ट्रेडने त्याचा मानसिक तोल ढळतो आहे की काय, अशा तऱ्हेने होम्सकडे पाहिले. कोणाचीही करमणूक होईल अशी लेस्ट्रेडची पद्धत व जरा रानटी निरीक्षण बघून, मीदेखील आश्चर्य चकित झालो होतो.

लेस्ट्रेड बोलला, “मला माहिती नाही की तुम्हाला असे वाटते आहे का, की मॅकफरलेन त्याच्या विरुद्धचा पुरावा बळकट करण्यासाठी काळोख्या रात्री तुरुंगातून बाहेर आला. मी ही गोष्ट जगातील कुठल्याही जाणकाराकडे सोपवतो की ती अंगठ्याची खूण त्याची होती की नाही?”

“ती निर्विवादपणे त्याच्याच अंगठ्याची खूण होती.”

लेस्ट्रेड चिडून म्हणाला, “बास. पुरे करा. मी व्यवहारी माणूस आहे. मिस्टर होम्स, जेव्हा मला माझा पुरावा मिळाला, तेव्हा मी माझा निष्कर्ष काढला. जर तुम्हाला याउप्पर काही सांगायचे असेल, तर मी हॉलमध्ये वृत्तांत लिहित बसलेलो असेन, तिथे येऊन सांगा. ”

होम्सने त्याची मानसिक शांती परत मिळवली. तरी मला त्याच्या हावभावात करमणूक झाल्याचा भाव असल्याचा, संशय येत होता.

“वॉटसन, ही केस फार दुःखद दिशेने चालली आहे, नाही का? आणि तरीही त्यात आपल्या अशीलाला आशा वाटेल, अशा काही विशेष बाबी आहेत.’

मी मनापासून बोललो, “हे ऐकून मला आनंद झाला. मला वाटले तो फासावर लटकणार.”

“प्रिय वॉटसन, मी इतक्या टोकाला जाऊन बोलणार नाही. पण गोष्ट अशी आहे की

ज्याला आपला मित्र फार महत्व देतो आहे, त्या पुराव्यात एक गंभीर कच्चा दुवा आहे."

"खरेच का, होम्स?"

"तो असा आहेः मी काल जेव्हा हॉलची तपासणी केली तेव्हा ती खूण तिथे नव्हती. आणि वॉटसन, आता आपण उन्हात थोडे फिरून येऊ."

थोड्या गोंधळलेल्या पण आशेचे किरण डोकावणाऱ्या अवस्थेत, मी माझ्या मित्राबरोबर बागेत फिरलो. होम्स आळीपाळीने घराच्या प्रत्येक बाजूचे बारकाईने निरीक्षण करत होता. मग आम्ही आत जाऊन, तळघरापासून छताखालील खोलीपर्यंत फिरलो. बहुतेक खोल्या सामानाशिवाय रिकाम्या पडलेल्या होत्या. तरीही होम्सने त्या अगदी सूक्ष्मतेने तपासल्या. शेवटी एकदम वरच्या मजल्यावरील भाड्याने न दिलेल्या तीन खोल्याच्या बाहेर त्याला एकदम आनंदाचा झटका आला.

तो म्हणाला, "वॉटसन, या केसमध्ये खूप विलक्षण बाबी लक्षात येत आहेत. मला वाटते आता आपला मित्र लेस्ट्रेडला विश्वासात घ्यायची वेळ झाली आहे. आपल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर थोडे हास्य विलसू लागेल. आणि जर माझा या केसबद्दलचा अंदाज खरा ठरला, तर आपण त्याला उपकृत करू शकू. हो. हो. आपण कसे कसे काय काय करायचे, याचा मी विचार करतो."

स्कॉटलंड यार्ड इन्स्पेक्टर अजूनही केसचा वृतांत लिहित बसला होता. त्याच्या जवळ जाऊन होम्स बोलला, "तू या केसचा वृतांत लिहित होतास का?"

"हो."

"तुला असे वाटत नाही का, की तू तो लिहायची जास्त घाई करतो आहेस? मला नाईलाजाने असे म्हणावे लागते आहे, की तुझ्याकडील पुरावा पुरेसा नाही आहे."

लेस्ट्रेड माझ्या मित्राला ओळखत असल्याने, त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करण्यासारखे नाही, हे तो समजून होता. त्याने पेन खाली ठेऊन चौकसपणे होम्सकडे पाहिले.

“तुम्हाला काय म्हणायचे आहे, मिस्टर होम्स?”

“मला एवढेच म्हणायचे आहे की या केसमधील महत्वाच्या साक्षीदाराला तुम्ही विचारात घेतलेले नाही.”

“तुम्ही त्याला इथे हजर करू शकता का?”

“मला वाटते मी करू शकतो.”

“मग करा.”

“मी कसून प्रयत्न करतो. तुझ्याकडे किती कॉन्स्टेबल आहेत?”

“तिघेजण आहेत. जवळच आहेत.”

होम्स म्हणाला, “छान! ते भले दांडगे व शक्तीशाली आवाज असलेले आहेत का?

“हो. हो. नक्की. पण मला समजत नाही की त्यांच्या आवाजाशी तुम्हाला काय करायचे आहे?

होम्स म्हणाला, “कदाचित मी ते सांगतो व त्याबरोबर अजूनही एकदोन गोष्टी सांगतो. कृपया तुझ्या लोकांना बोलावून घे. मी प्रयत्न करतो.”

पाच मिनिटांनी, तीन पोलीस हॉलमध्ये जमले.

बाहेरच्या गॅरेजसारख्या खोलीत ( outhouse ) तुम्हाला खूप गवत दिसेल. मी तुम्हाला त्यातील दोन पेंढ्या आणायला सांगतो. त्यामुळे मला जो साक्षीदार हवा आहे, तो मिळायला मदत होईल. आभारी आहे. वॉटसन, मला वाटते तुझ्या खिशात काडेपेटी असेल. मिस्टर लेस्ट्रेड, आता मी तुम्हाला सर्वांना माझ्याबरोबर एकदम वरच्या मजल्यावर यायला सांगतो.”

मी आधी सांगितल्याप्रमाणे, त्या तीन रिकाम्या खोल्यांच्या बाहेर रुंद पॅसेज होता. त्याच्या शेवटच्या टोकाला, आम्ही सर्वजण होम्सने सांगीतल्याप्रमाणे उभे राहिलो.

कॉन्स्टेबल व लेस्ट्रेड जोराने हसत व एकमेकांबरोबर ढकलाढकली करत आणि माझ्या मित्राकडे नवलपूर्ण कटाक्ष टाकत, त्याला वाकुल्या दाखवत उभे होते. होम्स आमच्यासमोर करामत दाखवणाऱ्या जादुगारासारखा उभा राहिला.

"तू कृपया एका कॉन्स्टेबलला दोन बादल्या पाणी आणायला सांगशील का? खोलीच्या मध्यभागी त्या पेंढ्या ठेवा. आता मला वाटते, सर्व तयारी झाली आहे."

लेस्ट्रेडचा चेहरा रागाने लाल होऊ लागला. "मिस्टर शेरलॉक होम्स, तुम्ही आमच्या बरोबर खेळ खेळत आहात का? जर तुम्हाला काही माहिती असेल तर ते असली नाटके न करता, सरळपणे नक्कीच सांगू शकता."

"ओहो! लेस्ट्रेड, मी तुम्हाला सर्वांना खात्री देतो, की मी काही हेतूनेच हा प्रकार करतो आहे. तुम्हाला बहुधा आठवत असेल की तुम्ही माझ्यावर काही विनोद करत होतात. तेव्हा तुमचे पारडे जास्त जड होते. तेव्हा आता तुम्ही माझ्यावर खार न खाता, माझा थोडा नाटकीपणा सहन करा. वॉटसन, तू ती खिडकी उघडून, गवताच्या पेंढीला कडेनी आग लावशील का?

मी तसे केले. वाळके गवत कडकड आवाज करत पेटून उठले. पॅसेजभर जळका वास येऊ लागला व धूर पसरला.

लेस्ट्रेड, आता आपण आपल्याला पाहिजे असलेला साक्षीदार शोधता येतो का, ते बघू. आता आपण सगळे आग आग असे ओरडू. चला सुरवात करा. एक दोन तीन ---- "

आम्ही सगळे ओरडलो, "आग! आग!"

"अजून एकदा ओरडा. सर्वांचा आवज एकत्र येऊ दे."

“आग! आग;” हा आवाज नक्की नॉरवूडभर पसरला.

तो आवाज विरतो न विरतो तोच एक नवलपूर्ण गोष्ट घडली. पॅसेजच्या शेवटची भक्कम वाटणारी भिंत फोडून एक दरवाजा एकदम सताड उघडला आणि एक छोटासा सुरकुत्या पडलेला वयस्क माणूस, एखाद्या सशाने बिळाबाहेर पडावे तसा, वेगाने सुटलेल्या क्षेपणास्त्रासारखा बाहेर आला.

होम्स शांतपणे म्हणाला, “वा! वा! झकास! वॉटसन, आगीवर बादलीभर पाणी ओत. तसे केलेले चालेल. लेस्ट्रेड, मला तुझा नाहीसा झालेला मुख्य साक्षीदार, मिस्टर जोन्स ओल्डॅक्रे तुझ्यासमोर पेश करू दे.”

लेस्ट्रेड डोळे फाडून त्या नवागताकडे आश्चर्यपूर्वक बघत राहिला. पॅसेजमधील भरपूर प्रकाशात ओल्डॅक्रे रागावलेला दिसत होता. तो आमच्याकडे व आगीकडे आळीपाळीने बघत राहिला. तो फिकट करड्या डोळयांचा व पांढऱ्या पापण्यांचा, भयानक, लबाड व दुष्ट चेहरा होता.

शेवटी लेस्ट्रेडच्या तोंडून कसेबसे शब्द फ़ूटले, “हे काय आहे? हा सर्व वेळ इथे काय चालले आहे?”

लाल तोंड झालेल्या, चिडलेल्या गुप्तहेरापासून लांब जाऊन ओल्डॅक्रे खुनशीपणे हसला.

“मी कुणाला काही इजा केलेली नाही.”

इजा केलेली नाही? एका निरपराध माणसाला तू फाशीच्या तख्तापर्यंत पोचवले आहेस. हा गृहस्थ इथे नसता, तर त्या बिचाऱ्या निरपराध माणसाला नक्कीच फाशी झाली असती.”

तो दुर्दैवी माणूस दुःखाने रडायला आला.

“सर, हा माझा फक्त एक विनोद होता.”

“ओहो! विनोद होता का? मी तुला धमकावतो, की आता तुला हसायचे काही कारण उरणार नाही. त्याला पकडा व मी येईपर्यंत हॉलमध्ये ठेवा.” ते गेल्यावर त्याने पुढे चालू ठेवले. ”मिस्टर होम्स, मी कॉन्स्टेबल्ससमोर बोलू शकलो नाही. पण आता मी वॉटसनसमोर तुम्हाला सांगतो, ही तुम्ही सर्वात चांगली गोष्ट केली आहे. मला हे सर्व गूढच वाटत होते. पण तुम्ही हे कसे काय जमवलेत? तुम्ही एका निरागस माणसाचा जीव वाचवला आहे. एक गुंतागुंतीचे प्रकरण सोडवले आहे. त्यामुळे आता स्कॉटलंड यार्डमध्ये माझी बदनामी होणार नाही.”

होम्स हसला आणि लेस्ट्रेडच्या खांद्यावर थोपटले.

“तुझी बदनामी होण्याचे बाजूलाच राहिले पण तुझी कीर्ती वाढेल. तू लिहित असलेल्या त्या वृत्तांतात काही किरकोळ बदल कर. मग त्यांना कळेल की इन्स्पेक्टर लेस्ट्रेडच्या डोळ्यात धूळ फेकणे किती अवघड असते.

“आणि तुमचे नाव जाहीर व्हायला नको का?”

“मुळीच नको. काम झाले आणि मला सर्व काही भरून पावले. कदाचित माझा उत्साही लेखक मित्र कधीतरी ही गोष्ट कागदावर उतरवेल, तेव्हा मला त्याचे श्रेय मिळेल, काय वॉटसन? आता हा उंदीर कुठे लपून बसला होता, ते बघू.”

पॅसेजच्या टोकाला सहा फूटांवर प्लायवूड व प्लॅस्टरची भिंत उभारून त्यात एक दार लपवून बसवले होते. त्या दाराच्या वरील बाजूस असलेल्या छतातील फटीतून उजेड येण्याची तजवीज केली होती. आत थोडेफार फर्निचर होते. खाण्यापिण्याची सोय केली होती. पुस्तके व कागदपत्रेही ठेवली होती.

आम्ही बाहेर आल्यावर होम्स म्हणाला, “तो बिल्डर असल्याचा त्याला फायदा होता. त्यामुळे तो दुसऱ्या कुणाची मदत न घेता, त्याची लहानशी लपून बसायची जागा बांधू शकला. अर्थात, त्याच्या त्या नोकराणीचे अमूल्य उपकार पण तू स्मरायला पाहिजेस, लेस्ट्रेड.”

“ते मी करतो. पण तुम्हाला या गुप्त खोलीचा छडा कसा काय लागला, मिस्टर होम्स?

“मी मनात ठरवले, की हा माणूस घरातच कुठेतरी दडून बसलेला आहे. जेव्हा मी वरील मजल्यावरील पॅसेज, खालील मजल्यावरील पॅसेजपेक्षा सहा फुटाने कमी असल्याचे पाहिले, तेव्हा माझ्या ती जागा लक्षात आली. जर आग लागली तर त्याला दडून बसणे शक्य होणार नाही, त्याला तिथून बाहेर पडावेच लागेल. असा विचार करून मी तो स्वतःहून बाहेर पडेल व आपली थोडी करमणूकही होईल, असा बेत आखला. नाहीतर आपण जाऊन त्याला पकडू शकलो असतोच. शिवाय तुझ्या सकाळच्या टोल्याला प्रतिटोला द्यायचा होता.”

“खरच सर, तुम्ही माझ्या तोडीस तोड निघालात. पण तो घरातच आहे, हे तुम्हाला कसे कळले?

लेस्ट्रेड, अंगठ्याच्या खुणेवरून तू म्हणालास की निर्णय झाला. ते वेगळ्या अर्थाने खरे होते. मी आदल्या दिवशी पाहिले, तेव्हा ती खूण तिथे नव्हती. तुला माहिती असेल तर, मी खूप बारकाईने निरीक्षण करतो. मी हॉलचे निरीक्षण केले, तेव्हा तिथे भिंतीवर काही नव्हते. तेव्हा ती खूण रात्री केली गेल्याचे व ती बहुधा ओल्डॅक्रेनेच केल्याचे माझ्या लक्षात आले.”

“पण कशी?”

“अगदी साधे आहे. जेव्हा कागदपत्रे सील केली गेली, तेव्हा ओल्डॅक्रेने मॅकफरलेनला त्याचा अंगठा मऊ मेणात बुडवून, एका पाकिटावर सीलबंद करण्यासाठी उमटवायला सांगितला. हे इतके पटकन व सहजपणे केले गेले, की मॅकफरलेनला देखील त्याची आठवण राहिली नाही. असे घडले असेल, की ओल्डॅक्रेला देखील त्याचा उपयोग भिंतीवर करावा असे पहिल्यांदा सुचले नाही. त्याच्या त्या नवीन बांधलेल्या गुहेत राहून विचार करतांना त्याला ते सुचले असणार. मॅकफरलेनला अटक करण्यासाठी पुरावा म्हणून याचा चांगला उपयोग होऊ शकेल, हे त्याला अचानक जाणवले. असे करणे, ही त्याच्यासाठी सोपी गोष्ट होती. स्वतःला टाचणी टोचून थोडे

रक्त काढायचे व तो मेणातील ठसा त्यात बुडवून भिंतीवर उमटवायचा, असा बेत करून त्याने रात्री स्वतः किंवा नोकराणीमार्फत तो पार पाडायचा, असे ठरवले व पार पाडला. जर तुम्ही ओल्डॅक्रेकडील कागदपत्रे तपासली, तर मी तुला पैज लाऊन सांगतो की तुम्हाला त्यावर अंगठ्याचा ठसा असलेले सील दिसेल."

लेस्ट्रेड म्हणाला, "छान! फार छान! आता मला सर्व पूर्णपणे नीट कळले. पण या फसवणुकीचे कारण काय. मिस्टर होम्स?"

एका गुप्तचराची अरेरावी अचानक बदलून, शिक्षकाला प्रश्न विचारणाऱ्या मुलात झालेली बघणे, करमणूक करणारे होते.

"मला वाटते ते स्पष्ट करणे, फारसे अवघड नाही. दुष्ट, सूडाने पेटलेली अशी सभ्य व्यक्ती खाली आपल्याकरता थांबली आहे. तुला माहिती आहे की, एकदा मॅकफरलेनच्या आईने त्याला नाकारले होते. माहिती नाही म्हणतोस? मी तुला सांगितले होते की तू आधी ब्लॅकहिथला जा व मग नॉरवूडला. तर त्याच्या दृष्टीने ती जुनी जखम त्याच्या दुष्टपणाचे बेत आखणाऱ्या डोक्यात ठसठसत होती. आयुष्यभर तो सूड घेण्यासाठी तडफडत होता, पण संधी मिळाली नाही. मागील एकदोन वर्षात, काही गोष्टी त्याच्या मनाविरुद्ध घडल्या -- मला वाटते, हा माझा गुप्तपणे केलेला तर्क आहे. आणि मग एक वाईट बेत आखून, त्याने त्याच्या देणेकऱ्यांना फसवायचे ठरवले. त्यासाठी त्याने कुणा मिस्टर कॉर्नेलीअस यांना एक मोठा चेक दिला. मला वाटते ते त्याचेच दुसरे नाव होते. मी अजून त्या चेक्सची तपासणी केली नाही. पण एका लहानशा गावात ओल्डॅक्रे वारंवार जाऊन दुसऱ्या नावाने रहात असावा आणि बँकेला चेक त्या नावाने देत असावा. त्याला त्याचे नाव पूर्णपणे बदलून टाकायचे असावे व त्या नावाने बँकेतून पैसे काढून घ्यायचे असावे. ते घेऊन पोबारा करायचा व दुसरीकडे जाऊन बस्तान बसवायचे, असा त्याचा बेत असावा."

"शक्य आहे."

त्याच्या असे लक्षात आले असावे की असे नाहीसे होण्याने, त्याचा सगळा पूर्वेतिहास पुसला जाईल आणि शिवाय पूर्वाश्रमीच्या प्रेयसीच्या मुलाने आपला खून केला आहे असे भासवल्यास, वर सूडही उगवता येईल. हे खलनायकगिरीचे टोक होते. ते त्याने प्रत्यक्ष अंमलात आणले. गुन्हा करायला प्रवृत्त होण्याचे कारण मिळावे, म्हणून इच्छापत्राचे नाटक होते. मॅकफरलेनला त्याच्या पालकांपासून लपवून गुप्त भेट घ्यायला प्रवृत्त केले गेले. काठी विसरणे, रक्त, प्राण्यांचे अवशेष आणि वखारीतील बटणे हा सर्व बेत डोके वापरून केलेला होता. हे जाळे असे बेमालूमपणे विणले होते की काही तासांपूर्वी मला वाटत होते, की यातून सुटणे शक्य नाही. पण त्या दुष्टाला पट्टीच्या कलाकाराचे वरदान नव्हते. कुठे आणि केव्हा थांबायचे, हे त्याला कळले नाही. हुशारीने केलेला बेत तो सुधारायला गेला -- दुर्दैवी बळीच्या मानेभोवतीची दोरी अजून घट्ट करायच्या नादात, त्याचा सर्व बेत फसला. लेस्ट्रेड, चल आपण खाली जाऊन त्याला भेटू. मी त्याला फक्त एकदोन प्रश्न विचारू इच्छितो."

तो दुष्ट माणूस दोन्ही बाजूला पोलीस असलेल्या अवस्थेत खोलीत बसलेला होता. तो तक्रारीच्या सुरात बोलला, "सर, हा फक्त विनोद होता -- व्यवहारी विनोद! त्याहून अधिक काही नाही. सर, मी तुम्हाला खात्री देतो, की मी फक्त माझ्या नाहीसे होण्याचा परिणाम बघण्यासाठी लपून बसलो. बिचाऱ्या मॅकफरलेनला काही त्रास होईल, असे मी काही केले असे तुम्हाला वाटत असेल, तर तो माझ्यावर अन्याय ठरेल."

लेस्ट्रेड बोलला, "ते ज्युरी ठरवतील. आम्ही तुला खुनाच्या प्रयत्नासाठी नाही तरी, काही बेकायदेशीर व त्रासदायक असा, मिळून प्रयत्न केल्याबद्दल अटक करतो." होम्स म्हणाला, "तुझा बँकेतील खात्यात मिस्टर कॉर्नेलीअसच्या नावाने जमा झालेले पैसे, तुझे घेणेकरी त्यांच्या वसुलीसाठी वापरतील.

त्या छोट्या माणसाने त्याची दुष्ट नजर माझ्या मित्राकडे वळवली.

तो म्हणाला, "मला तुमचे आभार मानले पाहिजेत. कदाचित पुढेमागे मी कर्ज फेडेन."

होम्स उदारपणे हसला.

तो म्हणाला, “मला वाटते, निदान काही वर्षे तरी तुला भरपूर काम असेल. तसेही, वखारीत तुझ्या जुन्या पँटच्या शेजारी तू काय ठेवले होतेस? मेलेला कुत्रा, ससा की इतर काही? तुला सांगायचे नाही? प्रिय माणसा, किती हा क्रूरपणा! मला वाटते, रक्त व राखेसाठी खूप ससे लागले असतील. वॉटसन, जर तू कधी ही गोष्ट लिहिलीस तर ससे तुला उपयोगी पडतील.”

# The Adventure of the Empty House

# रिकाम्या घराचे साहस

१८९४च्या उन्हाळयातील गोष्ट आहे. माननीय रोनाल्ड अडेअरच्या अत्यंत वेगळयाच व स्पष्टीकरण देता न येणाऱ्या पद्धतीने झालेल्या खुनाने, नखरेल जग दुःखात बुडाले होते व लंडनचे या प्रकरणातील स्वारस्य वाढले होते. खुनाबद्दलच्या पोलिसांनी शोधून काढलेल्या गोष्टी, लोकांना आधीच माहिती होत्या. पण बऱ्याच गोष्टी अजून दडलेल्या होत्या. सर्व बाबी कोर्टासमोर इतक्या

बळकटपणे खुल्या केल्या गेल्या होत्या, की त्याच बाबी परत पुढे आणण्यात काही अर्थ नव्हता. फक्त आता दहा वर्षांनी, मी त्या उल्लेखनीय साखळीमधील कच्चे दुवे सांगण्याचे स्वातंत्र्य घेतो आहे. ती केस उत्कंठापूर्ण तर होतीच, पण माझ्या साहसी आयुष्यात, कुठल्याही गोष्टीतील अविश्वसनीय अशा प्रसृत झालेल्या माहितीमुळे मला जोरदार धक्का बसला होता व आश्चर्य वाटले होते. आत्ता, इतक्या वर्षांनतरही मी त्या केसचा विचार करू लागलो, तर माझ्या नेणीवेत दडलेल्या अविश्वसनीय अशा बाबींनी मी थरारून जातो. मला आनंदाचे व आश्चर्याचे भरते येते. त्या माणसाने स्वतःच्या तोंडाने माझ्यावर घातलेल्या बंधनामुळे मी गप्प होतो. पण गेल्या महिन्याच्या तीन तारखेला मी त्यातून मुक्त झाल्याने, आता हे जाहीर करणे माझे कर्तव्य आहे. आता लोक मला दोष देणार नाहीत. कारण वेळोवेळी मी त्या उल्लेखनीय माणसाचे विचार व कृत्ये याबद्दल काही वक्तव्ये केली असतांना, लोकांनी त्यात फार रुची दाखवली होती.

शेरलॉक होम्सशी असलेल्या माझ्या गाढ मैत्रीमुळे, घडलेल्या गुन्ह्यात मला प्रचंड रस असे. आणि तो नाहीसा झाल्यावर, लोकांसमोर उभे राहिलेले अनेक प्रश्न मी नेहमीच काळजीपूर्वक वाचून काढत असे. एकाहून जास्त वेळा मी ते माझ्या समाधानाखातर त्याच्या पद्धतीने सोडवण्याचा प्रयत्नदेखील केलेला आहे. अर्थात मला त्यात फारसे यश मिळालेले नाही. पण त्यातील कुठलीच केस मला रोनाल्ड अडेअरच्या दुःखमय शेवटाइतकी भावलेली नाही. जेव्हा एखाद्या अनोळखी व्यक्तींच्या खुनाबद्दलचे पुरावे व उलटतपासणी मी वाचतो, तेव्हा मला शेरलॉक होम्सच्या मरणामुळे समाजाचे किती नुकसान झाले आहे, हे जाणवते. मला वाटते, खात्रीपूर्वक वाटते, की या विचित्र घटनेसंबंधीच्या बाबी त्याला नक्कीच रुचीपूर्ण वाटल्या होत्या. पोलीसांच्या तपासाची मदत होतीच. किंवा युरोपमधील पहील्या सुसूत्र निरीक्षक व जागृत मनामुळे, ते गुन्हेगार काय करतील याचा अंदाज होताच. दिवसभर इकडेतिकडे फिरतांना, मी मनातल्या मनात केसचा विचार करत होतो. पण मला पुरेसे योग्य असे स्पष्टीकरण, सापडत नव्हते. दोनदा तेच ते सांगण्यापेक्षा, जसजशा गोष्टी लोकांना माहिती होत गेल्या, तसतशा मी सांगत जातो.

माननीय रोनाल्ड अडेअर हा मेनुथच्या ऑस्ट्रेलीयन कॉलनीचा गव्हर्नर असलेल्या उमरावाचा दुसरा मुलगा होता. मोतीबिंदूचे ऑपरेशन करण्यासाठी अडेअरची आई तिचा मुलगा रोनाल्ड व मुलगी हिल्डा यांच्याबरोबर ऑस्ट्रेलियाहून आली होती. ते ४२७, पार्क गल्ली इथे रहात होते. उत्तम अशा समजल्या जाणाऱ्या त्या समाजात, मुले इकडे तिकडे फिरत असत. कोणी शत्रू नसलेले असे, तिथले वातावरण चांगले होते. मिस एडिथ वूडलेबरोबर रोनाल्डचा साखरपुडा ठरला होता. पण परस्पर संमतीने, तो काही महिन्यांपूर्वी मोडला गेला. त्यामुळे काही खोलवर भावनिक परिणाम झाले नाहीत. त्या माणसाचे आयुष्य नेहमीच्या पारंपारीक कोत्या चाकोरीतून चालले होते. कारण त्याच्या सवयी शांत होत्या आणि स्वभाव फार भावनाशील नव्हता. तरीसुद्धा या सरळमार्गी तरुण उमरावावर ३० मार्च १८९४ मध्ये रात्री दहा ते अकरा वीसच्या दरम्यान, फार विचित्र व अकस्मिक पद्धतीने मरण चालून आले.

रोनाल्ड अडेअर हा पत्त्यांचा शौकीन होता. तो सतत खेळत असे. पण त्याला काही इजा होईल असा जुगार नव्हे. तो कॅव्हेन्डीश, बॅगाटेल व बाल्डविन या पत्त्यांच्या क्लबचा सभासद होता. त्याच्या मृत्युच्या दिवशी, बॅगाटेल क्लबमध्ये त्याने सकाळी व दुपारीही पत्त्यांचा एक प्रसिद्ध खेळ खेळला. मिस्टर मुरे, सर जॉन हार्डी व कर्नल मोरान हे त्याच्याबरोबर खेळले. तो खेळ खेळतांना प्रत्येकाला साधारण सारखेच पत्ते आले होते. अडेअरने पाच पौंड किंवा जास्त गमावले असावेत. त्याचे नशीब बरे होते. त्यामुळे एवढ्याश्या नुकसानाचे त्याला काही वाटले नाही. रोज रात्री तो या ना त्या क्लबमध्ये खेळायचा. पण तो सावधपणे खेळणारा होता आणि बहुतेक वेळा जिंके. असा पुरावा सापडला की गॉडफ्रे मिलनर व उमराव बालमोराल यांच्याबरोबर काही आठवड्यांपूर्वी खेळतांना, कर्नल मोरानबरोबरच्या भागीदारीमध्ये, त्याने एका वेळी चारशे वीस डॉलर जिंकले. खुनाच्या घटनेची चौकशी करतांना, ही अलीकडची खबर पुढे आली.

खुनाच्या दिवशी संध्याकाळी तो बरोबर दहा वाजता घरी परतला. त्याची आई व बहीण कोणातरी नातेवाईकाकडे गेलेल्या होत्या. नोकराणीने सांगितले की तिने त्याला दुसऱ्या मजल्यावरील पुढच्या खोलीत शिरतांनाचा आवाज ऐकला. ती त्याची उठाबसायची खोली होती. तिने तिथे शेकोटी पेटवली. ती पेटल्यावर तिने खिडकी उघडली. त्यानंतर अकरा वाजून वीस मिनिटांनी मेनुथ बाईसाहेब व त्यांची मुलगी येईपर्यंत, तिथून काही आवाज आला नाही. मुलाला शुभ रात्री म्हणण्यासाठी बाईसाहेब त्यांच्या मुलाच्या खोलीत शिरल्या, तेव्हा त्यांना असे आढळून आले की दार आतून बंद आहे. त्यांच्या हाकांना व दार वाजवण्याला काही उत्तर मिळाले नाही. मग मदत मिळवून जबरदस्तीने दार उघडण्यात आले, तेव्हा तो दुर्दैवी तरुण टेबलाजवळ पडलेला आढळला. मोठ्या पिस्तुलाच्या गोळीने त्याच्या डोकयाला भली थोरली जखम झाली होती. पण कुठल्याही प्रकारचे शस्त्र खोलीत सापडले नाही. टेबलावर दहा पौंडांच्या दोन नोटा पडल्या होत्या व सोन्याचांदीच्या नाण्याच्या स्वरूपात, सतरा पौंड पडले होते. या पैशांचे ढीग रचून ठेवलेले होते. एका कागदावर क्लबमधील काही मित्रांच्या नावापुढे काही आकडे लिहिलेले होते. त्यावरून असा निष्कर्ष काढला गेला, की तो मृत्यूपूर्वी त्याच्या पत्त्यांच्या खेळातील हारजितीचा हिशेब करत होता.

परिस्थितीच्या मिनिटाभराच्या तपासणीने, ती केस अधिक गुंतागुंतीची होऊन बसली. पहिल्या प्रथम हे समजले नाही, की त्या तरुण माणसाने दार आतून का लावून घेतले होते. अशी शक्यता होती, की खुन्याने दार लावले असेल आणि त्यानंतर खिडकीतून पळून गेला असेल. खिडकीपासून बाहेर उडी मारायच्या जमीनीचे अंतर निदान वीस फूट होते व खाली फुलांनी भरलेल्या झुडुपांचा वाफा होता. ती फुलझाडे किंवा खालची जमीन यापैकी काहीच विस्कटलेले दिसत नव्हते. किंवा खालील हिरवळीवरदेखील काही खुणा दिसत नव्हत्या. त्यामुळे रोनाल्डनेच दार लावले असावे, असे वाटत होते. पण तो जर मेला होता, तर मग त्याने दार कसे लावले? खिडकीतून वर चढून कोणी आले असेल, तर मागे काही खुणा सोडलेल्या दिसल्या असत्या. एखाद्याने खिडकीतून गोळी झाडली असती, तरी इतकी नेमकी व जोराने जखम होण्याइतकी

लागणे अवघड होते. शिवाय पार्क गल्ली तशी गजबज असलेली होती. घरापासून शंभर यार्डावर, एक गाडी उभी होती. पिस्तुलाचा आवाज कुणी ऐकला नाही. तरीही तत्काळ मरण येईल, इतक्या जोराने आवाज न करता गोळी झाडली गेली होती. अशी एकंदरीत पर्ल गल्लीतील गूढ खुनाची कहाणी होती. खुनाचा हेतू काय ते कळत नव्हते व मी म्हटल्याप्रमाणे, तरुण रोनाल्डला कुणी शत्रू असल्याचेही माहिती नव्हते. खोलीतून काही पैसे किंवा किंमती ऐवज चोरल्याचेही दिसत नव्हते.

दिवसभर मी या गोष्टी मनात परतपरत आठवून पहात होतो, जेणेकरून काही तर्कसंगती सापडेल आणि माझ्या गरीब बिचाऱ्या मित्राने काही बचावात्मक हालचाल केल्याच्या खुणा तरी, तपासाच्या सुरवातीस सापडतील. मला कबूल केले पाहिजे, की मी अगदीच थोडी प्रगती केली. मी संध्याकाळी बागेत फिरत होतो. सहाच्या सुमारास मी पार्क गल्लीच्या टोकाशी असणाऱ्या, ऑक्सफर्ड रस्त्याला पोचलो. फूटपाथवरील काही मवाली एका खिडकीकडे टक लावून बघत होते. मी पण त्या घराकडे पाहू लागलो. रंगीत चष्मा घातलेला एक बारीक माणूस मला साधे कपडे घातलेला गुप्तहेर असावा, असे वाटले. तो त्याचे काही विचार हिरीरीने मांडत होता व त्याच्याभोवती ऐकणाऱ्यांची गर्दी झाली होती. मी शक्य तेवढा त्याच्या जवळ गेलो. पण त्याचे निरीक्षण मला बेकार वाटले. मी वैतागून तेथून चालू पडलो. तेव्हा मी एका वयस्क बांधेसूद नसलेल्या माणसाला धक्का दिला. तो बाळगत असलेल्या पुस्तकांचा ढीग खाली पडला. मला आठवते की मी तो उचलायला लागल्यावर, त्यातले एक 'झाडांच्या पूजेचा इतिहास' असे असल्याचे मला दिसले. तो गरीब मनुष्य पुस्तकप्रेमी असणार, असे मला वाटले. तो एक व्यापारी म्हणून किंवा छंद म्हणून, अशी अनाकलनीय पुस्तके घेऊन चालला होता. मी त्याची क्षमा मागितली. पण दुर्दैवाने माझा धक्का लागून पडलेली ती पुस्तके त्याच्या दृष्टीने फार मूल्यवान असल्याचे लक्षात येत होते. चिडून मोठ्याने गुरगुरत, तो वळला आणि त्याचे पांढरे केस व वाकलेली पाठ गर्दीत नाहीशी झाली.

४२७ पार्क गल्ली येथील माझ्या निरीक्षणाने, मला रुची असलेली समस्या सोडवण्यास थोडी मदत झाली. हे घर रस्त्यापासून पाच फुटापेक्षा जास्त उंच नसलेल्या बुटक्या भिंतीच्या कुंपणाने, अलग केलेले होते. त्यामुळे तिथून बागेत येणे सोपे होते. पण खिडकी तशी चढून येण्यास अवघड होती. कारण तिथे कोणी माणूस चढून येऊ शकेल, असे कुठल्याही प्रकारचे खांब नव्हते. मी केसिंग्टनकडे परत आलो व माझ्या अभ्यासिकेत बसून पाच मिनिटे होतात न होतात, तोच नोकराणी सांगत आली की एक मनुष्य मला भेटायला आलेला आहे. आश्चर्य म्हणजे तो माझा धक्का लागून ज्याची पुस्तके पडली तोच होता. त्याचा उठावदार पण सुरकुतलेला चेहरा, पांढऱ्या केसांमधून डोकावत होता. त्याच्या उजव्या हातात डझनभर मोठी पुस्तके होती. त्याच्या विचित्र खर्जातील आवाजात तो बोलला, "सर, मला बघून तुम्हाला नवल वाटलेले दिसते आहे."

मी तसे झाले असल्याचे कबूल केले.

"मी तुमच्या मागून आलो व तुम्हाला या घरात शिरतांना पाहिले, तेव्हा माझ्या सद्सदविवेकबुद्धीला स्मरून, मी विचार केला की मी थोडा अडखळलो असेन, तर त्यात विशेष काही त्रास नव्हता. माझी पुस्तके तुम्ही उचलून दिल्याबद्दल मी तुमचे आभार मानावे, म्हणून आलो आहे."

"तुम्ही एवढ्याश्या गोष्टीसाठी उगीच तसदी घेतलीत. मी कोण आहे ते तुम्हाला कसे कळले?"

"सर, मी फार स्वातंत्र्य घेत नसेन, तर मी तुमचा शेजारी आहे. चर्च रस्त्याच्या कोपऱ्याला, माझे पुस्तकांचे छोटेसे दुकान आहे. तुम्हाला भेटून मला आनंद झाला. आता तुम्ही स्वतःला धक्क्यातून सावरा. तुमच्या पुस्तकांच्या दुसऱ्या कप्प्यातील जागा व्यवस्थित भरून काढायला माझ्याकडे कॅट्युलस व पवित्र लढाईचे पाच खंड, सूट मिळणाऱ्या किमतीला आहेत. तुमचे पुस्तकांचे कपाट त्यामुळे जास्त व्यवस्थित दिसेल, नाही का सर?"

माझ्यामागील कपाट बघण्यासाठी मी वळलो. जेव्हा मी परत वळलो, तेव्हा शेरलॉक होम्स टेबलापलीकडून माझ्याकडे हसत पहात उभा होता. मी उठून उभा राहिलो. काही सेकंद त्याच्याकडे निरखून पाहिले आणि मला वाटते आयुष्यात पहिल्यांदाच व शेवटचे, मी चक्कर येऊन पडलो. माझ्या डोळ्यासमोर करडे धुके तरळले. मी जागा झालो तेव्हा पाहिले, की माझी कॉलर सैल केलेली होती व माझ्या ओठांवर ब्रँडीची चव रेंगाळत होती. हातात जग घेऊन होम्स माझ्यावर ओणवा झालेला होता.

माझ्या आठवणीतील आवाज बोलला, "माझ्या प्रिय वॉटसन, मी तुझी हजारदा क्षमा मागतो. तुझ्यावर इतका परिणाम झाला असेल, अशी मला कल्पना नव्हती."

मी त्याला घट्ट मिठी मारली.

मी ओरडलो, "होम्स! हा खरच तू आहेस का? तू चक्क जिवंत आहेस?" त्या भीतीदायक भुयारातून तू यशस्वीपणे चढून येऊ शकलास का?"

तो म्हणाला, "क्षणभर थांब. या गोष्टींची चर्चा करायला तू बरा आहेस का? मी नाटकीपणे प्रगट होऊन तुला अकारण गंभीर धक्का दिलेला आहे."

"मी ठीक आहे. पण होम्स, माझा माझ्या डोळ्यांवर खरच विश्वास बसत नाही. अरे देवा! सगळ्या माणसांमधून तू ---- माझ्या अभ्यासिकेत उभा असावास, हे समजून घेणे अवघड आहे." मी परत मला चिमटा काढून बघितले. "तसेही तू काही भूत वाटत नाहीस. माझ्या प्रिय होम्स, तुला पाहून मला कमालीचा आनंद झालेला आहे. बस आणि मला सांग, की तू त्या भीतीदायक भुयारातून कसा काय जिवंत बाहेर आलास?

तो माझ्यासमोर बसला. त्याच्या नेहमीच्या शांतपणे सिगरेट पेटवली. तो पुस्तकविक्रेत्याच्या कोटात होता. त्याचे केस पांढरे व हातात पुस्तकांची चळत होती. पहिल्यापेक्षा

तो जास्त बारीक व उत्साही दिसत होता. त्याच्या गरुडासारख्या धारदार नाकाच्या चेहऱ्यावर, पांढुरकी मलूल छटा दिसत होती. त्याची तब्येत फार बरी नसल्याचे ती दर्शवित होती.

तो म्हणाला, "वॉटसन, मी स्वतःला ताणून पूर्वस्थितीत आणल्याने मला चांगले वाटत आहे. उंच माणसाला उंची एक फुटाने कमी करून खूप तास वावरणे त्रासदायकच होते. प्रिय मित्रा, स्पष्टीकरण म्हणून आपल्यासमोर असलेल्या कठीण व धोकादायक अशा रात्रीच्या कामासाठी, मला तुझे सहकार्य लागणार आहे. मला वाटते, कदाचित हे काम संपल्यावर मी तुला सारे स्पष्टीकरण दिलेले बरे पडेल."

"मला खूप उत्सुकता लागून राहिली आहे. मी सर्व काही आत्ताच ऐकणे पसंत करेन."

"तू आज रात्री माझ्याबरोबर येशील का?"

"तुला पाहिजे तिथे आणि पाहिजे तेव्हा."

"हे खरोखर पूर्वीसारखेच झाले. आपण जाण्यापूर्वी, छानसे जेवण करायला आपल्याला वेळ आहे. मग त्या भुयाराबद्दल! मला त्याच्याबाहेर यायला फार त्रास झाला नाही. त्याचे साधे कारण म्हणजे मी त्याच्या आत कधी गेलोच नव्हतो."

"आत गेलाच नव्हतास?"

"नाही, वॉटसन. मी त्याच्या आत कधीच नव्हतो. मी तुला पाठवलेली चिठ्ठी पूर्णपणे खरी होती. जेव्हा काहीतरी वाईट घडणार असल्याची पूर्वसूचना देते आहे असे वाटणारी मृत प्रोफेसर मोरीॲर्टीची आकृती, मी सुरक्षिततेकडे नेणाऱ्या अरुंद रस्त्यावर उभी असलेली पाहिली, तेव्हा माझी कारकीर्द संपुष्टात आल्याची माझी जवळजवळ खात्रीच झाली. त्याच्या करड्या डोळ्यात मला, आवरण्यास कठीण असा काही हेतू दिसला. मी त्याच्याशी बोलून एक चिठ्ठी लिहायची परवानगी मिळवली, जी मी तुला नंतर पाठवली. मी ती माझ्या काठी व सिगरेटच्या पेटीजवळ ठेवली आणि रस्त्याने चालत निघालो. मोरीॲर्टी माझ्याबरोबर होताच. मी शेवटी खाडीशी

आलो. त्याच्याकडे शस्त्र नव्हते पण पण तो माझ्या अंगावर धाऊन आला व माझ्या गळयात त्याचे लांब हात टाकले. पण त्याला कळले की त्याचा खेळ संपत आलेला आहे. फक्त त्याला माझ्यावर सूड उगवायची इच्छा उरली होती. आम्ही डुगडुगत दरीच्या अगदी कडेने चाललो होतो. मला मार्शल आर्टची ( ज्युडो, कराटेसारखा एक साहसी क्रीडाप्रकार ) किंवा रेसलिंग या जपानी पद्धतीची थोडीफार माहिती होती व त्याचा मला एकाहून जास्त वेळा उपयोग झाला होता. मी त्याच्या पकडीतून निसटलो. काही सेकंदाने तो मोठ्याने किंकाळी मारत, हवेत जोराने हात उंचावत. मला लाथ मारू लागला. पण त्याचा तोल गेला आणि तो पडला. भिंतीच्या कडेला माझा चेहरा नेऊन, मी त्याला खोल पडतांना पाहिले. मग तो एका खडकावर आदळला आणि पाण्यात पडला.

होम्सने सिगरेटच्या झुरक्यांमधून दिलेले त्याचे स्पष्टीकरण मी आश्चर्याने ऐकत राहीलो.

मी ओरडलो, "पण मी माझ्या डोळयांनी खालपर्यंत गेलेल्या व परत न फिरलेल्या खुणा पाहिल्या."

"झाले ते असे झाले. ज्या क्षणी प्रोफेसर नाहीसा झाला, तेव्हा माझ्या लक्षात आले की केवळ दैव बलवत्तर म्हणूनच मी वाचलो. मला माहिती आहे, की माझ्या मरणावर टपलेला मोरीॲर्टी हा एकमेव मनुष्य नव्हता. मला जखमी करायचा वा मारायचा बेत असलेले, अजून कमीत कमी तिघेजण होते व त्यांच्या म्होरक्याच्या मरणाने ते अधिकच चिडून उठले असणार. ते फार धोकादायक होते. त्यातील कुणा ना कुणाला मी सापडलो असतो. पण सर्व जगाची जर खात्री झाली असती, की मी मेलो आहे, तर ही माणसे त्यांना त्यांच्या नको त्या उद्योगांमुळे ओळखून कुणी अडकवेल, ही भीती नसल्याने समाजात मोकाट सुटतील व आज ना उद्या मी त्यांना ठार करू शकेन. मग मी जाहीर करू शकेन, की मी अजून जिवंत आहे. प्रोफेसर मोरीॲर्टी दरीच्या तळाशी पोचायच्या आत, मी हा सगळा विचार केला.

“मी उभा राहिलो व माझ्यामागील दगडी भिंतीची तपासणी केली. त्या बाबतीतले तुझे चित्रमय वर्णन मी काही महिन्यांनी वाचले, तेव्हा भिंत फक्त जोर देण्यासाठी बांधली गेल्याचे लक्षात आले. पण ते खरे नव्हते. काही छोटे जमिनीला समांतर असे भाग त्यातून बाहेर आलेले दिसत होते. सुळका तर इतका टोकदारपणे उंच गेलेला होता, की तो चढून जाणे अशक्यच होते आणि ओल्या रस्त्यावरून मागे पाउलखुणा न ठेवता वाट काढत जाणे, तेवढेच अशक्य होते. मला वाटते, अशा प्रसंगी मी करतो, तसे माझे बूट मी म्हणूनच उलटे केले होते. पण एका दिशेने जाणाऱ्या तीन चाकोऱ्या बघून, काही फसवणूक झाल्यासारखे वाटत होते. साकल्याने विचार करता, मी चढण्याचा धोका घ्यावा, हे उत्तम ठरले असते. वॉटसन, हे फार आनंददायी नव्हते. त्या दरीकडे बघून, भोवळ येईल की काय असे वाटत होते. मी कल्पनेच्या साम्राज्यात रमणारा माणूस नाही. पण खोलवरून मला मोरीॲर्टीच्या किंकाळ्या ऐकू आल्यासारखे वाटत होते. थोडीशी चूक झाली, तरी मृत्यू अटळ होता. बरेच वेळा गवताचा पुंजका माझ्या हातात येई किंवा खडकांमधील ओल्या फटींमधून पाय घसरे. मला वाटे, झाले. मी आता संपलो. पण मी झगडत झगडत वर जात राहीलो आणि शेवटी मला खोलवर एक पठारासारखा मऊ शेवाळ्याने भरलेला भाग लागला. तिथे मी आरामात कुणाला न दिसता झोपू शकत होतो. माझ्या प्रिय वॉटसन, त्याच वेळेस तू आणि तुझी माणसे मोठ्या चेंगट व दयनीय पद्धतीने मला कुठल्या परिस्थितीत मरण आले, त्याचा तपास करत होतात.

शेवटी तुम्ही तुमचे अटळ व पूर्णपणे चुकीचे निष्कर्ष काढलेत व हॉटेलकडे निघालात आणि मी एकटाच राहिलो. माझी अशी कल्पना होती, की माझे साहस आता संपत आले असावे. पण अचानकपणे मला असे आढळून आले, की अजून काही आश्चर्ये माझी वाट बघत आहेत. वरून पडणारा एक मोठा खडक माझ्या अगदी जवळून गेला आणि खोल दरीत पडला. मला वाटले, की तो अपघात होता. पण क्षणभराने वर बघतांना, मला अंधारू लागलेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर एका माणसाचे डोके दिसले. त्याने अजून एक खडक, मी उभा होतो त्या दिशेने भिरकावला. तो माझ्या डोक्यापासून फ़ूटभर अंतरावर पडला. याचा अर्थ उघड होता. मोरीॲर्टी

काही एकटाच नव्हता. त्याचा कंपू होता. त्यावरून तो किती धोकादायक होता, ते लक्षात येत होते. त्याने माझ्यावर हल्ला केला, तेव्हा त्याच्या मागे त्याची माणसे लक्ष ठेऊन होती. मला न दिसता त्यांनी मोरीअॅर्टी दरीत पडलेला पाहिला असणार. मग ते सुळक्यावर चढून गेले असणार व तेथून मला संपवायच्या हेतूने मोठे खडक खाली ढकलून दिले असणार.

"वॉटसन, हा विचार करायला मला फार वेळ लागला नाही. सुळक्यावर परत मला तो कठोर चेहरा दिसला. तो आता अजून एक खडक खाली पाडायच्या प्रयत्नात असल्याचे मला कळले. मी घाईने कसाबसा रस्त्याने खाली येऊ लागलो. मला वाटत नाही, की मी ते थंडपणे केले असेल. वर चढण्यापेक्षा ते शंभरपटीने जास्त अवघड होते. पण मला धोक्याचा विचार करायला वेळ नव्हता. मी त्या पठाराच्या कडेला हाताने धरून उतरत असतांना, अजून एक खडक माझ्या जवळून गेला. अर्धे अंतर उतरून आल्यावर मी घसरू लागलो, पण देवकृपेने मी ख्ररचटत, रक्त गळत, रस्त्याला लागलो. मी अंधारातून पळत सुटलो. दहा मैल पळालो. आठवड्यानंतर मला असे आढळले, की मी फ्लॉरेन्समध्ये आहे. माझे काय झाले, हे जगात कुणालाही माहिती नसल्याबद्दल, माझी खात्री होती.

"माझ्या प्रिय वॉटसन, मी तुझी माफी मागतो. माझा विश्वासू असा एकच माणूस होता -- तो म्हणजे माझा भाऊ, मायक्रॉफ्ट. मी मेलोच होतो आणि हे नक्की होते की तुला ते सर्व खरे असल्याचे वाटल्याशिवाय, तू इतक्या खात्रीलायक रीत्या माझ्या दुःखांताचा तपशील दिला नसतास. गेल्या तीन वर्षात अनेक वेळा मी तुला लिहिण्यासाठी, म्हणून पेन उचलले. पण माझे गुपित फुटेल या भीतीने, मी तुझे माझ्यावरील प्रेम आठवून, तुला अंधारात ठेवण्याच्या मोहाला बळी पडलो. आज संध्याकाळी तू जेव्हा माझी पुस्तके उचलत होतास, तेव्हा मी तुझ्यापासून लांब निघून गेलो. तेव्हा माझा धोक्याचा काळ चालू होता आणि तू एकदम काही आश्चर्योद्गार काढला असतास, तर मी उघडा पडलो असतो. त्यामुळे काही नको असे, वाईट परिणाम घडले असते. मला मायक्रॉफ्टवर विश्वास ठेऊन माझ्याबद्दल खरे सांगणे भाग होते. कारण मला त्याच्याकडून

पैसे हवे होते. मला आशा होती, त्याप्रमाणे लंडनमधील घटना घडल्या नाहीत. कोर्टातील सुनावणीमध्ये, मोरीॲर्टीच्या टोळीतील माझा सूड घेण्यास टपलेले दोन मोठे धोकादायक सभासद सुटले. मी दोन वर्षे तिबेटमध्ये काढली. मी ल्हासाला भेट देऊन व मुख्य लामाबरोबर काही दिवस राहून, छान वेळ घालवला. उल्लेखनीय सफरी करणाऱ्या नॉर्वेजियन सिंगेरसन याचे नाव तू ऐकले असशील. पण म्हणजे तू माझ्याबद्दलच्या, तुझ्या या मित्राबद्दलच्या, बातम्या ऐकत होतास, हे तुला माहिती नव्हते. मग मी पर्शियाला गेलो. मक्का पाहिली. खार्टुमच्या खलिफाशी माझी भेट, फारच बहारदार ठरली. मी परदेशी कार्यालयाला त्याचा वृतांत दिला. फ्रान्सला परतताना मी दक्षिणेकडील मॉन्टपेलीअरला काही महीने राहून, कोळशापासून बनणाऱ्या पदार्थांवरील संशोधनाला माझा वेळ दिला. त्यात मला पुरेसे समाधान मिळाल्यावर व आता माझ्या शत्रूंपैकी एकजणच लंडनमध्ये राहीला असल्याचे समजल्याने, मी इथे परतायच्या बेतात होतो. तेव्हा पार्क लेनच्या गूढ केसने माझे लक्ष वेधून घेतले. त्यामुळे मी घाईने परतायची हालचाल केली. ती केस मला फक्त आव्हानात्मक वाटली एवढेच नव्हे, तर त्यामुळे मला व्यक्तिशः विशिष्ट प्रकारच्या संधी मिळतील असे वाटले. मी ताबडतोब लंडनला आलो. मिसेस हडसनला रानटीपणे आश्चर्याच्या भावनातिरेकात लोटून, बेकर रस्त्यावरील माझ्या घरी अवतीर्ण झालो. मायक्रॉफ्टने माझी जागा व माझी कागदपत्रे नेहमी असत, तशीच नीट राखून ठेवली होती. वॉटसन, तेव्हा अशा तऱ्हेने मी दोन वाजता, माझ्या जुन्या जागेतील माझ्या आवडत्या हातवाल्या खुर्चीत येऊन स्थानापन्न झालो आहे. मी एवढीच इच्छा करत होतो की माझा जुना मित्र वॉटसन याने इथे येऊन त्याच्या नेहमीच्या माझ्यासमोरील खुर्चीत बसावे."

एप्रिलमधील त्या संध्याकाळी मी होम्सचे एवढे उल्लेखनीय कथन ऐकले. त्यावर विश्वास ठेवणे, मला कठीण जात होते. परंतु मी परत पाहू शकणार नाही असे वाटणारी होम्सची उंच वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती व उत्सुक, वेधक चेहरा पाहिला, तेव्हा माझा त्याच्या कहाणीवर विश्वास बसला. मला जाणवणारा त्याचा उदास विरह त्याच्या लक्षात आल्यामुळे त्याने शब्दांऐवजी त्याच्या हावभावांमधून सहानुभूती दाखवण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, "वॉटसन, काम करत

रहाणे, हाच दुःखावरचा उत्तम उपाय आहे. आणि आज रात्री माझ्याकडे आपल्या दोघांकरता छोटेसे काम आहे. जर आपला निष्कर्ष बरोबर असेल, तर या पृथ्वीतलावरील त्या माणसाच्या आयुष्याला न्याय मिळेल." मी फुकटच त्याला अजून काही सांगायला सांगितले. तो उत्तरला, "सकाळपूर्वी तुला याबद्दल पुरेसे समजेल व दिसेल. साडेनऊ पर्यंत, आपल्याला गेल्या तीन वर्षांबद्दल पुरेसे बोलता येईल. नंतर आपण रिकाम्या घराच्या उल्लेखनीय साहसाबद्दल चर्चा करायला सुरवात करू."

टांग्यात त्याच्याशेजारी मी बसलो आहे, माझ्या खिशात पिस्तुल आहे आणि हृदयात साहस करण्याची ऊर्मी भरलेली आहे, असे जुन्या काळासारखे मला वाटत होते. होम्स थंड, शांत होता. रस्त्यावरील दिव्यांचा प्रकाश त्याच्या टोकदार नाक डोळ्यांच्या चेहऱ्यावर पडत होता. त्यामुळे त्याच्या विचारमग्न अशा मुद्रेवरील भुवया खाली वळलेल्या दिसत होत्या. पातळसर ओठ दाबले गेले होते. मला कल्पना नव्हती की कुठल्या जंगली पशूची शिकार करायला, आम्ही लंडनमधील गुन्हेगारांच्या गर्द अरण्यात चाललो होतो. या चतुर शिकाऱ्याच्या आविर्भावांवरून मला खात्री होती की साहस फारच भयंकर होते -- पण त्याच्या ओठांवर समाधानाचे हास्य झळकताना पाहून मला आमच्या मोहिमेचे हेतू, थोडे चांगले असावे असे वाटत होते.

माझी अशी कल्पना होती की आमचे साहस बेकर रस्त्यापुरते मर्यादित असेल पण होम्सने टांगा कॅव्हेंडीश चौकाच्या अलीकडे थांबवला. त्याने टांग्याबाहेर पाऊल ठेवले, तेव्हा त्याने मोठ्या शोधक नजरेने उजवीकडे व डावीकडे पाहिले. प्रत्येक रस्त्याच्या कोपऱ्यावर तसाच दृष्टीक्षेप टाकून त्याने त्याचा पाठलाग होत नसल्याचे, काळजीपूर्वक पद्धतीने पाहिले. आमचा मार्ग थोडा वेगळाच होता. लंडनच्या गल्ल्याबोळांचे होम्सचे ज्ञान, असामान्य प्रकारचे होते. या प्रसंगी तो तबेले व तबेले मोडून केल्या गेलेल्या घरांच्या जाळयामधून, मनाशी खात्री बाळगत, जोराने चालला होता. इथे असा काही भाग आहे, हे मला माहितीदेखील नव्हते. शेवटी आम्ही एका, जुनी धुरकट घरे असलेल्या, लहानशा रस्त्याला लागलो. तिथून मँचेस्टर व ब्लांडफोर्ड रस्ता लागत होता. तिथे

एका अरुंद वाटेशी टांगा हळूच वळला व एका लाकडी दरवाज्यातून आत शिरून, सुनसान रिकाम्या जमिनीवर थांबला. तिथून एक दार किल्लीने उघडून आम्ही एका घराच्या मागील दाराशी आलो. आम्ही दोघे आत शिरल्यावर, त्याने आमच्या मागे ते दार लाऊन घेतले.

ती जागा पूर्णपणे अंधारी होती. ते रिकामे घर असल्याचे मला समजले. उजाड लाकडी तक्तपोशीवर आमची पाऊले, कुरकुर वाजत होती. एका भिंतीमधून चिंध्या झालेला कागद लोंबत होता. तिथे माझा हात लागला. होम्सच्या बारीक थंड बोटांचा वेढा माझ्या मनगटाभोवती पडला. तो मला पुढे खालील बाजूस असलेल्या लांबलचक हॉलमध्ये घेऊन गेला. तिथे मला दरवाज्यावरील अंधुक उजेडात धुरकट चौकोनी खिडकी दिसली. इथे होम्स अचानक उजवीकडे वळला आणि आम्ही एका चौकोनी, मोठ्या. रिकाम्या खोलीत आलो. त्याचे कोपरे अंधारलेले होते. पण रस्त्यावरील दिव्यांनी मध्यभाग थोडासा उजळलेला होता. तिथे जवळ दिवा नव्हता व खिडकी धुळीने माखलेली होती. त्यामुळे आम्हाला एकमेकांच्या पुसट आकृत्या फक्त जाणवत होत्या. माझ्या मित्राने माझ्या खांद्यावर हात ठेवला व त्याचे ओठ माझ्या कानाजवळ आणून तो कुजबुजला,

“आपण कुठे आलो आहोत, तुला कळले का?”

मी अंधारी खिडकीकडे निरखून बघत म्हटले, “नक्की हा बेकर रस्ता आहे.”

“बरोबर. आपण आपल्या जुन्या घराच्या समोर असलेल्या, कॅम्डेन घरात आहोत.”

“पण आपण इथे का आलो आहोत?”

“कारण इथून त्या चित्रातल्यासारख्या घराचे दृष्य छान दिसू शकेल. माझ्या प्रिय वॉटसन, मी तुला अशी विनंती करतो की तू बाहेरून दिसणार नाहीस अशी काळजी घेऊन, थोडा अजून खिडकीजवळ ये. आता तू तुझ्या छोट्या परीकथांची सुरवात असलेल्या, आपल्या खोल्यांकडे

बघतोस का? आपण बघूया की मी इथे नसलेल्या तीन वर्षांमध्ये, तुला आश्चर्यचकित करण्याची माझी शक्ती नाहीशी झालेली आहे की काय!"

मी पुढे सरकून ओळखीच्या खिडकीकडे पाहिले. माझी दृष्टी त्यावर पडताच, नवल वाटून व दुःखाने माझे तोंड उघडे पडले. खिडकीचे पडदे खाली केलेले होते. आणि खोलीत प्रखर दिवा जळत होता. खुर्चीत बसलेल्या माणसाची सावली खिडकीच्या प्रकाशित तावदानावर पडली होती. त्या डौलदार व नखरेल माणसाचे डोके, खांद्यांचा रुंदपणा व त्याची एकंदर वैशिष्ट्ये ठळकपणे दिसत होती. त्याचा चेहरा अर्धवट वळलेला होता. त्याची काळी आकृती माझ्या आजोबांच्या आवडत्या फोटोफ्रेमसारखी दिसत होती. हे पूर्णपणे होम्सचे काम होते. तो तोच होता का? मी इतका आश्चर्यचकित झालो, की होम्स माझ्याशेजारी उभा आहे का, याची खात्री करायला मी माझा हात लांब केला. तो शांतपणे हसत होता.

तो म्हणाला, "कसे काय?"

मी ओरडलो, "अरे बापरे! हे फारच छान आहे."

तो म्हणाला, "काळ किंवा रीतीरिवाज माझी अमर्याद विविधता, शिळी करू शकत नाहीत. हे खरच माझ्यासारखे आहे, नाही का?" एखाद्या कलाकाराला स्वतःच्या कलाकृतीत असावा तसा आनंद व अभिमान, त्याच्या आवाजात जाणवत होता.

"मी शपथेवर सांगतो, की तो तूच होतास."

"हे मी ग्रेनोबलच्या ऑस्कर म्युनिअरमुळे करू शकलो. तो काही दिवस साचा बनवत होता. तो मेणात बनवला गेला होता. बाकीचे मी आज दुपारी बेकर रस्त्याला आल्यावर केले."

"पण का?"

माझ्या प्रिय वॉटसन, ते मी या बळकट कारणासाठी केले, की मी इथे नसलो तरी मी इथे आहे, असे काही लोकांना वाटावे, अशी माझी इच्छा होती."

आणि तुला वाटत होते, की खोलीवर कुणीतरी नजर ठेऊन आहे?"

"मला कुणीतरी नजर ठेऊन असल्याचे, माहिती होते."

"कोण?'

"माझे जुने शत्रू, वॉटसन. ज्यांचा म्होरक्या रायचेनबाक दरीत चिरनिद्रा घेत होता ती टोळी, तुला नक्कीच आठवत असणार. फक्त त्यांना आणि त्यांनाच माहिती होते, की मी अजून जिवंत आहे. आज ना उद्या मी माझ्या खोलीवर परतेन, असा त्यांचा विश्वास होता. म्हणून ते सतत लक्ष ठेऊन असत. आणि आज सकाळी त्यांनी, मला आलेले बघितले."

"तुला कसे कळले?"

"कारण मी खिडकीतून बाहेर पाहिले, तेव्हा मला त्यांचा एक सैनिक पाळत ठेऊन उभा असलेला दिसला. तसा त्याच्यापासून काही धोका नाही. त्याचे नाव पार्कर आहे. त्याचा व्यवसाय गुन्हेगारांना गिलोटिनची शिक्षा देणे हा असून, तो हार्प नावाचे वाद्य उत्तम वाजवू शकतो. मी त्याची काही पर्वा करत नाही. पण त्याच्यामागे असलेल्या, मोरीॲर्टीचा जिवलग मित्र असलेल्या, कड्यावरून माझ्यावर मोठे खडक ढकलणाऱ्या, शक्तिमान भीतीदायक व्यक्तींची पर्वा करतो. तो लंडनमधील सर्वात लबाड व धोकादायक गुन्हेगार आहे. वॉटसन, तो मनुष्य आज रात्री माझ्या मागावर आहे आणि आपण त्याच्या मागावर असलेले, त्याला मुळीच माहिती नाही."

माझ्या मित्राचे बेत हळूहळू मला समजत होते. या सोयीस्कर बेतामुळे, टेहेळणी करणाऱ्यांवर, नजर ठेवली जात होती व पाठलाग करणाऱ्यांचा पाठलाग केला जात होता. ती टोकदार सावली म्हणजे माशाला पकडायचा गळ होता आणि आम्ही शिकारी होतो. आम्ही अंधारात शांतपणे एकत्र उभे होतो आणि आमच्या समोरून घाईघाईने परतपरत हलणाऱ्या आकृत्यांकडे, लक्ष ठेऊन होतो. होम्स स्तब्ध व शांत होता. पण तो दक्ष होता, हे मी नक्की सांगू शकतो. येणाऱ्याजाणाऱ्यांवर तो नजर रोखून होता. ती सुनसान, पण आमच्यासाठी वादळी रात्र

होती. लांबलचक रस्त्याने वाऱ्याचा सूं सूं आवाज येत होता. खूप लोक येतजात होते. बहुतेकांनी कोट व मफलर घातला होता. एकदोनदा मला असे वाटले, की मी त्यापैकी एक आकृती पूर्वी पाहिलेली आहे. रस्त्यावर काही अंतरावरील एका घराच्या दारात दोन माणसे वाऱ्यापासून स्वतःचा बचाव करतांना दिसत होती. मी होम्सचे लक्ष तिकडे वेधण्याचा प्रयत्न केला. पण त्याने थोडा अधीरपणा दाखवून, पुन्हा रस्त्यावर नजर ठेवायला सुरवात केली. काही वेळा त्याने भिंतीवर बोटे ठेऊन हातापायांची भरभर हालचाल केली. तो अस्वस्थ बनत चालल्याचे मला कळत होते. त्याला जशी अपेक्षा होती त्याप्रमाणे, त्याचे बेत सफल होत नव्हते. शेवटी जसजशी मध्यरात्र जवळ येऊ लागली व रस्ता सुनसान झाला तसतसा तो अस्वस्थ होऊन रागारागाने खोलीत फेऱ्या मारू लागला. मी त्याच्यावर काही शेरेबाजी करायच्या विचारात होतो. जेव्हा मी प्रकाशित खिडकीकडे माझे डोळे वळवले, तेव्हा मला पूर्वीसारखेच आश्चर्य वाटले. मी होम्सचा हात पकडून वर दाखवले.

“मी ओरडलो, “सावली हलते आहे.”

खरोखर लगेच सावलीची पाठ वळून त्याचे तोंड आमच्याकडे झाले.

तीन वर्षात नक्कीच त्याच्या स्वभावातील आक्रमकता कमी झाली नव्हती. किंवा त्याच्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेतील अधीरपणाची धार कमी झाली नव्हती.

तो म्हणाला, “अर्थातच ती हलली. वॉटसन, मी इतका अपरिपक्व मूर्ख नाही आहे, की मी माझा खोटा पुतळा बनवेन व त्याला युरोपमधील हुशार मनुष्य फसेल. आपण या खोलीत येऊन दोन तास झाले. आणि मिसेस ह्डसनने त्या पुतळ्यात आठ वेळा किंवा दर पाऊण तासाने बदल केले. ती ते पुढून करते आहे. म्हणजे तिची सावली कधीच दिसणार नाही. आहा!” त्याने एक अस्फुट उद्गार काढून श्वास रोधला. मंद प्रकाशात मी पाहिले, की तो सावरून बसलेला आहे व पूर्ण लक्ष देऊन त्याने डोके पुढे झुकवले आहे. बाहेर रस्त्यावर चिटपाखरू देखील नव्हते. ती दोन माणसे अजूनही गुडघ्यात वाकून, दक्षतेने दरवाज्याजवळ उभी होती. पण नंतर ती दिसेनाशी

झाली. सर्वत्र अंधार व स्थिरता होती. फक्त आमच्यासमोरच्या पिवळ्या धमक पडद्यावर मध्यभागी काळ्या आकृतीची बाह्यकडा दिसत होती. नीरव शांततेत परत मी पातळ कुजबुजता आवाज ऐकला. दबक्या अधीरतेने काही बोलणे चालू होते. क्षणभराने त्याने मला खोलीच्या अंधाऱ्या कोपऱ्यात ओढले. माझ्या ओठांवर ठेवलेल्या त्याच्या हाताने, मला गप्प बसण्याची सूचना मिळाली. माझ्या ओठांवर ठेवलेली त्याची बोटे थरथरत होती. माझ्या मित्राला इतका हादरलेला, मी कधीच पाहिले नव्हते. अजूनही आमच्या समोरील रस्ता सुनसान व स्तब्ध होता. अचानक मला काही जाणवले, जे त्याने आधीच ओळखले होते. बेकर रस्त्याच्या बाजूने नव्हे तर आम्ही ज्या घरात होतो त्याच्याच मागील बाजूने. माझ्या कानावर हळू, चुपचाप आवाज आला. एक दार उघडले व बंद झाले. खालील पॅसेजमधून पदरव ऐकू येऊ लागला. तो खरे तर हळू असणे अपेक्षित असावे. पण रिकाम्या घरात त्याचा प्रतिध्वनी उमटत होता. होम्स भिंतीच्या कडेला मागे सरकला. मीही तसेच केले. माझ्या पिस्तुलावर माझा हात गेला. उघड्या दारातील अंधारापेक्षा जास्त काळा असलेल्या माणसाची, पुसट आकृती मला दिसली. क्षणभर उभा राहून दबकत, दबकत तो धोकादायकपणे पुढे आला. काहीतरी नको ते घडणार अशा आविर्भावात तो आमच्यापासून तीन यार्डावर माझ्यावर पकड घेणार, त्यासाठी मी तयार राहिलो. पण त्याला आमच्या अस्तित्वाची कल्पना नसल्याचे, माझ्या लक्षात आले. तो आमच्या जवळून गेला. खिडकीजवळ अर्ध्या फूटावर जाऊन आवाज न करता, उभा राहिला. रस्त्यावरील दिव्यांचा उजेड धुळकट तावदानावर पडून, पुसटपणे त्याच्या चेहऱ्यावर पडला. तो माणूस उत्कंठेने भारून गेला होता. त्याचे दोन डोळे चांदण्यांसारखे चकाकत होते. तो विचित्रपणे झटपट हालचाली करत होता. तो वयाने मोठा मनुष्य होता. त्याचे मोठे कपाळ टक्कलातून आत गेलेले असून, नाक पातळ व बाहेर आलेले होते. त्याच्या मिशा भरघोस असून, त्यातून करडे केस डोकावत होते. त्याच्या डोक्यावर नाटकातल्यासारखी मागे गेलेली टोपी होती. त्याच्या मोठ्या उघड्या कोटातून, संध्याकाळचा शर्ट डोकावत होता. त्याचा चेहरा काळा व त्रासलेला होता. त्यावर खोल रानटी सुरकुत्या होत्या. त्याच्या हातात काठीसारखे काहीतरी होते. पण त्याने ती जमिनीवर ठेवल्यावर,

त्यातून धातूसारखा आवाज येत होता. मग त्याने त्याच्या मोठ्या कोटातून एक मोठी वस्तू काढली. एक स्प्रिंग किंवा कडी त्यातून पडल्यासारखे वाटले. मग तो गुडघ्यात वाकून जमिनीवर ओणवा होऊन त्याचे सर्व वजन व शक्ती एका तरफेवर लाऊन काही कृती करू लागला. त्यामुळे एक दीर्घ घुमणारा कर्कश आवाज येऊ लागला व शेवटी एक मोठा दोन वस्तू एकमेकांवर आदळल्यासारखा आवाज येऊन तो थांबला. तो ताठ झाला. मग मला त्याच्या हातात पिस्तुलासारखे काही दिसले. उत्सुकतेने काही वाईट घडवण्याचे विचार, त्याच्या डोक्यात चालू असावेत. त्याने मागून पिस्तुल उघडले. बहुतेक त्यात गोळ्या भरल्या व खटका दाबला. मग वाकून त्याने खिडकीच्या बाजूवर पिस्तुलाचे टोक ठेवले मग मला त्याच्या वर वळलेल्या लांब मिशा दिसल्या. त्याचे डोळे इकडे तिकडे बघतांना, चमकत असलेले पाहिले. मी समाधानाचा एक सुस्कारा ऐकला. त्याने पिस्तुलाचा मागचा भाग त्याच्या खांद्याजवळ धरला आणि आश्चर्याने त्याच्या नजरेच्या शेवटच्या टप्प्यात असलेला, त्याचे लक्ष्य असलेला काळा माणूस पिवळ्या जमिनीवर पाहिला. क्षणभर तो पाय घट्ट रोवून स्तब्ध उभा राहिला. मग त्याने पिस्तुलाचा चाप घट्ट केला. तिथे खळकन काच फ़ूटल्याचा विचित्र मोठा आवाज आला. त्याच क्षणी होम्सने वाघासारखी त्या माणसाच्या अंगावर उडी मारली आणि त्याच्या चेहऱ्यावर जोराने वार केला. क्षणार्धात त्याने पूर्ण ताकदीने होम्सच्या मानेला धरले. पण मी त्याच्या डोक्यावर पिस्तुलाच्या मागील बाजूने प्रहार केला. तो जमिनीवर पडला. मी त्याच्यावर ओणवून त्याला धरून ठेवले. तेव्हा माझ्या मित्राने जोरात शिट्टी वाजवली. धावणाऱ्या पायांचा आवाज ऐकू येऊ लागला व गणवेषातील दोन पोलीस व साध्या कपड्यातील एक गुप्तहेर पुढच्या दाराने खोलीत घुसले.

होम्स बोलला, “लेस्ट्रेड, तू आलास?”

“हो. मिस्टर होम्स. मी स्वतःच आलो. सर, तुम्हाला लंडनला परत आलेले बघून चांगले वाटते आहे.”

मला वाटते लेस्ट्रेड, तुला थोडी खासगी मदत हवी आहे. एका वर्षात तीन तीन खून? असे चालणार नाही. पण तू मोलेसेची गूढ केस तुझ्या नेहमीच्या पद्धतीपेक्षा -- म्हणजे तू ती फार चतुरपणे हाताळलीस."

आम्ही सर्वजण उठून उभे राहिलो. आमचा कैदी धापा टाकत होता. त्याच्या दोन्ही बाजूला प्रामाणिक, विश्वासू कॉन्स्टेबल उभे होते. रस्त्यावर आधीच बघ्यांची गर्दी व्हायला सुरवात झाली होती. होम्सने खिडकी बंद केली व पडदा ओढून घेतला. लेस्ट्रेडने दोन मेणबत्त्या आणल्या व पोलिसांनी त्यांचे कंदील बाहेर काढले. मला शेवटी आमच्या कैद्याकडे नीट बघता आले. तो भयंकर शक्तिमान तरीही दुष्ट भासणारा चेहरा होता. तो आमच्याकडे वळला. एखाद्या तत्वज्ञासारख्या भुवया आणि कामप्रवण माणसासारखा जबडा असलेला हा माणूस, नक्की चांगले वाईट करण्याची प्रचंड क्षमता असलेला होता. पण त्याच्या त्या पापी झुकत्या पापण्यांच्या दुष्ट निळ्या डोळ्यांकडे, ठळक भुवयांकडे किंवा उद्दाम व धमकीवजा नाकाकडे बघवत नव्हते. ते निसर्गाचे जणू साधे पण धोकादायक द्योतकच होते. त्याने आमच्यापैकी कुणाकडेच लक्ष दिले नाही पण त्याचे सूडाने व आश्चर्याने पेटलेले डोळे होम्सवर खिळलेले होते. तो पुटपुटत होता, "अरे राक्षसा! हुशार राक्षसा!"

त्याची सुरकुतलेली कॉलर नीट करत व जुन्या नाटकातील वाक्याचा पुनरुच्चार करत होम्स म्हणाला, "ओहो कर्नल! शेवटी प्रेमिकांच्या भेटण्याने प्रवास संपतो. रायचेनबाक दरीच्या कडेने मी चालत असल्यापासून, तू माझ्याकडे जे लक्ष दिले होतेस, त्यानंतर तुला भेटण्याचा योग मला आला नाही."

अजूनही कर्नल तारवटल्यासारखा व गुंगीत असल्यासारखा माझ्या मित्राकडे बघत होता. "अरे राक्षसा! हुशार राक्षसा!" एवढेच तो बोलू शकत होता.

होम्स बोलला, "मी अजून तुझी ओळख करून दिली नाही. हा सभ्य गृहस्थ म्हणजे एके काळी राणीच्या भारतीय सैन्यात असलेला, कर्नल सेबेस्टियन मोरान. हा आपल्या पूर्वेकडील साम्राज्यातील सर्वात उत्तम शिकारी व नेमबाज! कर्नल, मला विश्वास आहे की मी सांगतो आहे ते

बरोबर आहे. तू शिकार केलेल्या वाघांची बरोबरी अजून कोणीही करू शकलेला नसेल, नाही का?"

तो वयस्क भयानक मनुष्य काही बोलला नाही. पण अजून तो टक लाऊन माझ्या मित्राकडे बघत होता. रानटी डोळ्यांनी व दाट मिशांनी तो एखाद्या वाघासारखा दिसत होता.

होम्स म्हणाला, "शत्रूला नामोहरम करण्यासाठीच्या माझ्या बेताने वयस्क शिकारीदेखील फसला. हे सगळे तुझ्या खूपच ओळखीचे आहे. मागे तू एका मुलाला दोरीने झाडाला बांधून त्याच्यावर पिस्तुल रोखले होतेस आणि वाघ येण्याच्या तुझ्या पैजेची वाट बघत बसला होतास, नाही का? हे रिकामे घर म्हणजे माझे झाड आहे आणि तू माझा वाघ आहेस. तुझ्याबरोबर बरेच वाघ असतील व तेवढीच पिस्तुले असतील असे मला वाटत होते. पण तसे नसल्यामुळे तुझ्या स्वतःच्या सावजावर तुलाच लक्ष केंद्रित करावे लागले." आजूबाजूच्या लेस्ट्रेड व इतर पोलिसांकडे निर्देश करत तो म्हणाला, "ह्या माझ्या बंदुका आहेत. दोन्ही गोष्टी तंतोतंत सारख्या आहेत."

कर्नल मोरानने रागाने गुरगुरत पुढे उडी मारली. पण कॉन्स्टेबलनी त्याला मागे खेचले. त्याचा रागावलेला चेहरा बघायला भयानक वाटत होता.

होम्स म्हणाला, "मी कबूल करतो की तू मला थोडे आश्चर्यचकित केले आहेस. मला असे वाटले नव्हते की तू स्वतःहून या रिकाम्या घराचा व या सोयीस्कर अशा पुढच्या खिडकीचा वापर करशील. रस्त्यावर तुझी वाट बघत लेस्ट्रेडची माणसे उभी आहेत. सर्वस्व गमावल्याची माझी अपेक्षा असतांना, पोलीस तेवढे माझ्या मदतीला आलेले आहेत.

कर्नल मोरान नेमलेल्या गुप्तचराकडे वळला.

तो म्हणाला, "तुझ्याकडे मला अटक करायचे योग्य असे कारण असेल किंवा नसेल. पण मी या व्यक्तीची अपमानकारक शेरेबाजी ऐकून घेण्याचे काही कारण, मला तरी दिसत नाही. जर मी कायदा मोडला असेल, तर सर्व काही कायदेशीर मार्गाने झाले पाहीजे."

लेस्ट्रेड म्हणाला, “हे पुरेसे योग्य वाटते आहे. मिस्टर होम्स, आम्ही इथून जाण्यापूर्वी तुम्हाला काही सांगायचे आहे का?”

होम्सने जमिनीवरून शक्तिमान एअरगन उचलली व त्याची रचना बघू लागला.

तो बोलला, “हे एकमेव व स्तुत्य असे शस्त्र आहे. आवाजरहित व खूप शक्तिशाली! मला आंधळा मशीनदुरुस्ती करणारा जर्मन, व्हॉन हर्डर माहिती होता. मृत प्रोफेसर मोरीॲर्टीने सांगितल्यावरून, त्याने ती तयार केली होती. गेली खूप वर्षे मला ती अस्तित्वात असल्याचे माहिती होते. पण मला ती हाताळायची संधी कधी मिळाली नव्हती. लेस्ट्रेड, ह्या बंदुकीकडे व तिच्या गोळ्यांकडे मी तुझे खास असे लक्ष वेधू इच्छितो.”

“मिस्टर होम्स, आम्ही तिची निगा राखू, याबद्दल विश्वास ठेवा. अजून काही सांगायचे आहे?” एवढे बोलून ते सगळे दाराकडे वळले.

“एवढेच विचारायचे होते, की तुम्ही त्याच्यावर कुठला गुन्हा लावणार?”

“कुठला गुन्हा? का सर, अर्थात मिस्टर शेरलॉक होम्सच्या खुनाचा प्रयत्न करणे हाच गुन्हा.”

“नाही लेस्ट्रेड, मला या भानगडीत स्वतःला ओढवून घ्यायचे नाही. तू त्याला अटक केलीस, हे तुझे आणि फक्त तुझेच उल्लेखनीय असे हुशारीचे काम आहे. हो लेस्ट्रेड, मी तुझे अभिनंदन करतो. तुझ्या नेहमीच्या भलते धोके पत्करण्याच्या व लबाडीच्या आनंदी एकत्रितपणे तू त्याला पकडले आहेस.”

“पकडले! कोणाला पकडले, मिस्टर होम्स?”

सगळे पोलीसदल ज्याला व्यर्थ शोधते आहे तो -- मागील महिन्यातील तीस तारखेला आदरणीय रोनाल्ड अडेअरला, ४२७ पार्क गल्लीच्या दुसऱ्या मजल्यावरील उघड्या खिडकीतून एअरगनने ज्याने जोरात गोळी झाडली, तो कर्नल सेबॅस्टीयन मोरान. तो त्याचा गुन्हा आहे, लेस्ट्रेड. आणि आता वॉटसन, तुला अडेअरच्या मोडक्या खिडकीतून मिळालेला, काही नावे व

आकडे लिहिलेला कागद तू लेस्ट्रेडला दिलास तर मग कामच झाले. तर मला वाटते आता अर्ध्या तासात, माझ्या अभ्यासिकेत सिगरेट ओढतांना, तुला गुन्हेगाराच्या अटकेची काही करमणूक पहायला मिळेल."

मायक्रॉफ्ट होम्सच्या निगराणीने व मिसेस हडसनने अलीकडे घेतलेल्या काळजीमुळे, आमची जुनी जागा होती तशीच राखली गेली होती. मी तिथे आत शिरलो, तेव्हा मी तिथे कधी नाही एवढी टापटीप पाहिली. पण पूर्वीच्या सर्व वस्तु जागच्या जागी होत्या. तिथे रासायनिक प्रयोगांचा कोपरा होता. आम्लाचे डाग पडलेले टेबल होते. आसपास रहाणाऱ्या नागरिकांनी आनंदाने जाळून टाकली असती, अशी भीती वाटेल अशी छोटी पुस्तके व मोठमोठी संदर्भ पुस्तके तेथील मांडणीत होती. चित्रविचित्र आकृत्या, व्हायोलीनची पेटी आणि परीक्षानळयांची ओळ -- हे सगळे मी माझ्याभोवती नजर टाकताच, दृष्टीस पडले. खोलीत रहाणारे दोघेजण होते -- एक, आम्ही आत शिरल्याबरोबर आमच्यावर कटाक्ष टाकणारी, मिसेस हडसन व दुसरा संध्याकाळच्या साहसामध्ये महत्वाची भूमिका बजावलेला, तो होम्सचा विचित्र पुतळा! तो माझ्या मित्राचा मेणाचा रंगीत पुतळा होता. तो स्तुत्य रित्या इतका हुबेहूब केला होता व छोट्या टेबलावर होम्सचा ड्रेसिंग गाऊन घालून ठेवला होता. त्यामुळे रस्त्यावरून बघणाऱ्याला तिथे होम्स बसलेला आहे असेच वाटे.

होम्स म्हणाला, "मिसेस हडसन, मला अशी आशा आहे की तुम्ही सर्व प्रकारे काळजी घेतलेली आहे."

"मी तुम्ही सांगितल्याप्रमाणे, गुडघ्यांवरुन रांगत तिथे जात असे."

"उत्तम. तुम्ही फार मस्त काम केले आहे. गोळी कुठे लागली होती, हे काही तुम्हाला दिसले का?"

"हो, सर. तुमच्या पुतळ्याची छाती त्यामुळे बिघडून गेली आहे. कारण तो नेम सरळ डोक्यातून गेला आणि भिंतीवर जाऊन धडकला. मी ती गोळी गालीच्यावरून उचलली."

होम्सने ती गोळी मला दाखवली. “वॉटसन, तुझ्या लक्षात आले असेल की ही सहज घडी होणाऱ्या पिस्तुलाची गोळी आहे. यात डोकेबाजपणा दिसतो आहे. कारण एअरगनमधून अशी गोळी मारली जाण्याची अपेक्षा, कोण करू शकेल? मिसेस हडसन, ठीक आहे. तुमच्या मदतीबद्दल मी आभारी आहे. वॉटसन, आणि आता मला तुला तुझ्या जुन्या खुर्चीत बसलेले पाहू दे. कारण मला तुझ्याशी चर्चा करण्यासाठी पुष्कळ मुद्दे आहेत.

त्याने कोट काढून टाकला व पुतळ्यावरील त्याचा जुना काळसर रंगाचा गाऊन काढून घातला. पुतळ्याचे तुटके फ़ूटके कपाळ पाहून तो हसून म्हणाला, “जुन्या शिकाऱ्याच्या नसांमधील स्थिरता व डोळ्यांमधील चाणाक्षता अजून गेलेली नाही. डोक्याच्या मागील बाजूस मध्यभागातून गोळी जाऊन मेंदूला फटकारा बसला. तो भारतातील सर्वात उत्तम नेम होता. माझी अपेक्षा आहे की लंडनमध्ये अजून काही याहून बरे मारलेले नेम असू शकतील. तू ते नाव ऐकले आहेस का?”

“नाही, मी ऐकले नाही.”

“ठीक आहे. ठीक आहे. इतका प्रसिध्द! जर मला बरोबर आठवत असेल तर शतकातील कमालीचा हुशार असलेल्या प्रोफेसर जेम्स मोरीआर्टीचे नाव तू ऐकलेले नाहीस. मला मांडणीमधून चरित्रांची सूची काढून दे.”

खुर्चीवर मागे रेलून बसत व सिगरेटची धूम्रवलये सोडत आळशीपणे त्याने सूचीची पाने चाळली.

तो म्हणाला, “माझ्या संग्रहात मो या अक्षराबद्दलची माहिती अगदी परिपूर्ण आहे. मो या अक्षरासाठी मोरीआर्टी हा पुरेसा प्रातिनिधिक स्वरूपाचा होता. विष देणारा मॉर्गन, नैतिक गोष्टींची चाड व आठवण नसणारा मेरीड्यू, चेरिंग क्रॉसच्या प्रतीक्षागृहात माझ्या डाव्या सुळयावर गुद्दा मारणारा मॅथ्यु आणि शेवटी आपला आज रात्रीचा पाहुणा.”

त्याने पुस्तक माझ्या हातात दिले व मी वाचू लागलोः

मोरान सेबेस्टीयन, कर्नल. बेकार. माजी बंगलोरच्या मूळ संस्थापकांपैकी एक. १८४० मध्ये लंडनला जन्मलेला. एके काळी पर्शियामधील माजी ब्रिटीश मुख्यमंत्री असलेल्या सर ऑगस्टसचा मुलगा. इटॉन व ऑक्सफर्ड येथून शिकलेला. जोवाकी व अफगाण मोहिमेतील चॅरॅसिआब (पत्रवितरण करणारा), शेरपूर, व काबूल येथे काम केलेला.

पश्चिम हिमालयातील शक्तीचे खेळ (१८८१), जंगलातील तीन महिने (१८८४) या पुस्तकांचा लेखक, पत्ताः कॉनड्युइट रस्ता. क्लबः अँग्लो इंडियन, टँकेर्व्हील, बॅगाटेल पत्ते क्लब. समासात होम्सच्या वैशिष्ट्यपूर्ण अक्षरात लिहीले होतेः

लंडनमधील नंबर दोनचा धोकादायक मनुष्य.

पुस्तक परत देत मी म्हणालो, "हे आश्चर्यकारक आहे. एक चांगला सैनिक म्हणून, या माणसाचे व्यावसायिक आयुष्य आहे."

होम्स उत्तरला, "खरे आहे. काही अंशी त्याने चांगले काम केले. तो कसा एका नरभक्षक वाघामागे कोरड्या तळयात हळूहळू उतरला, ही गोष्ट भारतात अजून सांगितली जाते. तो नेहमीच निधड्या छातीचा होता. वॉटसन, काही झाडे ठराविक उंचीपर्यंतच वाढतात व नंतर अचानक त्यांच्यात काही अभूतपूर्व असा विचित्रपणा दिसून येतो. असेच तुला माणसांमध्ये देखील बघायला मिळेल. माझी अशी उपपत्ती आहे, की प्रत्येक व्यक्ती त्याच्या वाढीच्या वयात, पूर्वजांच्या पूर्ण आयुष्यातील प्रक्रियांचे प्रतिनिधित्व करते. आणि अचानक असा चांगला किंवा वाईट बदल होणे, हे सांस्कृतिक, पिढीजात संस्कार व त्यांच्या परिणामांवर बरेचसे अवलंबून असते. मनुष्याचे गुणावगुण व एकंदरीत व्यक्तिमत्व हे त्याच्या कुटुंबाच्या इतिहासाशी अनुकूल असे असते."

"हे नक्कीच कल्पनेच्या पलीकडील आहे."

“हो. पण मी काही त्याचा आग्रह धरत नाही. कारण काही असेल, पण कर्नल मोरान चुकीचे वागू लागला. काहीही खुले प्रकरण न करता, त्याने स्वतःला भारतात रहाणे अशक्य करून घेतले. तो निवृत्त होऊन लंडनला परत आला. तिथेही त्याने स्वतःचे नाव बद्दू करून घेतले. याच वेळी प्रोफेसर मोरीआर्टीने त्याला शोधून काढले, त्याच्यासाठी काम करणाऱ्यांचा, तो कधी काळी तेथील प्रमुख होता. मोरीआर्टीने त्याला उदारपणे पैसे दिले. आणि साध्यासुध्या गुन्हेगाराने केले नसते, अशा फक्त एक दोन महत्वाच्या कामात त्याला वापरुन घेतले. तुला १८८७ मधील लॉडरच्या मिसेस स्टेवर्टचा मृत्यू आठवत असेल. नाही आठवत? ठीक आहे. पण माझी खात्री आहे की त्यापाठीमागे मोरानच होता. पण ते सिद्ध करता आले नाही. इतक्या हुशारीने कर्नलने ते लपवले होते, की मोरीआर्टी टोळी फ़ूटली, तेव्हादेखील त्याला दोषी ठरवता आले नाही. तुला ती तारीख आठवत असेल, जेव्हा मी तुला तुझ्या खोलीत बोलावून एअरगनच्या भीतीने शटर्स बंद करून घ्यायला लावली होती. तू हे माझे काही काल्पनिक तर्क असल्याचे, म्हणाला होतास. मी काय करतो आहे, हे मला नक्की माहिती होते. कारण या उल्लेखनीय एअरगनबद्दल व त्यामागे दुनियेतील एक उत्तम नेमबाज असल्याचे देखील, मला माहिती होते. जेव्हा आम्ही स्विझर्लंडमध्ये होतो, तेव्हा तो मोरीआर्टीबरोबर आमच्या मागे आला. आणि तो तोच होता ज्याने मला रायचेनबाक दरीतील ती पापी पाच मिनिटे दिली. मी फ्रान्समध्ये माझ्या तात्पुरत्या निवासात खूप लक्ष देऊन कागदपत्रे वाचली असतील, असे तुला वाटले असेल. पण तो तिथे गुप्तपणे आला आहे की काय व त्याला कसे जेरबंद करता येईल, याचाच मी विचार करत होतो.. लंडनमध्ये तो मोकळा होता, तोपर्यंत माझे आयुष्य पणाला लागलेले होते. रात्रंदिवस माझ्यावर मरणसावली पडलेली होती. आणि केव्हातरी त्याने संधी घेतलीच असती. मी काय करू शकत होतो? त्याला बघितल्याबरोबर मी त्याच्यावर गोळी झाडू शकत नव्हतो. नाहीतर मला हद्दपार केले गेले असते. जज्जला विनंती करूनही काही उपयोग नव्हता. त्यांना वाटणाऱ्या रानटी संशयाच्या आधारे, ते काही करू शकत नव्हते. त्यामुळे मीही काही करू शकत नव्हतो. पण मी गुन्हेगारांच्या कारवायांवर लक्ष ठेऊन होतो. केव्हा ना केव्हा ते माझ्या तावडीत सापडतील, याची मला खात्री

होती. नंतर रोनाल्ड अडेअरचा मृत्यू झाला. शेवटी मला संधी मिळाली. मी काय केले हे समजल्यावर, हे नक्की नव्हते का, की कर्नल मोराननेच तो खून केलेला आहे? तो त्या मुलाबरोबर पत्ते खेळला. त्याचा पाठलाग करत क्लबपासून त्याच्या घरी पोचला आणि उघड्या खिडकीतून त्याला टिपले. याबद्दल काही संशय नव्हता. फक्त बंदुकीतील गोळ्या त्याची मान फासात अडकवायला पुरेशा होत्या. मी ताबडतोब आलो. माझ्या घरावर पाळत ठेवलेल्या सैनिकाने मी तिथे आल्याचे, कर्नलला सांगितल्याचे मला कळले. माझे अचानक परत येणे, त्याने केलेल्या खुनाशी संबंधित असल्याचे, त्याला नक्कीच समजले. त्यामुळे तो चांगलाच सावध झाला. तो मला त्वरेने त्याच्या वाटेतल्या काट्यासारखे दूर करायला बघणार, हे मी खात्रीपूर्वक समजून चुकलो. त्याचे खून केलेले हत्यार त्यासाठी तो आणणार, हे देखील मी जाणले. मी खिडकीमध्ये त्याच्यासाठी माझ्या पुतळ्याची चांगली सोय करून ठेवली आणि कदाचित पोलीसांची जरुरी भासेल, असे त्यांना कळवून ठेवले. वॉटसन, तसेही तू ते दाराशी आल्याचे बिनचूकपणे जाणलेस -- मी चांगल्या निरीक्षणांती, स्वप्नरंजन करत न बसता, असा अंदाज केला की तो तीच जागा हल्ला करण्यासाठी निवडणार नाही. माझ्या प्रिय वॉटसन, आता मी स्पष्ट करायचे काही राहिले आहे का?"

मी म्हणालो, "हो. तू हे स्पष्ट केले नाहीस, की आदरणीय रोनाल्ड अडेअरला मारायचा कर्नल मोरानचा हेतू काय होता?"

"अरे माझ्या प्रिय वॉटसन, अपुरी माहिती खरीखुरी समजून काढलेल्या निष्कर्षाच्या बाबतीत अगदी तर्कशुध्द मनदेखील चुकू शकते. प्रत्येकजण वर्तमान काळातील पुराव्यांवरून आपापली गृहीतके बनवत रहातो आणि तुझे मत वेगळे असले, तरी माझ्याइतकेच खरे असू शकते."

"तू तुझे एक मत बनवले आहेस का?"

"मला वाटते, जे आहे ते स्पष्ट करणे फारसे कठीण नाही. कर्नल मोरान व तरुण अडेअर यांच्यामधील खेळात, बरेच पैसे जिंकले गेले. मोरान निःसंशय लबाडीने खेळला -- ते मला खूप

काळ माहिती आहे. माझा असा विश्वास आहे की खून झाला त्या दिवशी, अडेअरला मोरान त्याला फसवत असल्याचे समजले. असे झाले असेल, की तो खासगीत हे बोलला आणि मोरानने स्वतःहून क्लबचे सभासदत्व रद्द केले नाही, तर त्याला उघडे पाडायची धमकी दिली. शिवाय त्याच्याकडून पुन्हा पत्ते न खेळण्याचे वचनही घेतले. पण त्याच्याहून वयाने बराच मोठा असलेल्या व प्रसिध्द असलेल्या माणसाला उघडे पाडून, तरुण अडेअर स्वतःला बेकार प्रकरणात गुंतवून घेईल, अशी मुळीच शक्यता वाटत नव्हती. बहुधा मोरानने तसे नाटक केले असेल. लबाडीने पत्ते खेळून जगणाऱ्या मोरानसाठी, क्लबमधून माघार घेणे, म्हणजे नाश पावणे होते. त्यामुळे त्याने अडेअरचा खून केला. अडेअरचा भिडू त्याच्याशी लबाडीने खेळल्याने, त्याला काही फायदा होत नव्हता. ही रक्कम किती असावी, म्हणजेच त्याला किती रक्कम भरावी लागणार आहे, याचा विचार अडेअर करत होता. आईने व बहिणीने त्याला मध्येच येऊन त्याच्या चाललेल्या हिशेबात त्रास देऊ नये आणि तो नाण्यांनी व कागदावर लिहिलेल्या नावांनी काय करतो आहे, हे सांगायला भाग पाडू नये, म्हणून त्याने दार कुलुपबंद केले. पण तो बेत सफल झाला का?

“माझी खात्री आहे, की तू सत्य शोधून काढले आहेस.”

“कोर्टाच्या सुनावणीत ते कळेल, की त्यावर शिक्कामोर्तब केले जाते आहे की खोटे ठरवले जाते आहे. कसेही झाले तरी आता, कर्नल मोरान आपल्याला त्रास देणार नाही. व्हॉन हर्डरची प्रसिध्द एअरगन स्कॉटलंड यार्ड संग्रहालयाची शोभा वाढवेल आणि लंडनच्या गुंतागुंतीच्या आयुष्यात येणाऱ्या छोट्या छोट्या खास समस्या सोडवण्यासाठी, परत एकदा शेरलॉक होम्स त्याचे आयुष्य खर्ची घालू शकेल.”

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. वृषाली जोशी यांचे हे बारावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. डॉ. वृषालींसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२१ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (५ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (७), डॉ. वृषाली जोशी(१२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

*आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।*
*दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।*